ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | कॅ. मोडक स्मारक ग्रंथ |
| संपादक | : | ग. सी. पेंडसे |
| लेखक | : | द. वा. पोतदार, न. चिं.केळकर, दि. वि. काळे, दा. न. शिखरे, मो. ना. नातू, दि. ह. लिमये |
| प्रकाशक | : | कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९४३ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

# कॅप्टन् मोडक

## स्मारक-ग्रंथ

संपादकः

**डॉ. ग. सी. पेंडसे,**

डी. ओ. एम. एस.

355.92

355.92
Pen
1694

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00940

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २



कॅ. ग. वा. मोडक

ॐ

# कॅ. मोडक-स्मारक-ग्रंथ

संपादक

**डॉ. ग. सी. पेंडसे**

डी. ओ. एम्. एस्.

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

लेखक

| | |
|---|---|
| प्रो. द. वा. पोतदार. | श्री. न. चिं. केळकर. |
| श्री. दि. वि. काळे. | श्री. दा. न. शिखरे. |
| डॉ. मो. ना. नातू. | प्रो. दि. ह. लिमये. |

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २.

प्रकाशक :
मंगेश नारायण कुलकर्णी,
कर्नाटक पब्लिशिंग हाउस,
मुंबई २.

प्रथमावृत्ति १९४३
सर्व हक्क स्वाधीन

म / २२८

मुद्रक :
लक्ष्मण सखाराम केळकर,
जनार्दन सदाशिव लि., चा प्रेस,
३९४, सदाशिव पेठ, पुणें २.

# संपादकीय हृद्गत

हा स्मारक-ग्रंथ वाचकांचे हातीं देण्यास आम्हांस अतिशय आनंद होत आहे. जागतिक युद्धपरिस्थितीचे पडसाद सध्यां या देशांतील लोकांच्या एकंदर जीवनावर, मागील कित्येक पिढ्यांत जितक्या जोरानें उमटले नसतील इतक्या जोरानें, उमटत आहेत. स्वभावतःच शांतताप्रिय, निवृत्तीपर व सहिष्णु अशा हिंदी संस्कृतिच्या रक्तांत न सामावणाऱ्या कित्येक गोष्टींचे समाजावर आघात होत आहेत. जगावर स्वाभिमानानें जगावयाचें असल्यास 'राष्ट्रांचें लष्करीकरण करा' असा पुकार सर्वत्र दुमदुमत असून या हाकेला उभे न राहिल्यास जागतिक लष्करी सामर्थ्याच्या वरवंट्याखालीं आपली चटणी होईल अशी भीति प्रत्येक विचारवंत माणसांस भेडसावीत असल्यास नवल नाहीं. आणि यांतूनच प्रथम सैनिकीकरणाच्या ( Militarisation ) ओरडीचा जन्म झाला. अर्थात् हिंदी सैन्याचें हिंदीकरण ( Indianisation ) जितकें पूर्णत्वास जाईल; तितका या सैनिकीकरणाचा गाडा पुढें लोटला जाणार आहे. परंतु हिंदीकरणाबरोबरच जर राष्ट्रीय वृत्तीची जोपासना किंवा राष्ट्रीयकरणाचे ( Nationalisation ) प्रयत्न झाले नाहींत, तर हिंदीकरणाचें रहस्यच नाहींसें होईल हा इशारा येथें देणें आगत्याचे वाटतें. राष्ट्रीय वृत्तीच्या कणखर पायावरच हिंदीकरणाची व तदंगभूत सैनिकीकरणाची इमारत उभी राहिली, तरच हिंदी राष्ट्रीय सैन्याचें सुखस्वप्न दृष्टिपथांत येऊं शकेल.

तेव्हां अशा वेळीं उत्कृष्ट हिंदी सैनिक कसा असावा, याचें उत्तम आधुनिक उदाहरण लोकांच्या नजरेपुढें आणून, हिंदी राष्ट्रीय सैन्याची, राष्ट्रीय स्वाभिमान व स्वत्वरक्षण या दृष्टीनें उभारणी करण्यास कोणते मार्ग चोखाळणें आवश्यक आहे, याची रूपरेषा कार्यकर्त्यांच्या नजरेसमोर आणावी, अशा दुहेरी हेतूनें आम्ही हा ग्रंथ अशा सर्वतोपरी कठीण काळांतही लोकांच्या हातीं देण्याचें धाडस करीत आहों. या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर ग्रंथ शक्य तितका माहितीपूर्ण व उद्बोधक करण्याचा प्रयत्न केला आहे.

शिवाय सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीनुरूप उत्पन्न झालेल्या सैनिकीकरण व राष्ट्रीय आघाडीसारख्या चळवळींतही हा ग्रंथ उपयुक्त व मार्गदर्शक होईल अशी आम्हांस उमेद आहे.

व्यक्तिगत व परिस्थितीच्या मर्यादा आणि अडचणी लक्षांत आणून यांतील उणीवांकडे वाचक दुर्लक्ष करतील अशी आशा बाळगणें वावगें होणार नाहीं. आणि ग्रंथप्रकाशनाचा उद्देश सतत डोळ्यापुढें ठेऊन या ग्रंथाचा परामर्ष घेतल्यास याचें महत्त्व व उपयुक्तता सहज ध्यानांत येईल. गुणदोषांचे विवेचन व चर्चा यापेक्षां या ग्रंथामुळें जरी एका जिज्ञासू कार्यकर्त्याला योग्य मार्गदर्शन झालें तरी आमच्या सर्व श्रमांचें चीज व सार्थक होईल यांत शंका नाहीं.

शेवटीं ह्या ग्रंथांत ज्या अनेक विद्वान् व्यक्तीनीं लेख लिहिले आहेत त्यांचे आम्ही ऋणी आहों. प्रस्तुत ग्रंथाचे प्रारंभापासूनच या सर्वांनीं आत्मीयतेनें शेवटपर्यंत शक्य ते परिश्रम केले, यांतच या कार्याचें महत्त्व सर्वांना पटलें असें आम्ही समजतों. श्रीमंत सरदार बाबासाहेब बिवलकर यांनीं प्रस्तुत कार्यांत मोठ्या कळकळीनें लक्ष घालून प्रारंभापासूनच जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. मध्यप्रांताचें माजी मुख्य प्रधान व सध्याच्या व्हॉइसरॉयच्या कौन्सिलचे सभासद डॉ. खरे यांनीं मोठ्या आनंदानें प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें, याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. "हा ग्रंथ इंग्रजींत झाला, तर याची उपयुक्तता कितीतरी पटीनें वाढेल" अशी सूचना पुष्कळांकडून आली; आणि भविष्यकालांत जर जरूर ती सर्व जुळवाजुळव झाली तर ही गोष्ट शक्यही होईल. याहिपेक्षां कै. मोडक यांच्या लष्करी इतिहासावरील अप्रकाशित हस्तलिखितांचें प्रकाशन झाल्यास ती सर्व दृष्टीनीं विशेष उचित अशी गोष्ट होईल यांत शंका नाहीं. अर्थात्, यांत चांगल्या अनुभवी व अभ्यासू वृत्तीच्या लष्करी अधिकाऱ्यानें लक्ष घालून, कै. मोडकांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेऊन, परिश्रम केले तर तें एक मोठें राष्ट्रहिताचें कार्य होणार आहे. आणि अशा ध्येयनिष्ठेनें परिश्रम करणारा जर एकही हिंदी अधिकारी हें कै. मोडकांचें कार्य पूर्ण करण्यास न मिळाला, तर तें देशाचें दुर्भाग्यच म्हटले पाहिजे.

या ग्रंथाचे कार्यास सुरवात होऊन जवळ जवळ दोन वर्षे होत आलीं. या अवधींत जरूर ती माहिती मिळविण्याकरितां पुष्कळ मंडळींच्या प्रत्यक्ष भेटी घ्याव्या लागल्या. ज्यांना प्रत्यक्ष भेटणें अशक्य होते, अशा ठिकाणीं पत्रव्यवहार करावा लागला. परंतु ज्या सर्वांनीं मोठ्या आपुलकीनें ही माहिती पुरविली त्यांचे आम्ही आभार मानतो. कामाच्या सुरुवातीपासूनच विशेष आस्थेनें यांत लक्ष पुरविणाऱ्यांपैकीं आमचे मित्र व कॅ. मोडकांचे आप्त रा. गाडगीळ, वैमानिक, हे अपघातानें दिवंगत झाले, हें नमूद करण्यास आम्हांस फार दुःख होत आहे. कर्नाटक प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. मंगेशराव कुलकर्णी यांनीं हें प्रकाशन आपल्या अंगावर घेतल्याबद्दल व जनार्दन सदाशिव लि. प्रेसचे चालक श्री. ग. ना. जोशी व व्यवस्थापक श्री. ल. स. केळकर यांनीं मर्यादित वेळांत हें काम उरकल्याबद्दल त्यांचें आभार मानणें अगत्याचें आहे.

अखेरीस ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें हें कार्य आज सिद्धीस जात आहे त्याचें स्मरण करून व हा अल्पसा प्रयत्न, मिलिटरी लायब्ररी, आर्मी ॲसोसिएशन अशांसारख्या एकाद्या मोठ्या योजनेस प्रोत्साहक ठरो, अशी आशा प्रगट करून हें संपादकीय पुरें करतों.

पुणें
ता. २५–११–४३

— डॉ. ग. सी. पेंडसे.

# प्रस्तावना

कै. कॅ. गणपतराव मोडक यांच्या विषयींच्या या स्मृतिग्रंथाला प्रस्तावना लिहिण्यांत विशेष आनंद वाटतो. कारण, या ग्रंथाचें स्वरूप केवळ व्यक्तिप्रधान नसून, त्यांत कॅ. मोडक यांच्या व्यक्तिपेक्षां त्यांनीं आमरण निष्ठेनें केलेल्या कामगिरीवरच जास्त भर दिलेला आहे, हें या ग्रंथांतील लेखांवरून स्पष्ट दिसतें. कॅ. मोडक हे हिंदी लष्करी प्रश्नाशीं जणुं तादात्म्य पावलेले होते; व त्या प्रश्नाच्या आधुनिक अंगोपांगांचा व्यासंग जसा त्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक केलेला होता, त्याचप्रमाणें स्वराज्यांतील जुन्या लष्करी पद्धतीचेंहि त्यांचें ज्ञान मार्मिक होतें, हें त्यांच्या 'प्रतापगडचें युद्ध' या ग्रंथावरून कोणाच्याही लक्षांत येईल. त्यामुळें हिंदुस्थानाची जुनी लष्करी परंपरा, ब्रिटिश आमदानींतील हिंदी लष्कराचें स्वरूप व राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें त्याच्या पुनर्घटनेचे मार्ग, या तिन्हीं बाबींचा उत्कृष्ट परामर्ष त्यांनीं आपल्या 'Indian Defence Problem' या पुस्तकांत घेतला असल्याचें आढळतें. त्या दृष्टीनें त्यांच्या संबंधींच्या या स्मृतिग्रंथांत विद्वानांच्या लष्करी प्रश्नांवरील लेखांचा समावेश करण्यांत यावा, हें अगदीं उचित होय.

हिंदी लष्कराच्या पुनर्घटनेचा प्रश्न हा दिसतो तितका साधा किंवा सरळ नाहीं. चालू महायुद्ध सुरू झाल्यापासून आपण एक विधान गेलीं तीनचार वर्षें सतत ऐकत आलों आहोत. तें असें कीं, "हिंदुस्थान हा दोस्त राष्ट्रांचा पूर्वेकडील लष्करी तळ आहे." हें विधान चालू युद्ध सुरू झाल्यापासून वारंवार ऐकूं येत असलें, तरी ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून गेलीं शंभर वर्षें खरोखरी हा देश ब्रिटिश सरकारचा पूर्वेकडील लष्करी तळच होऊन बसला आहे. आणि हिंदुस्थानांतील लष्कराच्या आड जर कोणती गोष्ट येत असेल, तर ती हीच होय. ब्रिटिश सरकार हिंदी लष्कराचा उपयोग केवळ हिंदुस्थानाच्या रक्षणासाठींच करतें असें नव्हें, तर एकंदर सर्व पूर्वेकडे म्हणजे आशियांत आणि आफ्रिकेंत त्यांचे जे राजकीय व्यापारी व आर्थिक हितसंबंध पसरलेले आहेत, त्यांच्या रक्षणासाठींहि हिंदी सैन्याचा उपयोग करावयाला ब्रिटिश सरकार मागेपुढें पहात नाहीं.

किंबहुना हिंदी लष्कर हें ब्रिटिश सरकारच्या पूर्वेकडील हितसंबंधाचे रखवालदार आहे, असेंहि म्हटलें तरी शोभेल. सायमन कमिशनच्या रिपोर्टांत ही गोष्ट स्पष्टपणें नमूद केलेली आहे. त्या रिपोर्टांत असें म्हटलेलें आहे कीं, हिंदुस्थानाच्या संरक्षणाचा प्रश्न हा साम्राजाचा प्रश्न आहे. वायव्य सीमाप्रांत ही हिंदुस्थानाची अशी एक खुष्कीची सरहद्द आहे कीं, जिच्यावर कोणतेंहि दुसरें बलाढ्य राष्ट्र चढाई करूं शकेल. म्हणून लोकनियुक्त सरकारच्या ताब्यांत असलेल्या हिंदी सैन्याच्या हातीं त्याच्या रक्षणाचा प्रश्न सोपवितां येणार नाहीं. ( The effective defence of India is an imperial question; the N. W. F. of India is the one-land frontier of India in the empire which is open to attack by a great power. Its defence, therefore, cannot be left to an Indian army administered and directed by a popularly elected government. ) सायमन कमिशनच्या या विधानांत हिंदी लष्कराच्या हिंदीकरणाच्या मार्गांतील अडचणीचें खरें मर्म अगदी स्पष्ट शब्दांत सांगून टाकलेलें आहे.

पण, सुदैवानें चालू महायुद्धांत आलेल्या अनुभवामुळें हिंदी लष्कराच्या हिंदीकरणाच्या मार्गांतील या अडचणी दूर होण्यासारखी परिस्थिती उत्पन्न झाली आहे. हिंदुस्थानाचें काय किंवा ब्रिटिश सरकारच्या पूर्वेकडील इतर साम्राज्याचें काय, संरक्षण एकटे इंग्लंड करूं शकत नाहीं, ही गोष्ट उघड आहे. ब्रिटिशांच्या पूर्वेकडील साम्राज्याचें संरक्षण जर कळकळीनें आणि कसोशीनें व्हावयाला हवें असेल, तर तें साम्राज्याच्या त्या त्या भागांतील लोकांनीच स्वयंस्फूर्तीनेंच केलें पाहिजे, हा धडा चालू युद्धानें ब्रिटिश सरकारला अगदी निःसंदिग्धरीतीनें शिकविला. इतकेंच नव्हे, तर साम्राज्याच्या त्या त्या भागांतील लोकांत उत्कट युद्धोत्साह उत्पन्न व्हावयाला हवा असेल, तर त्यांना स्वराज्याचे हक्कहि मोठ्या प्रमाणांत बहाल करणें जरूर आहे, ही गोष्टहि या युद्धानें ब्रिटिश सरकारच्या गळीं उतरविली आहे, असें अनुमान करण्यास जागा आहे. सारांश, साम्राज्यांतील सर्व देशांना जास्तींत जास्त प्रमाणांत स्वराज्य देणें, व अशारितीनें स्वदेशरक्षण आणि साम्राज्यरक्षण या दोहोंविषयीं त्यांच्यांत उत्साह उत्पन्न करून त्यांची

लष्करी संघटना करणें हें युक्त आहे आणि इष्ट आहे, हे दोन नवे राजकीय सिद्धांत चालू युद्धाच्या अनुभवांतून निष्पन्न झाले आहेत. ऐन युद्धाच्या धुमश्चक्रींत क्रीप्ससाहेबांनीं हिंदुस्थानांत घाइघाईनें येऊन केलेली शिष्टाई आणि हिंदी लष्कराचें सध्या आपोआप होत असलेलें हिंदीकरण या दोन्ही गोष्टी या नव्या सिद्धांताच्या निदर्शक आहेत.

अर्थात् हिंदी लष्कराचें हिंदीकरण हें यापुढें क्रमप्राप्त आहे, व त्याचा विचार करतांना "इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम" या आपल्या ग्रंथांत कॅ. मोडक यांनीं जी त्याची चर्चा केलेली आहे, तिचा उपयोग सरकारलाही झाल्याशिवाय रहाणार नाहीं. या युद्धानें लष्कराच्या हिंदीकरणाचा प्रश्न जसा सुटण्याच्या बेतांत आला आहे, तसाच दुसराहि एक विवाद्य प्रश्न कायमचा निकालांत काढलेला आहे. गेलीं शंभर वर्षें हिंदुस्थानांतील जातींचे लष्करी व बिनलष्करी असे दोन मनःपूत भेद कल्पून होतां होईल तों पंजाब्यांचीच आणि शक्य तितकी जास्त मुसलमानांची भरती लष्करांत करण्याचें सरकारचें धोरण होतें. पण युद्धकलेला आतां इतकें कांहीं शास्त्रीय आणि यांत्रिक स्वरूप प्राप्त झालें आहे कीं, अवजड अशा धिप्पाड शरीराचें धूड बाळगणाऱ्या पंजाब्यापेक्षां काटक, चपळ, बुद्धिमान् आणि कष्टाळू असा मराठा किंवा मद्रासीमनुष्यच या नव्या वैज्ञानिक युद्धकलेंत अधिक वाकबगार आणि उपयुक्त ठरण्याचा संभव आहे. तेव्हां लष्कराच्या हिंदीकरणाच्या किंवा पुनर्घटनेच्या प्रश्नाचा विचार करतांना यापुढें लष्करी आणि बिनलष्करी जातींचा जुना खुळचट भेदभाव फारसा नडणार नाहीं; व उत्तरेकडील धिप्पाड शरीराच्या जाडजूड लोकांप्रमाणेंच बारीक पण काटक अंगकाठीच्या दक्षिणेकडील लोकांनाही लष्करांत भरपूर वाव मिळेल अशी खात्री वाटते. शिवाय संरक्षणातही मुलकी आणि लष्करी असे दोन प्रकार अलिकडील वैज्ञानिक युद्धकलेमुळें निर्माण झालेले असल्यामुळें काटक आणि धिप्पाड अशा दोन्ही प्रकारच्या जातींना देशसंरक्षणाच्या कामी भरपूर वाव मिळण्याचा संभव आहे. सिव्हिल डिफेन्स म्हणजे मुलकी संरक्षण व डिफेन्स म्हणजे संरक्षण हीं दोन्हीं खातीं हिंदी मंत्र्याच्या हातीं सोपविलेलीं आहेत हेंही या प्रश्नाचा विचार करतांना लक्ष्यांत घेण्यासारखें आहे.

ज्याप्रमाणें स्वदेशीच्या प्रश्नाकडे महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीच प्रथम लक्ष वेधलें त्याप्रमाणें हिंदी लष्करी प्रश्नाकडेहि महाराष्ट्रीय पुढाऱ्यानींच प्रथम लक्ष पुरविलें. आणि या प्रश्नावर महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी जितका जोर दिला तितका इतर प्रांतांतील पुढाऱ्यांनी दिला नाहीं असेंहि म्हटलें तरी चालेल. कदाचित् महाराष्ट्राची परंपरा या गोष्टीला कारण असेल. कारण कोणतेहि असो, पण सर रघुनाथ परांजपे, डॉ. मुंजे, बॅ. सावरकर, किंवा कै. कॅ. मोडक यांच्यासारख्या महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांनीच लष्कराच्या हिंदीकरणाच्या प्रश्नांत चिकाटीनें मन घालून, निदान महाराष्ट्रांत तरी चांगली कामगिरी केली आहे, यांत शंका नाहीं. मी स्वत: ज्यावेळीं मध्यप्रांत वऱ्हाडचा मुख्य प्रधान होतों, त्यावेळीं हायस्कुलांतून निशाणबाजीचें शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला; व डॉ. मुंजे व बॅ. सावरकर या दोघांनीहि या उपक्रमाबद्दल माझें अभिनंदन केलें होते. त्याचप्रमाणें नागरिक संरक्षक दलें उभारण्यासाठीं 'सिव्हिक गार्डस् बिल' 'Civic Guards Bill' प्रांतिक असेंब्लीपुढें आणण्याचा प्रयत्नही मी केला. पण, कॉंग्रेसश्रेष्ठींच्या प्रतिकूलतेमुळें तो यशस्वी होऊं शकला नाहीं. तथापि कॉंग्रेसच्या ताब्यांतील इतर कोणत्याहि प्रांतांत अशा तऱ्हेचे उपक्रम करण्याचे प्रयत्न झाले नाहींत ही गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे. म्हणूनच मी असें म्हणतों कीं, लष्कराच्या हिंदीकरणाच्या प्रश्नाविषयीं महाराष्ट्रीयांना विशेष अगत्य आणि तळमळ वाटते.

कै. कॅ. मोडक यांच्यासंबंधींचा हा स्मृतिग्रंथही त्या तळमळीचाच खरोखरी निदर्शक आहे. चालू युद्ध संपल्यावर हिंदी लष्कराच्या पुनर्घटनेचा प्रश्न हा हिंदुस्थान सरकारला, युद्धांतील एकंदर अनुभव लक्षांत घेऊन, निकडीनें हातीं घ्यावा लागेल असें वाटतें. अशावेळीं कॅ. मोडक जर सुदैवानें हयात असते, तर त्यांच्या ज्ञानाचा आणि विचाराचा फायदा सरकार आणि लोकपक्ष या दोहोंनाहि मिळाला असता. तथापि, ' इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम ' हा त्यांचा इंग्रजी ग्रंथ आणि प्रस्तुत स्मृतिग्रंथ हे त्यांनी केलेल्या कामगिरीचें स्मरण लोकांत जागृत ठेवतील याबद्दल शंका नाहीं.

न्यू दिल्ली<br>८-११-४३

— ना. भा. खरे

# अनुक्रमणिका


| | लेख | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | जीवन व कार्य<br>डॉ. ग. सी. पेंडसे | १ |
| २ | हिंदुस्थानचा लष्करी इतिहास<br>प्रो. द. वा. पोतदार | ४८ |
| ३ | हिंदुस्थान देशांतील बुद्धिमान् वर्गाची युद्धशास्त्राशीं फारकत<br>श्री. दि. वि. काळे | ६९ |
| ४ | विश्वविद्यालयांत युद्धशास्त्राचा प्रवेश<br>श्री. न. चिं. केळकर | ८६ |
| ५ | देशांतील शक्तीची जोपासना<br>डॉ. मो. ना. नातू | ९७ |
| ६ | हिंदी संरक्षणाचा प्रश्न<br>प्रो. दि. ह. लिमये | १०६ |
| ७ | हिंदुस्थानचें राष्ट्रीय सैन्य<br>श्री. दा. न. शिखरे | १२९ |

# आठवणी व उद्गार

—:ॐ:—

( १ ) कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे; अधिपति इचलकरंजी ( २ ) हिज् हायनेस् श्रीमंत सदाशिवराव खासेराव पवार, अधिपति देवास ( ३ ) सरदार माधवराव वि. किबे, इंदूर ( ४ ) श्री. द. गो. जोशी, बंगलोर (५) श्री. श्री. त. कट्टी, ग्वाल्हेर (६) डॉ. ल. शं. भावे ( ७ ) श्री. न. गं. आपटे ( ८ ) श्री. सदुभाऊ गोडबोले ( ९ ) श्री. कृ. ब. महाबळ ( १० ) श्री. म. सी. रणदिवे ( ११ ) एक लष्करी अधिकारी.

( 1 ) Sir **P. S. Sivaswamy Aiyer.** ( **2** ) The Hon. **M. S. Aney.** ( **3** ) **Swami Kuwalayananda.** ( **4** ) Rao Bahadur **G. S. Sardesai.** ( **5** ) Rao Bahadur **C. Haywadana Rao.** ( **6** ) **R. G. Gadgil.** ( **7** ) Dr. **B. S. Moonje.** ( 8 ) **Report of the Interview with Capt. Modak in 1926 Published in many papers in connection with Indian Military History.**

॥ ॐ ॥

# जीवन व कार्य

[ लेखक : डॉ. ग. सी. पेंडसे ]

" Beware,or you will be shot " हे शब्द उच्चारतांना त्या तरुणाच्या चेहऱ्यावर पूर्ण निश्चयच दृग्गोचर झाला होता. १९०७ सालची गोष्ट. तो साधारण २२-२३ वर्षांचा असावा असें वाटत होतें. बंगलोर स्टेशनवर जी म्हैसूरकडे जाण्यास निघणारी मेल उभी होती, तिच्या एका पहिल्या वर्गाच्या डब्याच्या दारांत, कांहीं झालें तरी तेथून हालावयाचें नाहीं अशा निश्चयानें, हा तरुण उभा होता. त्याचा गौरवर्ण व रेखीव चेहरा, अंगानें बेताचीच पण पुरी उंच शरीरयष्टी, एकाद्या युरोपियन लष्करी अधिकाऱ्यालाहि लाजवील अशी पोषाखाची व इंग्रजी बोलीची ऐट, यामुळें योग्य तो दरारा सहजच उत्पन्न झालेला होता. डब्याभोंवतीं स्टेशनमास्तर, रेल्वेचें उच्च अधिकारी, पोलीस अधिकारी व इतर पुष्कळ गंमत पहाणाऱ्या लोकांची गर्दी दिसत होती. त्यांतच एक युरोपियन गृहस्थ क्रोधाविष्ट झालेले दिसत होते. परंतु वर उधृत केलेल्या शेवटच्या निश्चित

व खणखणीत स्वरांत दिलेल्या प्रत्युत्तरानें तेथें चाललेल्या संतप्त व हातघाईवर आलेल्या वादविवादाला पूर्णविराम पडला. त्या साहेबाची प्रतिष्ठा राखण्यास तत्पर असलेला अधिकारी-वर्ग पराभूत झाला, आणि त्यांना सुविचार सुचून, त्यांनीं त्या युरोपियन गृहस्थाकरितां वेगळाच डबा गाडीला लावण्याचें ठरविलें व तो प्रसंग निभावला. या तरुणाचें त्या डब्यांत प्रथम ठेवलेलें खालच्या जागेवरचे ( बर्थ ) सामान त्याच्या अपरोक्ष त्या युरोपीय गृहस्थानें उचलून वरच्या जागेवर ठेवलें होतें. यानें तें सरळ उचलून खिडकीच्या बाहेर फेकून दिलें आणि त्यामुळें हा प्रसंग ओढवला. पण अगोदर येऊन जागा नुसती राखूनच (रिझर्व्ह)नव्हे, तर त्याच्यावर आपलें सामानही ठेवून शिक्कामोर्तब केला असतांना, आपल्या हक्कावर बेगुमानपणानें अतिक्रमण करून घेणें त्या तरुणाच्या स्वाभिमानाला सहन करणें अशक्यच असल्यामुळें त्यानें ' शठंप्रतिशाठ्यं ' हें तत्त्व अमलांत आणलें होतें. शेवटीं एकदा दुसरा डबा जोडून, ती ९॥ वाजतां निघणारी गाडी १० वाजतां सुटली. हे तरुण गृहस्थ म्हणजेच कॅ. मोडक होत; परंतु या प्रसंगीं ते फक्त डेक्कन कॉलेजचे विद्यार्थीच होते.

## थोडा कुलवृत्तांत

मोडकांच्या घराण्याचें मूळगांव कोंकणांत मालवण तालुक्यांतील मसूर हें खेडें होय. तेथून यांचे तीन पिढ्यापूर्वींचे पुरुष देशावर आले. कुरुंदवाड व सांगली या संस्थानांत यांच्यापुढील दोन पिढ्यांतील पुरुष चांगल्या हुद्यावर काम करीत असत. कॅ. मोडकांचें वडील डॉक्टर असून त्यांची पुष्कळ वर्षें म्हैसूर संस्थानच्या नोकरींत गेली. मोडकांचा जन्म पुण्यासच त्यांच्या मामांच्या घरीं १८८७ सालीं ऑगस्ट महिन्याच्या २७ तारखेस झाला. त्यांच्या पुढील आयुष्यातील चारित्र्यावर व कर्तृत्वावर मुख्यतः त्यांच्या मातोश्रींचीच मोठी छाप पडलेली दिसते. बेळगांव जिल्ह्यांत ' आत्याबाई मोडक ' या नांवानें त्या ओळखल्या जात, कारण त्यांचे पुष्कळ राहाणें व कार्य बेळगांव जिल्ह्यांतच झाले. घरच्याघरींच डॉक्टरांच्या हाताखालीं त्यानीं प्रसूती-शास्त्राचे शिक्षण घेतले होते आणि स्वभावतःच धीट असल्यामुळें कोणासही अडीअडचणीला न डगमगतां व निस्वार्थबुद्धीनें त्या

मदत करीत असत. त्यांचा वेदांत व ऐतिहासिक ग्रंथांचा व्यासंग चांगला असून दासबोध व इतर समर्थ वाङ्मयांवर त्यांचा विशेष भर असे. डॉक्टर मोडकांच्या निधनानंतर त्यानीं आपले हें इतर पाठांतर विशेष चांगलें वाढविलें. व प्रवचनद्वारां त्याचा लाभ आपल्या भगिनीवर्गास देणें चालू केलें. त्यांची विषय मांडण्याची पद्धत तर्कशुद्ध असून विचारांत निश्चितपणा असे. त्यांच्या वक्तृत्वाचा फायदा स्वदेशीच्या प्रचारास व १९३० सालीं झालेल्या कायदेभंगाच्या चळवळीसही भरपूर झाला. अन्यायाची भयंकर चीड व करारीपणा हे गुण प्रामुख्यानें त्यांच्या स्वभावांतच भिनलेले असल्यामुळें त्यांच्या खणखणीत वक्तृत्वांत विषयाची खरी तळमळ नेहमीं दृष्टोत्पत्तीस येत असे. आहारविहाराची कडक बंधनें, संन्यासी वृत्ती, पूर्ण निःस्वार्थबुद्धी, व परिणामकारक वक्तृत्व यांचा भाविक श्रोत्यांवर योग्य तोच परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? त्या म्हणत, " मी एक उत्तम मुलगा देशाला अर्पण केला आहे. याचें मोल इतर कशाने होईल? आणि कोणतीहि स्त्री आपल्या देशास यापेक्षा जास्त मौल्यवान् देणगी काय देऊं शकेल ?" कॅ. मोडकांचीहि मातृभक्ती अलोट होती. आपल्या ' प्रतापगड युद्ध ' या हिंदवी लष्करी इतिहासाच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात:—

" न मातुः परदैवतम् " निस्पृह प्रेमाचें परमस्थान आणि वात्सल्याचें आगर अशी माझी माता माझ्या लष्करी बाण्याची मूर्तिमंत प्रेरणाच होय ही जाणीव मला सर्व संकटांतून आणि अडचणींतून बचावून नेत असते. जिनें अनुपम अशा शिक्षणानें राष्ट्रकार्याच्या दंगलींत देशाकरितां व धर्माकरितां वाहिलेला एक सैनिक असा माझा गौरवानें उल्लेख करून मला स्फूर्तीचे सैनिक बनविले त्या माझ्या मातेच्या त्यागाची शिकवण ही माझ्या सर्व कर्तृत्वाची गुरुकिल्ली आहे. "

बाहेरचें इतकें कार्य व परोपकार करीत असतांना मुलांचें चारित्र्य व शीलसंवर्धन याकडे त्या किती काळजीपूर्वक लक्ष देत असत हें यावरून स्पष्ट दिसतें. त्यांचे सर्व गुण एकत्रित दाखविणारी एक गोष्ट येथें नमूद करणें इष्ट आहे.

आत्याबाईंना नारायण नांवाचा आणखी एक मुलगा होता. कर्मधर्मसंयोगानें हा मुलगा दुर्वृत्त व दुर्वर्तनी निघाला. त्यास खाण्याचें व चैनीचें

फार वेड. त्याकरितां घरांत व बाहेर चोऱ्याही करीपर्यंत त्यानें मजल आणली. आत्याबाईनीं त्यास पुष्कळ उपदेश केला, समजाविलें, मारलें, पण उपयोग होईना. "शेण खाऊनहि मनुष्य जगतो हें मी तुला प्रत्यक्ष दाखविते" असे म्हणून त्यांस परावृत्त करण्याच्या प्रयत्नांची कमाल मर्यादाच गाठण्याकरितां त्या २-३ दिवस गाईचें शेण खाऊनच राहिल्या. इतके करूनही शेवटीं जेव्हां कशाचाच उपयोग होत नाही असे ठरलें तेव्हां त्या करारी आणि बाणेदार बाईनें "मला लांच्छनास्पद होणारा तुझ्यासारखा मुलगा नसल्यासारखाच आहे" असें म्हणून त्यानंतर आमरणांत त्या मुलाचें मुखावलोकनही त्यानीं केलें नाहीं. तोही मुलगा घरांतून पळूनच गेला. परंतु परत आत्याबाईंचें मुखांतून नारायणाबद्दल एक शब्दही बाहेर पडला नाहीं.

## शैक्षणिक आयुष्य

कॅ. मोडक यांना घरीं 'तात्या' या टोपण नांवानें संबोधीत असत. तात्यांचे बरेच शिक्षण त्यांचें मामा रा. बाबासाहेब सोमण यांचेकडे झालें. परंतु जशी आई तसेच हे तिचे बंधु. हे एल्. एल्. बी. चीं परीक्षा झाल्यावर बेळगावांस वकिली करीत. त्यांनीं कांहीं दिवस सांगली संस्थानांत न्यायाधिशाचे हुद्यावरही काम केलें. पण नोकरीच्या कामाच्या बाहेर संस्थानांत त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावरही आक्रमण होऊं लागल्यामुळें त्यांना नोकरीचा राजिनामा देणें भाग पडलें. नोकरींतून जरी ते बाहेर पडले, तरी वकील म्हणून कोर्टातील कुलंगडी सोडविणेंहि त्यांच्या अत्यंत सात्विक स्वभावाला जमलें नाहीं. शेवटीं त्यांच्या वृत्तीला अनुरूप अशा राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यात ते पडले. महात्मा गांधींच्याबरोबर चंपारण्यांत त्यांनीं उत्तम कामगिरी बजावली. रा. बाबासाहेबांच्या घरच्या पूर्ण राष्ट्रीय व स्वदेशी वातावरणाचा तात्यांच्या मनांवर योग्य तोच परिणाम होऊन, मातोश्रीनें रुजत घातलेले स्वधर्म व स्वदेश यांच्या अभिमानाचें बीज चांगलें रुजून रा. सोमणांच्या सान्निध्यांत वाढीसही लागलें. तात्यांचा रा. सोमणासंबंधीं आदर व प्रेम शेवटपर्यंत कायम टिकलें. तात्यांच्या सर्व परिचितांना त्यांना नंतरच्या आयुष्यांत लागलेल्या धूम्रपानाचें व्यसन

माहीत होतें, पण त्यांनीं शेवटपर्यंत कधीही रा. बाळासाहेबांसमोर धूम्रपान केलें नाहीं. ही गोष्ट त्यांना आपल्या मामांच्याबद्दल किती आदर वाटत होता त्याचें द्योतक म्हणून नमूद करणें जरूर आहे.

तात्यांचा कल प्रथमपासूनच अभ्यासापेक्षां खेळाकडे जास्त. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण पुण्यासच झालें. पुण्याच्या न्यू इंग्लीश स्कूलचें ते कांहीं वर्षे विद्यार्थी होते. त्यांचे सोबती तो एक बेडर व बेफिकीर वृत्तीचा मुलगा होता, असें त्यांचे वर्णन सांगतात. दुसरे करणार नाहींत किंवा दाखविणार नाहींत, असें कांहींतरी साहस वा कौशल्य प्रगट करणें हेंच त्यांचे वैशिष्ट्य सांगतात. नेहमीचें जरी सायकलवर बसावयाचें झाले तरी हँडल् हातांत धरतांच नेहमींसारखे एक पाय पायडलवर न ठेवतां, एकदम उडी मारून वर बसण्यांतही ते स्वतःचे वैशिष्ट्य निर्माण करीत. १९०६ सालीं मुंबई विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना पुढील शिक्षणाकरितां डेक्कन कॉलेजमधें घालण्यांत आलें. येथेंही त्यांनीं हॉकी, टेनिस, क्रिकेट वगैरे सर्व खेळांत प्रावीण्य मिळविलें पण त्यामुळें अभ्यासाकडे जास्तच दुर्लक्ष झालें. याचा अर्थ ते बौद्धिक व्यासंगाचे वैरी होते असा नव्हे. इतिहास व लष्करी थाटाचें वाङ्मय याची त्यांना विशेष गोडी असे. मराठ्यांच्या इतिहासांतील विशेषतः शौर्याच्या प्रसंगांत त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीला पुष्कळच पोषक द्रव्य मिळत असें व यांतूनच आपण स्वतः सैन्यांत शिरून कांहींतरी नवीन अद्भुत करूं आणि सैन्यांत अधिकारी झाल्यास आपली प्रतिष्ठा वाढून हुकमत गाजविण्यास मिळेल अशी कल्पना मनांत येऊन त्यांनीं सैन्यांत अधिकाऱ्याची नोकरी करण्याची महत्त्वाकांक्षा धरली.

## महत्त्वाकांक्षेची पूर्ती

१९०७–८ सालीं सुशिक्षित मंडळी बहुशः मुलकी व शैक्षणिक खात्यांत मानाच्या जागा सहज पटकावूं शकत. त्या कालांत सैन्यांत शिरण्याची कल्पनाही कोणास शिवत नसे. किंबहुना, सैन्यांतील नोकरी करणें हें निर्बुद्ध-पणाचेंच लक्षण समजत असून, सैन्य म्हणजे निर्बुद्ध लोकांचा जमाव व लढाई म्हणजे मारामारी अशी कोती व विक्षिप्त कल्पनाच सुशिक्षितांत

प्रचलित असे. स्वदेशीची चळवळ, राष्ट्रीय शिक्षण वगैरे चळवळींमुळें देशांत राष्ट्रीय वृत्तीचें बीज जरी रुजत असलेलें दिसत होतें, तरी सैन्य व लष्करी शास्त्र ( Military Science ) या गोष्टींचें राष्ट्रीय जीवनांतील खरें महत्व लोकांना माहीतही नव्हतें. लोकमान्यांचा लष्करी शिक्षणावरील एखादा लेख किंवा राष्ट्रसभेचें ( Congress ) सैन्याचा अवाढव्य खर्च, शस्त्राचा कायदा वगैरेसंबंधीं होणारे फुटकळ ठराव यापलीकडे सर्वसामान्य सुशिक्षित समाजाच्या वाचनांतही या गोष्टींसंबंधीं विशेष विचार येत नसत. उलट या वर्गाची या विषयापासून ताटातूट होऊन फार वर्षें लोटलेली असल्यामुळें त्यांच्यामध्यें याविषयीं आपुलकी राहोच, उलट अप्रीति नांदत होती. ही त्यावेळची परिस्थिती लक्षांत घेतली म्हणजे तात्यांच्या वडील मंडळींकडून त्यांना सैन्यांत शिरण्याच्या कल्पनेस फारसे प्रोत्साहन मिळालें नसल्यास नवल नाहीं, आणि इतरांनींही त्यांना विक्षिप्त व उनाड अशीं विशेषणें लावलीं असल्यास आश्चर्य काय ? परंतु या लोकनिंदेचा त्यांच्यावर कांहींच परिणाम झालेला दिसत नाहीं. उलट आपला निश्चय पुरा करण्यासाठीं त्यांनीं शेवटीं कॉलेजला रामरामच ठोकला.

तात्यांची महत्त्वाकांक्षा सैन्यांत एकदम अधिकाराची जागा मिळविण्याची असल्यामुळें, त्याला लागणारी सर्व तयारी त्यांनीं मोठ्या पद्धतशीर रीतीनें करण्यास सुरवात केली. सर्व देशी परदेशी खेळांत त्यांनीं चांगलें प्रावीण्य संपादन केले. वडील म्हैसूर संस्थानच्या सैन्यांतच डॉक्टर म्हणून नोकरी करीत असल्यानें बंगलोरला त्यांना इम्पीरियल लान्सर्समध्ये, घोड्यावर बसणें, नेम मारणें, वगैरे शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिवाय इंग्रजी भरपूर वाचून व मुद्दाम सराव करून एखाद्या इंग्रज माणसाप्रमाणें त्या भाषेंत वादविवादपटुत्व त्यांनीं मिळविलें आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांप्रमाणें, वागणूक चालीरिती, पोशाख वगैरे सर्व अंतर्बाह्य तयारी इतकी बेमालूम केली कीं, कित्येक वेळां रस्त्यांतून जातांना यांना सैन्यांतील अधिकारी मनुष्य समजून चुकून सलामही केला जात असे. हें सर्व नाटक करीत असतांना त्यांच्या मातोश्रीनें हृदयांत पेटविलेली स्वाभिमानाची ज्योत मालविली तर गेली नाहींच, पण दिवसेंदिवस वाढतच गेली, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांचे इतिहासाचें व तदनुषंगिक वाचन चालूंच होतें. मराठ्यांच्या

स्वराज्यसंस्थापनेंच्या कथानकांत त्यांच्या स्वाभिमानाला योग्य असें खाद्य मिळत असें व त्यांची स्वभावत:च साहसप्रिय वृत्ती शूर मराठ्यांच्या रणांगणावरील शौर्यांत तल्लीन होत असे. त्यावेळेस ते आपल्या बरोबरीच्या लोकांना मराठ्यांच्या अद्भुतरम्य कथा सांगून रंगवून टाकीत. तात्पर्य नखशिखांत मुसलमान बनून शत्रूच्या छावणींत प्रवेश मिळविणारा बहीर्जी जसा हृदयांत पक्का मराठा असे, तद्वतच सैन्याच्या अभेद्य गोटांत प्रवेश मिळविण्यासाठीं अंतर्बाह्य ब्रिटिश अधिकाऱ्यासारखा थाट व उठाव करणारे तात्या अंतर्यामी पूर्ण मराठेच होते.

## म्हैसूरचा प्रयत्न

याच वेळेस त्यांची श्री. कृष्णायर्स नांवाच्या म्हैसूरच्या राजघराण्याशीं नातें असलेल्या पुरुषाशीं मैत्री जमली. हे गृहस्थ पुढे म्हैसूर इंपीरियल आर्मीमधें कर्नलच्या हुद्यापर्यंत चढले. म्हैसूर इंपीरियलमधें शिरून सैन्य आधुनिक पद्धतीवर सुसज्ज करून, त्याचा उपयोग आपलें स्वत्व राखण्याकडे कसा करतां येईल याचा हे दोन मित्र सारखा विचार करीत. तेव्हां म्हैसूरच्या महाराजांवर जर छाप बसवितां आली तर मोडकांचें कार्य सुलभ होईल या हेतूनें महाराजांबरोबर एकदां शिकारीस जाण्याचा सुयोग यांनींच तात्यांना आणून दिला. त्याचवेळेस बंगलोरहून म्हैसूरला जातांना स्टेशनवर घडलेली कथा सुरवातीस दिली आहे. महाराजांबरोबर जाण्यास मिळालेल्या संधीचा तात्यांनीं भरपूर फायदा करून घेतला असें दिसतें, कारण त्यांनीं लगेच म्हैसूरच्या सैन्यप्रमुखाकडे असा मनुष्य इंपीरियल लान्सर्समधें असावा अशी शिफारस केली. मुख्य अधिकाऱ्यांनींही तात्यांना कमिशन देण्याचें कबूल करून तावडतोब वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे शिफारस केली. साधारणपणें सैन्याच्या प्रमुखांनीं अशी शिफारस केल्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यानें ती नाकारवी असें होत नाहीं. या सर्वांत वरिष्ठ अधिकारावर हिंदुस्थानसरकारचा ब्रिटिश अधिकारी असून, तो २–३ संस्थानें मिळून एक असे. त्याच्यापर्यंत शिफारस पोहोंचल्यामुळें 'कार्य साधलें' या आनंदांत तात्या होते, इतक्यांत मोडक "**चित्पावन ब्राह्मण**" असल्यामुळें त्यांना कमिशन देतां येत नाहीं असें लिहून आलें, आणि आतांपर्यंत केलेलें सर्व श्रम एका

लेखणीच्या फटकाऱ्यानें पार कोलमडलें ! ! आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करून घेण्याकरितां अत्यंत उत्साहानें व कष्टानें तयारी करून व आपली लायकी सर्वांना पूर्णपणें पटवून दिल्यावरही केवळ चित्पावन जातीमुळें आपले सर्व गुण कवडीमोल ठरूं शकतात या गोष्टीचा त्या २२-२३ वर्षांच्या स्वाभिमानी तरुण मनावर फार खोल परिणाम झाला. परंतु असल्या विघ्नामुळें हिंमत सोडून निराश होणाऱ्यांपैकीं तात्या नव्हते.

## कमिशन मिळालें

म्हैसूरला आपले सर्व श्रम वाया गेलेले पाहून त्यांनीं म्हैसूरला कायमचाच रामराम ठोकला आणि ध्येयपूर्तीच्या दृष्टीनें चांचपणी करीत ते ग्वाल्हेरला आले. तेथेंही स्वतंत्रपणें कांहीं महिने राहून आपल्या कर्तृत्वाची छाप पाडण्याकरितां त्यांनीं म्हैसूरसारखेच परिश्रम केलें, व शेवटीं कमिशन नाहींच, पण कसातरी ग्वाल्हेर इंपीरियल लान्सर्समधें प्रवेश मिळविला. याप्रमाणें तात्यांनीं जे भगीरथ प्रयत्न केले त्याचें हें फल म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढण्याप्रमाणेंच झालें यांत शंका नाहीं. दुसऱ्या खात्यांत यापेक्षां चांगली नोकरी मिळण्याची किंवा कॉलेजमध्यें परत जाऊन विद्यापुरी करण्याची पूर्ण शक्यता असतांना सुद्धां तसें न करतां आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्याकरितां त्यांनीं झालेली मानहानी सहन केलीच, इतकेंच नव्हें तर ध्येयपूर्तीपर्यंत सारख्या वाजत असलेल्या नकारघंटेच्या निनादानें खचून न जातां ते सतत त्यांतूनच मार्ग काढीत पुढें गेले, यामुळें त्यांची गणना

> विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।
> प्रारब्धमुत्तमजनाः न परित्यजंति ॥

अशा उत्तम जनांमध्यें होते. या प्रसंगानें त्यांना पुष्कळच धडे दिले. ‘ चित्पावन–ब्राह्मण ’ म्हणून नाकारण्यांत कांहीं तरी गूढ आहे, हिंदी सैन्यांत लायकीचा प्रवेश मिळविण्याशीं फारसा संबंध दिसत नाहीं, सुशिक्षितांना तर येथें मज्जावच दिसतो तेव्हां या सर्व परिस्थितीचें कारण काय असे विचार त्यांच्या मनांत सारखे येऊं लागले. अर्थात् या दुर्बिणींतून ते एकदा सभोवतालीं पाहूं लागल्यावर त्यांना नवीन व चमत्कृति-

पूर्ण वातावरणांत पुष्कळच नवीन तारे व प्रकाश दिसूं लागले. १९११ सालीं त्यांना एकदाचें कमिशन मिळालें. यापुढें त्यांनीं ग्वाल्हेरच्या फर्स्ट इंपीरियल लान्सर्समध्यें आणि शिवाय फोर्ट कमांडर, ॲसिटंट ॲड्ज्टंट जनरल, ॲसिटंट् क्वॉर्टर मास्टर जनरल वगैरे निरनिराळ्या हुद्याच्या जागींही कामें केलीं परंतु असलीं नुसती कामें करून व पगार पचवून पेन्शन खात ते जर कोठेंतरी आरामांत दिवस काढून परलोकवासी झाले असते तर हा स्मृतिग्रंथ तर राहोच, पण त्यांच्या निधनांत राष्ट्राचें कांहीं नुकसान झालें आहे, असेंही कोणास वाटण्याचें कारण नव्हतें. १९११ ते १९३२ पर्यंत ते ग्वाल्हेरहून सेवानिवृत्त होईतोंपर्यंत, त्यांच्या नोकरीव्यतिरिक्त कर्तृत्वाला कमीतकमी वाव असतांना, त्यानीं केवळ स्वतःच्या श्रमानें व पैशानें एकाद्या संस्थेला साजेल अशी केवढी उपयुक्त व महत्त्वाची कामगिरी बजावली हें पाहाण्यास एकंदर सैन्याची उत्क्रांती व त्यावेळचें वातावरण यासंबंधीं थोडी माहिती असणें नुसते इष्ट नव्हे पण आवश्यक आहे.

आजच्या युद्धपरिस्थितींत कोणाही धडधाकट माणसास सैन्यांत प्रवेश सुलभ आहे. सरकारही तरुणांना सैन्यांत शिरण्यास उत्तेजन देत आहें. सैनिक पेशाकडे पहाण्याची समाजाची आजची दृष्टीही भिन्न आहे. या हल्लींच्या फेरबदलामुळें आज कांहीं गोष्टींचें महत्त्वही तितके वाटणार नाहीं. परंतु या तपशीलाच्या फरकामुळें मूलभूत सिद्धातांत फारसा फरक पडत नसल्यानें व ज्या व्यक्तीच्या कार्याकडे आपणांस पहावयाचें आहे त्यांतील रहस्य, तत्कालीन परिस्थितीचें संपूर्ण आकलन झाल्याशिवाय लक्षांत येणें कठीण असल्यानें खालीं हिंदी सैन्याच्या उत्क्रांतीचें ऐतिहासिक समालोचन देत आहों.

## हिंदी सैन्याची उत्क्रांति

११ जानेवारी १६१३ सालीं मोंगल बादशहानें अतिपूर्वेकडे व्यापार करण्यास स्थापन झालेल्या व्यापारी मंडळींचा प्रतिनिधी कॅ. बेस्ट यांस सुरतेस वखार काढण्यास सनद दिली. १६३४ पर्यंत या व्यापाऱ्यांची मुंबई, मद्रास व बंगाल या तीनही प्रांतांत वखारी काढण्यापर्यंत प्रगति झाली. या वखारींच्या संरक्षणार्थ व त्यांच्या

गोऱ्या अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां या व्यापाऱ्यांनीं कांहींतरी शिपाई ठेऊन कोठेकोठे किल्ल्यांची तटबंदीही केली होती. पण १६६८ सालीं मुंबई बंदर चार्लस राजानें या व्यापारी मंडळींच्या ताब्यांत दिलें व त्याबरोबरच राजाचें थोडेसे सैन्यही कंपनीच्या अंमलाखालीं आलें; यापुढें मात्र तीनही प्रांतांची व्यवस्था पूर्ण स्वतंत्रपणें करून प्रत्येक प्रांताला थोडे सैन्य व एक प्रांताधिकारी असून तो सर्वस्वी इंग्लंडमधीलच अधिकाऱ्यांना जबाबदार असे. या वेळच्या सैन्यांत युरोपियन व हिंदी अशा दोन प्रकारच्या फौजा असून, हिंदी फौजांचा पोशाख, शस्त्रास्त्रें व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अधिकारीही हिंदीच असत. या अधिकारी वर्गांतील माणसें साधारणपणें सुबुद्ध, उच्चवर्णीय, खानदान घराण्यांतील, व शिपाईबाणा पिढीजाद अंगांत मुरलेलीं अशीं असत. १८ व्या शतकांतील इंग्रज-फ्रेंच युद्धांचें पडसाद हिंदुस्थानांतही इंग्रज इंग्रज-फ्रेंच्यांच्या व्यापारी हितसंबंधाबाबत भांडणांत दिसतात. परंतु युरोपांतून दोघांनाही मुबलक मनुष्यबळ येथें आणणें शक्य नसल्यामुळें, आपली भांडणें भांडण्यास या कंपन्यांनीं एतद्देशीय फौजांचा भरणा वाढविण्यास सुरवात केली आणि अशा पोटार्थी फौजा हिंदुस्थानांत उभ्या करणें शक्य असून कौशल्यानें वाढविल्यास 'विजय' सहज संपादन करतां येतो, या गोष्टीचें महत्त्व धूर्त युरोपियन लोकांना चांगलें समजलें. काळ्या सैन्यांतील शस्त्रास्त्रांचा कमीपणा भरून काढण्यास युरोपियन सैन्याचा उपयोग होत असे. क्लाईव्हच्या कारकीर्दींत इंग्रजांच्या ताब्यांत पुष्कळच मुलूख आलेला होता, व शेवटीं १७७० मध्यें या फ्रेंच-इंग्रज कलहाचा निकाल पूर्णपणें इंग्रजांच्या बाजूनें लागून फ्रेंच व्यापारी मंडळींचें दिवाळें वाजलें. यावेळीं या देशांतही कोणतीच एकसूत्री राज्यव्यवस्था नसून, लहान लहान राजे, नबाब व सरदार यांचे एकमेकांशीं सारखे कलह चालत असल्यामुळें व इंग्रजांची मदतही ते कित्येक वेळां आपला आपसांतील कलह माजविण्यास मागून घेत असल्यानें इंग्रजांचे सैन्य पुष्कळच वाढलें, आणि क्लाईव्हनें प्रथम महत्त्वाचे असे फेरबदल सैन्याच्या संघटनेंत केले. त्यांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजपर्यंत एतद्देशीय फौजांचें अधिकारी जे हिंदीच उच्चवर्णीय खानदान घराण्यांतील असत, त्यांच्या-

ऐवजीं हिंदी फौजांवर ब्रिटिश अधिकारी नेमून हिंदी अधिकाऱ्यांना हळूहळू रजा देण्यास सुरवात केली. यापुढें फक्त हाच क्रम वाढत गेला. व हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण कमी कमी होत जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्यांचें प्रमाग वाढत गेलें. १७९६ सालीं हिंदुस्थानांत १३००० गोरे, ५७००० काळे व त्यांत पुष्कळसे ब्रिटिश अधिकारी असें सैन्य अस्तित्वांत होतें. या प्रघातामुळें जो महत्त्वाचा परिणाम झाला तो हा कीं उच्चवर्णीय व सुबुद्ध हिंदी अधिकारी वर्ग सैन्यांतून नाहींसाच होऊं लागला व राहिलेल्यांची प्रतिष्ठा व अधिकार आपोआपच ऱ्हास पावूं लागलीं. यानंतर महत्वाची गोष्ट म्हणजे १८५७ सालचें क्रांतियुद्ध. डलहौसीनें केलेल्या अन्यायामुळें जरी लोकांचीं मनें प्रक्षुब्ध झालीं होतीं तरी हिंदी सैन्यानेंच मुख्यत: उचल केल्यामुळें हें बंड झालें, ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं; व त्यांतही हिंदू–मुसलमान अशा सर्व सैन्यानें भाग घेतल्यामुळें सर्व हिंदुस्थान-भर बंडाचा मोठ्याच प्रमाणांत उठाव झाला. सर्वांवर सारखाच अन्याय व सर्वांच्याच धर्मभावना दुखावल्या गेल्यामुळें राज्यकर्त्यांविरुद्ध एक प्रकारची साशंक वृत्ति व द्वेषभाव उत्पन्न होण्यास एक सर्वसामान्य कारण घडलें. या बंडाचें एकंदर देशावर जे घोर परिणाम झाले त्यांत सैन्याची संघटना व कारभार या अत्यंत महत्वाच्या गोष्टीवर घडलेले परिणाम महत्त्वाचे होत. १८५८–५९ सालीं सैन्याची संघटना व कारभार यांवर विचार करून नवीन सूचना करण्याकरितां 'पील–कमिटी' ची स्थापना झाली. या कमिटीचा शेंकडोंशें पानांचा छापलेला अहवाल पाहिला म्हणजे येवढेंच दिसतें कीं सर्वांची भीतिग्रस्त मनें,झालेली गोष्ट परत घडूं न देण्याकरितां काय युक्ति काढावी या विचारानें ग्रासून गेलीं होतीं. गोऱ्यांचें लष्कर केवढें मोठें ठेवावें, गोऱ्याकाळ्यांचें प्रमाण कसें बेतशीर राखावें, हिंदी अधिकारी कसा नामशेष करावा, महत्त्वाची तोफखान्यासारखीं शस्त्रें गोऱ्यांच्याच ताब्यांत ठेवून हिंदी तोफखाना कसा नाहींसा करावा, गोऱ्या सैन्याचा बोज व भीति रहावी म्हणून गोऱ्याकाळ्यांना शक्यतों एकमेकांपासून दूर ठेवणें कसें इष्ट आहे, प्रत्येक बटॅलियनमध्यें निरनिराळ्या जातींचे लोक ठेवून त्यांचें धार्मिक व सामाजिक वैर व मत्सर कसे कायम ठेवतां येतील, अशा अनेक बारीक-सारीक गोष्टींचा खल होऊन त्या अमलांतही आणल्या गेल्या. त्यामुळें

सुबुद्ध व सुशिक्षितांस सैन्यांत मज्जाव झाला व क्लाईव्हपासूनच हिंदी अधिकाऱ्यांचें सुरू झालेलें नष्टचर्य पूर्ण होऊन त्यावर कसें कायमचेंच शिक्का मोर्तब झालें हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.

"The steps which were taken with the object of crushing the capacity of Indian leadership will be found described in the report of the 'Peel'-Commission, 1858-59 etc.... The suceessive changes in the organization of the Indian army since the time of Lord Clive and especially the changes introduced after the great mutiny, were all dictated by one supreme consideration how to prevent any possibility of any rising on the part of the Indian soldiers and to prevent them from acquiring any capacity for leadership." (Dissenting Minute of P. S. S. Aiyer and Maj.-Gen. Rajawade.-Indian Military College Committee 1931.)

पील कमिशननंतर १८७८-७९ सालीं 'ईडन् कमिशन' बसून परत सर्व गोष्टींचा फेरविचार झाला; परंतु त्यांतही हिंदी अधिकारी नष्ट झाले हेंच बरोबर आहे असें ठरून १९१२ सालच्या " "आर्मी इन् इंडिया" कमिटीनें तर हिंदी सैन्याचा हिंदी नेता नाहींसा केल्यामुळें नेतृत्व किंवा पुढारीपणा ( leadership ) ह्या एका अत्यंत महत्वाच्या गुणाचा लोप झाला, ही गोष्ट आपल्या ( इंग्रजांच्या ) सुरक्षिततेच्या दृष्टीनें फार महत्वाची आहे असें ठरविलें. आणि हिंदी सुशिक्षित, सुबुद्ध व अंगांत सहजच नेतृत्व असणाऱ्या तरुणांना आपल्या लढाऊ वृत्तीला व साहसी महत्वाकांक्षेला साजेसें अभिमानास्पद शौर्य दाखविण्याची संधी कायमचीच नाहींशी करून, देशांतील कांहीं मोठे गूण नष्ट करण्यानेंच स्वतःची सुरक्षितता कशी अधिक वाढते हें त्यांच्याच खालील उताऱ्यावरून दृष्टोत्पत्तीस येईल.

" But it was the inevitable tendency of our increasing power in India to oust the native functionary from his seat or lift him from his saddle, that the white man might fix himself there. So, it happened in due course that the native officers who had excercised real authority in their battalians were pushed aside by an incursion of English gentlemen who took all substantive power into their hands. As the degradation of the native officer was thus accomplised, the whole character of the sepoy army was changed. It ceased to be a profession in which men of high position accustomed to cammand, might satisfy the......aspirations and expand the energies of their lives."( Eden Commission-Maj-Gen. Tucker's memorandom )

" The Army in India Committee of 1912-13 referred to the risk of revolt having been reduced by the retention of the higher command and administration in the hands of ther Bitish officers and by the consequent lack of opportunity for Indian officers to acquire the leadership and initiative which practice and responsibility could alone impart and they regarded this as a most important safe-guard." ( Page 192, Indian Military College Committee Dissenting Minute )

सैन्याच्या संघटनेंत दुसरा महत्वाचा बदल म्हणजे हिंदी सैन्याच्या कांहीं विशिष्ट प्रमाणांत हिंदुस्तानच्या डोक्यावर गोरें सैन्य सतत ठेवण्यांत आलें.

हें प्रमाण सरासरी २:१ असें ठरलें. आणि अधिकारी वर्ग व इतर सर्व मिळून ८०,००० पर्यंत गोरें सैन्य येथें कायम प्रस्थापित करण्यांत आलें. शिवाय हें सैन्य इंग्लंडमधील ब्रिटिश सैन्याचा भाग पण हिंदुस्तानच्या संरक्षणार्थ असें ठरल्यामुळें या सर्व सैन्याचा खर्च त्यांची इंग्लंडमध्यें भरती होण्यापासून ते नौकरी संपून येथून परत जाईपर्यंत हिंदी सरकारच्या तिजोरीवरच लादण्यांत आला. यामुळें येथील सैन्याच्या बाबतींत एकंदर खर्चाचा आंकडा सारखा फुगतच गेला. ब्रिटिश शिपायाचा वरचष्मा व प्रतिष्ठा वाढवून कायम ठेवण्याकरितां त्याच्या व हिंदी शिपायाच्या आर्थिक परिस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर ठेवण्यांत आलें. येवढेंच नव्हें तर महत्वाचीं शस्त्रास्त्रें त्याच्याच ताब्यांत ठेऊन वेळींअवेळीं हिंदी शिपायांच्या न्यूनतेवर भर देऊन त्याच्या मनावर ब्रिटिश शिपायाच्या वरिष्ट दर्जाबद्दल योग्य तो परिणाम होऊन हिंदी शिपायांत एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले. "The govt. and the military authorities have followed a systematic policy of propaganda of the inferiority of the Indian to the British." (Page 105, Indian Constitutional Problems-Sir P. S. S. Aiyer)

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हत्यारांचा कायदा ( Arms Act ). या कायद्यामुळें तर हिंदी लोकांची सैन्याशींच काय पण लढाऊ वृत्तीशींही फारकत केली गेली. हिंदुस्तानच्याच काय पण सर्व जगाच्या इतिहासांत ही एक अभूतपूर्व कथा आहे. सैन्यांतून हिंदी अधिकारी वर्ग नाहींसा झाल्यामुळें सहजच ऱ्हास पावत असलेलें नेतृत्व, साहस, स्वाभिमान, कर्तृत्व व अत्यंत महत्वाचा गूण म्हणजे लढाऊ वृत्ति, हे सर्व गूण 'हत्याराचा कायदा' पिढ्यान्‌पिढ्या अमलांत राहिल्यामुळें नामशेष झाले व हिंदी लोकांची प्रतिकारशक्तीच जवळ जवळ नाहींशी झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या गोष्टीवर पुष्कळ टीका वेळोवेळीं झालेली आहे. हत्यारांच्या कायद्यानें घातलेलीं बंधनें या देशांतील लोकांस खच्ची करण्यास कारणीभूत झालीं.

"The policy of the Govt. of India in regard to the administration of the Arms Act has all along been a subject of hostile criticism in the country. It is urged that innumerable restrictions and limitations imposed on the possession of fire-arms have led to the emasculation of the Indian manhood." ( S. P. Bajpai-Arms Rules Committee Dissenting Minute. )

सैन्यांत घेतांना हिंदी लोकांचे लढाऊ व बिनलढाऊ असे भाग पाडण्यांत आले. आणि बिनलढाऊ या नांवाखालीं ज्यांना समाजांत मान व प्रतिष्ठा आहे अशा सुबुद्ध लोकांना मज्जाव करण्यांत आला. यामुळें हिंदी सैन्यांत फक्त स्वाभिमानशून्य आणि निर्बुद्ध लोकांचाच भरणा होऊन सैन्यांतील नौकरी तर कमी दर्जाची मानली गेलीच, पण त्यांत शिरणें हें सुद्धां निर्बुद्धपणाचेंच लक्षण समजलें गेलें. सहाजिकच सैन्य व इतर सुबुद्ध समाज यांच्या आचारांत व राहणींत वगैरे सर्व बाबतींत दिवसेंदिवस फार मोठें अंतर पडत जाऊन, एकाच शरीरांतील कर्तृत्व करून घेणारा अधिकारी मेंदू व कार्य दाखविणारा स्नायू इतके जवळचे एकमेकांचे जुने संबंध पूर्ण नाहींसे झाले. या तुटलेल्या संबंधामुळें हें सर्व हिंदी सैन्य यानंतर पूर्ण सरकारी व भाडोत्री बनलें. व देशांतील या दोन प्रमुख गटांतील आपुलकी व आत्मीयता कायमची नाहींशी झाली. तात्पर्य हिंदी सैन्याचा व हिंदी राष्ट्रहिताचा काडीचाही संबंध राहिला नाहीं व तें एक धंदेवाईक परकीय सरकारच्या नौकरींतील सैन्य तयार झालें.

"At the same time it must be remembered that our native army is a mercenary force, serving an alien Govt." (Report of the Eden Commission, 1878-79 ).

इतर समाजाच्या इच्छा, आकांक्षा, चळवळी, सुखदुःखें व विचार यांचा या तटबंदींत पूर्ण बंदिस्त केलेल्या सैन्याच्या गटावर कांहींच परिणाम होऊं नये अशी ही आपोआपच निर्माण झालेली परिस्थिति, हिंदी शिपायांनीं

काय वाचावें, कसें रहावें, कोठें जावें वगैरे सर्व हालचालींवर व्यवस्थित निर्बंध घालून पूर्णत्वास पोहोंचविण्यांत आली. समाज व सैन्य यांची झालेली ही अत्यंत घातुक अशी ताटातूट नाहींशीं होऊन या दोन महत्त्वाच्या व मुख्य गटांत कधीं काळीं जर योग्य समज व साहचर्य घडून येईल तर राष्ट्रहिताचे प्रगतिपथावर एक पाऊल नक्की पुढें पडेल यांत संशय नाहीं.

बंडानंतर केलेल्या फेरबदलांपैकीं चवथा महत्त्वाचा बदल म्हणजे नवीन भरती कोणत्या प्रांतांतून व्हावी, प्रांतवारच सैन्यें कशी ठेवावींत, निरनिराळ्या जातींचा कसा भरणा करावा, वगैरे लहान सहान गोष्टींचा विचार सुरू झाला. या पद्धतीप्रमाणें निरनिराळ्या प्रांताचे, धर्मांचे, जातींचे वगैरे सैन्यांतही गट निर्माण झाले. यामुळें त्यांच्यांत अगोदरच एकमेकांबद्दल असलेला आपुलकीचा अभाव द्विगुणितच होत जाऊन त्याचें मत्सर, द्वेष, यांत रूपांतर झालें असल्यास नवल काय ? तात्पर्य सैन्यांतही यामुळें एकीचा अभाव झाला आणि सर्व भेदभाव कायम राहिले. सैन्यांत अशी गटपद्धति ( Class Composition ) न ठेवल्यास, लोकांच्या धार्मिक व सामाजिक भावना दुखावल्या जाऊन, तें एक असंतोषाला कारण होईल असें सरकारकडून याचें समर्थन करण्यांत येतें परंतु अखंड राष्ट्राचें एक सैन्य व त्यांतील आपण एक सैनिक अशी भावना अशानें कधींच उत्पन्न होणार नाहीं हेंही तितकेंच खरें; आणि यामुळें तिऱ्हाईताच्या भेदनीतीलाही सहजच वाव रहातो ही गोष्टही दृष्टीआड करून कसें चालेल ?

'फोडा व झोडा' Divide and rule ही इंग्रजराजनीति जरी आतां सर्वश्रुत असली तरी या नीतिमुळें किती सूक्ष्म व खोल परिणाम देशाच्या परिस्थितीवर झाले आहेत हे अजून आम्हाला पूर्णपणें उमगावयाचें आहे. "एका प्रांतांतील हिंदु व मुसलमान एकाच रेजिमेंटमध्यें भरती करावेत. याप्रमाणें निरनिराळ्या प्रांताचें सैन्य वेगवेगळें ठेवण्यानें आपल्याला त्यांचा वेळप्रसंगीं उपयोग करून घेतां येईल."

"निरनिराळ्या जातींना व लोकांच्या गटांना एकमेकांपासून पूर्ण भिन्न करून वेगवेगळे गट ठेवण्यांतच राज्याचा धोका कमीत कमी करण्याचे दृष्टीनें राज्यकर्त्यांना हितकारक ठरेल."

"Let all races, Hindu or Mohamedan, of one province be enlisted in one regiment and no others, and having created distinctive regiments, let us keep them so against the hour of need." (Sir John Lawrence: Peel Commission Report) "It speaks forcibly for the strong necessity which exists for so dividing and separating into distinct bodies the different nationalities and castes, the rulers in our eastern dominions may deem it safe and expedient to entertain in our armies, so as to render them as little dangerous as possible to the state." (Eden Commission: Maj. Gen. Tucker's Memorandum.)

एक बडे अधिकारी मेजर जनरल हँकॉक बंगालबद्दल बोलतात, "या इलाख्याचे, ज्यांमध्यें लोक अत्यंत भिन्न भिन्न तऱ्हेचे आहेत व एकमेकांत पुष्कळ मत्सर आहे, असे दोन किंवा तीन भाग करून त्याचा फायदा घेत राहणें श्रेयस्कर आहे."

"...that residency may be divided into two or three great areas, in which the people are very distinct, and in which there is a very considerable degree of that sort of jealousy and animosity......It is advisible for us to take advantage of that sort of feelings." (Eden Commision.)

तात्पर्य हिंदी सैन्य निर्बुद्ध, भाडोत्री, देश व समाज यांच्या आकांक्षापासून फार दूर व स्वाभिमानशून्य लोकांचें असें तयार झालेलें होतें. संस्थानी सैन्याचीहि स्थिती यापेक्षां फार वेगळी नव्हती. हिंदुस्थानांतील फक्त कांहीं थोड्या मोठ्या संस्थानांनींच सैन्य ठेवलेलें होतें व त्यास 'इंपिरिअल सर्व्हिस ट्रुप्स' असें संबोधित असत. त्याचा खर्च जरी संस्थानिक करीत

तरी त्याच्यावर संघटना व कारभार यांबाबत पितृवत् ब्रिटिश सरकारी अधिकारी असे. आणि हा मुख्य मिलिटरी ॲडव्हायसर दरबारला नेहमीं योग्य तो सर्व सल्ला देत असे.

'प्रतापगड युद्ध' या पुस्तकाचे प्रस्तावनेंत कै. मोडक यासंबंधीं लिहितात, "गेल्या एक शतकभर युद्धाच्या कामगिरीपासून आपल्या बुद्धिमान वर्गाची सोडवणूक झाली. हुकमामुळें मागें पुढें हलणारीं यंत्रें, अडाणी लोकांना परभाषेंतील हुकमाच्या शब्दांची जबर तालीम, त्यांच्या विचारशक्तीचा खून करून जुलमानें केल्यावर, सहज पैदा होऊं लागलीं. त्या प्याद्यांचें काम निर्बुद्ध माणसांकडूनच उत्तम होतें असें तज्ज्ञ राज्यकर्त्यांचें मत असल्यानें, बुद्धीला लष्करी वळण देण्याच्या शिक्षणाला हिंदुस्थानांत प्रवेश मिळण्याचें कारणच राहिलें नाहीं."

## लष्करी इतिहासाचा अभ्यास

तात्यांना या सर्व गोष्टीचें आकलन थोड्याच अवधींत झालें; व हे झालेले दुष्परिणाम कसे नाहीसे करतां येतील, त्याकरितां काय खटपट केली पाहिजे, यासंबंधीं ते विचार करूं लागले. 'माझें कार्य साधलें' 'मला काय त्याचे?' हा तर विचार राहोच, पण 'मी नोकरींत आहे, काय करणार?' अशीही पळवाट त्यांच्या कधींही मनांत आली नाहीं. देशांतील हरपलेला स्वाभिमान परत निर्माण केला पाहिजे हा आत्मविश्वास किंवा ज्याला इंग्रजींत मोराल ( Morale ) म्हणतात तो वाढविण्यासाठीं प्रथम लष्करी इतिहासाचा अभ्यास सुरू केला.

आपला सर्व इतिहास परकीयांच्या लेखणींनें लिहिला गेला असल्यानें तो आपल्याला किती विकृत स्वरुपांत वाचावयास लागतो हे आतां सर्वांच्या पूर्ण परिचयाचें आहे. उदयोन्मुख राष्ट्रानें आपल्या देशांतील तरुणांचा 'स्वाभिमान' जागृत करण्याकरितां आपणच इतिहासाचें संशोधन व लेखन केलें पाहिजे, ही गोष्ट त्यांना चांगली पटली होती. कोणत्याही राष्ट्राच्या राजकारणांत मुत्सद्दी व सेनापती ह्यांचे अबाधित संबंध असून मुत्सद्याची लेखणी जेथें थांबतें तेथें सेनापतीच्या कामगिरीस सुरुवात होते, व शेवटीं मुत्सद्याच्या लेखणीचा जोरही सेनापतीच्या

सेनासामर्थ्यावरच अवलंबून असतो. यामुळें युरोपीय देशांतून इतर सर्व गोष्टींबरोबरच युद्ध या विषयाचाही पद्धतशीर अभ्यास सुरू झाला. त्यामुळें गतकालीन युद्धांचा अभ्यास करणें आवश्यक होऊन लष्करी इतिहास हा वेगळा विषयच निर्माण झाला. या विषयाला तिकडे विश्वविद्यालयांतून पदवीपरिक्षेकरतांही ठेवण्याइतकें महत्त्व प्राप्त झालें. आपल्या पूर्वजांबद्दल खरा स्वाभिमान निर्माण करून राष्ट्रीय जीवनांत जिवंतपणा आणून राष्ट्रीय शीलसंवर्धनास ( Morale ) याचा फार उपयोग होत असल्यामुळें आपल्या देशांतील लष्करी इतिहासाचें त्यांनीं संशोधन करण्यास प्रारंभ केला. लष्करी इतिहास नुसता कागदपत्रांवरून संपादन करणें शक्य नसल्यामुळें त्याच्या लेखनाला तज्ज्ञाचीच जरूर आहे. तात्या स्वतः नकाशे घेऊन कागदपत्रांवरून काढलेलीं अनुमानें प्रत्यक्ष पडताळून पहाण्यास कित्येक वेळां, मिळेल त्या साधनांचा उपयोग करून व वाटेल त्या हालअपेष्टा सोसून मराठ्यांच्या इतिहासांतील पुष्कळशा युद्धभूमींवर पायपीट करीत असत. याबाबत त्यांनी आपल्या आयुष्यांतील अनेक वर्षें व पुष्कळ पैसाही खर्च केला. युद्धांचा पद्धतशीर अभ्यास व मांडणी ( Military Science ) ही गोष्ट जरी नवीन असली, तरी युद्ध ही गोष्ट फार जुनी आहे आणि युद्ध ही गोष्ट सामाजिक वा राष्ट्रीय घडामोडींचा शेवटचा निकाल लावण्याच्या दृष्टीनें व मनुष्य मूलतःच स्वार्थी असल्यामुळें न्याय्य हक्क प्रस्थापित करण्यासमुद्धां अनिवार्य झाली. यामुळें शास्त्रीय संशोधनाच्या आधुनिक युगांत हत्यारें, सैन्यरचना, दळणवळणाच्या सोई, वगैरे साधनांत जरी पूर्वीपेक्षां जमीनअस्मानाचें अंतर पडलें असलें, तरी मनुष्यस्वभावानें आपोआपच मर्यादित केलेलीं अशीं मूलतत्त्वें त्रिकालाबाधितच रहातात. कालमानाप्रमाणें दळणवळणाच्या साधनांत जरी फार फरक पडले तरी दळणवळणाचे मार्ग ( Lines of Communication ) सुरक्षित ठेवण्यासाठीं कांहीं उपाययोजना आतां जशी करावी लागते तशी पुर्वींहि करावी लागतच होती. व योग्य वेळीं अचानक छाप्याचा ( Surprise ) उपयोग जसा आज होतो तसाच पूर्वीही होता. ह्या विषयाचें महत्त्व समजाऊन यास अभ्यासक्रमांत जागा मिळावी म्हणून तात्यांनी विश्वविद्यालयांना लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात—

" Military History, I maintain is based upon facts of human nature which is scarcely changeable as war is almost a nature's law by which all powerful parties settle their quarrels. "

अर्थात् ,लष्करी तज्ज्ञांस तें युद्ध कसें घडलें असेल हें डोळ्यांपुढें आणण्यांस तत्कालीन सामाजिक, भौगोलिक, राजकीय, आर्थिक वगैरे सर्व परिस्थितीची चांगली माहिती असून त्यांनीं त्या दृष्टीनें युद्धभूमीचें अत्यंत सूक्ष्म असें प्रत्यक्ष अवलोकन केलें पाहिजे. तात्या अशा तऱ्हेनें प्रत्येक रणभूमीचा अभ्यास करीत व त्यांच्या युद्धशास्त्राच्या खोल वाचनानें व प्रत्यक्ष अनुभवानें त्यांना सर्वच गोष्टी भराभर आकलन होत असत. परंतु इतकें करून त्यांना स्वतःला पूर्वजांच्या शौर्यवीर्यादि गुणांची व आपल्या सेनापतींच्या युद्धकौशल्याचीं जरी खात्री पटली होती तरी देशाला किंवा समाजाला त्यांनीं अत्यंत कष्टानें मिळविलेल्या या ज्ञानाचा फायदा काय ? ग्वाल्हेर मिलिटरी ट्रेनिंग स्कूलमध्यें ते हा विषय शिकवितही असत. ग्वाल्हेरच्या सैन्यांतील अधिकाऱ्यांना अशा युद्धभूमीचा अभ्यास कसा करावा ह्याचें प्रात्यक्षिक देण्याकरितां ते मुद्दाम घेऊन सहल करित असत व सर्व रणक्षेत्राचें अवलोकन झाल्यावर नकाशावरून व जुन्या कागदपत्रांच्या साधनांवरून तेथेंच मोठें विचारपरिप्लुत असें व्याख्यान होत असें. युद्धपूर्व राजकारण (Prewar Politics), लढाईच्या हालचाली ( Strategy & tactics of war ) आणि नंतरची राजकीय परिस्थिती ( Postwar administration ) अशा सर्व मुद्यांवर अत्यंत माहितीपूर्ण व राष्ट्रप्रीतीनें भरलेल्या वक्तृत्वाचा श्रोत्यांवर योग्य तोच परिणाम होऊन, त्यांना तात्यांच्या अभ्यासाबद्दल कौतुक व आपल्या पूर्वजांबद्दल आदरयुक्त अभिमान वाटून, ते आनंदानें डोलत असल्यास नवल काय ? परंतु त्यांच्या विषयाच्या पसाऱ्याला व महत्त्वाकांक्षेच्या भरारीला ग्वाल्हेरचें मिलिटरी स्कूल व सैन्य हें फारच अकुंचित क्षेत्र होतें. तेव्हां त्यांनीं या विषयाचा प्रवेश युरोपीय देशाप्रमाणेंच आपल्याही विश्वविद्यालयांतून लवकरच व्हावा अशी सर्व हिंदुस्थानभर खटपट चालविली. या खटपटीकरितां वर बनारसपासून खालीं म्हैसूरपर्यंत देशभर हिंडून विश्वविद्यालयाच्या अधिकारी–मंडळीला ही गोष्ट

पटवितांना त्यांची कित्येक वर्षें गेली. या विषयांचें महत्त्व पूर्णपणें लक्षांत न आल्यामुळें व विषयाच्या अज्ञानामुळें लवकर येणें शक्यही नसल्यामुळें "पैसे नाहींत," 'या विषयावर पुस्तकेंच नाहीत,' वगैरे सहज सुचणारीं उत्तरें मिळूं लागलीं. 'गरज निर्माण करा म्हणजे पुरवठा करण्याचीं साधनें आपो-आप पुढें येतील' असें तात्या नेंहमीं सांगत. परंतु ज्या विश्वविद्यालयाचीं चार परीक्षा घेऊन प्रशस्तीपत्रकें देण्यापलिकडे मजल जात नाहीं, त्यांच्या-कडून काय अपेक्षा करावी? या प्रयत्नांत तात्यांना येवढें कळून चुकलें कीं स्वतःच अशीं पुस्तकें निर्माण करणें जरूर आहे. स्वतः विश्वविद्यालयांकडून पुढाकार घेऊन हें कार्य होणार नाहीं. १९११ सालीं त्यांना कमिशन मिळाल्यापासून पुढें या उद्योगांत त्यांचीं पुष्कळ वर्षें गेलीं. १९१५ सालीं ते युद्धावरच गेले, त्यामुळें जो खंड पडला असेल तेवढाच. परंतु या त्यांच्या युरोपच्या प्रवासाचा व तत्कालिन परिस्थितीचाही नवीन अनुभव व अवलोकन या दृष्टींनीं त्यांनीं चांगलाच फायदा करून घेतला. तेथेंही हिंदी व युरोपिय अधिकारी यांच्या वागविण्यांत व खाण्यापिण्यांत भेद ठेऊन जी हीन वृत्ती दाखविण्यांत येत असे त्याला त्यांच्याकडून जागच्याजागीच योग्य उत्तरें मिळत असत; परंतु त्यामुळें '**मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलम्।**" या वृत्तीचा त्यांना मनापासून कायमचा तिटकाराच आला व आपला देश प्रतिकारक्षम करण्यास आपण प्रथम मानसिक गुलामगिरींतून मुक्त झालें पाहिजे; येवढेंच नव्हे, तर सर्व प्रयत्न फार कौशल्यानें व दीर्घकाल करावा लागणार हें त्यांना जास्त जास्त भासूं लागलें.

## तरुण सुशिक्षितांस प्रोत्साहन

परत त्यांच्या उद्योगास आरंभ झाला. तरुण, सुशिक्षित व होतकरु मंडळीस सैनिकपेशा घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे व अशीं माणसें जितकीं सैन्यांत जास्त शिरतील, तितके त्या निर्बुद्ध व भाडोत्री सैन्यांत राष्ट्रीय स्वाभिमानाची पेरणी करणें शक्य होईल या कल्पनेनें त्यांनीं अशा तरुण मंडळीस सक्रीय मदत करण्यास सुरुवात केली, आणि कित्येक तरुण मंडळींस त्यांच्यामुळें सैन्यांत शिरण्यास प्रोत्साहन मिळून उत्तम शिक्षणही मिळालें.

या तरुणांच्या मनावर राष्ट्रीय ध्येयाचा संस्कार घडावा म्हणून त्यानीं आटोकाट प्रयत्न केले. यांच्यात उच्च प्रकारची ध्येयनिष्ठा व त्याकरितां प्राण देण्याचीहि तयारी असावी असें त्यांस रात्रंदिवस शिक्षण दिलें. त्यांच्याकरितां वाटेल ते कायिक, वाचिक व मानसिक कष्ट सोसून शक्य ती आर्थिक मदतही निरपेक्ष बुद्धीनें केली. याप्रमाणें वर्षानुवर्षे त्यांच्या सान्निध्यांत राहून गुरुमुखांतून वेद ऐकल्यावरसुद्धां अधिकाराच्या व पैशाच्या योगानें सहजच निर्माण होणाऱ्या ऐषआरामांत व अहंकारांत गुरफटून गेल्यानें त्यांना यांपैकीं पुष्कळच तरुणांच्या बाबतीत निराश व्हावें लागलें, तरीहि ते रागावत नसत. उलट 'केलें तें माझ्याकरितां, तुमच्याकरितां किंवा नांवलौकिकाकरितां नसून ध्येयप्राप्तीकरितां कर्तव्यबुद्धीनें सर्व केलें असल्यानें माझी चाकरी त्या परमेश्वराचे घरीं रुजू आहे' येवढेच तें म्हणत असत.

## लेखनद्वारा जागृती

त्याचप्रमाणें या काळांत त्यांनीं लेखनालाही आरंभ केला. निरनिराळ्या मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रांतून जनतेला लष्करी प्रश्नांवर माहिती देण्यासाठीं लेखमाला चालू झाल्या. लष्करी शिक्षण, लष्करी वाङ्मयाची अवश्यकता, हिंदुस्थानी सैन्यांतील ज्या वेळोवेळी हिंदीकरणाबाबत 'सुधारणा' म्हणून पुढें आणण्यांत आल्या त्यावर मूलग्राही व सडेतोड टीका, आणि 'यू. टी. सी. तील मुलांस' उद्देशून उपयुक्त सूचना व सल्ला अशा विविध विषयांवर लेख येत असत. आपल्या तरुण पिढींतील राष्ट्रीय स्वाभिमान निर्माण करण्याकरितां ते कसा उपदेश करीत याचा मासला खालील उताऱ्यावरून दृष्टीस येईल. "देशरक्षण हें तुमचें आद्य कर्तव्य आहे. बहाद्दरी एवढाच गुण लष्करी आहे असें समजण्याचें हे दिवस नव्हेत. तुम्ही पुढारी ( officer ) या नात्यानें कार्य करण्यास शिक्षण मिळविलें पाहिजे." यानंतर टॅक्टिक्स, फ्रॉन्टीअर वॉरफेअर, ब्रिटिश व हिंदी सैन्याची शासनपद्धती, आऊट डोअर स्केचिंग ( Out door sketching ), मस्केट्री, सैन्याचा कायदा ( Military law ) वगैरे विषयांवर माहिती मिळवणें जरूर असून त्याकरितां कोणतीं

पुस्तकें वाचावीत,हें सांगून सध्यां मिळणारें शिक्षण फारच अपूर्ण असल्यानें फसून कांहीं भ्रामक कल्पना करून घेऊं नका असा ते इशारा देतात. "तुम्हाला सध्या यू.टी.सी.त जें शिक्षण मिळतें तेवढ्यानें तुम्ही गोऱ्या अधिकाऱ्यासारखे 'ऑफिसर' होण्यास पूर्ण लायक झाला असा चुकीचा समज तुमच्या राष्ट्राच्या इभ्रतीस फार घातक आहे. कदाचित गोऱ्या अधिकाऱ्यासारखे जिरेटोप चढविण्यानें किंवा शिपायाऐवजी टॉमीसारखे 'प्रायव्हेट' म्हणवून घेतल्यानें आपण त्यांच्यासारखे होतों हा समज सोडा. ही नुसती नक्कल राष्ट्राच्या कित्येक आवश्यक गुणांतील आपलेपणा हा गुण नाहीसा करते. इंग्रजी 'एटिकेट' व काट्याचमच्याच्या ज्ञानावाचून कांहीं अडण्याजोगे नाहीं. या सर्व गोष्टी राष्ट्राचें राष्ट्रियत्व नाहीसें करणाऱ्या आहेत. सँढर्स्टला जाण्याकरितां या तात्पुरत्या सात आठ दिवसांतही शिकता येतात. त्यासाठीं काळाचा व पैशाचा अपव्यय वर्षानुवर्षे करीत बसणें हें काय शहाणपणाचें म्हणावयाचें ?" याप्रमाणें तरुणांनीं राष्ट्रीय शीलसंवर्धन करणें किती जरूर आहे, हें ते नेहमीं त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत असत. व ज्यांच्याशी स्पर्धा करावयाची त्यांची खरी योग्यता प्राप्त करून घेण्यास कसा अभ्यास व प्रयत्न पाहिजे हेही सारखे समजाविण्याची शिकस्त करीत.

## सैन्यातील जागृतीचे प्रयत्न

शिवाय सर्वसामान्य सैनिक वर्गांत राष्ट्रीय भावना उत्पन्न होण्याकरितां आपल्या ऐतिहासिक मोठ्या व्यक्तींचीं स्मारकें व उत्सव करण्याची प्रथा पाडण्याची त्यांनीं पुष्कळ खटपट केली. ग्वाल्हेरला शिवाजी महाराजांचा झालेला तिसऱ्या शतसांवत्सारिकाचा उत्सव फार यशस्वी व अर्थपूर्ण झाला, यांत शंका नाहीं. शिवाजी महाराजांच्या मिरवणूकींत त्यावेळीं जुन्या चालीरीतीप्रमाणें पोशाख व ऐट केलेलें सैन्य, अधिकारी, मानकरी व सरदार आणि शुद्ध मराठेशाहींतील चालीरीती यांचा सोहळा पाहून गतऐश्वर्याबद्दल कोणाच्याही मनांत स्वाभिमान,आत्मविश्वास आणि आनंद अशा निरनिराळ्या भावनांच्या उर्मी उसळल्याशिवाय राहिल्या नाहींत. मननीय व्याख्यानें, जुन्या हत्यारांचें प्रदर्शन, एखाद्या मराठी युद्धांतल्याप्रमाणें सैन्याच्या हालचालींचें प्रत्यक्ष निदर्शन, निरनिराळ्या मर्दानी खेळांचें सामने, मिरवणुकीचा

थाट वगैरे कार्यक्रम फार आकर्षक झाले. मराठ्यांच्या इतिहासांतील सेनापतींचे याप्रमाणेंच उत्सव व्हावे म्हणून 'मल्हारराव–बाजीराव उत्सव मंडळ' इंदुरास स्थापन झालें. तात्यानी त्यांतही पुष्कळ वेळां भाग घेऊन त्यास एक वळण लावण्याचा प्रयत्न केला. या मंडळातर्फे रावेरखेडीस झालेल्या बाजीराव उत्सवाचे वेळीं ते अध्यक्ष होते. अशा सर्व प्रसंगीं त्यांनीं आपली 'सैनिक दिनांची' कल्पना सारखी पुढें मांडून त्याचें राष्ट्रीय–शील संवर्धनाचें दृष्टीनें किती महत्त्व आहें हें लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. मण्डळाच्या अहवालांत म्हटले आहे कीं—" महाराष्ट्राच्या-गतवैभवास व मर्दुमकीस साजेल अशी बरीच अप्रकाशित माहिती कॅप्टन साहेबाकडून कळली. त्यांना मराठ्यांचा इतिहास व त्यांतील प्रमुख व्यक्ति यांचा किती निकट परिचय झाला आहे हें त्यांच्याशीं चार शब्द बोलतांच लक्षांत येईल. 'सैनिक दिन पाळा' हा अध्यक्षांचा आदेश होता.

## कायदे मंडळाकडून चालना देण्याचे प्रयत्न

याच सुमारास आणखी एक जें महत्त्वाचें कार्य चालू होतें तें म्हणजे लष्करी खर्चासंबंधीं कायदेमंडळांतील सभासद व इतर पुढारी लोकांना माहिती पुरवून त्यांच्याकडून सैन्याच्या बजेटवर टीकास्त्र सोडणें. स्वतः नोकरींत असल्यानें त्यांनीं याबाबत सडेतोड टीका करून या राखीव (Nonvotable) खात्यासंबंधीं जागृति करतांना देशांतील पुढारी व कायदेमंडळांतील प्रतिनिधी यांच्यांत याविषयीं प्रथम आस्था व औत्सुक्य निर्माण करणें जरूर होतें. लष्करी खर्चाचा ( Military Budget ) त्यांचा अभ्यास फार खोल व सूक्ष्म असे. स्वतः सूक्ष्म अभ्यास करून काढलेली आंकडेवार माहिती व स्वानुभवावरून त्यावर केलेली स्पष्ट टीका यांचा उपयोग कायदेमंडळांतील प्रतिनिधीनीं व वेळोवेळीं पुढाऱ्यांनींही करून घेतला व यांतूनच स्कीन कमीटीचा जन्म झाला असे म्हटल्यास फारसें गैर होणार नाहीं.

१९१४ ते १८ च्या महायुद्धानंतर सरकारला हिंदी लोकांच्या लष्करी बाबतींतील गाऱ्हाण्यासंबंधीं कांहींतरी करणें जरूर पडलें व दरवर्षी दहा हिंदी तरुणांना सँढर्स्टला पाठवून हिंदी सैन्यांत अधिकारी म्हणून घेण्याचे ठरलें. याप्रमाणें हिंदी सैन्याचें हिंदीकरण होण्यास सहज शेकडोशें वर्षें

लागतील हें सहज विचार करून दिसण्यासारखे आहे. हिंदुस्थानांत लष्करी अधिकारी होण्याच्या योग्यतेची तरुण मंडळी मिळतच नाहींत अशी कल्पना करून घेऊन, अशी तरुण मुलें तयार करण्याच्या हेतूनें डेहराडून येथें १९२२ सालीं 'मिलिटरी कॉलेज' या नांवाखालीं प्राथमिक शिक्षण देण्याकरितां एक शाळा काढण्यांत आली आणि लॉर्ड रॉलिन्सन (Rawlinson) हे सरसेनापती असतांना १९२३ सालीं हिंदीकरणाचा 'एट-यूनिटस्-स्कीम म्हणून मजेदार कार्यक्रमही जाहीर करण्यांत आला. या योजनेप्रमाणें सैन्याचा एक लहानसा भाग बाजूस ठेऊन त्याचें हिंदीकरण किती यशस्वी होते हें पहावयाचें व ही गोष्ट प्रयोगादाखल असल्यानें सर्व सैन्याच्या कारभारावर याचा परिणाम होऊं नये म्हणून हा भाग वेगळा ठेवण्यांत येत आहे असें सांगण्यांत आलें, आणि शेवटी १९२५ सालीं चांगली योग्य तरुण मंडळी लष्करी पेशा स्वीकारण्यास कशी पुढें येतील याची चौकशी करण्याकरितां कायदेमंडळाच्या मागणीवरून ले. जनरल स्कीन यांच्या अध्यक्षतेखालीं 'हिंदी सँढर्स्ट कमिटी' नेमण्यांत आली. या सर्व गोष्टी होत असतांना तात्यांची लेखणी यांचा योग्य तो समाचार घेतच होती. हिंदी अधिकाऱ्यांसाठीं निर्माण केलेल्या दहा जागा, डेहराडूनचें मिलिटरी कॉलेज, हिंदिकरणाची एट-यूनिटस्-स्कीम, हिंदुस्थानांतील लष्करी शिक्षण वगैरे सर्व विषयांवर सडेतोड टीकात्मक लेख त्यावेळीं केसरींत 'एक लष्करी तज्ञ' या नांवाखालीं आढळतात. हिंदी करणाच्या एट्-यूनिटस-स्कीमवर' लिहिलेल्या लेखाचा मथळाच 'सैन्याच्या हिंदीकरणांतील कावा' कसा अर्थपूर्ण आहे. यामध्ये या सैन्याच्या विभागांतील १२० अधिकाऱ्यांच्या जागांपैकीं साधारण ४८ जागा मेजरपेक्षां वरच्या दर्जाच्या असल्यानें गोऱ्यावर काळा अधिकारी येण्याची आपत्ति उत्पन्न होऊं नये, व राहिलेल्या ७२ जागांपैकीं सध्याच सैन्यांत जे हिंदी अधिकारी आहेत ते तेथें आणून भरल्यावर फारशा जागाच उरत नसल्यानें नवीन कमिशन देण्याचीही आपत्ति टळते असा त्यांत दुहेरी डाव साधत होता. शिवाय ब्रिटिश अधिकाऱ्यांशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याची सवय लागली तर तें ठीक नव्हे या उद्देशानेंही ही योजना आंखली गेली असण्याचा संभव होता. शेवटीं, युद्धांतील कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून अशिक्षित व नालायक कमिशन बहाल करून त्यांच्या

बौद्धिक कमकुवतपणाबद्दल हिंदी अधिकारी नालायक असतात असा ठपका देऊन, परत हिंदीकरणास अडथळा उत्पन्न करण्यास कारणही आपोआपच काढतां येईल असा उद्देश यांत आहे असे स्पष्ट या लेखांत प्रतिपादन आहे.

**स्कीन कमिटीपुढील ( Skeen Committee ) कार्य**

या सर्व गोष्टींमुळें जनतेचें लक्ष स्कीन कमिटीच्या कार्याकडे लागलें होतें. यांतून खरें मिलिटरी कॉलेज निर्माण होते, का आणखी एकादा कावा उत्पन्न होतो याची जिज्ञासा राजकीय वातावरणांत उत्पन्न झाली होती. व राष्ट्रीय वृत्तीचे पंडित मोतीलालसारखेही लोकप्रतिनिधी यांत काम करीत होते. पुढें राष्ट्रसभेच्या कांहीं धोरणामुळें पंडित मोतीलाल यांनीं राजीनामा दिला. तरीही या कमिटीच्या कार्यांत एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्तमान-पत्रप्रतिनिधींना कमिटीच्या बैठकींना हजर रहाण्याची परवानगी असून बैठकीचा अहवालही छापण्याची परवानगी होती. केसरी, मराठा, लीडर, हिंदुस्तान टाईम्स् वगैरे सर्व प्रमुख पत्रांत दर बैठकीचा अहवाल येत असे. कमिटीनें प्राथमिक पुरावा गोळा केल्यानंतर एक प्रश्नपत्रिका काढली, व उत्तरें मागविलीं; व त्या उत्तरांवरून ज्यांना प्रत्यक्ष कमिटीपुढें साक्ष देणेंकरितां बोलावणें जरूर वाटलें त्यांना आमंत्रण देण्यांत आलें. प्रश्नपत्रिका बाहेर आल्यावर तात्यांनीं एक मोठा १००-१२५ पानांचा मजकूर कमिटीला पाठविला. तात्यांना साक्ष देण्यास बोलावणेंही आलें. या संधीचा त्यांनीं पुरेपूर फायदा घेऊन ' न भूतो न भविष्यति ' अशी सर्व गोष्टीवर मुद्देसूद स्पष्ट व खणखणीत टीका केली. साक्षीच्या अगोदरच स्कीन कमिटीपुढील कार्य ' या मथळ्याखालीं त्यांचा लेख प्रसिद्ध झाला. हिंदुस्तानांत लष्करी वारे उत्पन्न होण्यास व योग्य तरुण, लष्करी पेशासाठीं चढाओढीनें मोठ्या संख्येनें पुढे येण्यास काय गोष्टी करावयास हव्यात, यासंबंधीं २१ मुद्दे देऊन प्रत्येक मुद्याचें मंडण करण्याकरतां शेवटीं भरपूर आंकड्यांसह पुरावा देण्यांत आला होता. यांत खालील मुद्दे होते. ( १ ) सैन्यांत प्रवेश मिळण्यास जातींचा निर्बंध, लढाऊ–बिनलढाऊ असा नसावा. ( २ ) सैन्यांतील तोफखाना, टँक वगैरे सर्व शाखांत हिंदीं तरुणांस प्रवेश असावा. ( ३ ) युरोपीय सँढर्स्ट व वूलविच्सारख्या संस्था ६ महिन्यांत

येथें स्थापन कराव्यात. ( ४ ) प्रवेश देतांना सध्याची असलेली सरकारी नेमणुकीची पद्धत ( Nomination ) बंद करून त्याऐवजी चढाओढीची परीक्षा ( Competition ) घेऊन उमेदवारांची निवड करावी ( ५ ) सैन्यांतील सध्याची निरनिराळ्या जाती एका नांवाखालच्या रेजिमेंटमध्यें भरण्याची पद्धत बंद करावी ( ६ ) सध्याचें डेहराडून येथील नाममात्र ' लष्करी कॉलेज ' बंद करावें. ( ७ ) प्रवेशास असलेली वयाची मर्यादा २० पासून २३ पर्यंत चढवावी. ( ८ ) सैन्यांतील व्हॉइसरॉय व बादशाही असें दोन प्रकारचे अधिकार देण्याचें बंद करावें. ( ९ ) हिंदी सॅढर्स्टचें शिक्षण आर्थिकदृष्ट्या साधारणपणें सर्वांच्या आटोक्यांतील ठेवलें पाहिजे. ( १० ) यू. टी. सी. ही संस्था वाढविली पाहिजे. ( ११ ) प्रवेश देतांना अविश्वासाचें धोरण ( Policy of Mistrust ) ठेवता कामा नये. ( १२ ) युद्धांतील कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून बादशाही अधिकार ( King's Commission ) देण्याचें बंद केलें पाहिजे. ( १३ ) विश्वविद्यालयांत लष्करी इतिहास व युद्धशास्त्र हा विषय घेऊन लष्करी शिक्षण दिलें पाहिजे. ( १४ ) सर्व शाळांमधून कवाईत व बंदूक ( Drill and Musketry ) यांचें शिक्षण दिलें पाहिजे. ( १५ ) हत्यारांचा कायदा थोडा सैल करणें जरूर आहे. यू. टी. सी. व आय्. डी. एफ्. च्या लोकांना परवाने द्यावेत ( १६ ) यू. टी. सी मध्यें ओ. टी. सी. इतकें शिक्षण दिलें पाहिजे. ( १७ ) देशांत ठिकठिकाणीं 'रायफल क्लब्स्' स्थापण्यास सरकारनें प्रोत्साहन दिलें पाहिजे. ( १८ ) प्रवेश परीक्षा सर्व इलाख्यांच्या ठिकाणीं घ्याव्यात ( १९ ) यू. टी. सी. व आय्. डी. एफ्. च्या लोकांना कांहीं विशेष शिक्षणाकरितां पंचमढी, सातारा, रावळपिंडी वगैरे ठिकाणीं प्रवेश मिळावा. ( २० ) आय्. डी. एफ्. व राखीव सैन्यांत सर्वांना प्रवेश द्यावा. ( २१ ) सैन्यांत सर्वांना समतेनें वागविण्यांत यावें.

हल्लींच्या सैन्यांत अधिकाऱ्याच्या जागा मिळण्यास नुसती शारिरीक बळकटी असून चालत नाहीं. तर बौद्धिक योग्यतेचीहि तितकीच जरुरी आहे. अशा प्रकारची शारिरीक व बौद्धिक तयारी कॉलेजें व शाळा यांतील कित्येक विद्यार्थ्यांत दिसून येते. यू. टी. सी. त १।२ वर्षें काढलेली अस-

त्यास जास्तीच चांगलें. तेव्हां शाळा, कॉलेजांतील विद्यार्थीवर्ग हा सैन्यांतील उच्च शिक्षणाला खरा लायक वर्ग आहे. परंतु हीं मुलें सरकारनें ठरविलेल्या बिनलढाऊ जातींतून येत असल्यानें त्यांना सैन्यांत मज्जाव करून ठेवलेला. तेव्हां ही जातवारी अगोदर नाहिशी करा असा पहिलाच मुद्दा ठेवणें जरूर होतें. परंतु हें विपुल साहित्य तयार असलें तरी त्याचा उपयोग करून घेण्याकरितां तरुणांत लष्करी पेशाची आवड उत्पन्न करून त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें प्रवेश मिळून लष्करी नोकरींत पूर्ण वाव मिळाला पाहिजे. याकरितां सध्याच्या शिक्षणक्रमांत योग्य ती शारिरीक शिक्षणाची, लष्करी व राष्ट्रीय दृष्ट्या भर टाकणें जरूर असून त्याकरितां शाळेंत कवाईत, बंदूक वगैरे आणि कॉलेजांत यू. टी. सी. ची गुणानें व संख्येनेही वाढ करून, विश्वविद्यालयाच्या अभ्यासांत लष्करी इतिहास घेणें कसें इष्ट आहे हें सहज दिसून येते.

या सर्व गोष्टींमुळें लष्करी पेशाची आवड उत्पन्न होईल अशा प्रकारची एकदां या विषयाबद्दलची तहान निर्माण झाली म्हणजे हिंदवी लष्करी इतिहासाचें सहजच संशोधन व लेखन होऊं लागेल, स्वाभिमान निर्माण होईल; महत्त्वाकांक्षा वाढतील, व त्यामुळें राष्ट्रप्रेमानें भरलेलें लष्करी वारें तरुण पीढींत उत्पन्न होईल. नाहींतर इंग्रजींतील एका म्हणीप्रमाणें ' You can take the horse to the water, but cannot make it drink ' घोड्याला पाण्यावर न्याल पण त्यांस पाणी पिण्यास कसे लावणार ? तद्वतच राष्ट्रप्रेमविरहित, पोटभरु लोकांना सैन्यांत शिरण्याची संधी मिळाली तरी त्याचा खरा व पुरा उपयोग करण्याचें त्यांना काय साधणार ?

सर्व सामान्य माणसास सैनिकपेशा घेतां यावा या दृष्टीनें, प्रवेश फक्त जरूर तेवढ्या शारिरीक व बौद्धिक गुणांवरच अवलंबून ठेवावा. त्यांत त्याची जात, नातेवाईक, वशिले, श्रीमंतीचा दर्जा, सरदार, राजे किंवा मोठ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या कुलांत झालेला जन्म, अशा गोष्टींचा विचार आणणें गैरशिस्त असून चांगलीं मुले अशानें आपोआपच गळतात, आणि दरवर्षीं दहा हा आंकडा हिंदुस्तानचें मानानें समुद्रांत एकाद्या माशा-प्रमाणें असून तो पुष्कळ वाढविला पाहिजे हेंही सहजच प्राप्त होतें.

इंग्लिश सँढर्स्टच्या शिक्षणाला साधारणपणें दरमाणशीं १८००० रु. खर्च येतो. हिंदुस्तानांतील अवाढव्य सैन्य, देशांतील लायक तरुणांची मोठी संख्या, भरपूर पैसा, वगैरे सर्व गोष्टींची येथें अनुकूलता असतांना इच्छा असल्यास येथें सँढर्स्टसारखें कॉलेज ४–६ महिन्यांत सहज निर्माण करतां येईल. परंतु अशा कॉलेजच्या शिक्षणाचा विद्यार्थ्यास खर्च कमी यावा असें ठरविलें म्हणजे एकंदर विद्यार्थ्यांची संख्या सँढर्स्टसारखीच ६०० पर्यंत असावयास पाहिजे. यामुळें इंग्लंडचा व येथील डेहराडूनच्या प्राथमिक शाळा वगैरे मिळून येणारा अवाढव्य खर्च आपोआपच वाचेल. शिवाय परदेशांत लहान वयांत, अगदीं वेगळ्या व हिंदुस्तानच्या रक्तांत न सामावणाऱ्या अशा चालिरीतींत व पद्धतींत मुलगा पाठविणें आज जसें पालकांच्या जिवावर येते, तोही मुद्दा नाहिसा होईल. आणि सर्वसामान्य पालकालाही आपल्या मुलांस या शिक्षणास पाठवितां येईल. येथील कॉलेजांत पाश्चात्य चालिरीतींचें अंधानुकरण करण्याचें कांहींच कारण नसून त्यामुळें शिक्षणांत कसलीही कमतरता येत नाहीं असें त्यांनीं स्पष्ट बजावलें. देशी चालिरीतींत वाढलेले शाकाहारी लोकसुद्धां उत्तम शिपाई व अधिकारी होऊं शकतात, येवढेंच नव्हे तर उलट त्यामुळें विद्यार्थ्यांचा खर्चही कमी होईल, असे त्यांनीं सांगितलें. डेहराडूनला असलेली प्राथमिक शिक्षणाची संस्था यांना मिलिटरी कॉलेज हें नांव देण्यानें लोकांची निष्कारण दिशाभूल होत असून,अशा संस्थेची कांहींच आवश्यकता नाहीं असें त्यांनी दाखवून दिले. देशांतील शिक्षणसंस्थांतून योग्य धर्तीवर शारिरीक शिक्षणाचा जर फैलाव केला तर सर्वच संस्था कमी खर्चांत असल्या संस्थे इतक्याच कार्यक्षम करतां येऊन देशांतील सर्व सामान्य जनतेलाही त्याचा फायदा घेतां येईल. तेव्हां देशांतील पैशाचा चाललेला हा अपव्यय एकदम बंद करणेंच इष्ट आहे असा त्यांचा आग्रह होता.

इतकें करूनही सैन्यांमध्यें कांहीं फेरबदल करणें जरूर आहे असें त्यांनी दाखविलें. एका रेजिमेंटमध्यें निरनिराळ्या जातींचें जसें मिश्रण करतात त्यामुळें त्यांच्यांत एकमेकांबद्दल आपुलकी ( Spirit-de-corps ) वाटणें कठीण होतें. आणि कोणत्याही सैन्याची कार्यक्षमता त्यांतील माणसांस एकमेकांबद्दल किती प्रेम व आपुलकी वाटते, यावरच पुष्कळशी अवलंबून

आहे. म्हणून ही वर्गवारीची पद्धत ( Class composition ) बंदच केली पाहिजे असें त्यांनी सुचविले. त्याचप्रमाणें व्हाइसरॉय व बादशाही असे दोन प्रकारचे अधिकार ठेवण्याची रीत फक्त हिंदीं सैन्यांतच दिसून येते. इतर कोणत्याही देशांत ही गोष्ट नाही इतकेंच नव्हे तर येथील ब्रिटिश फौजेंतही नाहीं. यामुळें फक्त हिंदी व ब्रिटिश यांच्या अधिकारांत व पुढें सर्वत्र बाबींत भेद उत्पन्न होण्यास मदत होते. म्हणून अशी रीत मुळीच बंद करावी असें त्यांनीं प्रतिपादिलें. तात्पर्य, ज्या ज्या गोष्टींमुळे भेदनीतीचा अवलंब करून सैन्यांत फोडझोड करणें शक्य होतें, अशा सर्व गोष्टी या राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें नाहिशा करणें किती जरूरीचें व अगत्याचें आहे हें त्यांनी श्रोत्यांच्या मनांवर बिंबविण्याचा अटोकाट प्रयत्न केला. सैन्यांत सध्यां शिपायाकरतां बोधभाषा म्हणून रोमन उर्दू ( Roman Urdu ) अशी एक भाषा वापरतात. यांत रोमन लिपींतून उर्दू शब्द लिहितात व उच्चार उर्दूच असतो. या संकर भाषेला जगांत तुलना नसेल. यामुळें शिपायाला रोमनलिपी शिकावी लागते, व उर्दू शब्द यावे लागतात. व या दोनही भाषांचा त्याच्या मातृभाषेशीं कांहींच संबंध असत नाहीं; शिवाय या भाषेंतून त्यास एक पुस्तक वाचतांनाच म्हातारपण येतें, तेथें ज्ञानसंपादनाची गोष्ट कशाला? यामुळें स्वदेशी भाषांतून लष्करी ज्ञानाचा फैलाव कधीही होण्याचा संभव नाहिसा होऊन, एकदोन पुस्तकावर तालीम करूनच थकवा येत असल्यानें बुद्धीमान वाचकालाही जास्ती वाचनाची आवड उत्पन्न होण्याची आपत्तीही टळते. तात्यांनीं सैन्याची भाषा हिंदीच पाहिजे असा आग्रह धरला. सर्व स्वदेशी भाषांना ही जवळची असून हिंदुस्तानची राष्ट्रभाषा होण्याच्या योग्यतेची ही बोली आहे असें तात्यांनी निक्षून सांगितलें. तेव्हां, आपले पुढारीही इंग्रजींत बोलतात ( Even your leaders speak in English ) असा टोमणा मारण्यांत आला. परंतु त्याला तात्यांनीं, " पुढाऱ्यांना हिंदींत बोलता येत नसले तरी लोकांना ती चांगली समजते " असें चटकन प्रत्युत्तर देऊन टाकलें.

देशांतील हत्यारांच्या कायद्यासंबंधीं अन्यायबंधनें कमी करावीत असें त्यांनीं सांगितले होते. त्यावर आणखी एका सभासदांनीं त्यांना या सर्व गोष्टींचा हत्यारांच्या कायद्याशीं संबंध काय, असा प्रश्न विचारला. त्याला

उत्तर देतांना तात्यांनीं असें चोख सांगितलें कीं, "गेलेली हत्यारें परत जवळ आल्यावरच लोकांत जुन्या लष्करी बाण्याचें पुनरुत्थान होईल. ( Possession of arms by the people will make them pick-up the traditions and develop the instincts of a soldier ).

सर्व सैन्याचें हिंदीकरण २८ वर्षांचें आंत कार्यक्षमतेला धक्का न लावतां संपूर्ण करतां येणें शक्य असून हिंदीकरणाबरोबरच ( Indianisation ) राष्ट्रीय भावना ( Nationalisation ) उत्तेजित करून सैन्य नुसते हिंदी नव्हे तर राष्ट्रीय झाले पाहिजे, तरच त्या सैन्याचा या देशास व समाजास उपयोग आहे, नाहीतर हिंदी सैन्य हा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होऊन हिंदुस्तानच्याच अहितास कारणीभूत होईल, असा त्यांनीं इशारा दिला. त्यांनी सुचविलेल्या सर्व सुधारणा या एका ध्येयाला धरून आहेत. राष्ट्रीय हिंदी सैन्य 'National Indian Army' हें ध्येय साध्य करतांना शाळा कॉलेजच्या शिक्षणापासून तों सैन्याच्या संघटनेपर्यंत सर्व ठिकाणीं कशा व किती सुधारणा करणें जरूर आहे, याची त्यांनी ३।४ तासपर्यंत छाननी करून प्रतिपक्षाचे सर्व आक्षेप व शंका सहज हवेंत उडवून दिल्या. इतर बहुसंख्य साक्षीदारांच्या एकांगी व कांहीं कांहीं वेळां तर साक्षीदारांच्या अकलेचें वाजलेलें दिवाळें चव्हाट्यावर आणणारी विधानें ( Wait till the Military Traditions are created ) वाचली म्हणजे या साक्षीची योग्यता व चौरसपणा लक्षांत येतो. 'राष्ट्रीय सैन्याच्या' ध्येयाची गर्जना ही अगदीं 'मूले कुठारः' या न्यायानें त्यावेळीं दुमदुमून राहिली असेल यांत संशय नाहीं. केसरींत या विषयावर लिहिलेल्या लेखांत ते शेवटीं म्हणतात—'कोठेहीं वाव नाहीं म्हणून तरुणांत असंतोष झाला आहे. राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांत इतकी उद्दीपीत झाली आहे कीं तिला योग्य वाव न मिळाल्यास देशास व राज्यकर्त्यांस फार अनिष्ट परिणाम भोगावे लागतील. राजद्रोह म्हणून ही भावना दडपून टाकणें शहाणपणाचें नाहीं. देशाच्या रक्षणाकरितां भाडोत्री सैन्य ठेवणें फार गैरशिस्त आहे. यानें देशाचें स्वावलंबन नाहिसें होतें व लोक नादान बनतात. 'मायेवाचून रड नाहीं' ही म्हण ध्यानांत ठेवली पाहिजे. हिंदुस्तानचें रक्षण करणें हिंदी सुपुत्रांचें कर्तव्य आहे व हें बजावण्यास त्यांना संधी देणें यांतच देशाचें कल्याण आहे.

हल्लींची अविश्वासाची नीती हिंदुस्तानास जास्त खड्डयांत टाकील व थोड्याच काळांत साम्राज्यास त्याच्च गर्तेत लोळवील हें स्पष्ट सांगितल्य-। वाचून आम्हास रहावत नाहीं, १९२७ सालीं स्कीन कमिटीच्या शिफारसी प्रसिद्ध झाल्या व या साक्षीचा स्कीनकमिटीच्या अहवालावर योग्य तोच परिणाम झालेला दिसून येईल. परंतु सरकारनें हा अहवाल( Procedure ) पुढें कित्येक वर्षें दडपूनच टाकला. सुबुद्ध लोकांची सैन्यांतील अधिकाऱ्यांच्या जागांवरून हकालपट्टी करून, लढाऊ बिनलढाऊ वगैरे भेद करून, भेदनीतीनें सुरक्षित बनविलेले भाडोत्री सैन्याचें पूर्वीच दिग्दर्शीत केलेलें सरकारी धोरण आमूलाग्र बदलणें शक्यच नसल्यामुळें तात्यांनीं मांडलेल्या सर्व सुधारणा ग्राह्य होणें कसें शक्य होणार ?

## लष्करी इतिहासाचा सुयोग

यानंतर तात्यांनीं फिरून आपल्या लष्करी इतिहासाच्या अभ्यासाकडे लक्ष वळविलें. भारत इतिहास संशोधक मंडळांत ते चर्चेकरितां व व्याख्यानाकरितां पुष्कळ वेळां जात असत. रा. ब. चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं 'प्रतापगड–युद्ध' या विषयावर भा. इ. सं. मंडळांत व त्यावेळचे शिक्षणमंत्री श्री. हिरालाल देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं डेक्कन जिमखान्यावर त्यांच विषयावर त्यांचीं व्याख्यानें झालीं आणि त्यांच्या लिखाणाचाही सुयोग आला. एके दिवशीं ते मुंबईहून पुण्याकडे येत असतांना गाडींत एका सद्‌गृहस्थांनीं त्यांची मुद्दाम ओळख करून घेऊन सांगितलें कीं, 'मला तुमचा लष्करी इतिहास प्रसिद्ध करण्याची इच्छा आहे, हे गृहस्थ रा. शंभूराव दातार. श्री व सुविचार यांचा संगम फार थोड्या ठिकाणीं दृष्टीस पडतो.हा संगम झाल्यास कोणत्याही कार्यास अक्षरशः पूर येणें फार कठीण नसते. परंतु 'दांत आहेत तेथें चणें नाहींत व चणे आहेत तेथें दांत नाहींत' अशी वस्तुस्थिती पुष्कळ वेळां दिसते. रा. शंभूराव हे एक श्रीमंत कॉंट्रॅक्टर होते. स्वयंस्फूर्तीनें त्यांनी हें कार्य हातीं घेण्याचें ठरविलेलें पाहून तात्यांना फार आनंद व कौतुक वाटलें. इंग्लंडमध्यें फक्त लष्करी वाङ्मयच प्रसिध्द करण्याकरितां गेल पोल्डेन अँड कं. सारखे वेगळे प्रकाशकच आहेत. आपल्या देशांत अशा वाङ्मयाची नुसती वाणच नव्हे तर आवश्यकताही असतां, आपल्या

भाषेंत अशी पुस्तकें प्रकाशित करण्याची महत्त्वाकांक्षा कोणीही धरूं नये हा श्री व सुविचार यांच्या फारकतीचाच एक परिणाम नव्हे काय ?

रा. शंभूराव यानीं ती महत्त्वाकांक्षा धरल्याबद्दल तात्यांना फार अभिमान वाटत असे. 'प्रतापगड–युद्ध' हें हिंदवी लष्करी इतिहासावरचें पहिलें पुस्तक थोडयाच दिवसांत प्रसिद्ध झालें. परंतु आमचे 'मिलिटरी पब्लिशर्स' फार दिवस जगले नाहींत; व पुढील दहाबारा पुस्तकें तयार असूनही पैशाच्या अभावी घरांतच पडून राहिली, तीं अजून तशीच आहेत ! या वेळेस असा एक योगायोग आला कीं, त्यावेळचे मुंबई प्रांतांचे इलाखाधिपति सर लेस्ली विल्सन यांना अशा प्रयत्नाचें महत्त्व पटून त्यांनीं तात्यांच्याजवळून मुद्दाम रोज बसून सर्व पुस्तक समजावून घेतलें. विश्वविद्यालयांत या विषयांस प्रवेश मिळाला पाहिजे, असें तात्यांनीं त्यांच्या मनावर बिंबविण्यास सोडलें नाहीं. सरकारी ग्रंथशालाकरितां त्यावेळीं एकदम दोनशें प्रतींची खरेदीही सरकारकडून केली गेली.

## शिपाई–सुधार–संस्था व त्रैमासिक

सध्याचें सैन्य नुसते भाडोत्री व निर्बुद्ध असलें तरी देशांतील सैन्य हा समाजाचाच एक महत्त्वाचा भाग आहे हें विसरून चालणार नाहीं. आपल्या देशांत सैन्य व समाज हे दोन गट एकमेकांपासून फार भिन्न व दूर झाले असून,त्यामुळें देशांतील कोणत्याच राष्ट्रीय भावनांना व आकांक्षांना जसें महत्त्व यावयास पाहिजे तसें येत नाहीं. जगांतील कोणत्याही महत्त्वाकांक्षा पुऱ्या करण्यांत सैन्याच्या गटाचा भाग फार मोठा आहे. या गटाच्या हिताकरितां त्यांच्या राष्ट्रांतून पुष्कळ उपयुक्त गोष्टी केल्या जातात. Soldiers' welfare Societies शिपाई सुधारणा–संस्था अशासारख्या कित्येक संस्था त्या देशांतून सैनिकांच्या हिताकरतां झटत असतात. त्यांचें हितसंबंध सुरक्षित ठेवण्याकरितां व त्यांच्यांत योग्य व जरुरीच्या ज्ञानाचा प्रसार करण्याकरितां सुंदर नियतकालिकें त्यांच्यांच भाषांतून प्रसिध्द करतात. आपल्याकडे मात्र सैन्यांतील व समाजांतील मनुष्य यांच्यांत कोणत्याच बाबतींत एकी किंवा आपुलकी नसून उलट हिंदी सैनिक हिंदी माणसाला 'भ्याड बाबू' समजतो व हिंदी मनुष्य सैनिकास 'आडमुठा, बिनडोक'

समजतो अशी परिस्थिती आहे. तात्या जर सैन्याच्या बाहेर देशांतील सर्व तरुणांना योग्य दिशा लागावी,म्हणून प्रयत्न करीत होते तर सैन्यांतील तरुणांना ते विसरलें असतील काय? हिंदी सैन्यावर होत असलेली हुकूमजबरदस्ती त्यांच्या पूर्ण परिचयाचीच होती. ह्या अन्यायाची दाद लावून घेण्याकरितां एक सैनिक-संघ ( Army Association ) काढून त्याच्यातर्फे प्रथम एक एतद्देशीय भाषेंत त्रैमासिक काढावें, असा त्यांनीं विचार केला व त्याप्रमाणें उद्योगासहि लागले.

रोमन उर्दूमुळें स्वदेशी भाषेचा तर लोप होतोच, पण स्वदेशी भाषांत लष्करी विषयांच्या लेखनाची जरुरीही नाहींशी झाल्यानें लष्करी ज्ञानाचा हिंदी साक्षर समाजांत प्रसारही होण्याची शक्यता नाहिशीं होते. त्यामुळें सोपा विषयही समजण्यास कठीण होऊन हिंदी शिपायांची फारच त्रेधा व तारांबळ उडते. हा हिंदी शिपायावरचा अन्याय दूर करणें जरी आपल्या हातांत नसले,तरी त्याचा दुष्परिणाम टाळण्याकरितां हिंदी भाषेंतून लष्करी वाङ्मय लिहिण्यास त्यांनी पूर्वीच सुरवात केली होती. १९२१ सालीं त्यांचें पहिलें साधारण २०० पानाचें मस्केटीवरील पुस्तक माधव पुष्पमालेंत प्रसिद्ध झालें. इंग्रजी, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषांतून आढळणारी ही लष्करी वाङ्मयाची विपूल संपत्ति लुटून देशी भाषांत आणावयाची अशी लेखकाची महत्त्वाकांक्षा त्या पुस्तकांच्या प्रस्तावनेवरूनच दिसून येते. यापुढचीं एकदोन पुस्तकें लिहून तयारही होतीं. तेव्हां हा प्रयत्न सैनिक संघाकडून कदाचित् परत हातीं घेतां येऊन दुसऱ्या पुष्कळ अन्यायांनाही तोंड फोडतां यावें या उद्देशानें प्रथम त्रैमासिकाबद्दलच त्यांनीं प्रयत्न करण्याचें ठरविलें. त्यासंबंधी आर्थिक मदतीकरितां लिहिलेल्या विनंतिपत्रकांत ते म्हणतातः—

" देशाच्या इच्छा व आकांक्षा यांपासून फार दूर राहिल्यानें सैन्य हा एक सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं वेगळांच असा गट निर्माण झाला आहे. भाषेच्या अडचणीमुळें खरोखर बुद्धिमान सैनिकांचीही विलक्षण पीछेहाट होते. आणि परिचित भाषेंत लिहिलेल्या हुकुमांचें जसें चांगलें ज्ञान होतें तसें परभाषेंतील हुकुमांचें न होऊन सैनिकांचें जीवित म्हणजे आवाजावरून हजारों शब्द लक्षांत ठेवून वागणाऱ्या यंत्रासारखें होतें. भाषेच्या अडचणीमुळें केवढी हानीं होत आहे बरें !

" To subjugate a conquered race we must dominate them with our language." ( Morley's letters ). राष्ट्रीय भाषेला, एकाद्या राष्ट्राला पारखे करणें, हे त्याला खच्ची करणेंच होय, असें मोर्ले-साहेबाचें महावाक्य प्रसिद्धच आहे. तेव्हां या बाबतींत होणारा अन्याय कांहींसा दूर करून हिंदीं सैनिकांना त्यांच्या उत्कर्षाला योग्य असें शिक्षण त्यांच्या भाषांच्या द्वारें द्यावें,यासाठीं गुरुमुखी,उर्दू ,मराठी व हिंदी अशा चार भाषां-तून नियतकालिक काढावें असें आम्ही योजिलें आहे. "या नियतकालिकांत हिंदीं सैनिकांशीं संबंध येणारे व त्यांच्यांत राष्ट्रीय वृत्ती निर्माण करणारे सर्व विषय येणार होते. टिळक ज्युबिली फंड वगैरे फंडांकडे याबाबत तात्यांनीं मदतीकरतां मागणी केली. श्री. न. चिं. केळकर वगैरे पुढाऱ्यांना ही गोष्ट पटून श्री. केळकरांनीं स्वतः आर्थिक मदतीकरतां जें विनंतीपत्र लिहिलें आहे त्यांत ते लिहतात " लष्करी प्रश्नाबद्दल हिंदी हितसंबंधींच्या दृष्टीनें त्यांना असलेली माहिती त्यांचें विचार आणि त्यांनीं केलेले परिश्रम म्हणजे एक मोठा इतिहासच आहे. अल्पशा संभाषणानें त्यांची योग्यता तेव्हांच आपल्या लक्षांत येईल. हिंदी लष्करांतील लाख दीड लाख सैनिकांची जी आज हेळणा होत आहे ती दूर करून या मोठ्या वर्गामध्यें इष्ट प्रका-रची जागृती करण्याची त्यांना आज तळमळ लागलेली असून, त्याची योजना त्यांनीं मोठ्या परिश्रमानें तयार केली आहे. हें त्यांचें म्हणणें व कार्यक्रम मला अत्यंत सहाय्य देण्यासारखा वाटतो. येथून शक्य ती मदत त्यांना देण्यांत येत आहे. आपल्याकडून त्यांना हरएक प्रकारची मदत व्हावी अशी या पत्रद्वारें मी विनंती करीत आहें. " पुरेसें द्रव्यबळ वेळेवर हातीं न आल्यानें तात्यांचा हा प्रयत्नही अर्धवटच राहिला. १९३० सालीं हिंदी सैन्यांत एक अभूतपूर्व प्रकार घडला. पेशावर येथें आपल्या निःशस्त्र देशबांधवांवर गोळीबार करण्याचा दिलेला हुकूम गढवाल पलटणींतील कांहीं लोकांनीं नाकारला. सैन्याच्या शिस्तीप्रमाणें हा गुन्हा ठरून त्यांना काळेपाण्याच्या शिक्षाही झाल्या. या प्रसंगाचा फायदा घेऊन या शूर शिपा-यांच्या बायकापोरांच्या मदतीकरतां देशभर फंड उभारून त्यांना सहानु-भूती दाखविणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार आवश्यक वाटल्यामुळें त्यांनीं तसा प्रयत्नही केला.

याच सुमारास महाराष्ट्रांत शारिरिक शिक्षणाचा योग्य प्रसार व्हावा म्हणून शारिरिक शिक्षण परिषदा भरविण्यात येऊं लागल्या होत्या. आपल्या देशांतील आखाड्यांत तयार होणारे पहिलवान व व्यायाम संस्थांतून शिक्षण घेणारीं मुलें हें हिंदी राष्ट्रीय सैन्य निर्माण करण्याच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें साहित्य आहे ही गोष्ट त्यांच्या ध्येयनिष्ठ दृष्टींतून निसटली नव्हती. या सर्व व्यायाम संस्थांतून या परिषदेमार्फत जर त्यांच्या शिक्षणक्रमांत एकसूत्रीपणा आणतां आला तर प्रगतीचें पुढलें पाऊल पडण्यास फार त्रास होणार नाहीं, या दृष्टीनें त्यांनीं या मंडळींना असें करण्याचें महत्त्व पटवून देण्यास सुरवात केली. नाशिकच्या पांचव्या परिषदेस ते स्वतः हजर होते. व्यायामसंस्थांतील व आखाड्यांतील एकमेकांबद्दलचा वाटणारा द्वेषभाव नाहीसा होऊन त्यांच्यांत एकसूत्रीपणा निर्माण होण्यास सर्वांचा एक गणवेष, हिंदींतून हुकूम असणारी एकच कवाईत व सर्व संस्थांची एकच खूण ( बॅज ) या गोष्टींची मदत होईल असें वाटून हे ठराव त्यांनी नाशिकच्या परिषदेंत पास करून घेतले. ठराव केले म्हणजे कार्यभाग झाला असें नव्हे पण देशांतील व्यायाम संस्थांकडे पहाण्याची दृष्टी, त्यांच्यावरील जबाबदारी व ध्येय यांना अनुसरून विचार आचार व धोरण कसें असावें याचें परिषदेंत उत्तम मार्गदर्शन झालें यांत संशय नाहीं. या मार्ग दर्शनाचा उपयोग होण्याचा सुयोग त्या कार्यक्षेत्रांत संस्थानिष्ठांच्यापेक्षां जेव्हां ध्येयनिष्ठेचीं माणसें निर्माण होऊन खटपट करतील तेव्हांच येईल.

१९३२ सालीं तात्यांना ग्वाल्हेरच्या नोकरींतून सेवानिवृत्त व्हावें लागलें. १९११ पासून ३२ पर्यंत सतत २१ वर्षें नोकरी करून ते कॅप्टनच्या हुद्याच्यावर चढले नाहींत यांतच त्यांच्या योग्यतेचें, माहितीचें व ज्ञानाचें चीज नोकरींत झाले नाहीं हें सहज दिसून येतें. परंतु ग्वाल्हेरच्या माधवराव महाराजांचा त्यांच्यावर विशेष लोभ होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराजांना त्यांची योग्यताही पूर्णपणें ठाऊक होती. व म्हणूनच ते ग्वाल्हेरच्या नोकरींत इतकीं वर्षे टिकले असें म्हटलें तरी चालेल. स्वाभिमान व कार्यक्षमता हा संगम परतंत्र देशांत कोणत्याही नोकरीस वावडाच असतो; मग तो संस्थानांत असल्यास नवल काय ? त्यांना पगारही फार होता असें नाहीं. परंतु नोकरीशिवाय राहिलेला सर्व वेळ व घरखर्चांतून

राहिलेला सर्व पैसा त्यांच्या आवडीच्या कार्याकरितांच उपयोगांत आणला जात असे. त्यांच्या कार्याचा व्याप पाहिला म्हणजे त्यामुळें संस्थानीं वातावरणांत संताप उत्पन्न झाल्यास कांहींच नवल वाटण्यासारखें नाहीं आणि या संतप्त वातावरणांतूनच शेवटीं त्यांच्या राजिनाम्याचा जन्म झाला. आणि १९३२ सालीं तात्यांनीं ग्वाल्हेर सोडलें. ग्वाल्हेर सोडल्यावर त्यांना १–२ ठिकाणीं बोलावणींही आलीं होतीं. पण आपल्या कल्पनांना पूर्ण वाव देण्यांत येणार असला, तरच जावयाचें असें त्यांच्या मनांत असल्यामुळें म्हणा, किंवा त्यांच्या कार्यामुळें झालेल्या सरकारी संतापाचे पडसाद व प्रतिध्वनी तेथेंही उमटल्यामुळें म्हणा, त्यांना परत नोकरीचा योग आला नाहीं हें खरें.

## इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम व लीग

नोकरी सुटल्यावर त्यांनीं पूर्णपणें आपल्या कार्यासच वाहून घेतलें. इंग्लंडांतील गोलमेज परिषदांचा तो काळ. नवीन सुधारणा काय येतात याकडे सर्वांचें लक्ष लागले होते. अशा वेळीं हिंदी सुधारणांत लष्करी प्रश्नाचें स्थान महत्त्वाचें आहे हे पटवून देण्यासाठीं आणि हिंदी पुढाऱ्यांच्यापुढें त्यासंबंधीं मत मांडण्याच्या दृष्टीनें त्यांनीं 'हिंदी संरक्षणाचा प्रश्न' ( Indian Defence Problem ) हें पुस्तक लिहिण्यास घेतले. स्कीन कमिटीपर्यंत लष्करी सुधारणांचा आपण आतापर्यंत जो इतिहास पाहिला त्यांत सर्व भर सैन्याच्या अधिकारी वर्गाचें हिंदीकरणावरच दिला होता.

हा भर फार दिला गेल्यामुळें हिंदीकरण म्हणजे अधिकाऱ्यांचेंच असें जवळ जवळ समीकरणच झाल्यासारखे होते. गोलमेज परिषदेंत संरक्षणावर नेमल्या गेलेल्या पोटकमिटीमध्यें (Defence Sub committee) जेव्हां हिंदीकरणाचा विषय चर्चेस निघाला, तेव्हां बॅ. जीना यांनीं अधिकाऱ्याबरोबरच ब्रिटिश फौज हिंदुस्थानवर लादण्याचें अन्यायाचें धोरण बदलले पाहिजे व निर्भेळ हिंदीकरणांत ब्रिटिश सैन्याचेंही हिंदीकरण झालें पाहिजे असा मुद्दा मांडला होता. त्यावर बोलतांना लॉर्ड रीडींग म्हणतातः—

" It had never occurred to me, when we were talking of Indianisation that we were speaking also

of the reduction of British troops.........as I have understood the nomencleture, the debate on Indianisation has always referred to the Indianisation of officers, the question of the subsititution of the Indian officers for British."

"हिंदीकरणाच्या नांवाखालीं आजपर्यंत माझ्या माहितीप्रमाणें हिंदी अधिकाऱ्यांचाच प्रश्न चर्चिला जात असे. त्यांत गोऱ्या सैन्याचा संबंध येतो असें मला कधींच वाटलें नाहीं." अधिकाऱ्यांच्या प्रश्नावरच नेहमीं फार भर दिल्यानें हिंदीकरणाची दुसरी बाजू पार दृष्टीआड झाली होती.

१८५७ सालच्या बंडानंतर हिंदुस्थानांत साधारण ६०,००० पर्यंत गोरें सैन्य सतत ठेवावें असें ठरलें व त्याचा खर्चही हिंदी तिजोरीवरच पडला. याबद्दल कोठे कोठे गोरा शिपाई हिंदुस्थानास पोसण्यास पांढऱ्या हत्तीसारखा जड आहे, अशा प्रकारची प्रासंगिक टीका जरी होत होती तरी या प्रश्नाबद्दल साधार व सप्रमाण विवेचन एखाद्या तज्ज्ञ माणसाकडून होणें जरूर होते. तात्यांनीं हीं उणीव भरून काढली.

अधिकाऱ्याच्या प्रश्नाबद्दल ते स्कीन कमिटीच्या साक्षींत पुष्कळच बोलले होते. परंतु प्रतिपक्षाला या प्रश्नावर बऱ्याच पळवाटा मिळूं शकतात. परंतु गोरें सैन्य हिंदुस्थानांत ठेवण्याबद्दल पुढें करण्यांत आलेली कारणें किती फोल, निराधार व असत्य आहेत हें आंकड्यासहित फार परिणामकारक रितीनें तात्यांनीं त्या पुस्तकांत पटवून दिलें. या पुस्तकाच्या शेवटी हिंदी लष्करी प्रश्न किती महत्वाचा आहे व तो सोडविण्यास एका संस्थेचीच कशी जरूरी आहे हें प्रतिपादन करून तात्यांनीं इंडियन नॅशनल डिफेन्स लीगची योजना पुढें मांडली. १९३३ सालींच हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्याच वर्षीच्या वसंत व्याख्यानमालेचा प्रारंभ कॅ. मोडकांच्याच व्याख्यानानें झाला. त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व शिपायाला साजेल असा विधानांतील सडेतोडपणा याचा योग्य तोच परिणाम श्रोत्यांवर होत असे. त्यानंतर केसरींत 'टिळक मंदिरांत रणदेवतेचें दर्शन' अशा मथळ्याखालीं अग्रलेखच आलेला आहे. "वीरवृत्तींतील वारे कांहीं वेगळेंच असते असा अनुभव मोडकांच्या भाषणानें पुष्कळांना येऊन त्या योगानें त्यांच्या

नसानसांतून आवेश संचारला असल्यास नवल काय ?" त्याच अग्रलेखांत Indian Defence Problem या पुस्तकाचा उद्देश व आराखडा देऊन केसरीकार लिहितात, " त्यांची ही विचारसरणी नवी व ब्रिटिश मुत्सद्यांना निरुत्तर करणारी असल्यामुळें सध्याच्या प्रसंगीं जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढें जोरानें मांडली जाणें आवश्य आहे. लष्करी बाबतींत हिंदुस्थानची बाजू मांडण्यास मोडकांसारखा गृहस्थ लाभला याबद्दल हिंदुस्थांनास स्वतःचे अभिनंदन स्वतःच करून घ्यावें लागेल."

ही सूचना पुढें आल्यानंतर केसरीं कचेरींत एक सभा भरली आणि जॉइंट पार्लिमेंटरी कमिटीपुढें साक्षीकरतां मोडकांनाच पाठविण्यांत यावे असे ठरले. शक्य झाल्यास इंडियन नॅशनल डिफेन्स लीगची स्थापना करून त्या संस्थेतर्फेच त्यांची योजना व्हावी असे सर्वांच्या मनांत होते. त्याप्रमाणें आर्थिक मदत मिळविण्याची खटपटही करण्यांत आली असे दिसते. पण हिंदुस्तानचें दुर्दैव म्हणा कीं ही गोष्टही अर्धवटच राहिली. नाहींतर अधिकाऱ्यांच्या हिंदी करणाच्याबाबत ज्याप्रमाणें स्कीनकमिटीपुढील सभासदांची त्यांनीं खात्रीच करून सोडली, त्याप्रमाणें येथेही हिंदी करणाच्या या दुसऱ्या बाजूवरहीं,अनुभव व आंकडे यांच्या सप्रमाण आधारावर, निस्पृह व राष्ट्रहिताच्या तळमळीनें केलेली अधिकार युक्त विधानें ऐकून, १५० वर्षें जखडून कोंडून घातलेल्या या देशांत अजूनही असा एकादा स्वतंत्र राष्ट्राच्या तोडीचा लष्करी तज्ज्ञ उत्पन्न होऊं शकतो हे पाहून हिंदी सभासदांस अभिमान वाटून इतरांचें घसे कोरडे पडले असते यांत संशय नाहीं. ' इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम ' हें पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या अगोदरपासूनच नॅशनल डिफेन्स लीग सारखी संस्था स्थापन करण्याचें त्यांच्या डोक्यांत होते. नोकरींत असेतोंपर्यंत सतत २१ वर्षें जो उद्योग त्यांनीं एकट्यांनीं स्वतःचे पैशावर केला तो एकाद्या संस्थेलाही खाली पहाण्यास लावण्याइतका होता. परंतु नोकरी सुटल्यावर हें कार्य पुढें चालू ठेवणें एकट्या व्यक्तीला कार्याच्या व्यापाकडे व सातत्याकडे लक्ष देतां शक्य नव्हते. तेव्हां संस्था स्थापन करण्याची विशेषच जरूरी भासूं लागली. आणि त्याप्रमाणें त्यांनीं खटपटीसही प्रारंभ केला होता.

देशांतील निरनिराळ्या पुढाऱ्यांना भेटून लष्करी प्रश्नाबाबत जागृती

उत्पन्न करणें किती आवश्यक आहे हें त्यांनीं समजावून दिलें. शिवाय अशा संस्थेचा उपयोग राष्ट्रीय वृत्ती उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें; साधेल त्या उपायांनीं व साधनांनीं, देशांत ज्यास्तीत जास्त खरें लष्करी शिक्षण कसें पसरवितां येईल यासंबंधीही खटपट करणें शक्य होईल. अशा प्रयत्नांना सरकारी मदतीच्या व प्रोत्साहनाच्या अभावी मर्यादा ही रहाणारच. परंतु या मर्यादेपर्यंत तरी आपण आज पोहोंचलों आहो काय? तेव्हां या संस्थें-मार्फत सरकार दरबारी तर खटपट होईलच. पण शिवाय देशांत याप्रमाणें जागृती उत्पन्न करून सरकारी प्रोत्साहनाशिवाय लष्करी शिक्षणाच्या बाबतींत ज्या मर्यादेपर्यंत जातां येणें शक्य आहे ती मर्यादा गाठून राष्ट्रीय वृत्ती व महत्वाकांक्षा उत्तेजित करण्याचें कामही फार मोठें व जरूरीचें असल्यानें या संस्थेच्या स्थापनेची कॅ. मोडक यांनीं खटपट चालविली. या संस्थेमुळें पुढारी, कायदेमंडळाचे प्रतिनिधी, व देशांतील सुशिक्षित समाज यांच्यातील लष्करी प्रश्नावरील अनास्था व अनभिज्ञता नाहिशी करतां आली असती. शाळेमधें ड्रील क्लबज्, इतरांच्याकरितां सिटिझनशिप् ट्रेनिंग कोअर, विश्व-विद्यालयाकरितां यू. टी. सी. ची ओ. टी. सी. प्रमाणें वाढ, लष्करी इति-हासाचा अभ्यासक्रम, रायफल क्लब्ज, एअरगन क्लब्ज वगैरे निरनिराळें प्रयत्न वाढीस लावून त्यांत एकसूत्रीपणा आणतां आला असतां. ध्येयनिष्ठा व राष्ट्र-हिताची बुद्धि निर्माण करतां येऊन सैन्य व समाज यांच्यातील अंतर कमी कमी होऊन राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षा आटोक्यांत आणून देशाच्या रक्षणाकरीतां 'राष्ट्रीय सैन्याचें' ध्येय दृष्टीच्या टप्प्यांत येण्यास मदत व्हावी या हेतूनें हें कार्य त्यांनीं हातीं घेतलें. 'हिंदी राष्ट्रीय सैन्य' हेंच शेवटीं देशाचें स्वातंत्र्य मिळालें तरी टिकविण्यास समर्थ ठरेल, ही गोष्ट पक्की मनांत ठसल्यास आणि हिंदुस्थान हा एक खंड यापुढें एक अखंड राष्ट्र म्हणून राहिल्यासच हल्लीच्या जगांत तरणोपाय आहे हें समजल्यास तात्यांना देशांतील पक्षोपपक्षीच्या द्वेषमत्सरयुक्त चालू राजकारणाच्या चिखलांत आपल्या कार्याची गाडी अडकवून घेणे केव्हांच कां इष्ट नव्हते. हें सहज ध्यानांत येईल. म्हणून हें कार्य त्यांनीं प्रथमपासूनच पूर्णपणे पक्षातीत ठेवलें होतें व त्याचकरितां सर्व पक्षांना या मुद्यावर एकत्र आणणें जरूर असल्यानें एक नवीन पक्षातीत संस्था काढून अंतीम राष्ट्रीय ध्येय

साध्य करण्याच्या दृष्टीनें चालू पक्षांतर्गत राजकारणापासून त्यांना हें कार्य अलिप्त ठेवणें जरूर होतें, हें लक्षांत आणूनच १८ एप्रील १९३२ रोजीं झालेल्या एका खाजगी सभेत त्यांना 'इंडियन नॅशनल डिफेन्स लीग' ची स्थापना करून याच संस्थेतर्फे जॉइंट पार्लमेंटरी कमिटिपुढे साक्षीस पाठवावें असे ठरविलें होते. परंतु ही गोष्ट पैशाच्या अभावी शक्य झाली नाहीं आणि त्याऐवजीं १९३३ सालीं हिंदुमहासभेच्या प्रतिनिधींत कॅ. मोडकांनी साक्ष देण्यास यावें अशी सूचना व खटपटही झाली. ज्या वेळेस कॅ. मोडक देशांतील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांना हा प्रश्न हिंदुस्थानांतील सर्व पक्षांचा आहे व पक्षातीत आणि जातिभेदातीत दृष्टीनें निर्भेळ राष्ट्रीय वृत्तीनेंच कार्य केलें तर या कार्याचा अंतिम उद्देश साध्य होणार आहे, हें टाहो फोडून सांगत होते त्याच वेळेस अशी सूचना पुढें आल्यामुळें त्यांना मोठा पेचप्रसंग पडला असल्यास नवल नाहीं. एकदां या कार्यावर पक्षाचा किंवा जातीचा सरकारी शिक्कामोर्तब झाला म्हणजे या लहानशा गोष्टीचाही कार्यनाश करण्याकरितां आपले खरे हितशत्रू याचा फायदा घेतील ही गोष्ट तात्यांना अनुभवसिद्ध असल्यानें दृष्टीआड करणें कठीण झालें आणि शेवटीं अशा संस्थेच्या कार्यारंभीच कार्यनाशाला थोडेसुद्धां कारण मिळूं नये म्हणून त्यांना या सूचनेस नकार द्यावा लागला असे दिसतें.

इंडियन–डिफेन्स लीगच्या प्राथमिक खर्चाकरितां टिळकपर्स फंडांतून रु. ५०० मंजूर झाल्यावर २१ ऑ. १९३३ रोजीं महाराष्ट्रांतील निरनिराळ्या पक्षाच्या कांहीं पुढारी मंडळींची सभा भरून संस्थेचें कार्य व धोरण सध्या कसें असावें, याबद्दल विचारविनिमय होऊन कांहीं ठराव झाले. लोकमान्य पुण्यतिथीच्या दिवशीं निघालेल्या 'केसरी' च्या खास अंकांत, 'हिंदी तरुण पिढी व लष्करी शिक्षण' असा संपादकीय लेख प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर संस्थेबद्दल माहिती व प्रचार यांकरितां निरनिराळ्या प्रसंगीं पुष्कळ लेख व व्याख्यानें प्रसिद्ध झालेलीं आढळतात. यावेळीं कॅ. मोडक हे प्रचारासाठीं बनारसपासून बंगलोरपर्यंत हिंडत होते. १९३४ सालीं त्यांची फक्त महाराष्ट्रीय जिल्ह्यांत २५–३० व्याख्यानें झाली. बनारस, लखनौ, कानपूर वगैरे परप्रांतांत झालीं तीं वेगळींच. निरनिराळ्या कॉलेजांत, संस्था, व व्यायामशाळांतही त्यांचीं व्याख्यानें झालीं. यावेळीं

त्यानीं 'सैन्याची संघटना व कारभार, ' लष्करी शिक्षण, यू. टी. सी. व ओ. टी. सी. वगैरे पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर माहितीपूर्ण लेख लिहीले. निरनिराळ्या व्यायामसंस्था, संघ, आखाडे, व कॉलेजें यामध्यें लष्करी शिक्षणास सुरवात करण्याचे दृष्टीनें एक अभ्यासक्रमच त्यानीं तयार केला. हा सर्व अभ्यासक्रम सर्वांच्या उपयोगाकरितां छापण्यासही सुरू केलें. त्यांतील पहिलें पुस्तक 'बंदुक कशी उडवावी' हें मस्केट्री कोर्ससंबंधीं आहे. या पुस्तकाचें नांव जरी पोरकट वाटलें तरी यांतील लेखन वाचकाच्या बुद्धीला ताण देण्यासारखेंच आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात–" हल्ली कांहीं संस्थांत ड्रिलचें व थोडें इतर असें जें शिक्षण चालू आहे तें जेथें पूर्वी कांहींच नव्हतें यापेक्षां पुष्कळ चांगलें हें खरें; परंतु त्यांत जास्त भर टाकणें शक्य व जरूर आहे––ड्रिल शिकवून थोडी शिस्त आणणाऱ्या गोष्टीला 'लष्करी शिक्षण' असें मोठें गोड नांव देऊन आपली दिशाभूल केली जात आहे असें दिसतें. आमच्या बुद्धिमान् म्हणविल्या जाणाऱ्या वर्गाला अज्ञानामुळें सैन्य व त्याचें शिक्षण म्हणजे काय याची कल्पनाच नसल्यानें किंवा युद्धशास्त्र म्हणजे अस्तित्वांत असलेल्या सर्व शास्त्रांच्या शास्त्रीय ज्ञानानें भारलेलें असें एक शास्त्र आहे हें न समजल्यामुळें अज्ञानानें ड्रिलसारख्या गोष्टीला (गणवेषासारख्या) 'युनिफॉर्म' सारख्या एकरंगी कपड्याला खरें लष्करी शिक्षण समजून, मनुष्यस्वभावानुरूप स्वतःच्या व संस्थेच्या, महत्त्व व वैशिष्ट्याच्या कल्पनेनें भारून जाऊन, हे लोक स्वतःची व इतरांची चुकून गैरसमजुतीनें दिशाभूल करून घेत आहेत, ही खेदाचा गोष्ट आहे. पूर्वीचें आखाडे किंवा तालीमखानें, किंवा आजच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास संघ, मंडळें व्यायामशाळा वगैरे ही पूर्वीच्या काळांत योग्य अशा लष्करी–शिक्षणाच्या संस्था असत. त्यांत तलवार, पट्टा, भाला, जंबिया, फरीगदगा, लाठी वगैरे त्यावेळचें युद्धोपयोगी शिक्षण देत असत. फरक एवढाच कीं, त्यावेळेपेक्षां आजच्या युद्धाच्या साधनांत जरी फार फरक पडला असला, तरी आमच्या व्यायामसंस्थांच्या कार्यक्रमांत कांहीं फारसा फरक पडला नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. चालकांनीं आपल्या संस्थांचा कार्यक्रम युद्धशास्त्राच्या प्रगतिप्रमाणें बुद्धि-विशिष्ट व सशास्त्र बदलून घेणें अत्यंत महत्त्वाचें आहे. मला वाटतें जर

महाराष्ट्र खराच महा–राष्ट्र होता, आहे व होणार असेल, तर त्यांतील बुद्धिमान् नेते व कार्यकर्ते पुढारी या प्रयत्नाकडे सुचविलेल्या दृष्टीनें लक्ष देण्यास चुकणार नाहींत अशी अपेक्षा केल्यास वावगें होणार नाहीं. हा एअरगनच्या स्वरूपांत लहानसा मस्केट्री कोर्स पुढें ठेविला आहे. त्याशिवाय इतर ८–१० विषयाचे अभ्यासक्रम छापून बाहेर काढले जातील. 'ऑर्गनायझेशन' व 'स्केचिंग' हे विषय तयार आहेत." यावरून असें दिसून येईल कीं, व्याख्यानें देऊन माहिती देणें एवढेंच त्यांचें कार्य चाललें नव्हतें, तर आज विधायक कार्यक्रमाला कशी सुरवात करतां येईल, याबद्दलही खटपट चालू होती.

स्वत: त्यांना एखाद्या संस्थेंत बंदूक शिकवीत बसण्याइतका वेळ त्यांच्या कार्याच्या व्यापाकडे पाहिलें असतां त्यांना नव्हता, हें कोणीही कबूल करील. म्हणून त्यानीं शिकविण्याकरितां कांहीं मंडळी तयारही केली होती. व त्यावेळी कांहीं ठिकाणी एअर-गन्-क्लब्स् स्थापनही झालें होतें. त्याचबरोबर त्यांची रायफलक्लब्स् निर्माण करण्यासाठींही धडपड चालू होती. कित्येक लोकांच्या जवळ परवानें असून रायफली वर्षानुवर्षे पडून असत, त्यांचा उपयोग व्हावा व ह्या नवीन खेळाची तरुणांत गोडी उत्पन्न व्हावी म्हणून त्यांनीं रायफल क्लब्स् संबंधीं एक पूर्ण खर्चाच्या अंदाजासकट आराखडा तयार करून, पुणें, बेळगांव, अहमदाबाद, मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणीं असे क्लब्स् स्थापन करण्याची धडपड केली. मुंबईस कार्पोरेशनमध्यें श्री. गोविंदलाल शिवलाल यांनीं रायफल-क्लब स्थापन करण्यासंबंधीं ठरावही आणला होता. अहमदाबादला असा क्लब अस्तित्वांत आला व पुणें व बेळगांव या ठिकाणीं लोकांच्या निरुत्साहामुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणानें म्हणा या खटपटीस फारसें यश आलें नाहीं. १९३६ सालांत त्यांनीं म्हैसूर विश्वविद्यालयांत युद्धशास्त्र या विषयाच्या प्रवेशाची खटपट केली व तेथील विश्वविद्यालयानें ठरावही केला. त्यावेळेस परत त्यांचीं विश्वविद्यालयांतील लष्करी शिक्षणावर नागपूर बंगलोर वगैरे ठिकाणीं व्याख्यानें झालीं. या त्यांच्या खटपटीचें फळ म्हणजे विश्वविद्यालयांतून हा विषय घ्यावा येवढी कबुली देईपर्यंत मजल आली.

या सुमारास मध्यवर्ती कायदेमंडळाच्या प्रतिनिधींत जागृती निर्माण

करून त्यांना माहिती पुरवून तेथेंही लष्करी प्रश्न धसास लावावे असा तात्यांचा प्रयत्न चालला होता. कित्येक वेळां स्वत: दिल्लीला जाऊन व माहिती पुरवून निरनिराळ्या पक्षाच्या सभासदांना हा प्रश्न कसा आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याचा आहे व त्याकरितां काय केलें पाहिजे याचा प्रचार ते करीत असत. त्याचा कांहीं थोडा उपयोगही झाला असें दिसतें. बॅ. असफअल्ली, श्री. गझवनी, रा. गाडगीळ, पंडीत कुंझरू, बॅ. जीना वगैरे निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांत त्यांनीं या प्रश्नाबद्दल कुतुहल जागृत केलें होतें असें दिसतें.

## शारिरिक शिक्षणाचें कार्य

१९३५ सालींच त्यांना प्रकृति-अस्वास्थ्यामुळें बेळगांवासच राहणें भाग पडले. परंतु हा आजारीपणांतील वेळही त्यांनीं फुकट घालविला नाहीं. त्यांनीं एक ड्रिल क्लब् लहान मुलांकरतां चालू करविला व त्यांत त्यांच्या वयास व शिक्षणास अनुसरून त्यांचे अभ्यासक्रम आंखून दिले. घरांत बसल्याबसल्याच कांहीं तरुण मुलांना त्या क्लबचें शिक्षक तयार केले. ह्या क्लबांत एकंदर मुलांचीं वयें ८ पासून १८ पर्यंत असून संख्या २०० पर्यंत होती. अशा क्लबांत कमींतकमी खर्चांत उत्तम नागरिकाचे गूण व लष्करी विषय सोपे करून शिकविण्याचा हा त्यांनीं एक पद्धतशीर प्रयोगच करून पाहिला. शिकल्यावर ह्या विषयांत मुलांची किती प्रगति झाली आहे हें समजण्याकरितां परीक्षा घेतल्या व त्यांचे शाळाधिकारी व पालक यांजकडून त्यांची विशिष्ट गोष्टीवर मतेंही मागविण्यांत आलीं. परीक्षेमध्यें शारिरिक व बौद्धिक अशा दोन्ही दृष्टींनीं चांचणी झाली. मुलांच्या शरिरांत एकंदर सुधारणा दिसून आली व मुलांची चालही ( gait ) सुधारली होती असें दिसलें. त्यांची अवलोकन शक्ति वगैरे किती वाढली आहे हें पाहण्याकरितां त्यांना एका विशिष्ट मार्गानें लांब नेऊन आणावयाचें व प्रश्न विचारून परीक्षा घ्यावयाची. बौद्धिक ज्ञानांत त्यांना शिस्तीसारख्या गुणांचें राष्ट्रीय महत्त्व गोष्टींच्या रुपानें पटवून दिलें जात असे. शिवाय नेमबाजी कशी करावी, बंदुक कशी वापरावी, स्वच्छ कशी ठेवावी, आपल्या देशांत किती उद्योग आहेत, कांही कांहीं उद्योगांची सचित्र माहिती, अशा निरनिराळ्या विषयां-

वर मनोरंजन करतांनाच माहिती पुरवून मुलांची दृष्टि व्यापक करण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. हा प्रयोग ज्यांनीं ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिला त्यांनीं वाहवा केली व इतक्या कमी वेळांत व खर्चांत स्वयंस्फूर्तीनें जें येथें प्रत्यक्ष करून दाखविण्यांत आलें तें हजारों रुपयांचा अवाढव्य खर्च करून एकाद्या इंग्लंडच्या पब्लिक स्कूलमध्येंही जें करतात त्यापेक्षां कांहीं कमी नाही हें सप्रमाण सिद्ध झालें. डेहराडूनपासूनच तात्याचें असें म्हणणें होतें कीं अशा प्राथमिक शिक्षणाकरतां वेगळ्या खर्चिक संस्थांचीं जरूर नसून अशा प्रकारचे प्रयत्न जर प्रत्येक शाळेंत झाले तर कमी खर्चांत आपल्याला हेंच शिक्षण देतां येईल व देशाच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देतां सर्वांना या डेहराडूनसारख्या संस्थांचा फायदा घेणें शक्य नसल्यानें ही योजना राष्ट्रहिताच्या दृष्टीनें जास्ती उपयुक्त ठरेल. नाशिकचें भोसला मिलिटरी स्कूल निघण्याच्या वेळेस या संस्थेच्या चालकांनाही त्यांनीं हाच सल्ला दिला होता.व चालकांनीं बेळगांवचा हा प्रत्यक्ष प्रयोग पाहून हा सल्ला योग्य आहे असें मान्यही केलें होतें. १९३७ सालीं कॉंग्रेस पक्षाचीं मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं. मुंबई प्रांताच्या मंत्रीमंडळानें जीं कांहीं चांगलीं कामें केलीं त्यांत प्रांतांत शारिरिक शिक्षण कसें व कशा प्रकारचें प्रसृत करावें याची योजना आंखण्याकरतां एक समिती स्थापन केली. त्यांत कॅ. मोडकांची नेमणूक झाली. त्यांचे या समितींतील कार्य पुढें एका लेखांत विस्तारानें आलेलें आहे.

१९३८ सालानंतर शारिरिक-शिक्षण समितीचें कार्य संपल्यावर त्यांची प्रकृती ढासळतच चालली. आतांपर्यंतच्या आयुष्यांत त्यानीं आयुष्य वाढविण्याची किंवा टिकविण्याची कधीच काळजी घेतली नव्हती. एखाद्या लोभी माणसासारखें,शरीर नियमितपणाच्या पेटींत ठेवून आयुष्य वाढविण्यापेक्षां तें उत्तम रीतीनें खर्च कसें करितां येईल हाच विचार ते करीत असत. कमींत कमी झोप घेऊन, प्रत्येक क्षण आपल्याच कार्यांत कसा खर्च करितां येईल हें ते पहात असत. कोणत्याहि ध्येयाशीं एकरूप झालेल्या माणसाप्रमाणेंच त्यांचे विचार आचार व उद्‌गार असत. मनांत चाललेली तळमळ त्यांच्या सान्निध्यांत क्षणोक्षणी प्रत्ययास येत असे. आयुष्यभर अक्षरश: रात्रीचे दिवस केले. कामाचे डोंगर उचलले. मिळविलेला पैसा

पाण्यासारखा खर्च केला. कष्टाची कमाल केली. धैर्य, शौर्य, वक्तृत्व, बुद्धि वगैरे सर्व गुण ध्येयनिष्ठेच्या पाठपुराव्याकरितां पणास लाविले. परंतु प्रत्येक कार्य त्यांना अपूर्णच सोडावें लागलें. इतके हाल सोसल्यावर हातांत आलेल्या या निकालानें त्याचें मन उद्विग्न झालें. शिवाय नोकरी सुटल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थितीही फार खालावली. कांहीं दिवस तुटपुंजे मिळालेलें पेन्शनही ते घेत नसत. ह्याप्रमाणें सर्व बाजूनें परिस्थितीनें गांजल्यामुळें शेवटीं ते जेरीस आले.

पहिल्यापासूनच त्यांची ईश्वरावर श्रद्धा असे. ते कोठेही असले तरी लहानशी भगवत्‌गीता त्यांच्या विजारीच्या मागील बाजूच्या लहानशा खिशांत असे. एक दोन श्लोक का होईना पण वाचल्याशिवाय त्यानीं फ्रान्समध्यें असतांनाही कधीं अन्नग्रहण केले नाहीं. त्यांना तेथें जेव्हां कुतुहलानें " हे काय " असा प्रश्न विचारला जात असे, त्यावेळेस हा सैनीकाचा धर्मग्रंथ आहे ( This is a soldier's Bible ) असें मोठ्या स्वाभिमानानें ते सांगत असत. आपल्या तळमळणाऱ्या व अत्यंत अस्वस्थ मनाला थोडी स्वस्थता मिळावी म्हणून ह्या शेवटच्या दिवसांत ते पांदेचरीस श्री. अरविंदांच्याकडे व कांहीं दिवस रमणमहर्षींच्याकडेही गेले होते. श्री. अरविंदांना त्यांचें कार्य व पुस्तक फार आवडलें. आश्रमाचे त्यांनी सभासद व्हावें अशी सूचनाही तेथें पुढें आली होती. त्यांचा ऊतू जाणारा उत्साह व लोकांचा त्यांच्या कार्याबाबत तितकाच थंडपणा ह्यामुळें मनांत त्यांना आपण स्वतःला कितीही लायक समजलों तरीही ब्रिटिशांची शिस्त, धूर्तपणा, राष्ट्रीयत्वाची भावना, चिवटपणा, दूरदृष्टी, प्रसंगावधान आणि दुसऱ्याच्या कमकुवतपणाचा पूर्ण फायदा घेण्याची तत्परता अशा अनेक गुणापुढें अज्ञान, मत्सर, अहंकार, स्वार्थसाधुवृत्ति, थंडपणा, भीति, व राष्ट्रीयत्वाचा अभाव अशा दुर्गुणांचा प्रकाश कसा पडणार असें त्यांना वाटूं लागलें व राष्ट्रीय स्वाभिमान जागृत करून अहिंसेच्या मार्गानें का होईना पण अन्यायाचा प्रतिकार करण्याचे धडे देणाऱ्या महात्मा गांधींकडे त्यांचा कल झाला.

पूर्ण अहिंसा जरी सर्वसामान्य माणसाच्या जरी आटोक्याबाहेर असली तरी सत्याच्या भरीव पायावर उभारलेली निर्भयता जर माणसाच्या मनांत

अन्यायाची चीड व स्वाभिमान निर्माण करील तर त्याची प्रतिकारशक्ति कांहींतरी वांटेलच, मग तो प्रतिकार हिंसेनें करो का अहिंसेनें करो, असे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. महात्मा गांधींना ते एकदोन वेळां भेटलेही होते. संबंध समाजाला अहिंसेच्या उच्च कोटीला येणें शक्य नाहीं असे त्यांनीं सांगितल्यावर (All are not Mahatmaji's) महात्माजीनींही त्यांना फार मार्मिक व अचुक उत्तर दिलें कीं, माझ्या देशांत अर्धा डझन जरी मोडक असते तरी मला फार आनंद झाला असतां ( I wish there were half a dozen Modaks in my country )

शेवटपर्यंत त्यांच्या योजना चालूंच होत्या, परंतु शरीरानें शेवटीं त्यांना गप्प केले. त्यांना लिहिणें व बोलणेंही कठीण झाले आणि हा तळमळणारा आत्मा अविश्रांत धडपड करून १९४१ सालच्या डिसेंबर महिन्यांत १७ तारखेस आपलें विकल झालेलें शरीर सोडून गेला. ते वृत्तीनें मनानें व कृतीनें खरें क्षत्रिय होते. क्षत्रियाच्या बाणेदारपणास साजेशीं निस्पृहता, शौर्याला साजेशी धडाडी, तेजाला योग्य असा उत्साह व सावधानवृत्ती आणि अखंड राष्ट्रहिताची दृष्टी या त्यांच्या गुणांस तोड नव्हती. परंतु कोणताही मनुष्य पूर्ण निर्दोष कसा असणार ? तात्यांनाहीं याची जाणीव नव्हती असे नाही. म्हणून ते म्हणत " मी मनुष्य आहे. तेव्हां माझ्यांत कांहीं दोषही आहेत. परंतु माझ्या हातून तो ( परमेश्वर ) जे कार्य करून घेत आहे तेच तुम्ही घ्या व दोषांकडे दुर्लक्ष करा आणि अशी दृष्टि ठेवाल तरच आपणां सर्वांचीं व राष्ट्राचीही उन्नति होईल. "

# हिन्दुस्थानचा लष्करी इतिहास

[ लेखक : प्रो. द. वा. पोतदार ]

केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! आणि लज्जेचीहि ! हिन्दुस्थानाचा लष्करी इतिहास अद्यापि लिहून व्हावयाचा आहे ! स्थूलमानानें म्हटलें तर हा इतिहास पांच हजार वर्षांचा होईल; आणि त्यांत अनेक कोटिघटित लोकसमूहांचा संबंध दाखवावा लागेल. असें असून शिस्तवार आणि पद्धतशीर असा हिन्दुस्थानाचा लष्करी इतिहास अजून लिहून व्हावयाचा आहे ! लिहून व्हावयाचा आहे ही तरी आशेचीच नभोवाणी आहे !

आतां प्रथम थेट ऋग्वेदाकडे जाऊं. तेथें दाशराज्ञ युद्धाचा खणखणाट ऐकू येतो; आणि पुढें पौराणिक काळांत तर पहिलें गाजलेलें भयानक युद्ध रामरावणांचें—रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव—त्याला तोडच नाहीं ! अजून आम्ही रामाचे पवाडे घरोघरीं गातच आहोत ! त्यामागून झालेलें कौरवपांडवांचे भारती युद्ध तेंहि तसेंच ! महायुद्ध म्हटलें कीं आम्हास अजून भारती युद्धाचीच आठवण होते. आमच्या कवींनीं हीं युद्धें जीं एकदां गाइलीं त्यांची जी छाप आमच्या मनावर पडली ती इतकी दृढ कीं

त्यानंतर शेंकडों युद्धें या भारतभूमींत आम्ही खेळून गेलों परंतु आम्हांला त्यांची आठवण कांही तितकी दृढ राहिली नाहीं. रामरावण आणि भीमार्जुन यांच्या त्याच त्या कथा आमच्या तोंडीं अद्यापि बसलेल्या आहेत! त्यामागून केवढाले प्रसंग येऊन गेले, साम्राज्यें उभीं राहिलीं आणि लयाला गेलीं, क्रान्ति मागून क्रान्तिच्या लाटा उसळून आणि ओसरून गेल्या पण आमच्या कथा मात्र त्याच त्याच चालत राहिल्या. तोच आमचा लष्करी इतिहास म्हणा हवा तर!

देवदानवांची युद्धें कोणी पाहिली असतील तीं असोत, आणि पुष्पकादि विमानांतून कोणी आकाशसंचार केला असेल तो असो, आज मात्र प्रत्यक्ष हजारों कोसांची अंतरें आमच्या डोळ्यादेखत तोडणारीं प्रचंड विमानें आकाशाला गवसणी घालतांना आम्ही पहात आणि ऐकत आहोंत. शतघ्नींनी काय संहार पूर्वी केला असेल तो असो, आज मात्र शतघ्नीच काय परंतु सहस्राघ्नींचे प्रचंड स्फोटध्वनि आमच्या कानीं पडूं लागले आहेत; त्यांच्यांतून निघणाऱ्या ज्वाला आमच्या अंतःकरणास दग्ध करीत आहेत आणि त्यांच्या धुरानें आमचे जीव गुदमरूं लागले आहेत. अजूनहि आमचा लष्करी इतिहास पाहण्याची, शोधण्याची व अभ्यासण्याची वेळ आली नाहीं काय?

वेद, पुराणें आणि नीतिशास्त्रादि ग्रंथ पाहिले तर त्यांत सांग्रामिक ज्ञान कितीतरी विखुरलेलें आढळतें. नानाप्रकारचीं शस्त्रें आणि अस्त्रें, व्यूह, संधि–विग्रह विचार, शल्यतंत्र, संभारयोजना इत्यादि विविध प्रकरणांचें विवरण त्यांत सांपडतें. नुसती तरवार किंवा नुसता एक घोडा घेतला तर, तरवारीचे असि ( दीर्घासि=लांब तरवार) आणि कृति ( आखूड तरवार खंडा ) किंवा सप्ति ( धांवणारा ), हय ( चपळ ), आणि वाजी ( सशक्त ) असे भेद दर्शविलेले दिसून येतात. संधिप्रकार ( तह ) सांगतांना दंडोपनत, कोशोपनत, देशोपनत म्हणजे सैन्य देऊन, किंवा द्रव्य देऊन किंवा भूमि देऊन करावयाचे असे प्रकार केलेले आहेत. वाजिशिक्षा, अथवा अश्वविद्या अशी छोटी छोटी शास्त्रेंच रचलेलीं होतीं. शालिहोत्रशास्त्र प्रसिद्धच आहे. पक्षिविद्येचाहि उल्लेख येतो आणि कबूतरांना शिकवून युद्धाच्या कामीं त्यांचा उपयोग करून घेतल्याचाहि संभव

आहे. फ्रँकोजर्मन युद्धांत कबूतरांचा असा उपयोग केल्याचा दाखला आपणांस श्रुत आहे. धनुर्वेद हा वेद पदवीचा विषय होऊन बसला होता. स्थलयुद्धाप्रमाणेंच जलयुद्धाचाहि अनुभव आम्हांस नव्हता असें नाहीं. याप्रमाणें सतत पांच सहस्र वर्षांवर या भरतभूमींत युद्धकुंडें धडकून गेलेलीं आहेत. पण आजला आम्ही निःशस्त्र होऊन एकाद्याहि भारतीय सेनानीचें नांव देखील जगांत निघूं नये अशा हीन स्थितीला पोंचलों आहोंत. आमच्या डोळ्यांदेखत आमच्या बिनलढाऊपणाची चर्चा चाललेली आम्ही खुशाल पाहतो व ऐकतो आहोत. ब्रि. हिंदुस्तानचे एक माजी सरसेनापती जनरल सर आर्चिबाल्ड वॅव्हेल यानी कांही दिवसांमागें जगांतील प्रख्यात सेनानायकांची गुणचिकित्सा केली त्यावेळीं एकाहि भारतीयाचा किंवा पौर्वात्याचा नामोच्चारहि त्यांनीं केला नाहीं. वेळीं आमच्या शूर शिपायांचा गौरवोच्चार सांप्रत अधून मधून केला जातो हें खरें, पण तो जसा कांहीं कोणा नवशिक्यांचा व्हावा त्या थाटाचा असतो. आम्हीच जेथें आमच्या गौरवास पारखे झालों तेथें आणिकांस बोल कां लावावा ? आमचें स्वातंत्र्य गेलें त्याचें दुःख एवढें वाटत नाहीं परंतु आमच्या सामरिक इतिहासाचें आमचें स्मरणच बुजत चाललें त्याचेंच दुःख मरणाहूनहि अधिक बोचतें !

आमचा लष्करी इतिहासच तेवढा रचून सिध्द झालेला नाहीं आणि इतर म्हणजे सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, इत्यादि प्रकारचे इतिहास मात्र सिद्ध झालेले आहेत अशांतला बिलकूल प्रकार नाहीं. सामान्यत्वें असें म्हटलें तरी चालेल कीं, आम्ही परंपरावादी राहूनहि इतिहासविमुखच राहिलेले आहोंत.पूर्वीं घडलेल्या गोष्टींची अथवा घटितांची जंत्री दिली म्हणजे इतिहास सांगितला असें समजून चालतां यावयाचें नाहीं. या घटितांच अर्थ लावून दाखवावा लागेल. नाहींतर इतिहास म्हणजे नुसत्या नामावळ्या किंवा शकावल्याच होऊन राहतील. सत्याच्या कसोटीवर चिकित्सापूर्वक पारखून घेतलेलीं घटितें हें तर इतिहासाचें मूलद्रव्यच होय यांत शंका नाहीं. अशी पारखच शक्य नाहीं म्हणणारांच्या संशयवादाचें ग्राह्य तात्पर्य एवढेंच समजावें कीं, अशी पारख कठिण आहे ! डोळ्यादेखत घडणाऱ्या घटितांची तरी सर्वमान्य पारख करतां येते काय ? म्हणून काय

आपण आपले उद्योग थांबविले आहेत ? मतें बनविण्याचें टाकून दिलें आहे ? आणि त्या मतांचे धोरणानें कृतिही आपण करीतच असतों ना ? मतें चूक वाटल्यास बदलतोही ! मग वर्तमानकाळीं जो दोष आपण आनंदानें पत्करतों तोच दोष भूतकालावर लावून आमचा विचार थांबविण्याचें आम्हांस प्रयोजन काय ? मानवी शक्तीच मुळांत मर्यादित आहेत. पण आहेत तेवढ्यांचा होईल आणि करतां येईल तेवढा विकास आपण केला पाहिजे. या विकसित शक्तींच्या आधारानें मिळेल तेवढा प्रकाश आपण मिळविला पाहिजे आणि जीवनाच्या अंधाऱ्या रात्रीची सुप्रभात केली पाहिजे. "अस्तित्वार्थविग्रह" हें मानवी जीवनाचें स्वरूप युरोपीय तत्त्वज्ञ वर्णन करतात त्यांतलें मर्म हेंच आहे; आणि आमच्या इकडील एखादे वचनच पाहिजे असेल तर भगवद्गीतेंतील पुढील वचन पुढें करतां येईलः—

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायोह्य कर्मणः ।
शरीरयात्रापिच ते न प्रसिध्येदकर्मणः ॥

पण नुसतीं पारखलेलीं घटितें घेऊन काय लाभ होणार ? त्या घटितांचें 'दर्शन' रचलेंच पाहिजे. त्यांचा आमच्या जीवनाच्या स्वागतासाठीं अर्थ लावून दाखविला पाहिजे. नुसतीं घटितें अर्थबोध करीत नाहींत. अर्थसूत्रांत त्यास गोंविले पाहिजे. अर्थात् हा चिंतनाचा विषय झाला. चिंतनाच्या भट्टींत हीं घटितें घातलीं पाहिजेत आणि त्यांचें सार काढलेंच पाहिजे.

आपला घटितसंग्रह जागतिक, व्यापक, सर्व देशकालपरामर्षी असला पाहिजे. म्हणजेच करावयाचें चिंतन एकांगी आणि अपूर्ण होणार नाहीं. निदान आपला विश्वास त्या चिंतनावर राहील, आणि मग मनन चिंतनाचें निघणारें सार निःशंकपणें स्वतः ग्रहण करून इतर जिज्ञासूंस आणि पिपासूंस सादर करतां येईल.

वरवर पाहणारांस वाटतें कीं लष्करी किंवा यौद्धिक इतिहास म्हणजे सैन्यांची जुळवाजुळव, सैन्यसंचालन, युद्धसाहित्याची जमवाजमव आणि उपयोग, व्यूहरचना, इत्यादि विषयांची चर्चा होय. युद्धें म्हणजे एक प्रकारच्या कुस्त्या किंवा मारामाऱ्याच होत. कुस्ती दोन व्यक्तींची तर मारामारी पांचपन्नास माणसांची. परंतु युद्ध म्हटलें म्हणजे मुद्दाम तयार करविलेल्या व शिकविलेल्या शस्त्रधारी हजारों सैनिकांच्या द्वारां होणारी

झटापट होय. बलाबलाची परीक्षा कुस्तींत आणि युद्धांत उभयत्र होते. परंतु वरवरचा विचार सोडला आणि युद्धांचा विचार बारकाईनें केला म्हणजे सहज लक्ष्यांत येतें कीं युद्धाचीं मुळें पुष्कळच खोल गेलेलीं असतात. युद्धाचीं कारणें शोधूं गेलें तर जरी वरकरणीं एखाद्या कराराचा भंग किंवा एखाद्या मागणीचा नकार, असलें कांहींतरी कारण सांगितलेलें आढळतें. तरी या वरवर दिसणाऱ्या किंवा बोलल्या जाणाऱ्या कारणापेक्षां खरीं कारणें पुष्कळ व्यापक असून तीं खोल दडलेलीं असतात. सत्तेचा अभिलाष, वैभवाची हांव, धार्मिक किंवा तात्विक मतभेद, स्वातंत्र्यप्राप्ति, न्यायधर्म स्थापना इत्यादि मूलभूत आणि वास्तविक हेतू निराळेच असतात. खोल विचार करीत चाललें म्हणजे या मूलभूत हेतूंची विलक्षण गुंतागुंत ध्यानांत येऊं लागते आणि मन चमत्कारानें भरून जातें. मानवी स्वभावाच्या अगदीं आंतल्या कप्प्यापर्यंत हीं मुळें जाऊन पोंचलेलीं आपणांस आढळून येतात आणि मग लष्करी इतिहास म्हणजे नुसता शस्त्रास्त्रांचा खणखणाट किंवा यमदरबाराची दिवाळी नसून, सर्वव्यापी अशा मानवी इतिहासाचेंच हें एक दुसरें नांव होय असा प्रत्यय येतो.

या दृष्टीनें पाहिले म्हणजे बाह्यत: जरी प्रत्यक्ष युद्धाचीं साधनें भिन्न-भिन्न काळीं निरनिराळी बदललेली दिसली, आणि त्यामुळें युद्धपद्धतींत मोठमोठे विलक्षण बदल झालेलेहि दिसून आले, तरी मानवी व्यापारांच्या अंतरंगाची बैठक कांहीं फिरली नाही, ती आहे तशीच आहे अशी खात्री पटते. युद्धाच्या रूपानें गर्जना करीत उठणाऱ्या लाटा या वास्तविक मानवी मन:सागराच्या अंत:प्रवृत्तींचाच आविष्कार होय याविषयीं शंका राहात नाहीं. मानवी मनाला शांति आणि सौख्य नि:संशय प्रिय आहेत. परंतु मानवी मनाची जी प्राकृतिक घडण आहे आणि त्यामुळें मानवी जीवनाचें जें नियमन झालेलें आहे, त्यांत अखंड शांतीचा लाभ सर्वथा अशक्य आहे आणि शांतीचा त्याग करून मधून मधून युद्धाच्या क्रूर कर्मांचा आश्रय घेणें भागच पडतें, त्यावांचून सुटकाच राहात नाहीं, हा सिद्धान्त पटूं लागतो. मानवी जीवन हा एक महान् संग्रामच आहे मग त्याचें स्वरूप वेळोवेळीं दिसावयाला कसेंहि असो. स्वसंरक्षणाची ओढ जीवांस सदाचीच लागलेली असते. लोभ, दया, न्याय इत्यादि प्रकृतींच्या विचित्र

धक्क्यांनीच मानवी जीवित विकसित आणि परिणत होत चालल्याचें दिसून येते. धर्मयुद्ध, अधर्मयुद्ध, आवश्यक व न्याय्य युद्ध यांचा विवेक करणें प्राप्त होतें. लष्करी इतिहास म्हणजे रक्ताच्या नद्या आणि बेचिराख झालेलीं शहरें नव्हत. ते त्यांचें बाह्य स्वरूप आहे. वास्तविक पाहतां लष्करी इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या इतिहासाचें एक प्रधान आणि अभ्यसनीय पर्व होय हा ठसा दृढ होतो.

शस्त्र धारण करणें मानवी जीवनाच्या साफल्यासाठींच अवश्य होते. पण तें वाटेल तेव्हां आणि वाटेल त्यानें नव्हें. 'आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि' अशा सारख्या धर्ममर्यादा आपणास पाळाव्या लागतात. तसेंच शस्त्रधारण कीर्तिकर ठरतें. सांस्कृतिक उच्चनीचतेच्या मूल्यांचा विचार निश्चित करूनच शस्त्र उचलावयाचें असतें. मानवी जीवनाचें मांगल्य आणि पावित्र्य यांच्या रक्षणासाठीं आणि संवर्धनासाठीं करावयाचीं युद्धेंच धर्म्य आणि ग्राह्य समजलीं जातात. अविचारीपणानें आणि अन्याय्य प्रेरणेनें केलेलें आणि करविलेलें प्राणबलिदान केव्हांहि निंद्यच होय.

इतक्या व्यापक विचारांत शिरलें म्हणजे लक्षांत येईल कीं केवळ शस्त्रांनींच युद्धें खेळतां येतात असें नाहीं. 'न धरीं शस्त्र करीं मी' म्हणून उघड प्रतिज्ञा करणाऱ्या श्रीकृष्णानें काय युद्ध केलें नाहीं ? बुद्धियुद्धही कांहीं कमी महत्वाचें नाहीं; आणि शस्त्रयुद्धेंही बुद्धिला गुंडाळून ठेवून कशी यशस्वी होऊं शकतील ? शस्त्र असो वा नसो, युद्ध होऊं शकतें हाच सूक्ष्मसिद्धान्त पुढील श्लोकांत मोठ्या मार्मिकपणें सांगितलेला आहे:—

आज्ञाभंगो नरेन्द्राणां विप्राणां मानखण्डनम् ।
पृथक्शय्याच नारीणामशस्त्रविहितो वधः ॥

कायदेभंग आणि मानभंग यांचाहि समावेश युद्धाच्या कक्षेंत इतक्या सूक्ष्मपणें आणि चतुराईनें येथें केलेला कोणासही विचारांतीं योग्यच वाटेल.

युद्धशास्त्र, युद्धकला, आणि युद्धनीति या तिन्ही दृष्टींनीं केलेला मानवी इतिहासाचा विचार तो समग्र लष्करी इतिहास गणावा लागेल. युद्धांची स्थूल, सूक्ष्म, तात्कालिक आणि मूलगामी कारणें व हेतू आणि त्यांचें वर्तमान आणि भविष्य परिणाम यांचा विचार करावयाचा तर नानाविध असा समग्र

मानवी इतिहासच अभ्यासावा लागेल हें वरील विवेचनावरून स्पष्टपणें वाचकांच्या ध्यानीं येईल.

हिंदुस्तानचा लष्करी इतिहास समग्र आणि सांगोपांग लिहावयाचा तर तें केवढें प्रचंड कार्य आहे याची आतां कोणासही कल्पना होईल. अनेक युद्धें आजवर होऊन गेलीं आणि युद्धाच्या बाह्यांगांत केवढीतरी क्रांति गेल्या पांच हजार वर्षांत होऊन गेलेली आहे. सांप्रतच्या यंत्रमय युद्धांत सर्व युद्धतंत्रच पार बदलून गेले असल्यामुळें आतां मागील जुनाट युद्धांचा इतिहास पाहणें सकृद्दर्शनीं निष्फळ वाटेल. परंतु हा भ्रमच ठरेल. जोमिनी या सुविख्यात युद्धपंडितानें युद्धांसंबंधी जीं सर्वसामान्य बारा तत्त्वें कथन केली आहेत, तीं सार्वकालिक आहेत. तसेंच तीं कोठेंहि आणि केव्हांही लागू पडणारीच असल्याचेंहि दिसून येईल.

अलीकडील पहिलें जागतिक महायुद्ध सुमारें वीस वर्षांपूर्वी झालें; आणि सांप्रत त्याहूनहि व्यापक महायुद्ध खणखणत आहे. या संधीचा फायदा घेऊन हिंदी तरुणांचा लष्करांत पुन: प्रवेश व्हावा म्हणून खटपटी चालू आहेत. आणि ज्यांच्या स्मरणार्थ हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे, ते माझे मित्र कै. गणपतराव मोडक यांनी स्वत: लष्करांत प्रवेश मिळवून चलाख आणि लायख तरुणांना लष्करी पेशांत शिरकविण्यासाठींच अहोरात्र काया झिजविली. पुढें मागें खरेखुरे भारतीय लष्करी सैनिक आणि सेनानी तयार व्हावयाचे तर हिंदुस्तानचा लष्करी इतिहास त्यांस अवश्य शिकवावा लागेल.

लष्करी इतिहासाशिवाय खरेंखुरें लष्करी शिक्षण पुरें होऊंच शकणार नाहीं. विशेषत: सेनापतीवर्गाच्या लायकीचें शिक्षण तर अशा ऐतिहासिक शिक्षणाविना केव्हांहि अपुरेंच राहील. लष्करी शिक्षण हें प्रत्यक्ष अनुभवावांचून व्यर्थच होय हें खरें. नुसतें पुस्तकी शिक्षण आणि कवाइतीची हडेलहप्पी केल्यानें कांही खरे शिपाई आणि धुरंधर सेनापती तयार होणार नाहींत. त्याला प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे. युद्धकौशल्याची पारख रणक्षेत्रावरच व्हावयाची हें खरें. रणकुंड सदैव धगधगत असते तेव्हां प्रात्यक्षिक शिक्षण मिळण्याची सोय सहजच उपलब्ध होते. परंतु जेव्हां शांततेचा काळ असतो तेव्हांही सैन्यें तयार ठेवावीच लागतात. रणांगणा-

चर कांहीं कोणास एकाएकी उभें राहतांहि यावयाचें नाहीं आणि कोणी उभें करणारहि नाहीं. त्याला आगाऊ शिक्षण द्यावेंच लागणार, आणि मग पुढलें शिक्षण आणि अनुभव रणांगणावरच मिळवावें लागणार. या पूर्वी द्यावयाच्या तयारीच्या शिक्षणांतच लष्करी इतिहासाचा समावेश होतो. पूर्वी जे नामांकित युद्धविशारद होऊन गेले आणि ज्यांनीं यशस्वी युद्धें खेळून आपली कीर्ति केली त्यांनीं काय करामती केल्या, हिकमती लढविल्या आणि ते कशीं युद्धें खेळले, हरले आणि जिंकले, त्याची सर्व माहिती भावी वीरांना असणें केव्हांहि लाभदायकच होणार. युद्ध जिंकावयाचें म्हणजे काय काय करावयास पाहिजे याची यथार्थ कल्पना येण्यासाठीं पूर्वी जे युद्धें खेळलें व ज्यांनी मोठमोठाले विजय संपादन केले त्यांच्या युद्धकृत्यांचा सांगोपांग अभ्यास आगाऊ केल्याशिवाय युद्धकलेचें मर्म कधींच कळणार नाहीं आणि खरें युद्धकौशल्यहि अंगीं बाणणार नाहीं. कुस्तीचें डावपेच जसे आखाड्यांत कुस्ती करकरूनच शिकावें लागतात तसेच युद्धांतील डावपेंचहि पूर्वी खेळून गेलेल्या युद्धांच्या डावपेंचांची समजूत करून घेतल्यानेंच शिकतां येतात. सैन्यरचना, सैन्यसंभार, साहित्यसंभार, सैन्यसंचालन इत्यादि अनेक युद्धांगांचा सूक्ष्मपणें अभ्यास करावा लागतो. युद्धाचीं पूर्व तयारी, प्रत्यक्ष युद्ध आणि युद्धोत्तर व्यवस्था या सर्वांकडे युद्ध खेळणाऱ्यांस लक्ष पोंचवावें लागतें. दोन पक्षांतील शक्तियुक्तिभक्तिबलांचा युद्ध म्हणजे एक सामनाच होय. त्याचें स्वरूप इतकें विविध आणि व्यापक असतें कीं विशाल बुद्धीच्याच पुरुषाला त्याचें आकलन करतां येतें. स्थळकालपरिस्थितिभेदाप्रमाणें युद्धाचे किती विविध प्रकार होतात आणि त्याचें स्वरूप किती विचित्र आणि विशाल होतें तें स्थिर मनानें विचार केल्याशिवाय एकाएकीं ध्यानांत भरणार नाहीं. इतिहास म्हणजे एका दृष्टीनें पाहतां अनुभवसंग्रहच होय; आणि आपल्या संग्रहीं जेवढा मोठा अनुभवसंग्रह स्वतःचा व इतरांचा, तसाच विद्यमान आणि पूर्वकालीन, तेवढी आपली दृष्टि विशाल होऊन आपला आत्मविश्वास वाढविण्यास समर्थ होईल हें स्पष्ट आहे.

येणेप्रमाणें लष्करी इतिहास हें लष्करी शिक्षणाचें एक महत्त्वाचें अंग आहे,हें लक्षांत घेतल्यावर असा लष्करी इतिहास हिंदुस्तानांतील शिपायांस

व सेनानींस अवगत झाल्याशिवाय ते हिंदुस्तानाचे खरेखुरे सैनिक किंवा सेनानी झाले असें ठरणार नाहीं, हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे. गेलीं शें–दीडशें वर्षें हिंदुस्थान स्वतंत्रेस मुकलेला आहे. या काळांत जें सैन्य, सैनिक व सेनानी हिंदुस्तानांत होऊन गेले आणि विद्यमान आहेत त्यांत खरी सत्ता आणि नियंत्रण ब्रिटिश अथवा गोरें म्हटल्या जाणाऱ्या वर्गाच्याच हाती आहे. आणि या ब्रिटिश किंवा गोऱ्या वर्गातील लोकांचे शिक्षण त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांच्या त्यांच्या देशांत किंवा ब्रिटिश-साम्राज्यांत ब्रिटिशांच्या देखरेखीखालीं आणि ब्रिटिश सांच्याप्रमाणें झालेलें असतें. ' इंडियन् आर्मि ' या नांवानें मोडणाऱ्या सैन्यवर्गात जी भारतीयांची भरती झालेली आढते त्यांत भारतीयांना वरचीं पदें सहसा मिळतच नाहीत, आणि म्हणून त्यांच्या वरिष्ठ लष्करी शिक्षणाचा प्रश्नच निघत नाहीं. या भारतीय सैन्याची गणना वास्तविकपणें भाडोत्री-पगारी-म्हणजे मार्सिनरी वर्गातच करणें न्यायाचें होईल. लष्करीपेशाची आवड त्यांपैकीं अनेकांचे ठिकाणीं आढळून येते आणि कित्येकांना तर ' ब्रिटिश ' राज्यांतच लष्करी नोकरी दोनचार पिढ्यापासून आपल्या घराण्यांत चालत आलेली सहज दाखवितां येईल. भारतीय सैन्यविभागांत शूर शिपाई आढळतील परंतु शिक्षित, सुशिक्षित आणि पंडित म्हणतां येतील असे फारच थोडे आढळतील. अर्थात् यांच्या लष्करी शिक्षणाची जी मांडणी केलेली असते त्यांत लष्करी इतिहासाचा समावेश करण्याची योजनाही नाहीं आणि केली तरी ती तांत्रिक आणि ब्रिटिश गौरवाच्या काळांतील इतिहासच असणार हें हिशेबानेंच प्राप्त होते.

हिंदुस्थानाच्या राजकारणाच्या गेल्या दीडशें वर्षांचा इतिहास स्थूलपणानें पाहणाऱ्या कोणाहि हिंदी गृहस्थास आतां असें निराळें खोदून आणि उलगडून सांगावयाची गरज नाहीं कीं हिंदुस्थानांत खरेखुरें राष्ट्रीय, भारतीय वृत्तीचें, भारतीय गौरवासाठीं राखलेलें आणि वाढविलेलें, भारतीयांच्या हुकुमतींत वागणारे भारतीय सैन्यच नाहीं ! देशी संस्थानांत देखील जीं सैन्यें आहेत तीं देखील ब्रिटिश सरकारच्या वरिष्ठ हुकुमतीखालीं नांदणारीच आहेत. त्यामुळें भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाची चर्चा करतांना भारताचें संरक्षण करण्यास भारतीय सैन्य कोठें आहे म्हणून हटकणें सोपें जातें.

सांप्रतकाळीं नवी सैन्यवाढ झपाट्यानें करण्यांत येत आहे आणि या सैन्यांत सांप्रतचें ब्रिटिश सरकार भारतीय सुशिक्षितांचीहि भरती करीत आहे. पण ही सर्व तयारी भोंवती पेटलेल्या युद्धाच्या निमित्तानें होणारी तांतडीची व ताबडतोबीची तयारी आहे. या तयारीसाठी लष्करी शाळा निघत आहेत आणि वर्ग चालत आहेत. आणि तेथें क्वचित् लष्करी इतिहासाचे तांत्रिक पाठहि देण्यांत येत असतात. परंतु जेथें भारतीय लष्करी इतिहास शास्त्रीय रितीनें रचून तयार केलेलाच नाहीं तेथें आतां एकदम इच्छा झाली किंवा गरज पटली तरी तो थोडाच चुटकीसरसा उभा करतां येईल ?

ब्रिटिशांचा व हिंदुस्तानाचा संबंध आल्याकाळापासूनच गेल्या तिनशें वर्षांत जे युद्धप्रसंग झाले त्यांचे वृत्तांत ब्रिटिश बाजूनें ब्रिटिश दृष्टीनें लिहिलेले उपलब्ध आहेत. असलें वाङ्मय पुष्कळच आहे. कितीहि सद्बुद्धीनें लिहिलें असें मानले, तरी असलें सारें वाङ्मय एकतर्फीपणाच्या व एकांगीपणाच्या दोषांतून सुटयें शक्य नाहीं. मात्र हिंदुस्थानाचा लष्करी इतिहास लिहिणारास हें सर्व वाङ्मय एक अत्यंत महत्त्वाचें साधन म्हणून तें कसून अभ्यासलें पाहिजे. हा अभ्यास करतांना तो भारतीय दृष्टीनें केला पाहिजे आणि भारतीय बाजूची माहितीहि शोधून तिची भर त्यांत घातली पाहिजे. आपल्याला नव्या भारताच्या नव्या संसाराची सर्वच घडी बसविली पाहिजे आणि त्यासाठीं जशी राजकीय सत्ता मिळवावयाची आहे, सामाजिक सुधारणा करावयाची आहे, आर्थिक संघटणा करणें अवश्य आहे, शैक्षणिक पात्रता वाढविणें प्राप्त आहे, तशीच लष्करी सिद्धताहि करणें प्राप्त आहे. आणि त्यासाठीं सर्वांगपरिपूर्ण अशी भारतीय लष्करी इतिहासाचीहि रचना केली पाहिजे.

हिंदुस्तानांतील ब्रिटिशसरकार भारतीय दृष्टीचें नाहीं हें खरें असलें तरी तें एक पुढारलेलें आणि सुधारलेल्या लोकांचें सरकार आहे. त्यामुळें हिंदुस्थानाच्या लष्करी इतिहासाच्या रचनेला उपयोगी पडणारी कांहीं पूर्वतयारी यांचेकडून झालेली आहे. किंबहुना असें म्हटले तरी चालेल कीं, स्वतःची सत्ता चालविण्यासाठीं त्या गोष्टी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना करणें प्राप्तच झालें. उदाहरणार्थ, ब्रिटिश सरकारनें अशा भूमीची शास्त्रीय पहाणी

केलेली आहे.—सर्व्हे मोजणी केलेली आहे आणि त्याचे नकाशे तयार करून प्रसिद्ध केलेले आहेत. हे नकाशे भिन्न भिन्न प्रकारांचे आहेत आणि लष्करी इतिहासाच्या अभ्यासकांस या नकाशांच्या साधनांची अत्यावश्यकता आहे. केवळ लष्करी उपयोगासाठीं बनविलेले नकाशेहि सरकारनें तयार करविलेले आहेत. लष्करी इतिहासाच्या रचनेसाठीं या साधनांचा होणारा उपयोग केवळ बहुमोल असाच गणावा लागेल. जातींची माहिती, इतिहास, स्थलवर्णनकोश, ( ग्याझिटीअर्स ) इत्यादि अनेक प्रकारची अपार व विपुल माहिती ब्रिटिश सरकारनें तयार केलेली आहे आणि त्यांतली कांहीं प्रकाशितहि केलेली आहे. अप्रकाशित साहित्यहि सरकारी दप्तरखात्यांतून खच्चून भरलेलें आहे. शिवाय ऐतिहासिक काळांतलें पुष्कळ साहित्य ब्रिटिश सरकारनें सुरक्षित ठेवलें आहे. ब्रिटिशांचा हा उपकार मोठाच झाला असें प्रांजळपणें नमूद करणें कोणाहि इतिहासाभ्यासूस अवश्य वाटेल.

केवळ ब्रिटिश लेखकांचें लिहिणें किंवा ब्रिटिश बाजूच्या तज्ज्ञांचीं विवचनें यांच्या आधारें आमचा भारतीय इतिहास यथार्थपणें चित्रित होऊं शकेल काय ? तसें करणें एकपक्षीय ठरणें स्वाभाविक नाहीं काय ! ब्रिटिशांचे जे प्रतिपक्षी त्यांची बाजू, त्यांचे पुरावे हेहि अभ्यासणें सत्यज्ञानासाठीं आणि विषयपूर्ततेसाठीं अवश्य नाही काय ? भारतीयांची बाजू आणि पुरावे पुढें यावें म्हणूनच इतिहाससंशोधनाचे कार्य आपण करीत नाहीं काय ? भारतीय पुरावे किंवा ब्रिटिश पुरावे दोन्ही पुरावे एकएकटे घेतले तर एकांगीच समजावे लागतील. तिऱ्हाइतांच्या साक्षीहि मिळाल्या तर त्याहि पाहाणें सत्यजिज्ञासूंचे कर्तव्यच ठरेल. पण नुसते कागदी पुरावे पाहिले आणि यथातथ्य माहितीनें तयार केलेले नकाशे वगैरे अभ्यासले म्हणजे लष्करी इतिहास कळेल काय ? प्रत्येक विषयासाठीं त्या विषयाचें म्हणून एक निराळें विशेषज्ञान अवश्य नाहीं काय ? लष्करी इतिहास लिहिणारास लष्करी ज्ञान अवश्य पाहिजे. नुसते कागदी पुरावे पाहून लष्करी प्रसंग कसे समजून येतील ? राजवाड्यांनी पानिपतची मराठे दुराणी यांच्यामधील लढाई कागदोपत्रीं पुरावे आणि प्रमाणें अभ्यासून आणि पानिपतचें युद्धक्षेत्र समक्ष पाहून वर्णिली आणि विवेचिली. परंतु राजवाडे यांस लढण्याचा आणि सैनिकसंचालनाचा प्रत्यक्ष अनुभव कोठें होता ?

तशा अनुभवाची व प्रत्यक्ष ज्ञानाची जोड असल्याशिवाय केवळ कागदपत्रांच्या साहाय्यानें पानिपतच्या भाऊसाहेबांच्या किंवा अब्दालीच्या हालचाली आणि डावपेंच यांचा यथार्थ आणि संपूर्ण उलगडा करतां येईल काय? कॅ. मोडक यांनी स्वतः लष्करांत नोकरी केली; आणि लष्करी अनुभव संपादन केला. प्रत्यक्ष फ्रान्सच्या रणभूमीवर चाललेल्या युद्धांत ते उभे होते. भारतीय तरुणांनी लष्करी पेशा पुनः पत्करावा; मोडलेली संवय पुनः जडवावी म्हणून त्यांची धडपड होती. लष्करी शिक्षणांत लष्करी इतिहासाचें किति महत्व असते हें त्यांनी चांगलें जाणलें होतें. आम्हां मराठ्यांचा इतिहास लष्करी हालचालींनीं खच्चून भरलेला आहे. शिवाजी, बाजी, महादजी सारखे महान् महान् सार्वभारतीय कीर्तिचे वीर आमच्यांत होऊन गेले. युद्धें खेळण्यांतच त्यांचे जन्मच्या जन्म गेले! त्यांच्या त्या युद्धांचा इतिहास लष्करी तज्ज्ञांनी—भारतीय लष्करी तज्ज्ञांनीं—अभ्यासून सांगावयाचा नाही तर कोणी? इतिहाससंशोधकांनीं कागदी पुराव्यांचें जें संशोधन चालविलें होते आणि त्यांचे विवेचन करून राजवाड्यांसारखे महर्षि जी नवरचना करीत होते त्याला—लष्करी तज्ज्ञांनी हातभार लावणें अवश्य नव्हते काय?

अशा विचारांनीं प्रेरित होऊनच कै. गणपतराव मोडक यांनीं आपला वांटा या कामीं उचलण्याचें ठरविलें. त्यांची मुख्य दृष्टि भारतीय नवतरुणांना लष्करी दीक्षा देण्याची होती; इतिहास रचण्याची नव्हती. पण ही दीक्षा देण्यांतला त्यांचा हेतू पुढेमागें इतर स्वतंत्र देशांप्रमाणें भारतीयांचे राष्ट्रीय सैन्य, सैनिक व सेनानी तयार व्हावे आणि जगांत गाजावे ही होती. हिंदुस्तानी लोक उमदे शिपाई होऊं शकतात; परंतु सेनानी होण्यास लागणारी पात्रता त्यांचे ठायी नाहीं अशी स्वार्थी ओरड आणि हेटाळणी आमचें इंग्रज प्रभू आपमतलबीपणानें करीतच असत. घरचें आणि हातचें राज्यच जर आम्ही घालवून बसलों होतों तर आमची नालायकी जगासमोर वर्णन करण्यास निराळा पुरावा दाखल करण्याचें वस्तुतः कांहींच प्रयोजन नव्हते. आम्हां भारतीयांना लायक करण्याचें पुण्यकार्य करण्यासाठींच आपला अवतार आहे असाहि दावा आमचे ब्रिटिश प्रभु एकीकडे करीत आणि आम्ही थोर परंपरेचे आहोत, आम्ही राज्य घालविलें कीं आमच्या

कांहीशा खुशीनें घेऊं दिलें, कांहीहि झालें तरी पुनः आमचें राज्य आम्हीच चालवूं हा आमचा अभिमानतंतू आमच्या पोटांत कोठें तरी बळकट मूळ धरून होता, आणि मूळ तंतूचाच विकास होऊन आम्ही पुनः स्वराज्य स्थापनेची हांव धरून उभे आहोंत. आम्हांस आतां कळून चुकले आहे कीं आमचा उद्धार आमचा आम्हांसच करून घ्यावा लागेल. कोणी ब्रिटिश प्रभु आपखुशीनें आमचे गेलेलें राज्य आणि सत्ता आमच्या पदरांत टाकील हा मिथ्या भ्रम आहे. आम्ही अंगच्या लायकीच्या बळावरच सर्व संपादन करण्याची आशा आणि विश्वास धरून, आपल्याच पायावर उभे राहिलें पाहिजे. आमचें बळ, आंगिक बळ वाढेल तेव्हांच आमच्या शब्दांना जग किंमत देईल आणि तेव्हांच आमच्या आकांक्षा फलद्रूप होतील. याच समजुतीनें शिक्षणक्षेत्रांत न्यू इंग्लिश स्कुलें आणि नूतन मराठी विद्यालयें स्थापून यशस्वी करून दाखविली; आतां कारखाने गिरण्या आणि बँका चालवूं लागलों आहोत. इतर सर्व क्षेत्रांतहि आम्हांस तेच केलें पाहिजे. आमचा लष्करी इतिहास आम्हीच तयार केला पाहिजे.

कॅ. मोडक हे असे डोळे उघडलेल्या तळमळीच्या गृहस्थांपैकीं एक होते. त्यांनीं मनाशी खूणगांठ बांधली; आपलें कार्यक्षेत्र निश्चित केलें आणि तशी तयारी चालविली; हजार अडचणींना तोंड दिलें. कारण अनुभवच असा कीं जो कोणी नवें क्षेत्र आखील त्याला स्वतःची सर्व तयारी स्वतःच करावी लागेल. अज्ञान उपहासहि सहन करावा लागेल. झगडावेंच लागेल आगरकर, टिळक, राजवाडे, सावरकर, गांधी–जगदीशचंद्र, बोस, रवींद्रनाथ ठाकूर, रे, विष्णूशास्त्री चिपळोणकर, इ. इ. सर्वांस या मार्गांनीं जावे लागले आणि याच अनुभवांतून पार व्हावें लागले. नुसतें लष्करी वाङ्मय म्हटलें तरी तें कोठें आणि कसें मिळणार ? कोणी भोक्ते नाहींत, अभ्यासी नाहींत, माहीतगार हा विरळाच. पण कॅ. मोडकांनीं दृढ निश्चय केला होता. पदरचा पैसा–आणि अशा कार्यकर्त्यांचा पदर सदा फाटकाच रहावयाचा–वेंचला; वणवण केली आणि लष्करी ग्रंथसंग्रह सजविला. नकाशे जमविले पण नुसत्या पुस्तकी ज्ञानानें थोडाच यथार्थ लष्करी इतिहाससिद्ध झाला असता ? तें स्वतः अनुभवी शिपाई व सैन्याधिकारी होते. ग्वाल्हेर फौजेंत त्यांनीं अनेक हुद्याची कामें केली. शाळेवर लष्करी

शिक्षकाचीहि नोकरी केली; बंदूकबहादुरीवर छोटीं छोटी पुस्तकें उर्दूमध्यें लिहिलीं. ते जातीनें मराठे म्हणजे महाराष्ट्रीय; मराठी इतिहासाचें संशोधनहि जोरांत चालू असलेलें. मराठी भाषा त्यांची जन्मभाषा; शिवाजी बाजीसारखे आमचे प्रतापींपूर्वजवीर आपला पराक्रम या भरत भूमींत गाजवून गेले ती पाठिशी परंपरा; तेव्हां असा सहजसिद्ध सौकर्याचा लाभ घेऊन मोडकांनीं आपलें तारूं हांकारलें. ग्वाल्हेर सैन्यांतील नोकरी करीत असतांना कै. श्री. माधव महाराजांच्या कृपेनें रजा मिळवून ते इतिहास प्रसिद्ध युद्ध क्षेत्रांची पाहणी करूं लागले. पण पहाणी करण्यापूर्वी कागदपत्रांच्या साहाय्यानें कच्ची माहिती डोक्यांत तयार पाहिजे. मग पहिली पाहणी; मग पुनः निवळलेल्या डोळ्यांनीं कागदपत्रांचे डोळसपणानें केलेले दुसरें वाचन आणि अभ्यास; मग पुनः क्षमालोचन; प्रत्येक वेळीं मनाची सूक्ष्मता वाढत जावयाचीच. ते कागदपत्रांच्या अभ्यासाठीं भा. इ. सं. मंडळांत येत. तेथें कै. पांडोबा पटवर्धन, आबासाहेब मुजुमदार, वासुदेवराव बेंद्रे, आबा चांदोरकर, शंकरराव जोशी, दत्तोपंत आपटे प्रभृति तेथील संशोकधांशी चर्चा करीत आणि आपल्या लष्करी पाहणीच्या आणि क्षेत्र परीक्षणाच्या बळावर आपल्या विषयाचा अभ्यास स्वतः नकाशे वगैरे काढून पुढें चालवीत. एकदा असा बराचसा अभ्यास झाल्यावर त्यांनीं "खडर्यांची लढाई" हा विषय घेऊन मंडळींच्यासमोर ठेविला. तेव्हां मोडक यांच्या अभ्यासाचे वैशिष्ट्य सर्वांच्या ध्यानांत स्पष्टपणें आलें. एक नवी दृष्टि पुढें आली. आजवर इतिहाससंशोधकांत फक्त कागदपत्रवालेच होते; परंतु आतां आमच्यांत एक लष्करी तज्ज्ञ दाखल झाल्याचा आम्हां सर्वांना आनंद झाला. आणि हा तज्ज्ञ आणि अभ्यासू या क्षेत्रांतला पहिलाच म्हटलें तरी चालेल उभ्या हिंदुस्थानांत कोणी देशी लष्करी तज्ज्ञ या दृष्टीच्या आणि तयारीचा नव्हता. देशी संस्थानांतून नांव कमाविलेले शूर आणि उमद्या उमेदीचे शिपाई आणि सेनानी होते परंतु त्यांत जुना इतिहासाभ्यासी कोठला? एक बडोद्याचे जनरल नानासाहेब शिंदे इतिहासाचे प्रेमी दिसत. नानासाहेबांनीं 'हिंदुस्थानचा लष्करी इतिहास आणि दोस्त राष्ट्रांच्या फौजा' हा त्यांचा एक ग्रंथहि प्रसिद्ध आहे आणि त्यांच्या लेखसंग्रहांत 'पानिपतचें युद्ध व 'जिंजीचा वेढा' अशा विषयावर लेखहि आढळतात. एवढा

एक अपवाद सोडला तर दुसरा कोणी लेखक व अभ्यासी लष्करी इतिहासांत लक्ष घालणारा आमच्या तरी माहितींत मोडकांखेरीज कोणी आला नाहीं. असो. मोडकांनीं याप्रमाणें आपला क्रम पुष्कळ वर्षें चालविला. खडर्यांच्या नंतर त्यांनीं ‘रांगणा कीं विशाळगड’ या शिवाजीच्या आयुष्यांतील एका रोमहर्षण प्रसंगाकडे लक्ष दिलें आणि कागदावरून त्याबाबत जे वाद होत असत आणि रांगणापक्ष मागें पडून पन्हाळ्याहून शिद्दी जोहाराचे वेढ्यांतून शिवाजी रात्रौ निसटला तो जवळच विशाळगडास किंवा खेळण्यास गेला असे कागदोपत्रीच्या नवीन पुराव्यावरून सिद्ध होत होते तेंच मानण्याकडे सर्व संशोधकांची जी प्रवृत्ति झाली होती, तीबाबत पन्हाळगड ते रांगणा आणि पन्हाळा ते विशाळगड असें रान सरळ डोंगरांतून दऱ्याखोऱ्यांतून तुडवून येऊन युद्धशास्त्र दृष्टया शिवाजी जवळच्या विशाळगडीं न जातां रांगण्यासच गेला असला पाहिजे असा पक्ष मोडक मांडीत असत. प्रत्यक्ष विश्वसनीय समकालीन कागदपत्रांवरून जें सिद्धप्राय मानणें भाग होते त्याला असा खो मोडक देऊं पाहात होते आणि त्यास अनुमोदन देणें आमच्यासारखा बिनलष्करी संशोधकांस केवळ अशक्यच होते. तथापि मोडकांचे मत मात्र बदललें नव्हते. विशाळगडास जाणें लष्करीदृष्टया अगदी मूर्खपणाचें ठरेल; आणि मधून रांगणा लांब नाहीं; आणि शत्रूच्या आटोक्याबाहेर झुकांडी देऊन जाण्यांतच शत्रूची खाशी फसवणूक करून शिवाजीनें अद्वितीय युद्धकौशल्य प्रगट केलें असें आपलें म्हणणें तें आग्रहानें आमचेपुढें मांडीत. या दोन लढायाप्रमाणेंच महाराजपूर आणि पन्ना येथील ब्रिटिश–शिंदे लढाईचाहि असाच तपशीलवार अभ्यास रणनीतिदृष्टया त्यांनीं केला होता, आणि ग्वाल्हेरास इं. हि. रे. कमिशनच्या बैठकीस कित्येक इतिहासकोविद सभासदांसमवेत आम्हांस महाराजपुरास नेऊन तेथील रणक्षेत्राची समजूत त्यांनीं आम्हां मंडळीस करून दिली होती. सह्याद्रीच्या ज्या प्रचंड डोंगरी पिंजऱ्यांत शिवाजीनें अफजलखानास कोंडून मारला, त्या कुतूहलजनक युद्ध प्रसंगाचाहि त्यांनीं सूक्ष्मपणे अभ्यास केला होता. असा सुमारें १५-२० लढायांचा किंवा युद्धांचा सूक्ष्म अभ्यास करून नकाशांसह टिपणें मोडक यांनीं तयार केली होतीं. यांत इतिहास समजाविण्यापेक्षांहि रणनीति आणि युद्धशास्त्र यांची शिकवण नवीन तरुणांस मिळावी व त्याची

मुख्यतः सोय करावी असा त्यांचा हेतू होता. पुढें त्यांनीं 'प्रतापगडचें युद्ध' हा आपला प्रबंध सविस्तर लिहून १९२७ सालीं प्रसिद्ध केला. तो वाचणारांस मोडक यांच्या परिश्रमांचा, कळकळीचा, सूक्ष्म व मार्मिक अवलोकनाचा आणि त्यांच्या युद्धविशारदत्वाचा प्रत्यय येईल. मराठी भाषेंत तर हा ग्रंथ अपूर्वच ठरलेला आहे. किंबहुना युद्धतंत्र विशद करणारा आणि विख्यात सीझर, हॅनिबॉल, अलेक्झांडर यांशीं समकालीनांकडून तुलला गेलेला अद्‌भुतविक्रमी शिवाजीसारखें अप्रतिम युद्धकौशल सुव्यक्त करणारा असा हा मोडकांचा प्रबंध इतर भारतीय भाषांतहि पहिलाच ठरेल. शिवाजीच्या मोहीमेवर अशा प्रकारच्या हा ग्रंथ जगांतहि पहिलाच आहे. याहि ग्रंथाचें धोरण शिवाजीचा तो युद्धप्रसंग सांगण्याचें जितकें आहे, तितकेंच तें एकंदर युद्धतंत्राची जी सार्वकालिक पण महत्त्वाचीं समान्य तत्त्वें आहेत तीं सुस्पष्ट करण्यावर भर देण्याचेंहि आहे.

आपण पुष्कळ म्हणतों कीं मराठे गनिमी काव्यानें लढत. युद्धतंत्रदृष्टया गनिमी काव्याचें स्पष्ट चित्र आपणांपैकीं कितीकांस काढतां येईल ? मोघम कल्पना नको. या गनिमी काव्याच्या विशेष पद्धतीच्या आश्रयावर तर मराठे साम्राज्य पदवीस पोचले आणि याचे नांव इतिहासांत अजरामर झालें आहे. आपला हातखंडा गनिमी कावा सोडून भाऊसाहेबांनीं पानिपतावर मोगली पद्धत स्वीकारली, म्हणून पानिपतावरचा बिकट प्रसंग उद्‌भवला असेंहि कित्येक विद्वानांचेच नव्हे तर मराठी जुन्या-विवेचकांचेही मत आहे. याची चर्चा करण्याचा अधिकार वास्तविकपणें लष्करी तज्ज्ञांचाच आहे, पण आम्ही सर्व चर्चा करणारे मात्र बिनलष्करी हा विचित्रपणा मोडकांसारख्यांच्या प्रयत्नांनीं नाहींसा होऊं लागला होता. परंतु दुर्दैवानें प्रतापगडाशिवाय इतर विवेचनें कच्च्या स्वरूपांतच अपरिष्कृत अशीं पडून राहिलीं ती राहिलींच. केव्हां तरी त्यांना पुनः दुसरा मोडक भेटेल तेव्हांच त्याचा उद्धार होईल. या विषयाकडे आतां लष्करांत शिरलेल्या आणि सांप्रतच्या युद्धांत अनुभव घेतलेल्या कोणी अभ्यासूनें काळजीपूर्वक मोडकांचें उदाहरण पुढें ठेवून लक्ष पुरविलें पाहिजे.

मोडकांच्या 'प्रतापगडा'वर श्री. नानासाहेब शिंदे यांनीं बरीच प्रतिकूल टीका केली. एक प्रकारें हेटाळणीच केली म्हटलें तरी चालेल. परंतु

मोडकांचा ग्रंथ वाचणारांस नानासाहेबांपेक्षां निराळाच अनुभव येईल एवढें म्हणण्याचें धाडस बिनलष्करी असूनहि आम्ही करतों.

युद्धतंत्र व युद्धशास्त्र यांच्या दृष्टीनें आम्ही मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे ही दृष्टि मोडक यांनी प्रसृत केली हें मोठेंच श्रेय त्यांच्या पदरीं टाकणें कोणासहि प्राप्तच आहे. युगमानाप्रमाणें युद्धपद्धति, युद्धतंत्र, युद्धसाहित्य, युद्धविस्तार, युद्धपरिणाम यांत अनेक स्थित्यंतरें घडून आलेलीं आहेत हें कोणीच नाकबूल करणार नाहीं. तथापि कांहीं स्थूल आणि सार्वकालिक असे युद्धशास्त्राचे नियम आहेत तसेच दृढ आहेत. या प्रकरणीं Policy and Arms या कर्नल रेपिंग्टन् या एका ( १९२४ ) अर्वाचीन तज्ज्ञाच्या ग्रंथांतील पुढील उतारा उपयुक्त वाटेलः–

"The past and the present can thus be contrasted, and it will be seen that while the old diplomacy dwelt mainly with only a few leading men and women, modern diplomacy has to deal with mass movements, mass opinions, and extends beyond the old confines, of Western Europe to the whole of the world. But, expand, though, the stage may, and change, though, the players must, the best principles of the old diplomacy survive and have only to be accommodated to new forces, new ideas, and new surroundings."

जें रेपिंग्टन् डिप्लॉमसीबाबत बोलत आहे तेंच वॉर किंवा युद्धशास्त्राबाबतहि खरेंच आहे असेंच त्याचें प्रतिक्र न पाहतां कळून येईल. आजहि आकाशयानांची भर युद्धांत एवढी प्रभावी दिसत असतां आणि जवळ जवळ सर्व युद्धतंत्र पार उलट पालट झालें कीं काय असें वाटत असतां मूळची आधारभूत ( बेसिक ) युद्धतत्त्वें बदललेलीं नाहींत असें दिसून येईल. अजूनहि नेपोलियन, फ्रेडरिक धी ग्रेट, मार्लबरो, वेलिंग्टन्, गुस्टाव्हस्, अडॉल्फस्, ग्यारिबाल्डी, सीझर, अशा सुविख्यात सेनानींचीं युद्धें अभ्यासणें

अवश्य आहे. इतकेंच काय, पण आपण ज्यांस अडाणी समजतों अशा झुलू लोकांचा अग्रणी चाका घ्या, त्याच्या सारख्यांच्या चरित्रांचा अभ्यासहि आधुनिकांस उपकारक ठरल्याशिवाय राहणार नाही. मग शिवाजी—बाजी सारख्यां विख्यात वीरांच्या युद्धांचा आणि युद्धतंत्रांचा अभ्यास आपण जुनाट म्हणून निरुपयोगी समजणें शहाणपणाचें होईल काय ? युगमान बदललें; आतां विसावें शतक चालू झालें, आतां सतराव्या नि सोळाव्या शतकांतलीं युद्धें अभ्यासून काय फायदा ? पण एवढ्या वीस शतकांत युद्धनीतीचीं मूलें आणि मूल्यें मुळांतच बदलून गेलीं आहेत काय ? तर असें मानणें हा एक भ्रम होय आणि त्याचाच निरास मोडकांनी करण्याचा प्रयत्न केला.

नुसतें शिवाजीनें अमक्याचा पराभव आणि बाजीरावानें तमक्याचा पराभव केला असें सांगण्यानें या रणपंडितांचें कौशल्य आपल्या ध्यानीं येईल काय ? आणि हा केवळ रणकौशल्याचाहि प्रश्न नाहीं. रणनीतीचा संबंध संपूर्ण जीवनाशीं दृढबद्ध आहे. रणनीतींतच समाजनीतीचा अंतर्भाव होतो ! म्हणून जे. डब्ल्यू. फोर्टेस्क्यू यांनी यथार्थपणें म्हटलें आहे.

(Military History by the Hon. J.W.Fortescue,1914)

" Military history is not the history of physical but of moral force, perhaps almost of the triumph of moral over purely physical force. "

या मॉरल फोर्सवर मोडकांचा फार भर असे. ते मोराल मोराल (Morale) म्हणून सारखा घोष करीत तो एवढ्यासाठींच. फार्टेस्कू जेव्हां म्हणतो कीं,

" Let me repeat to you that war is less a matter of courage than of endurance. "

युद्ध म्हणजे जरी मारामारी, कापाकापी असे वरवर दिसतें तरी युद्धाचा संबंध सर्व जीवनाशीं येतो आणि तोहि फार दृढ आणि निकटचा.

५

हें सूक्ष्म विवेचन बाजूस ठेवलें आणि नुसते स्थूलच विचारांत घेतलें, तरी आमचें इतिहासज्ञान सांप्रत किती मागासलेलें आहे त्याचा सहज प्रत्यय पटतो. पानिपतचें आमचें युद्ध घ्या. प्रत्यक्ष ती भूमि पाहून येतांच त्या युद्धाचें चित्र मनासमोर उभें राहतें तें वर्णन करून सांगणें कठीण हें आम्ही स्वानुभवानें म्हणूं शकतों. किती शिक्षक विद्यार्थ्यांस दिल्ली ते कुरुक्षेत्र या चाळिस कोस पट्टीचें यौद्धिक महत्त्व समजावून देत असतील? लष्करी दृष्टीनें पाहणारास सुचेल आणि फोर्टेस्क्यूचे पुढील म्हणणें पटेल—

" He will understand why, for instance, endless great actions for the mastery of India have been fought within fifty miles of Delhi. "

बाबरनें इब्राहिमावर जय थोडक्या सैन्यानिशीं मिळवितांना ज्या तुलुघ्मा (वळणींचा पिछाडी हल्ला) चा आश्रय केला त्याचें महत्त्व जर विद्यार्थ्यांचे मनावर ठसवितां आलें नाही, तर काय मर्म कळणार त्याला? चंबळ नदीचा प्रचंड मातीचा तट पाहवा तेव्हांच समजून येतें कीं, मराठे यमुना सोडून पानिपताहून निघाले ते थेट चंबळेवर कां थांबले? पहाडी आणि डोंगरी किल्ल्यांचा उपयोग आम्हां मराठ्यांना कसा झाला हें एरव्ही कसे कळणार? पायदळ कीं घोडदळ हा प्रश्न मराठी इतिहास वाचून जसा समजून घेतां येईल तसा अन्य इतिहास वाचून क्वचित् कळेल. आम्ही मराठ्यांनीं एवढे जय कसे मिळविले, आमच्यापूर्वी मुसलमानांनी एवढ्या शूर रजपूतांचा पराभव कसा केला, हें समजावून घ्यावयाचें असेल तर लष्करी तज्ज्ञाच्या दृष्टीनेंच पण भारतीय दृष्टीच्या लष्करी तज्ज्ञाकडूनच समजून घेतलें पाहिजे. इंग्रजांना कसें यश आलें? हे असे प्रश्न आहेत कीं यांचीं यथार्थ आणि समर्पक उत्तरें आणि तींहि सशास्त्र आम्हांस समजावून सांगतां आलीं पाहिजेत, नाहीतर आम्हांस पुरुषोत्तम कवीप्रमाणें नुसतें आश्चर्यांत बुडावें लागेल. तो इंग्रजांबद्दल म्हणतोः—

**अब्धिवासा बुद्धिमन्तो महाकाया महाबलाः ।**
**इंग्रजाख्यां गता वीरा गौराङ्गा यंत्रयोधिनः ।**

इंग्रजांच्या तोफांपुढें आम्ही निपचीतच पडलो ! इंग्रजांनीं 'मालवण' हिसड्यासरशीं घेतलें आणि आम्ही आश्चर्य व दुःख करीत बसलों– "केवळ शिवलंकाच होती ! कशी घेतली ! !" पण तेच आम्ही मराठे एकेकाळी किती भारी होतो याबद्दल फोर्टस्कूच काय म्हणतो पहाः—

"The second and more important were the Marathas, the followers of Siwaji Bonsla, a petty chief from the hills above Bombay, who being a fine Military leader wore out the armies of Aurangzeb, by what we call Guerilla tactics. What the Marathas were, no one can say. They were not a caste, nor a sect, nor a nation; but they were a homogeneous body, and they would, but for us English, have become masters of India."

हा भारतप्रभु होण्याचा आमचा योग कोणी आणि कसा हिसकला तों नुसत्या वरवरच्या कारणांनीं नीट कधीच समजणार नाही. युद्धनीतीचा मागोवा घेत घेत फार खोलांत जावें तेव्हां आमच्याविषयींच आश्चर्यकारक नवें ज्ञान आम्हांस झाल्याशिवाय राहणार नाहीं. मग (Leadership) नेतृत्वाचें रहस्य काय याचा आम्हांस उमज पडेल. मगच शिवाजी–बाजींच्याच नव्हे, विद्यमान लोकाग्रणींच्याहि प्रभावरहस्याचें मर्म ध्यानीं येईल.

असा प्रकाश सर्वांस मिळावयाचा तर इतिहासाचा अभ्यास करून केला पाहिजे. तेवढेच पुरें आणि तेवढ्यानें आमचे घोडे स्वराज्यगंगेंत न्हातील असें कधींच होणार नाही. आणि इतिहास म्हणजे फोर्टस्क्यूचेंच वचन द्यावयाचें तर—तो म्हणतो तें पटण्यासारखेंच म्हणतोः—

"In fact, it is not too much to say that knowledge of Military history is essential to the right understanding not only of domestic and

foreign policies, but of the whole story, written and unwritten of the human race-which is mainly a story of fighting. "

लष्करी इतिहासाचें महत्त्व एवढें खोल आहे. वास्तविक इतिहास म्हणजे एकच आहे. लष्करी, सांस्कृतिक, आर्थिक, या त्याच इतिहासाकडे बघण्याच्या दृष्टि आहेत. सर्व दृष्टींनीं होणारें त्याचें ज्ञान तेंच इतिहासाचें खरें स्वरूपदर्शन होय.

# हिंदुस्थान देशांतील बुद्धिमान् वर्गाची युद्धशास्त्राशीं फारकत

[ लेखक : श्री. दि. वि. काळे, एम्. ए. ]

## शांततेचा ध्येयवाद

शांततेचा ध्येयवाद फार जुना असून त्या ध्येयवादांतील उपयुक्ततेचा वस्तुपाठ गेल्या जागतिक महायुद्धांत तर अनेक भावनाशील मनांवर पक्काच ठसला. त्या महायुद्धाच्या समारोपादाखल झालेल्या तहाच्या वाटाघाटींवर शांतताध्येय–प्रेरित अयुद्धवादाची दाट छाया पडली—पण असें होऊनहि फिरून त्याहूनहि अधिक संहारक आणि अत्यंत अहिंसाप्रिय अशा सामान्य जनतेलाहि भरडून काढणारें असें हें दुसरें जगव्यापी महायुद्ध आपल्या डोळ्यांदेखत भडकलें आहे! उपयुक्ततावादी किंवा निर्भेळ ध्येयवादी अशा दोन्ही प्रकारच्या शांतताप्रेम्यानीं महात्मा गांधींच्या नांवाचा आणि विचारसरणीचा हिंदुस्थानाबाहेरही कांही कमी बोलबाला केला नाहीं; त्यांचा 'प्रति ख्रिस्त' म्हणूनहि अभूतपूर्व असा गौरव झाला. परंतु त्यांच्या संदेशाकडे पुरेपूर लक्ष वेधण्याचा प्रयत्न होऊनहि मानवी स्वभाव हा आहे तसाच असल्यामुळें त्याचा जगावर अपेक्षित परिणाम झाला नाहीं असेंच म्हणावें लागतें.

सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें प्रजाजनांच्या सर्वांगीण विकासासाठीं आणि स्वदेशरक्षणाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा कार्यासाठीं देशांतील बुद्धिमान् वर्गाला, युद्धशास्त्राचें सांगोपांग शिक्षण घेण्याला ज्या प्रकारचें उत्तेजन दिलें जातें, त्या प्रकारचें उत्तेजन आपल्या देशांत मिळूं शकत नाहीं. आपल्या तरुण पिढीला अट्टाहासाने लष्करी शिक्षणापासून दूर ठेवण्यांत येतें. स्वदेशरक्षणाचें स्वाभिमानपोषक कार्य स्वजनांकडून न होऊं देतां, तें परकीयांच्या हातून घेण्याची मानहानी सहन करावी लागते; आत्मसंरक्षणक्षमतेमुळें प्राप्त होणारा आत्मविश्वास आणि पराक्रम करण्याची स्वाभाविक प्रेरणा मुळापासून खुडून टाकण्यासाठीं म्हणून जुलमानें शस्त्र वापरण्याची बंदी करण्यांत येते; एवढेच नव्हे तर शस्त्राप्रमाणें थोड्याशा प्रमाणावर प्रतिकारक असा ज्या ज्या गोष्टींचा उपयोग होणें शक्य आहे अशा सर्व साधनांचा उपयोग करण्याचें साधें व वीरवृत्तीला पोषक असें शारीरिक शिक्षणहि घेण्यास विरोध होतो आणि हिंदी लोकांनीं सर्वतोपरी दुबळें राहावें अशा प्रकारची अन्यायी परिस्थिति अधिकाराच्या जोरावर निर्माण करण्यांत येते; ह्या गोष्टी पुष्कळच चिंतनीय आहेत.

## देशभक्तांच्या प्रथमपासूनच्या आकांक्षा

तसें म्हटलें तर हा विषय मुळीच नवा नाहीं. जेव्हां जेव्हां आपले राष्ट्रीय पुढारी देशोद्धाराच्या मार्गाचें चिंतन करावयास एकत्र बसले, तेव्हां तेव्हां त्यांनीं आपल्या या संबंधांतील आकांक्षा अगदीं स्पष्टपणें नमूद केलेल्या आहेत. युद्धविद्या आणि स्वदेशरक्षणाचें कार्य म्हटलें म्हणजे साहजिकच तीन गोष्टी ध्यानांत येतात. पहिली गोष्ट—देशाच्या सैन्यांत देशिकांनाच योग्य स्थान ( संख्येने आणि मानाने ) मिळावें, दुसरी गोष्ट—स्वयंस्फूर्तीनें लष्करी शिक्षण व लष्करी अनुभव स्वाभिमानानें मिळण्यासाठीं स्वयंसेवकवृत्तीची जोपासना व्हावी; आणि तिसरी गोष्ट—आत्मरक्षणार्थच केवळ नव्हे तर प्रजाजनांच्या सर्वांगीण विकासासाठीं, आत्मविश्वासाच्या वाढीसाठीं आणि तेजस्वी प्रतिकार सामर्थ्य-संपादनाचे पोटीं निर्माण होणाऱ्या प्रभावी व पराक्रमी वीरवृत्तीच्या निर्मितीसाठीं, मोकळेपणानें हत्यारें वापरण्याची शक्यता असावी. या तीनहि गोष्टींबद्दल

आपल्या राष्ट्रीय सभेनें ( इंडिअन नॅशनल कॉंग्रेस ) अगदी आरंभींच ठराव केलेले आढळतील. १८८६ ची दुसरी कॉंग्रेस १८८५ च्या पहिल्या कॉंग्रेसपेक्षां साहजिकच निराळी होती. पहिली 'स्वयंसेवकां'ची बैठक होती तर दुसरा 'प्रतिनिधीं' चा मेळावा होता, ही गोष्ट इतिवृत्तांतांत मोठ्या सूचक समाधानानें दाखल केली आहे. या फरकाचा दृश्य परिणाम म्हणूनच कीं काय, त्या सालीं ( १८८६ ) कलकत्यास ' देशांतील प्रजाजनांना स्वयंसेवक–दलांत प्रवेश देण्यांत यावा ' असा या संबंधांतील पहिला ठराव करण्यांत आला. पुढल्या वर्षी १८८७ च्या मद्रास कॉंग्रेसच्या वेळीं तोच महत्त्वाचा ठराव पुनः मंजूर करण्यांत आला. श्री. शंकरन् नायर यांनी ' ब्रिटिशांच्या जयासाठीं प्रार्थना ' करण्याच्या स्वातंत्र्यापेक्षां, स्वयंसेवक होण्याचे स्वातंत्र्याची आवश्यकता विनोदाने प्रतिपादिली; आणि ज्या रशियन अस्वलाच्या बागुलबुवाला भिऊन सरकारची त्रेधा उडत होती त्याचाच दाखला देऊन विचारलें, " रशियनांनीं आपल्या कालच्या शत्रूंना आज हत्यारें देऊन आपल्या खांद्याला खांदा लावून लढायला उभे केले आहेत. त्यांचें कांही अनहित झालें नाहीं. त्यांच्या तुर्कांपेक्षा आम्ही हिंदी लोक कमी निष्ठेचे आहोंत काय ? " आणि आश्वासनांची साखर पेरणाऱ्या सरकारजवळ अर्थात या प्रश्नाचें उत्तरच नव्हतें आणि नाहीहि. " राणीच्या जाहिरनाम्यांत दिलेल्या आश्वासनाबरहुकूम सैन्यांतल्या वरच्या अधिकाराच्या जागा हिंदी प्रजाजनांना द्याव्या, आणि उच्च दर्जाचें लष्करी शिक्षण देण्यासाठीं लष्करी विद्यापीठें ( मिलिटरी कॉलेजें ) उघडावीं " असा ठराव श्री. नरेन्द्रनाथ सेन यांनी या वर्षीच मांडला. " शांततेच्या काळांत स्वराज्य संभाळण्याच्या कामाइतकेंच युद्धकाळांत स्वदेश रक्षणाचें काम हिंदुस्थानला महत्त्वाचें वाटतें. आणि त्यासाठी तितकीच पात्रता मिळविली पाहिजे " या शब्दांत त्यांनीं हिंदुस्थानची आंतरिक इच्छा बोलून दाखविली. याच गटांतला तिसरा हत्याराचा कायदा रद्द करण्याबद्दलचा ठराव मद्रासलाच प्रथम पास झाला. यावर फारच जहाल भाषणें झालीं. सर्व मंडपांत उत्साह संचारला आणि भाषणें कित्येक तास झालीं. इतका हा ठराव लोकांना महत्त्वाचा वाटला, असें त्यावेळच्या राष्ट्रीय सभेच्या

इतिवृत्तांत लिहिलेलें आढळतें. त्यावेळीं आणि आताहि' हा विषय हिंदी लोकांच्या मनाला शल्यासारखा लागून राहिला आहे. " खास परवानगी-शिवाय हिंदुस्थानच्या कोणाहि रहिवाशाला हत्यार ठेवायला किंवा बरोबर न्यायला मोकळिक मिळत नाहीं; पण युरोपिअन, युरेजियन, नीग्रो, हॉटेंटॉट, फिजी बेटांतले लोक, फार काय पृथ्वीवरील कोठलेहि हीन दर्जाचे मानव, हिंदी किनाऱ्यावर समुद्रांतून वाहून येऊन लागणारा कोणताहि प्राणी (!) हत्यार घेऊन मिरवूं शकतो!" हत्यारांच्या कायद्याची विषाची नांगी ही इथें आहे. कोणीहि परका इसम आमच्या देशांत आमच्या डोळ्यांदेखत जें करूं शकतो ते जन्मजात हिंदवासियाला करतां येत नाहीं.

## हिंदी लोकांची बदनामी करणारा कायदा

१८५७ मध्यें शिपायांनीं स्वातंत्र्यासाठीं धडपड केली; पण त्यावेळीं लोकांचीं हत्यारें काढून घेण्याची आवश्यकता भासली नाही; ती वीस एक-वीस वर्षांनंतर १८७८ त भासली! १८५८ तल्या राणीच्या जाहिर-नाम्यापासून कॅनिंग, एल्गिन, मेयो, नॉर्थब्रुक, रिपन असे सौम्यप्रकृति व्हाइसरॉय आले. परंतु इंग्लडांत डिस्राअली मुख्य प्रधान झाल्यामुळें लॉर्ड लिटन (१८७६) हा अज्ञात हिरा निवडून त्यानें पाठवून दिला! आणि या साम्राज्यवाद्यानें आपल्या हिणकस तत्त्वज्ञानांचें प्रतीक आणि स्मारक म्हणून वर्तमानपत्रांचा आणि हत्यारांचा असे दोन कायदे करून १८७८ या वर्षाला काळिमा आणला; आणि लिटन हा साहित्यिक होता! 'ओवेन मेरिडिथ' या टोपण नांवानें काव्यें छापीत असे. मोठ्या साहित्यिक आणि कादंबरीकार बापाचा असा लेखक चिरंजीव होता. सर्व कायदेकौन्सिलचे नियम धाब्यावर बसवून इंग्रजी व देशी भाषांतील वृत्त-पत्रांत पंक्तिप्रपंच करणारा 'प्रेस ॲक्ट' त्यानें फक्त एका दिवसांत तीन वाचनें संपवून पसार केला, ही गोष्ट त्याच्या वृत्तीची चांगलीच साक्ष देते. तसाच हीन वृत्तीचा द्योतक असा हिंदी लोकांची बदनामी करणारा हा

---

१ रा. ऑ. श्री. एम्. आर. जयकर, यांचा लेख, ट्वेंटिएथसेंचरी, एप्रिल १९४२.

हत्याराचा कायदा आहे, असें त्या वेळच्या किती तरी सुबुद्ध इंग्रजांनीं म्हटलेलें आहे.

इतर देशांतहि हत्यारांचा वापर व व्यापार यांवर नियंत्रण ठेवण्याबद्दल कांही व्यवस्था असते. तशीच हिंदुस्थानांतल्या या 'आर्म्स ॲक्टनें' केलेली असेल, असा बहुतेकांचा समज असतो. आणि यामुळेच किती तरी पाश्चात्य व एतद्देशीय इतिहासकारांनीं याबद्दल उल्लेखहि केलेले नाहीत. परंतु ही त्यांची चूक आहे. १८७८ पूर्वीहि आपल्या देशांत कायदा होता व सुवृत्त व इतर लोक असा साधा बुद्धीला पटणारा फरक करण्याची सोय होती. शांततेनें राहणारे जिल्हे व दंगेखोरांचे जिल्हे असा जाहीर भेद करून त्या दुसऱ्या प्रकारच्या भागावर कांहीं बंधनें असत.' पण नव्या कायद्यांत सर्वच हिंदवासियांना एकसारखे लेखण्यांत आलें; आणि युरोपिअन व युरेजियन लोकांचा तेवढाच वर सांगितल्याप्रमाणें, अपवाद करण्यांत आला. आत्मरक्षणाचें हत्यार बाळगण्यास बंदी झाल्यामुळें चोर, दरोडेखोर, हिंस्त्र पशु यांच्यापासून, होणारी प्राणहानी वाढली तरी देखील निरनिराळ्या सबबींवर हत्यारांचें परवाने नाकारण्यांत आलें व त्यांची संख्या एकसारखी घटतच गेली. सर्व सामान्य जनता हत्यारांना पारखी झाली.[२] पांचदहा खेड्यांतून क्वचित् एखाद्याजवळ बंदूक असावी असा विपरीत काळ आला. याविरुद्ध त्यावेळीं आणि त्यानंतरहि देशांत पुष्कळ निषेध-सभा आणि आणि पत्रकें व अर्जहि झाले. परंतु इतर अनेक बाबतींत फरक झाले असले तथापि 'आर्म्स ॲक्ट' एकदा कायमचा डोक्यावर बसला तो तसाच बसला आहे. अर्थात् खऱ्या स्वातंत्र्याला त्याचें उच्चाटन किती आवश्यक आहे याची कल्पनाच करावी.

### कानाला ऐकवलें; पण कृतीनें मोडलें

पारतंत्र्याच्या खाईत पिचलेल्या हिंदी लोकांना १८५८ चा राणीचा जाहीरनामा म्हणजे मोठी सनद वाटे. इंग्लंडच्या इतिहासांतील

१ 'इंडिअन हिस्टरी ऑफ् अवर ओनटाइम्स' सत्यचन्द्र मुकरजी, १८९१, पृ. १३३.

२ 'ऑ. जी. व्ही. जोशीज् स्पीचिस्' पृ. ११८६.)

' मॅग्ना चार्टा ' किंवा ' बिल-ऑफ् राइट्स् ' (हक्कांची नोंद) अशीं बडीं नांवें आशाळभूतपणें त्याला दिलीं जात. अनेक वेळा अनेक संदर्भांत जाहीरनाम्यांतील पुढे दिलेले गंभीर शब्द पुनः पुनः मंत्रासारखे उच्चारण्याचा हिंदी मवाळांना चाळाच होता म्हटलें तरी चालेल; " आणि आमची आणखी अशी इच्छा आहे कीं, शक्य तोंपर्यंत, आमच्या प्रजाजनांना, मग ते कोठल्याहि जातीचे किंवा पंथाचे असोत, आमच्या नोकरींत अनिर्बंद्धपणें आणि निःपक्षपातानें अधिकाराच्या जागा दिल्या जाव्यात. शिक्षण, कर्तृत्व आणि प्रामाणिकपणा या गुणांनीं ज्यांची पात्रता सिद्ध झाली असेल त्यांच्यावर इतर कोणत्याहि प्रकारचीं बंधनें ठेवण्यांत येऊं नयेत " यापूर्वींच १८३३ मध्येच ' गव्हर्मेंट् ऑफ् इंडिया ' कायद्यांत ईस्ट इंडिया कंपनीला स्पष्टच सूचना मिळालेली होती—' केवळ धर्म, जन्मस्थान, वंश किंवा वर्ण यांसाठी कोणाहि एतद्देशियाला अधिकार देण्याचें नाकारूं नये. ' नोकऱ्यांप्रमाणें सर्वच इतर बाबींत हा दंडक लागू होता. पण कंपनीच्या वीस वर्षांच्या कारभारानंतर पुनः १८५३ सालीं जेव्हां निरीक्षण केलें तेव्हां कंपनीनें ही सूचना शब्दशः धाब्यावर बसविल्याचें आढळून आलें. व्यापारी कंपनी निःपक्षपाती व सुव्यवस्थित कारभार करूं शकत नाही म्हणून राजकारणी पार्लमेंटनें १८५८ नंतर हिंदुस्थानची अधिकारसत्ता आपल्याकडे घेतली आणि जाहीरनामे लागले. वर्षांपाठीमागून वर्षें गेलीं—कंपनी गेली, पार्लमेंट् आलें; पण हिंदुस्थनाच्या कपाळाची कटकट चुकली नाही. आणि जुलमी लॉर्ड लिटनलाच आपल्या एकाद्या गुप्त खलित्यांत, निर्लज्जपणें, जे शब्द आज दुर्जनत्वसूचक म्हणीप्रमाणें वापरले जातात, त्या शब्दांचा अवलंब करावा लागला. " आपल्या सर्वांना पुरें माहीत आहे कीं, या मागण्या आणि अपेक्षा केव्हाच पुऱ्या करतां येणार नाहीत आणि पुऱ्या होणारहि नाहीत. हिंदी लोकांना समोर प्रतिबंध करणें, हा एक मार्ग आणि त्यांची विश्वास दाखवून फसगत करणें ( Cheating them ) हा दुसरा मार्ग. यांपैकी कोणत्या तरी एकाचा अवलंब हा केलाच पाहिजे. आंणि आम्ही त्यांतल्या दुसऱ्या म्हणजे अत्यंत वांकड्या मार्गाचाच स्वीकार केला आहे. ' इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही सरकारांनीं आपलें सामर्थ्य हिंदुस्थानच्या कानाला ऐकविलेलें प्रत्येक अभिवचन अंतःकरणापाशीं

भंग करण्यासाठीं नाना प्रकारचे मार्ग योजण्याकडे खर्च केलेलें आहे." (' taken every means in their power of breaking with heart the words of promise they had uttered to the ear ' ) "

## अन्यायाची जागती जाणीव

या अन्यायाची तीव्र जाणीव हिंदुस्थानांत सदैव जागृत राहिलेली आहे. कॉंग्रेसमध्यें, कौन्सिलांतून, जाहीरसभांतून, लेखांतून, ग्रंथांतून, संधि मिळाली त्या सर्व ठिकाणीं, आपल्या लोकनायकांनीं या मागण्यांचा पुनरुच्चार न कंटाळता, न विसरतां, एकसारखा केलेला आहे. १९१६ मध्यें गेल्या महायुद्धांत हिंदुस्थानानें केलेल्या युद्धसाहायाबद्दल कृतज्ञतेचे उद्गार इंग्लंडांत निघू लागले. ते ऐकून हिंदी शासनव्यवस्थेच्या प्रश्नाकडे पाहण्याचा इंग्लंडचा दृष्टिकोण बदलेल अशी साहजिक आशा वाटू लागली. यावरून मध्यवर्ति विधिमंडळांतील एकोणीस लोकनियुक्त सदस्यांनीं जी एक संयुक्त मागणी केली त्यांत ११, १२, व १३ क्रमांकांत याच मागण्या मांडल्या आहेत:—(११) "युरोपिअनांना ज्या अटींवर हत्यारें बाळगण्याला परवानगी मिळते त्याच अटींवर हिंदी लोकांना बाळगण्याचा हक्क मिळावा; ( १२ ) हिंदुस्थानांत प्रादेशिक ( टेरिटोरियल ) सैन्याची उभारणी करून त्यांत स्वयंसेवक म्हणून दाखल होण्याला हिंदी लोकांना मोकळीक असावी; आणि ( १३ ) युरोपिअन लोकांच्याच अटींवर हिंदी तरुणांना सैन्यांत अधिकाराच्या जागा मिळाव्या."

महायुद्ध संपलें आणि आपल्या न्याय्य मागण्या कोणत्याहि पूर्वमान्य सनदशीर मार्गांनीं पुऱ्या झाल्या नाहीत हें पाहून, देशामध्यें निराशेचें वातावरण फैलावलें. त्याचा परिणाम होऊनच कॉंग्रेसचें धोरणहि बदललें. आणि मागण्या करण्याचा कंटाळा येऊन आत्मक्लेश–सत्याग्रहादि प्रत्यक्ष कृतीच्या राजकारणाचें महात्मागांधींचें युग अवतरलें. थोड्याच दिवसांत

१–'दि गव्हर्मेंट ऑफ् इंडिया' जे. रॅम्से मॅक्डोनल्ड, पृ. १०४; 'स्पीचिस् ऑफ् गोपाल कृष्ण गोखले,' पृ. ८३२.

वसाहतीच्या स्वराज्याच्या मर्यादित मागणीऐवजी, निर्भेळ स्वातंत्र्याची अभिनव घोषणा करण्यांत आली. आणि कोणी मागून कांही देत नसतो, आपलें आपणच सर्व मिळविलें पाहिजे, अशी नैसर्गिक स्वावलंबनाची वृत्ति दृढावली. अर्थात् हत्यारांचा कायदा, युद्धशिक्षणाची व्यवस्था अशा फुटकळ सुधारणांवर भर देण्याचा उपयोग तसा दिसत नाहीं, म्हणूनच त्या विषयांना अलीकडे तितकें प्रामुख्य मिळत नाहीं एवढेंच. बाकी प्रसंगानें त्यांचा उच्चार होतच असतो.

## सैन्याचें हिन्दीकरणाचा प्रश्न

हिंदुस्थानसरकारच्या एकंदरच हिंदी प्रजेला वागविण्याच्या धोरणा-विरुद्ध आपली जी कायमची तक्रार आहे, तिचा उच्चार करण्याचा हा प्रसंग नव्हे. परंतु वर उल्लेखिलेल्या तीन मागण्या मान्य न करतां सैन्याचें हें सर्व कुरण केवळ भारी पगारवाल्या युरोपियनांना चरण्यासाठीं मोकळें ठेवून हिंदुस्थानचा लष्करी खर्च हिंदुस्थानच्या गरीब खजिन्याला डोईजड करण्याचा जो गुन्हा हिंदी सरकार करीत असतें, त्याचा समावेश मात्र याच संदर्भात करावा लागेल. हिंदी लोकांना सैन्यांतील जागा देण्याचें टाळायचें म्हणून तर परकी युरोपियनांची योजना, आणि त्यांना आकर्षक वाटावें म्हणून भारी पगार व भत्ते, आणि त्यामुळेंच प्रमाणाबाहेर लष्करी खर्च, आणि तो भागवितां यावा म्हणून इतर राष्ट्रसंवर्धक खात्यांवर होणाऱ्या खर्चाची बचत–लोकोपकारक कार्यक्रमांची उपासमार–जादा कर–अशी अनर्थ परंपरा पाठीस लागते. या लष्करी उधळपट्टीवरच स्वतंत्रपणें आपले नेते नेंहमीं आणि वारंवार कोरडे ओढतांना दिसतात, याचें कारण हा प्रश्न प्रत्येक वार्षिक अंदाजपत्रकाचें वेळीं पुढें येतो, हेंच आहे. पण म्हणून इतर गोष्टी महत्त्वाच्या नाहींत असा त्याचा अर्थ नव्हे. यावर कोणत्याहि प्रकारें तात्पुरती मलमपट्टी लावून म्हणजे थोडीफार काटकसर करून हा अपव्यय थांबण्यासारखा नाहीं याचीहि जाणीव सर्वांना आहे. आणि म्हणूनच हिंदी लष्कराचें परमार्थतः हिन्दीकरण ( इंडियनायझेशन ) करण्याबद्दल चळवळ सुरू झालेली आहे. सैन्याचें हिन्दीकरण ही मुख्य बाब आणि ती शक्य व्हावी म्हणून हिन्दी प्रजेला हत्यारांची मोकळीक, सुशिक्षितांना स्वयंसेवक

होण्याचें स्वातंत्र्य आणि लायक हिन्दी लोकांना अधिकारप्राप्ति या आनुषंगिक गोष्टी अशी ही नैसर्गिक चौकट आहे. सर्व सुधारलेल्या व न्याय्य शासनसंस्था ती अविभाज्य आणि अपरिहार्य समजतात. राष्ट्राचें लष्करी धोरण म्हणून तिचा आचार अविवाद्य होतो. हिंदुस्थानांतच फक्त लष्करी धोरण अत्यंत विकृत झालेलें आहे. आणि म्हणूनच राष्ट्रांतील तरुण पिढीची सर्वस्वी नागवण होत असून होतकरू उमलत्या तरुणांना आपल्या जन्मसिद्ध स्वदेशरक्षणाच्या स्वाभिमानपूर्ण हक्कापासून स्वतःच्या देशांत दूर ठेवण्यांत येतें.

## तोंडाला पानें पुसण्याचे सुधारलेले मार्ग

प्रस्तुत हिंदी सरकारच्या लष्करी धोरणाचा साकल्यानें विचार करण्याची पात्रता असलेल्या कोणालाहि ब्रिटनचें हिंदुस्थानांतील लष्करी धोरण अत्यंत किळसवाणें झालेलें आहे असें दिसेल. राणीच्या जाहीरनाम्यांत सोज्वळ अभिवचनें कांहींहि असलीं, तरी गेल्या महायुद्धांतील परिस्थितींत साम्राज्याच्या गरजांमुळें आवश्यक ठरेपर्यंत, कोणाहि हिंदी माणसाला सैन्यांत कमिशन म्हणून मिळत नसे. हिंदी माणसाला कमिशन देण्याला घालून ठेवलेला कोलदांडा १९१७ सालीं केवळ तत्त्वतः म्हणजे फक्त शब्दांनीं काढून घेण्यांत आला; पण व्यवहारांत नानाविध सबबी दाखविण्याचें तसेंच चालू राहिलें. आणि कांहीं प्रगति झाली असेल तर तिचा वेग गोगलगाईच्या वेगाइतकाच राहिला. हिंदी लोकांबद्दल अविश्वास, मानहानिकारक गैरविश्वास आणि हत्यार व अधिकार हातीं देण्याला नाखुषी हें हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या लष्करी धोरणाचें मुख्य सूत्र आहे.' हल्लीच्या गणितानें पाहावयाचें तर तीनशें वर्षेपर्यंत तरी सर्व सैन्याचें हिंदीकरण होईल की नाही याची शंकाच आहे. कमिट्या आणि कमिशनें म्हणजे कालहरण करण्याचा व शब्दशः 'तोंडाला पानें पुसण्याचा' एक सुधारलेला मार्ग आहे हें कोणाला माहीत नाही? बहुसंख्य हिंदी गृहस्थ असलेली स्कीन कमिटी

---

१ 'इंडिअन पॉलिटिक्स् सिन्स् दि म्यूटिनी'—सी. वाय्. चिंतामणी, पृ. १२३)

झाली, पहिल्या राउंडटेबल कॉन्फरन्समध्यें नेमलेली डिफेन्स सब्कमिटी झाली, आणि शेवटीं चेटवूड कमिटी झाली. एकामागून एक येणाऱ्या कमिश्यांच्या शिफारसी अधिकाधिक प्रतिगामी स्वरूपाच्याच झाल्या—आणि शेवटीं हिंदुस्थानच्या पदरांत अजूनहि कांहीं पडलेलें नाहीं तें नाहीच. स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या, प्रातिनिधिक राज्यपद्धतीच्या वाटेल तितक्या योजना झाल्या आणि होतीलहि. स्वदेशरक्षण आणि परराष्ट्रांशीं संबंध ह्या दोन महत्त्वाचे प्रश्नांमध्यें जी स्वायत्तता मिळेल, ती त्या स्वातंत्र्याची खरी कसोटी होय. आणि यांतील पहिली कसोटी लावूं लागतांच अगदी अलीकडे उदारधी क्रिप्स साहेबांचा स्नेहासाठीं पुढें केलेला हात कसा तडकाफडकी आखडण्यांत आला हा इतिहास अगदीं ताजाच आहे.

मुलकी कारभारांतील थोडीशी उदारता आणि लष्करी जबाब-दारीच्या बाबतींतील अक्षम्य कंजुषता, यांमधील विरोध व्हॅलेंटाइन चिरोल-सारख्या माणसालाहि भासल्याशिवाय राहिला नाही. "हिंदी लोकांना कार्यकारी मंडळांत घेण्याला आपण हरकत घेत नाहीं; पण त्याचवेळीं हिंदी सैन्यांत मात्र अगदीं खालच्या श्रेणीच्यावर रतिभरहि त्यांना आपण चढूं देत नाही, ही एक विलक्षण विसंगति आहे"[1] असा अगदी सरळ आणि सहज सुचणारा आक्षेप त्यानें घेतला आहे. चांगल्या लायकीच्या हिंदी तरुणांना सैन्यामध्यें प्रवेश करण्याला आकर्षक परिस्थिति नाही, आणि हिंदुस्थानामध्यें राजनिष्ठेबरोबर लष्करी परंपराहि श्रेष्ठ दर्जाची असून तिचा उपयोग केला जात नाही, असें स्पष्ट विधान त्यानें कलेलें आहे. अर्थात् लढाऊ जाती आणि बिन लढाऊ जाती हा भेद, एका हातानें देऊं केलेलें ह्यानंतर सुशिक्षितांच्या संबंधांत तरी दुसऱ्या हातानें निकामी ठरविण्याच्या दुष्ट कारवाईच्या पोटींच जन्मास आलेला आहे, हे सिद्ध करणें फारसें कठीण नाही.

## लष्करी कार्यक्षमतेची मानभावी उठाठेव

सर जॉर्ज मॅक्मन या लेखकाचें 'मार्शल रेसिस ऑफ इंडिया'

१ ('इंडिअन् अन्रेस्ट'—व्हॅलेंटाइनचिरोल, १९१०, पृ. ३२८)

हें पुस्तक अर्थात् ब्रिटिश साम्राज्यवादाचाच दृष्टिकोण पुढें मांडणारें आहे. तथापि हिंदी लोकांना सैन्यांत पुरेसा वाव आणि बढती न मिळण्याशीं कारणें त्यानें त्यांत उघडपणें मांडलेलीं असून त्यांचा लष्करी कार्यक्षमतेचीं मुळींच संबंध नव्हता असा आपल्याला त्यावरून पुरेपूर पडताळा मिळतो. " छोटे जमीनदार, शेतकरी-मालक आणि शेतावरचे खंडकरी" हेच लढाऊ आहेत आणि त्यांची संख्या हिंदुस्थानांत भरपूर आहे; परंतु ब्रिटिश अधिकारी हिंदुस्थानांत आणविल्याशिवाय सरकारच्या मनाला सुरक्षितपणा वाटत नाहीं आणि त्यामुळें प्रतिबंधक धोरण ( Segregation policy ) अटळ ठरून अमलांत आणलीं जातें, ( पृ. ३४१ व ३४७ ), हें त्यावरून स्पष्ट दिसतें. पंजाबी, मुसलमान शेतकरी व कोंपन्यांतल्या गुरखे आफ्रिडि इत्यादि परकी माणसांवरच विसंबावें असें इंग्रजांना कां वाटतें, याचेंहि गमक त्यांतच मिळतें. पाश्चात्य ज्ञान आणि त्याबरोबरच देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, स्वराज्यलालसा, अशांचें त्वरेनें ग्रहण करणारा केवढा तरी मोठा सुबुद्ध वर्ग हिंदुस्थानांत आहे. त्याच्याबद्दल केवढें मधाचें बोट मेकॉलेनें लावलें ! " परंतु तो वीर्यवान ( Virile ) नाहीं ! अडाणी वाटणाऱ्या लोकांनीच पूर्वी हिंदुस्थानावर राज्य केलें व ब्रिटिशांचें राज्य गेलें तर फिरून तेच अडाणी लोक हिंदुस्थानचे अधिकारी होतील." अशी सायमन कमिशननें हिंदुस्थानच्या इतिहासाच्या परंपरेची आणि राजकारणपटुत्वाची जी बदनामी केलेली आहे, तीच लोकांच्या गळीं उतरविण्याचा अप्राणिक प्रयत्न कशासाठी चालला आहे हें ध्यानांत येणें कठीण नाहीं. हिंदुस्थानांत जातिभेद आणि वर्णभेद असले तथापि देशाच्या प्रत्येक भागांत क्षत्रिय वर्गाची नेंहमीं धार्मिक काळजीनेच जोपासना होत आलेली आहे. आणि परिस्थितींत बदल होऊन केवळ क्षत्रियांकडून रक्षण प्रतिकाराचें काम पुरें पडत नाहीं हें ध्यानांत आल्याबरोबर ब्राह्मणादि सर्व वर्णांनीं आपला नित्य व्यवसाय सोडून त्या महत्कार्यांत शक्य त्या प्रकारें हातभार लाविलेला आहे. शिवकालीन व नंतरच्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण समुत्थानाची ज्यांना कांहीं कल्पना आलेली आहे, त्यांना याचा दुसरा पुरावा द्यावयास नको. शिवाय सर्व वर्णांचें गुरुत्व ब्राम्हणांकडे हा केवळ अर्थवाद नव्हता. द्रोणाचार्य-कृपाचार्यादि धनुर्वेद पारंगत गुरुंची प्राचीनतम परंपरा अजूनहि या देशांत

विसरली गेलेली नाहीं. पण हीं प्रमाणें देऊन आपण फार तर अज्ञ माणसाला ज्ञान देऊन त्याचे डोळे उघडूं शकूं. परंतु जाणून बुजून झोपेचें सोंग घेणाऱ्याला, येनकेन प्रकारेण देशांतील बुद्धिमान् वर्गाला युद्धशास्त्रापासूनच काय, परंतु युद्धविद्या, युद्धकला व युध्दसाधनें यांपासूनहि दूर ठेवण्याचा कट करणाऱ्याला जागें कसें करणार ?

## हें चित्र पहा आणि तें चित्र पहा

येथपर्यंत प्रस्तुत छोट्याश्या प्रकरणांतील मुख्य विषय जो देशांतील बुद्धिमान् वर्गाची युद्धशास्त्राशीं फारकत–त्याची सर्वसामान्य राजकारणाच्या दृष्टीनें, आपल्या देशाच्या पुनरुध्दाराची तळमळ लागलेल्या आणि म्हणून हिंदुस्थानाच्या प्रातिनिधिक राजकारणी पुरुषांच्या दृष्टीनें व बहुतांशीं त्यांच्याच शब्दांत, ब्रिटिश धोरणाचें विदारक पृथःकरण देऊन मांडणी केली. ब्रिटिशांचें अन्यायाचें, अविश्वासाचें किंवा भ्याडपणाचें धोरण कसें आहे हें त्यांच्याच माणसांच्या तोंडून आपण ऐकलें. आपल्या देशांतील लोकांच्या नालायकीबद्दल जो व्यर्थ पुकार करण्यांत येतो, त्याच्या पाठीमागील कुजट स्वार्थांधतेचाहि वास आपल्याला मिळाला. आणि आजपर्यंत या सर्व गोष्टी झांकण्यासाठीं म्हणून सरकारमार्फत करण्यांत आलेलें समर्थन देशांतील अत्यंत जहालांपासून तों अत्यंत मवाळांपर्यंत कोणासहि पटलेलें नाहीं याचें प्रत्यंतरहि आपण पाहिलें. ब्रिटिशांचें आजचें लष्करी धोरण हें त्यांच्या एकंदर हीनबुध्दीच्या हृदयशून्य साम्राज्यलोभाचें आणि साम्राज्यवादाचें केवळ एक अंग आहे. आपल्या कृतकर्मांची जाणीव अर्थातच दुसऱ्या कोणापेक्षा त्यांनाच अधिक आहे आणि त्यामुळेंच हिंदी प्रजेला सत्ता किंवा हत्यार देण्याचा उदारपणा दाखविण्याचें त्यांना धाडसच होत नाही. याच्या उलट यू. एस. एनें फिलिपाइन्स बेटांच्याविषयीं स्वीकारलेलें निर्लोभीपणाचें धोरण आपल्या डोळ्यासमोर आहेच. *आपल्या अतिपूर्वेकडील महत्वाच्या बेटांतील वसाहतींच्या तद्देशीय लोकांना हत्यारें वगैरे पुरवून स्वदेशरक्षणक्षम करण्यासाठीं हॉलंडच्या मायभूमीनें घेतलेल्या खबर-

* "बुलेटिन ऑफ इंटर नॅशनल न्यूज–"

दारीचें सुफळ त्यांना प्रजेच्या निःसीम सहकार्याच्या रूपानें कसें मिळालें याचें इतिवृत्त आपण ऐकतोंच. त्याच्या उलट मलाया, ब्रम्हदेश येथील अखेरच्या क्षणापर्यंत गैरविश्वासानें वागविलेल्या प्रजाजनांच्या विरोधी भावनांची कटुता खुद्द इंग्रजांनाच चाखावयाला मिळाली आहे. त्यापासून ते काय बोध घेतात हें लौकरच दिसेल. अगदी गळ्याला लागेपर्यंत वाट पाहून मग केलेल्या हालचालीचे दुष्परिणाम होतात असा अनुभव आहे. खुद्द मॅनिलॉवर ओढविलेल्या प्रसंगाचीं वर्णनें आता वाचावयास मिळू शकतात. अकस्मात् झालेल्या जपानच्या वैमानिक विद्युत्पाताच्या काळीं मॅनिला सरकारनें परचक्राला तात्कालिक तोंड देण्यासाठीं म्हणून स्वयंसेवक अधिक नेमले. त्यांना हत्यारें दिली. हा गैरसरावाचा मान व हत्यारांचा ताबा मिळाल्यानंतर या क्षणनिर्मित हत्यारबंदांनीं कहर उडवून दिला व स्वतःच्याच भेदरलेल्या देशबांधवांचा अज्ञानानें छळ केला. मॅनिलाच्या लोकांनीं स्वतःच्या राष्ट्रीय प्रजेच्या हवालीं तरी हत्यारें देण्याचे प्रसंगीं शहाणपणच दाखविलें. परंतु आपल्या मुत्सद्दी सरकारला परदेशांतून सैन्य मागवून हिंदुस्थानचें रक्षण करण्यांत कोणत्याहि प्रकारची लज्जा वाटत नाहीं. गेल्या महायुध्दांत रणधुमाळी हिंदुस्थानापासून दूर असल्यानें जपानच्या दुरूनच्या स्नेहसंबंधावर विसंबून आपलें सरकार राहूं शकलें. परंतु सैन्याचें हिंदीकरण करण्याची सुबुद्धि त्याला झाली नाहीं. त्यानंतरच्या वीस बावीस वर्षांत एकसारखी टाळाटाळच चालविल्यामुळें दुसऱ्या महायुध्दाच्यावेळीं तीच बेसावधपणाची, गैरतयारीची व परावलंबित्वाची स्थिति राहिली आहे. आणि आज लक्षावधि अमेरिकन सैन्याचें आणि ज्या ऑस्ट्रेलियांत हिंदी लोकांना प्रवेश मिळत नाहीं त्या ऑस्ट्रेलियांतील सैन्याधिकाऱ्यांची हिंदुस्थानांत आयात करून, कर्ज करून त्यांचें पोषण करावें लागत आहे. या राजकारणी परिणामाची जबाबदारी सर्वस्वी फत्तरहृदयी ब्रिटिश सरकारवरच पडते; त्याच्या धोरणामुळें होतकरू हिंदी सुदृढ तरुणांवर अन्याय होत आहे, नव्हे त्यांचा धडधडीत अपमान होत आहे;' आणि देशाची अपरिमित हानी होत आहे.

१ (ट्वेंटिएथ् सेंचरी'—एप्रिल १९४२, पृ. ३८८.)

## कॅ. मोडकांचे प्रयत्न

सुबुद्ध आणि सुसंस्कृत प्रजेवरील राजकारणी अन्यायाची ही शीगाच होय. या अप्पलपोट्या आणि निलाजरेपणाच्या कारभाराचा देशाच्या आजच्या तरुणांच्या, भावी पिढ्यांच्या आणि एकंदर जनतेच्या हिमतीवर आणि लौकिकावरहि काय परिणाम होतो, याची कदर परकी सरकाराला अर्थातच नाही. तथापि ती आपल्याला ठेवलीच पाहिजे. आणि शक्य त्या उपायांनीं आपल्या तरुणांचा या अवनतीपासून बचाव केला पाहिजे, हें चिरंतन तत्त्व आपल्या पुढाऱ्यांना, शिक्षणतज्ज्ञांना, वृत्तपत्रव्यवसायिकांना आणि सर्वसामान्य सुबुद्ध जनतेला सांगण्यासाठी कै.कॅ.मोडकांनीं आकाशपाताळ एक केलें. त्यांनीं पुढें मांडलेली बाजू हीहि वरील प्रतियोगी व्यावहारिक निर्बंध-पर राजकारणाच्या मामल्याइतकीच महत्त्वाची आहे. ती त्याची दुसरी एक बाजू आहे; तिला आपण तात्त्विक आत्मविकासपर आत्महितनिष्ठ लोककारणाची बाजू असेंहि क्षणभर म्हणूं शकूं. दोन्ही चळवळींचें अंतिम ध्येय एकच आणि सर्व साधनें शेवटीं सर्व सत्ताधीश परकी सरकारच्याच हातीं. तेव्हां मना-सारखें यश दोहोंपैकी कोणत्याहि चळवळीला तें येऊं देणार नाहीत, ही पक्की खात्री ठेवूनच काय तें केलें पाहिजे, याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. परंतु वावदूक आत्मघातकी प्रमाणांच्या पाठीमागे लागून बहुसंख्य लोक आत्म-वंचना करून घेतात, त्यांची समजूत घालून त्यासंबंधीं सर्व क्षेत्रांतील लोक-कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, पुढारी, तरुण लोक आणि विद्यार्थी या सर्वांचें एक-मत बनविणें हें त्यांना इष्ट वाटत होते. लष्करी शिक्षणासारख्या अत्यंत इष्ट फलदाई कार्यक्रमाबद्दल निष्कारण मतभेद माजून त्याचा फायदा 'न कर्त्याचा वार' सर्वत्र पाहणाऱ्या आपल्या प्रतिस्पर्ध्याला होऊं नये याची त्यांना तळमळ लागून राहिली होती. लष्करी शिक्षणाची एकमुखी मागणी करणारी एकप्रकारची राष्ट्रीय अघाडी निर्माण व्हावी म्हणूनच त्यांचे आमरण प्रयत्न चालू होते.

## एक किळसवाणा डाव

खरें म्हटलें तर यासंबंधी दुमत कशासाठि व्हावें? जीवमात्राच्या नैसर्गिक अशा ज्या प्रवृत्ति आहेत त्यांचे योग्यप्रमाणांत व परिस्थितींत विकसन व्हावें याचेंच नांव जर शिक्षण असेल, आणि भरणपोषणादि

गरजांबरोबरच आत्मसंरक्षण हीहि जर जीवनप्रगतीला निरपवादपणें साहाय्यभूत होणारी नैसर्गिक प्रेरणा असेल, तर मग लष्करी शिक्षण आणि तदंगभूत प्राणसंरक्षक आणि प्रतियोगाने प्राणघातक हत्यारांच्याहि उपयोगाचें शिक्षण या गोष्टी अनवश्यक किंवा परिहार्य कशा ठरतील? ज्या गोष्टी इतर सर्व सुधारलेल्या देशांत नित्यक्रमांत बसतात त्या हिंदुस्थानच्या हवेंत निकामी ठरतात काय? परंतु केवळ खालच्या पायऱ्यांवर हिंदी लोकांना डांबून ठेवण्यामध्यें ब्रिटिश राज्यकर्त्यांचा एक किळसवाणा डाव असतो. वरच्या नोकऱ्यांमधील नोकरांचा खास इंग्लंडमधील व परदेशांतील त्या त्या खात्यांशीं संबंध येतो. आणि तुलनेने इंग्लंडांतील लोकांची व बाहेरील जगांतील कर्त्यापुरुषांची तथाकथित श्रेष्ठता कशी पोकळ आहे, याचें प्रत्यक्ष ज्ञान होतें. त्यांचा बाऊ वाटेनासा होतो. स्वतःचा आत्मविश्वास वाढतो. आणि तितक्या प्रमाणांत ज्या इभ्रतीचा डोलारा ( पोकळच! ) उभवून परकी प्रजेला दडपून ठेवण्याचा ते अट्टाहास करीत असतात त्यांतील न्याय्यत्व वितळून जातें. उलटपक्षीं आपल्यांतल्या कर्त्यापुरुषांचा बाहेरील जगाला परिचय होवून आपली इभ्रत व हिंमतहि परदेशीयांना माहीत पडून परसत्तेच्या आवश्यकतेचें समर्थन करतां येणें कठीण जातें. ईस्ट इंडिया कंपनी आपल्या कारकीर्दीत हिंदी लोकांनीं इंग्लंडांत जाऊं नये म्हणून जपत असे. त्याचें कारण म्हणून इंग्रजांना आपल्या देशांतील सर्व व्यवहार ( राज्यसत्तेव्यतिरिक्त ) आणि बहुधा सर्वसामान्यांसारखेंच करतांना पाहिल्यानंतर हिंदी लोकांच्या मनांत अवश्य तो दरारा राहणार नाहीं, असें अधिकाऱ्यांनीं स्पष्ट शब्दांत लिहून कळविलें होतें!

बुद्धिमान् लोकांना सैन्यप्रवेशांत निरनिराळ्या युक्त्या काढून बंदी केल्यामुळें त्या ठिकाणीं जो केवळ देशांतील निर्बुद्ध लोकांचाच भरणा झाला, त्याचा देशांतल्या देशांतहि फार अनिष्ट परिणाम होतो. त्या व्यवसायांत शिरणाऱ्या लोकांचें शिक्षण, दर्जा, कुवत आणि दानत हीं सर्व खरें म्हटलें असतां त्यांच्या वैयक्तिक सामाजिक पायरीप्रमाणें असतात हें सत्य विसरलें जातें. आणि त्यांचें व्यक्तिगत हीनत्व हें व्यत्यासानें त्यांच्या त्या व्यवसायालाच चिकटविलें जातें. आणि राष्ट्रीय प्रपंचांतील देशरक्षणाचा जो मानाचा व्यवसाय त्याबद्दल बहुसंख्याकांच्या मनांत निष्कारण अप्रीति

उत्पन्न होऊन कांहीं झालें तरी आपण तिकडे वळूंच नये, असा एक विघातक भ्रम प्रचलित होतो. सैन्यव्यवसायाबद्दल औदासिन्य उत्पन्न होतें. आणीबाणीच्या वेळीं सैन्यभरतीला पुरेसे लायक उमेदवार मिळत नाहींत. आणि हेंच एक आणखी आपली लष्करी नालायकी शाबीत करण्याला पुरेसें कारण होय, असा उलट प्रचार करणें आपल्या हितशत्रूंना शक्य होतें.

## आणखी कांहीं कारणें

यांमुळे आपल्या तरुणांचें केवळ शिक्षणदृष्ट्या व राजकीय दृष्ट्याच नुकसान झालें आहे असें नसून आर्थिक दृष्ट्याहि भयंकर नुकसान झालेलें आहे. राष्ट्रांतील लाभदायक उद्योगधंदे, यांत्रिक व्यवसाय, उच्च-दर्जाच्या नोकऱ्या आणि व्यापक दृष्टीचा व्यापार यांमध्यें आपल्या लोकांचा प्रवेश होण्याच्या मार्गांत पुष्कळच काटे पसरलेलें दिसतात. या सर्वव्यवसायांतील प्रत्यक्ष अनुभवाचें, व व्यावसायिक ज्ञानाचेंच केवळ नव्हे तर अशा धंद्यांतील होणाऱ्या नोकरीच्या व इतर दृष्टीच्या आर्थिक लाभाचेंहि लोणी सर्वस्वी परक्यांच्या हातालाच लागतें. राष्ट्रांतील वाढत्या बेकारीला आळा बसण्याच्याहि दृष्टीनें देशांतील तरुणांना असल्या व्यवसायांत त्यांच्या हक्काचें त्यांचें स्थान मिळणें अर्थात् आवश्यक आहे.

स्वदेशाच्या राज्यकारभारांतील विविध शाखा सर्वस्वी स्वदेशांतीलच नागरिकांच्या स्वाधीन असावयाला पाहिजेत हा सर्वमान्य सिद्धांत आहे. तो वरीलसारख्या उपयुक्ततावादानें सिद्ध होण्याची कोणाला अपेक्षा असेल असें वाटत नाहीं. आणि तशी कोणी इच्छा प्रगट केली तर आणखीहि निर्विवाद अशीं कितीतरी प्रमाणें सांपडतील. परंतु त्यांची मालिका यापुढें अधिक लांबविण्यांत विशेष स्वारस्य नाहीं. आपल्या स्वतःच्या मनांत त्यासंबंधीं सर्वप्रकारें अत्यंत दृढ आणि अविचल अशा कल्पना बांधून ठेवणें हें मात्र फार आवश्यक आहे.

## अखंड राष्ट्रीय आघाडी

आजच्या परावलंबी परिस्थितींत आपण कांहीं प्रत्यक्ष करूं शकत नाहीं हें देवच बोलला आहे; पण म्हणून त्या बाबतींतील प्रखर एकमुखी

आंकाक्षा मनामनांतून धगधगत ठेवण्याचें महत्कार्य आपण सोडतां कामा नये. हा विचार तीव्रतेने आणि सदैव नजरेसमोर राहिला पाहिजे. आपली अखंड राष्ट्रीय आघाडी–तूर्तच्या परिस्थितींत फक्त विचारैक्याची कां होईना !– आपण बनविली पाहिजे आणि ती खंबीर राखली पाहिजे. आणि तो एकविचार म्हणजे " आपल्या राष्ट्राला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे; आणि त्या स्वातंत्र्याचा एक आवश्यक आणि अविभाज्य घटक म्हणून आपल्याला हिंदुस्थानच्या रक्षणामध्यें निर्णायक मतस्वातंत्र्य मिळालेंच पाहिजे. " देशामधील सैन्याची आमूलाग्र संघटना, नेतृत्व आणि अधिकार हीं केवळ हिंदी नागरिकांच्या, खऱ्याखुऱ्या हिन्दमातेच्या सुपुत्रांच्या–हातांत वागत नाहीं, तोंपर्यंत हें निर्णायक मतस्वातंत्र्य मिळालें असें म्हणतां यावयाचें नाहीं. आणि हें खरोखर लाभावयाचें असेल तर नित्य व्यवहारांत शस्त्र बाळगण्याचें, सैन्यांत दाखल होण्याचे, देशरक्षणांत अधिकारपदप्राप्तींचें, आंतरराष्ट्रीय व्यवहारांत युद्ध–शांतता निर्णयाचें अनिर्बंध स्वातंत्र्य हिंदी लोकांना मिळालें पाहिजे. याबद्दल तात्त्विक आणि व्यावहारिक बाबतींत सर्वत्र एकमत दिसलें पाहिजे. त्यांत कोणाला बोट शिरकविण्याला जागा राहतां कामा नये. जेथपर्यंत केवळ हिंदी लोकांच्या आणि हिंदी बहुसंख्याकांच्या हातांत असेल तोंपर्यंत लष्करी शिक्षण, लष्कर–प्रवेश आणि लष्करी–अधिकार या बाबतींत मतप्रदर्शन, ठराव, योजना आणि शक्य तो प्रत्यक्ष व्यवहार या एका ध्येयानें प्रेरित होऊन झाला पाहिजे. एवढें जरी आपण साधलें तरी प्रस्तुत परिस्थितींत करतां येण्यासारखें होतें ते सर्व केलें असें होईल आणि म्हणूनच विद्यापीठें, कायदेकौन्सिलें, शिक्षणसंस्था, सार्वजनिक संस्था, अधिकारी लेखक आणि तरुणपिढी या सर्वांना आपण स्वतः, आपले देशबांधव व स्वतःचे पाल्य या सर्वांना प्रत्यक्ष प्रतिबंध होत नाहीं त्या मर्यादेपर्यंत या न्याय आकांक्षापूर्तीच्या मार्गावर नेण्यास कसूर करुं नये, एवढेंच कै. कॅप्टन मोडक यांचें म्हणणें होतें. आणि तें आतां बहुतेकांना पटलें असल्यामुळें त्याबद्दल विशेष अधिक विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं.

# विश्वविद्यालयांत युद्धशास्त्राचा प्रवेश

[ लेखक : श्री. न. चिं. केळकर ]

हल्लींच्या महायुद्धांत व २५ वर्षांपूर्वींच्या महायुद्धांत एक मोठा फरक दृष्टीस पडतो. तो असा कीं, त्याहि युद्धाचे वेळीं सैन्यांत हिंदी लोकांची पुष्कळ भरती झाली; पण ती बहुतेक शिपाई, फरास, कूली व इतर हलक्या प्रतीच्या लष्करी पेशाचे लोक यांची. अशा लष्कर भरतीचा जुलूम करावा लागे. कारण लष्करी बाजारबुणगें म्हणून परदेशीं जाऊन आपला जीव धोक्यांत घालण्याचा हिंदी लोकांना तो पहिलाच प्रसंग व अनुभव होता. लष्करांत शिरणाऱ्या लोकांच्या डोळ्यांपुढें उज्वल ध्येय असें कांहीं नव्हतें. आणि लढणाऱ्या सैन्यांतहि आपण अधिकारी नेमले जाऊं अशी कोणास आशा नव्हती. डॉक्टरी खात्यांतील लोकांनाच कायत्या अधिकाराच्या जागा मिळत, व त्याहि थोड्या. हा लष्करी अधिकाऱ्यांच्या जागांचा प्रश्न त्यावेळीं लोकमान्य टिळकांनीं जोरानें पुढें मांडला. अधिकाऱ्यांच्या जागा हिंदी लोकांना न्यायबुद्धीनें द्यायला सरकार तयार असेल तर लष्कर भरतींत सरकारला साहाय्य करायला मी पुढाकार घेण्यास तयार आहें, व

स्वतः माझ्या मुलांनाच लष्करी नोकरींत घालून प्रारंभ करीन, असें टिळकांनीं सांगितलें. परंतु सरकारनें ती गोष्ट मान्य केली नाहीं. उलट दिल्लीस लष्करी प्रश्नांचा विचार करण्याकरितां सरकारी बिनसरकारी अशी मिश्र परिषद बोलावण्यांत आली तेव्हां तिला लो. टिळकांना आमंत्रण केलें नाही. मुंबई येथें भरलेल्या अशाच प्रकारच्या मतप्रचारक सभेंत, ठरीव मुद्यांपलीकडे जाऊन बोलण्याला परवानगी न मिळाल्यामुळें, लो. टिळकांना सभेंतून उठून जावें लागलें.

अगदीं याच्या उलट स्थिति हल्लीं आहे. चालू युद्धांत लष्कर भरतीची मुळींच वाण पडत नाही. भरतीकामगारांना दरमहा हजारो रिक्रूट मिळतात, व तेहि वाटेल त्या खात्याच्या कामाला. पूर्वी लष्कर भरती म्हणजे तें एक हाणामारीचें रडारडीचें प्रकरण होत असे. हल्लीं लोक पोट भरण्याचा हा एक चांगला नवा उद्योग आहे असें मानूनच लष्करांत दाखल होतात. पण याहीपेक्षां हल्लीं एक गोष्ट विशेष घडून आली आहे कीं, लायख तरुण हिंदी उमेदवारांना लष्करी अधिकाऱ्यांच्या जागाहि मिळतात. ह्या जागांत दोन प्रति आहेत. एक बादशाही कमिशन व दुसरें व्हॉइसरॉयचें कमिशन. दोन्ही कमिशनें मिळवून शेंकडों हजारों तरुणांनीं लष्करी पेषा आपखुशीनें पत्करिला आहे. आणि ज्यांना हीं कमिशनें मिळालीं तितकेच आणखी लोक कमिशनांची इच्छा करणारे असूनहि त्यांना तीं मिळालेलीं नाहींत. हल्लींहि हिंदी मनुष्याची लष्करी बढतीची मर्यादा संकुचितच आहे. म्हणजे हिंदी रणवीरांच्या शौर्याचे पोवाडे सरकारी भाट गात असले व व्हिक्टोरिया क्रॉस-सारखे बहुमानाचे बिल्ले व पदकें त्यांना मिळत असलीं, तरी खालच्या पहिल्या दोन म्हणजे लेफ्टनंट व कॅप्टन ह्या पदव्यांपलीकडील उच्च प्रतीच्या पदव्या आजवर किती लोकांना मिळाल्या किंवा पुढें मिळतील हा प्रश्नच आहे. तथापि एकादा विशिष्ट कॉंग्रेससारखा राजकीय पक्ष सोडून दिला तर, अखिल जनतेचें तोंड युद्धाकडे वळलेलें आहे; आणि सरकारला लष्करी मदत करूं नये असें म्हणणारा फारसा कोणी आढळत नाही. याचें एक आणखी विशेष कारण असें आहे कीं, पूर्वीच्या महायुद्धांत प्रत्यक्ष हिंदुस्थानावर परचक्र येण्याचा जो संभव कोणाच्या मनांतहि कधीं आला नाही, तो जपानच्या चढाईमुळें आज प्रत्यक्ष डोळ्यांपुढें उभा राहिला आहे. यामुळें

साम्राज्यसरकाराला साहाय्य करण्यापेक्षांहि आत्मरक्षण करण्याचा हेतु अधिक प्रभावी होत आहे. आणि काँग्रेसनें सरकाराशीं स्वराज्याचे अधिकार मागण्याचा हट्ट धरून प्रतिकूल मोहीम सुरू केली आहे तरी, देशाचें रक्षण करण्याकरितां हातीं शस्त्र धरण्याची आवश्यकता काँग्रेसलाहि मान्य आहे. २५ वर्षांपूर्वी टिळक सरकारला साहाय्य करण्याची अट म्हणून लष्करी अधिकारांच्या जागा मागत होते. आज पंचवीस वर्षांनंतर ती अट प्रत्यक्ष स्वराज्याचे हक्काच्या मागणीपर्यंत चढली आहे. ही गोष्ट काळानें सहज घडून येणारीच आहे. तिला सरकारच्या कृपणपणामुळें व परिस्थितीनें द्रुत गति मिळाली आहे इतकेंच.

पंचवीस वर्षांपूर्वीची हिंदुस्थानांतील युद्धविषयक स्थिति व आजची स्थिति यांतील हा भेद दाखविण्याचें कारण असें कीं, ज्या व्यक्तीसंबंधीं मी हा लेख लिहीत आहें त्याचें वर्णन करण्याला ही पार्श्वभूमि योग्य ठरते. ही व्यक्ति म्हणजे कै. गणपतराव मोडक. कॅप्टन गणपतराव हा एक नमुनेदार लष्करी गडी होता. त्याचें बहिरंग व अंतरंग हीं दोन्ही युद्धरसानें रंगलेलीं होतीं. त्यांची चर्या, त्यांचा पोषाख, व त्यांच्या संवयी ह्या सर्व लष्करी थाटाच्या होत्या. डोक्यावर अकालीं पांढरे झालेले पण सफाईदार विंचरलेले केंस, अंगांत मानेशीं उघडा असलेला शर्ट, त्यावर गुंड्या उघड्या ठेवलेला खाकी कोट, खालीं लष्करी थाटाची विजार, एका हातांत रुपेरी मुठीची छडी, व दुसऱ्या हातांत अखंड पेटलेली सिगारेट अशी ही मूर्ति दिसे. ते इंग्रजी फार सफाईनें बोलत. इतकें कीं, एकाद्या युनिव्हर्सिटीच्या पदवीधराला किंवा त्यांच्या बरोबरीच्या लष्करी अधिकाऱ्याला त्यांच्या ओघवती वाणीचा हेवा वाटावा. त्यांचा जन्म ग्वाल्हेर सरकारच्या लष्करी नोकरींत गेला. तेथें ते कॅप्टनच्या हुद्यापर्यंत चढले होते. तसेंच १९१४ ते १९१६ पर्यंत ते युरोपांत ( फ्रान्सांत ) ग्वालियर दरबारच्या घोडदळी फौजेचे प्रमुख होते व जखमी होऊन परत आले. लष्करी नोकरी सोडण्याच्या वेळेस ते ग्वाल्हेर सरकारच्या लष्करी शिक्षणाच्या शाळेंत युद्धशास्त्राचा इतिहास हा विषय शिकविणारे शिक्षक होते. माझ्या समजुतीप्रमाणें, दिल्ली येथील विधिमंडळाच्या टोंचणीमुळें, हिंदी लोकांचा लष्करी अधिकारी वर्गांत अधिक प्रवेश कसा होईल ह्याचा विचार करण्या-

करितां सरकारनें ' स्कीन कमिटी ' म्हणून एक समीति नेमली होती, तिच्यापुढें कॅप्टन मोडक ह्यांची साक्ष झाली. होती. आणि त्यानंतर वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याशीं मतभेद झाल्यामुळें कॅप्टन मोडक ह्यांना पेन्शनींत निघावें लागलें. तें पेन्शन यथान्याय न मिळाल्यामुळें स्वाभिमानी कॅप्टन मोडक ह्यानीं तें कांहीं दिवस स्वीकारलेंहि नाहीं. संस्थानी लष्करांतच कां होईना पण जितक्या मोठ्यांतल्या मोठ्या हुद्याला चढणें त्यांना शक्य झालें असतें तेथपर्यंत न पोंचतां त्यांना ती नोकरी सोडावी लागली. तथापि लष्करी विषयासंबंधानें त्यांच्या मनांत असलेल्या अनेक कल्पनांचा व मतांचा प्रसार करण्याला त्यांना ग्वाल्हेरची नोकरी सोडल्यानंतरच वाव मिळाला.

पुढचा काळ त्यानीं या विषयाचा ध्यास घेतल्यासारखा विधायक कार्य करण्यांत घालविला. संस्थान सोडून ब्रिटिश हद्दींत आल्यावर त्यांना मनाजोगें क्षेत्र मिळालें. लष्करी नोकरींत असतानाच त्यांनीं युद्धशास्त्रावरील लेखनाला सुरुवात केली होती. तोच व्यासंग त्यानीं पुढें चालू ठेवला. ' प्रतापगडचें युद्ध ' या नांवाच्या पुस्तकांत त्यांनीं एकाद्या युद्धक्षेत्राचा अनेकांगी विचार कसा करावा याचा युरोपियन पद्धतीचा नमुना दाखविला आहे. ह्या पुस्तकानें मराठ्यांच्या इतिहासांतील एका रण प्रसंगाची शास्त्रीय चर्चा वाचकांपुढें आली. त्याचप्रमाणें आणखीहि कांहीं युद्धक्षेत्रांची तपासणी करून त्यानीं पुस्तकें लिहून ठेवलीं आहेत. पण तीं प्रसिद्ध झालीं नाहींत. पुण्यास लष्करी शिक्षणाला उत्तेजन देण्याच्या हेतूनें त्यानीं एक समिति स्थापन केली, व त्याकरतां थोडेंसें द्रव्यसाहाय्यहि मिळविलें. तसेंच पुण्यास बरेच दिवस राहून त्यानीं ' हिंदी लष्करांतील हिंदी लोकांचें स्थान ' ह्या विषयावर एक बराच मोठा ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध केला. विशेषतः सरकारकडे जो प्रयत्न यशस्वी होण्यासारखा नाहीं तो कदाचित् हिंदुस्थानांतील विद्यापीठांकडे केला असतां अधिक परिणामकारक होऊं शकेल, ह्या विचारानें त्यांनीं अनेक विद्यापीठांना चालना दिली. नागपूरच्या विद्यापीठानें त्यांना 'हिंदी लष्करी शास्त्राचा इतिहास' ह्या विषयावर व्याख्यानें देण्यास कांहीं दिवस नेमलें होतें. तसेंच मुंबई, नागपूर, बनारस, पुणें, कोल्हापूर, सांगली इत्यादि ठिकाणच्या कॉलेजांनीं त्यांचीं व्याख्यानें आपल्या विद्यार्थ्यांपुढें

करविलीं. मुंबई विद्यापीठानें त्यांना आपल्यातर्फे व्याख्यानें देण्यास नेमण्याची विनंति केली होती पण ती फुकट गेली. तथापि विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत लष्करी शिक्षण ह्या विषयाला स्थान मिळावें, आणि विद्यापीठांतून शिक्षण घेणाऱ्या तरुण लोकांच्या मनांत लष्करी पेशाची आवड उत्पन्न व्हावी, अशा विषयीं विद्यापीठानें कांहीं उपक्रम करावा हा त्यांचा प्रयत्न किंचित् सफल झाला.

कॅप्टन मोडक ह्यांच्या प्रयत्नामुळें झालें तें असें. १९३१ च्या फेब्रुवारींत कराची दयाराम कॉलेजचे प्रिन्सिपाल सहाणी ह्यानीं सीनेटमध्यें लष्करी शिक्षणाच्या प्रश्नाला चालना दिली. त्यावरून मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांत तो विषय किती कसा घालतां येईल याचा विचार करण्याकरितां एक समिति नेमण्यांत आली त्यांत खालील सभासद होते:—

( १ ) डॉ. घुर्ये ( २ ) प्रि. हॅमिल ( ३ ) प्रो. केशवराव कानिटकर ( ४ ) कॅ. डीन ( ५ ) कॅ. मोडक. कॅ. मोडक हे युनिव्हर्सिटीचे फेलो नसतांनाहि या समितीवर त्यांची नेमणूक झाली ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. पण या समितीनें फारसें काम केलें नाही. कारण मोडक हे समितीचे सभासद असले तरी तिचें चालकत्व त्यांच्या हातीं नव्हतें. म्हणून निराश होऊन त्यांनीं १९३३ च्या फेब्रुवारींत युनिव्हर्सिटीच्या रजिस्टरांकडे तक्रार केली, व लिहिलें कीं, पंजाब व आग्रा ह्या विद्यापीठांनीं लष्करी शिक्षणाचा समावेश आपल्या अभ्यासक्रमांत केल्याला दोन तीन वर्षेंहि झालीं, परंतु मुंबई कांहींच करीत नाहीं ह्याचा अर्थ काय ? त्यावर रजिस्ट्रार कांहीं उत्तर देऊं शकला नाही.

नागपूर विद्यापीठानें १९३० सालीं अशीच एक समिति ह्या विषयाचा विचार करण्याकरतां नेमली होती. त्यांत कर्नल कुकडे, रेव्हरेंड रॉबर्टसन, मिस्टर राजू, व कॅप्टन नाईट असे सभासद होते. त्यांच्या शिफारशीवरून युद्धशास्त्र हा विषय ऐच्छिक म्हणून अभ्यासक्रमांत ठेवला गेला. परंतु खर्चाला पैसे नाहींत म्हणून तो विषय शिकविण्याचीं साधनेहि नाहीत, या सबबीवर शिक्षणाचा प्रत्यक्ष उपक्रम करतां आला नाही. नागपूर विद्या-

पीठाच्या समितीवर कॅ. मोडक ह्यांना नेमलें नव्हतें तरी विद्यापीठातर्फें मोडकांचीं व्याख्यानें करविण्यांत आलीं होतीं.

विद्यापीठानीं लष्करी शिक्षण हा विषय पदवीच्या किंवा एकाद्या डिप्लोम्याच्या अभ्यासक्रमांत घातला नसला तरी ' युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअर ' ह्या नांवाची संस्था हिंदुस्थान सरकारानें कांहीं प्रांतांतून सुरू केली होती. परंतु ह्या संस्थेंत मिळणारें शिक्षण फार थोडें होतें इतकेंच नव्हे तर जितकीं मुलें हें शिक्षण घेण्याला तयार होतीं तितक्यांचाहि समावेश संस्थेंत होण्यासारखा नव्हता. कारण मुलें शिकविण्याला तज्ञ शिक्षक व साधनें लागतात. तीं पुरीं पडण्याइतका खर्च करण्याला सरकार तयार नव्हतें. यासंबंधानें स्वतः मी दिल्ली येथील विधिमंडळांत असतां तक्रार केली होती व तेव्हांहि ती खर्चाची सबबच सांगण्यांत आली होती असें मला स्मरतें. सरकारचें म्हणणें असें कीं, ' टेरिटोरियल फोर्स ' नांवाची एक लष्करी नोकरीची शाखा आम्ही उघडलेली आहे,व युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांनीं वाटल्यास त्या शाखेंत प्रवेश करावा.याचा अर्थ सुशिक्षित अशिक्षित हा भेदच मानला जाऊं नये,व लष्करांत शिरूं इच्छिणाराचा सामाजिक दर्जा लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. पण खुद्द विलायतेंत अशी गोष्ट होत नाही हें लोकांच्या निदर्शनाला आणण्याकरतां कॅ. मोडक ह्यानीं बराच प्रयत्न केला होता.

१९३३ ते १९४० ह्या अवधींत मुंबई विद्यापीठानें लष्करी शिक्षणाचा कांहीं विचार केला होता कीं नाही मला माहित नाही. परंतु १९४० च्या ऑगस्ट महिन्यांत नियामक मंडळानें ह्या गोष्टीला पुन्हा चालना दिली. त्यापूर्वीच्या एप्रिल महिन्यांत सिंडिकेटनें डॉ. वाड ह्यांच्या सूचनेवरून नेमलेल्या समितीनें लष्करी शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची रूपरेखा आंखली. तिचें तात्पर्य असें. 'लष्करी शिक्षणाचा अभ्यासक्रम,परीक्षा व डिप्लोमा ( प्रशस्तिपत्र ) ह्या गोष्टी विद्यापीठानें सुरू कराव्या. हें शिक्षण देण्याकरतां लागणारे शिक्षक सरकारी लष्करी अधिकाऱ्यांकडून मागवावे.यू.टी. सीच्या लष्करी संघांत नसलेल्या अशाहि विद्यार्थ्यांना हें शिक्षण घेतां यावें.' डॉ. वाड, प्रिं. करमरकर व मेजर एव्हरेड ह्यानीं शिक्षणक्रमाचा तपशील ठरवावा. ह्या तपशीलासह पुढील योजना पुढील जुलै महिन्यांत समितीनें मंजूर केली, व ठरविलें कीं, ॲकेडेमिक कौन्सिलनें शिक्षकांचे पगार व एकंदर खर्च ह्याविषयीं विचार

करावा, हें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पूर्व तयारी इंटर किंवा निदान मॅट्रिकपर्यंत झालेली असावी, तसेंच विद्यार्थी यू. टी. सी. संघात नसला तर तत्सम अशा एकाद्या संघांत त्यानें प्राथमिक लष्करी शिक्षण घेतलेलें असावें, शिक्षणक्रम दोन वर्षांचा असावा, प्रत्येक वर्षाच्या अखेरीस एक परीक्षा असावी, लष्करी शिक्षण देणारे अधिकारी लष्करी नोकरींतील पेन्शनर असांवेत, मुख्याध्यापकाचा पगार रु.१५००पर्यंत असावा, व सर्व बाबतींत शक्य तितकी लष्करी खात्याची सहकारिता मिळवावी. ह्या योजनेला पुढें नियामक मंडळाकडूनहि संमति मिळाली. वरील ठरावाप्रमाणें नियम तयार होऊन ते विद्यापीठाच्या नियमावलींत समाविष्ट करण्यांत आले आहेत. अशा रीतीनें यू. टी. सी. च्या योजनेशिवाय ही आणखी एक योजना विद्यापीठानें केली आहे. फरक हा कीं, यु. टी. सी संघाची सर्व व्यवस्था व खर्चहि सरकार करतें. आणि वर दिलेल्या योजनेचा खर्च स्वतः विद्यापीठानें करण्याचा आहे.

पण ह्या दोनहि योजना चालू राहिल्या तरी विद्यापीठांतील विद्यार्थ्यांमधून जितके लष्करी अधिकारी निर्माण व्हावे तितके होणार नाहींत. तसें होण्याला विलायतेंतील ओ.टी.सी.सारखी संस्था अवश्य आहे,असें कॅ. मोडक ह्यांचें म्हणणें होतें. ओ. टी. सी. म्हणजे ' ऑफिसर्स ट्रेनिंग कोअर ' ही संस्था विलायतेंतील एकंदर वीस बावीस विद्यापीठांना जोडलेली असते, व तिचें काम शांततेच्या काळींहि चालू असतें. हल्लीं हिंदुस्थानांत बंगलोर महू वगैरे ठिकाणीं लष्करी अधिकारी तयार करण्याचीं शिक्षणकेंद्रें उघडलेलीं असून त्यांतून भराभर हिंदी लष्करी अधिकारी कमीशनें घेऊन बाहेर पडत आहेत, व ते सर्व ताबडतोब युद्धावर जातीलहि. परंतु उद्यां युद्ध थांबलें म्हणजे हीं केंद्रे बंद होतील. अर्थात् ही सर्व तात्पुरती योजना झाली. युद्ध नसतांहि शांततेच्या काळीं ओ. टी. सी. संस्था जें काम करितें तें वरील शिक्षण केंद्रासारखेंच असतें. मात्र तें सावकाश चालतें. अधिक पद्धतशीर होतें. आणि त्या केंद्रांतून तयार होणारे तरुण अधिकारी शिलकी खात्यांत सांठवून ठेवलेले असतात. कदाचित् अशा राखीव लोकांच्या हयातींत त्यांना युद्धाचा अनुभव मिळणारहि नाहीं. परंतु युद्धें केव्हां निर्माण होतात ह्याचा नेम नसतो. पण आयत्यावेळीं झटपट रंगारी

पद्धतीनें तयार केलेले लष्करी अधिकारी असे तसेच ठरतात. म्हणून प्रत्येक जबाबदार अशा राष्ट्रीय सरकारचें हें कर्तव्यच असतें कीं, लष्करी अधिकारीपणाचें शिक्षण घेतलेले तरुण नेहमी संग्रहीं ठेवावयाचे. स्वतंत्र राष्ट्रांचें हेंच ध्येय असतें कीं आपल्या राष्ट्राचें रक्षण राष्ट्रांतील तरुणांनींच केलें पाहिजे, व हें व्हावयाचें तर प्रत्येक पिढींतील तरुणांना त्यांच्या वयाच्या ठराविक अवधींत लष्करी शिक्षण मिळण्याची व्यवस्था सतत म्हणजे तो एक नित्यक्रम बनून चालू राहिली पाहिजे. अमेरिकेंत ह्या 'शिलकी' खात्यांत दीड दोन लाख अधिकारी तयार असतात. शांततेचा काळ असला तरी मधून मधून त्यांना लष्करी तळावर व छावण्यांतून बोलावण्यांत येतें, व त्यांचें लढाऊ शिक्षण जागृत ठेवण्यांत येतें. प्रतिवर्षी विलायतेंत सुमारें चाळीस हजार तरुण ओ. टी. सी. संघांत शिक्षण घेतात. इंग्लंडांत हा उपक्रम ३०–३५ वर्षांपूर्वींच झाला आहे. पूर्वी ओ. टी. सी. संस्थेऐवजीं 'कॅडेट कोअर' या नांवाचे संघ होते. लष्करी शिक्षणाची सक्तीच असल्यामुळें 'ओ. टी. सी' ही संस्था नेहमीं समृद्ध रहाते. विलायतेंत २२–२३ विद्यापीठें व त्यांत अनेक कॉलेजें असल्यामुळें तरुणांची भरती प्रतिवर्षी नवी नवी होत असते. पण कॉलेजांप्रमाणें शाळांतूनहि ज्यूनिअर ओ. टी. सी. संस्था असतात. अशा शाळा प्रत्यक्ष सरकारी नेमणूक मिळणाऱ्या सुमारें २०० आहेत. विलायतेंत प्रतिवर्षी प्रत्यक्ष खड्या लष्करांत जी सुमारें पांच सहाशें अधिकाऱ्यांची भरती होते त्यांपैकीं शें दीडशें तरी विद्यापिठांच्या वांटणीला येतात. याशिवाय इतर द्वारांनीं म्हणजे 'टेरिटोरियल फोर्स' इत्यादि. परंतु कॅ. मोडक ह्यानीं मुख्यतः जी चळवळ केली, ती विद्यापीठांतील तरुणांना लष्करी शिक्षण मिळण्यासंबंधीं. आणि हें योग्यच आहे. कारण युद्धशास्त्राचें शिक्षण घेण्याला सुशिक्षित तरुणच अधिक लायक असतात. ज्यांना विद्यापीठाचें उच्च शिक्षण मिळालें नाही असे लोक लष्करांत शिपाई म्हणून शिरून पुढें अधिकाऱ्यांच्या जागाहि मिळवितात. नाहीं असें नाहीं. तथापि उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणाची योग्यता अधिकारी होण्याला केव्हांहि अधिक मानली जाणें रीतीचेंच आहे. सुशिक्षित तरुणाच्या मनांत राष्ट्रीय भावना अशिक्षितापेक्षां अधिक असतें असें सामान्यतः म्हणण्यांत चूक नाहीं. शिवाय युद्धशास्त्रांत तात्विक विषयांचा समावेश असल्यामुळें अशा सुशिक्षितांची तयारी पदार्थविज्ञान

भौतिक यांत्रिक इत्यादि विषयांत अधिक झालेली असते. हल्लीं लष्करी सरंजामाच्या व युद्धशास्त्रांच्या शिक्षणांत गणीत, भूगोल, इतिहास हे विशेष रीतीनें येतात.

बादशाही सरकाराविरुद्ध हिंदी लोकांच्या अनेक तक्रारींपैकीं लष्करी खात्या-संबंधानें दोन आहेत त्या अशा:—(१) बादशाही ब्रिटिश फौज हिंदुस्थानांत ठेवणें हें काम भारी खर्चाचें होतें. परक्यांकडून राष्ट्राचें रक्षण करून घ्याव-याचें आणि त्याकरितां स्वतः मात्र मोठ्या खर्चाचें आझें सोसावयाचें हा दुहेरी अन्याय होय. सर्वस्वीं हिंदी राष्ट्रीय फौज आणि तिच्यावर हिंदीच अधिकारी हें राष्ट्रीय ध्येय असतां तें पदरांत पडूं देण्यास सरकार फार दिरं-गाई करीत आहे.(२)आणि दुसरी तक्रार ही कीं,ह्या बाबत स्वतः सरकार-कडून फारच थोडी हालचाल झाली आहे. बादशाही फौजांच्या खर्चाचा कांहीं भाग अलीकडे इंग्लंडांतील ब्रिटिश सरकार सोसूं लागलें आहे.लष्कराच्या हिंदीकरणासंबंधानें पहिली सुरवात १९२६ सालीं म्हणजे अवघ्या सोळा वर्षांपूर्वी झाली. आणि तीहि इतकी कृपणपणाची कीं १९२६ ते १९४६ ह्या वीस वर्षांत अवघ्या आठ हिंदी पलटणींचे अधिकारी हिंदी होणार. त्या नंतर इंडियन मिलिटरी ॲकेडेमी ही संस्था काढण्यांत आली, आणि या पलटणींची संख्या आठांची एकवीस केली तरी त्यानें कांहींच होत नाहीं. हल्लींच्या गतीनें हें हिंदीकरण पुरें पदरांत पडावयाचें म्हणजे कितीतरी वर्षें लागणार. हल्लींच्या युद्धानें हें आयतेंच सिद्ध केलें आहे कीं, 'लष्करी अधि-काऱ्यांचें शिक्षण ही एक भारी अवघड गोष्ट आहे किंवा अधिकाराच्या जागा घेण्याला योग्य तसे व तितके हिंदी तरुण मिळत नाहींत' असें म्हणणें केवळ भ्रमात्मक व स्वार्थीपणाचें आहे. आणि तूर्त तरी सर-सहा कोणत्याहि पलटणींत हिंदी लोकांना सर्वांत खालच्या अधिकाराच्या जागा देण्यांत येतात. पूर्वी ॲकेडेमींत प्रवेश मिळणाऱ्या तरुण विद्यार्थ्याला अडीच वर्षें शिक्षण घ्यावें लागे ती मुदत दीड वर्षावर आणली आहे. लष्करी शिक्षणाचे नवे वर्गहि काढले आहेत. यामुळें प्रति-वर्षीं हजार-अकराशें अधिक हिंदी अधिकारी कमिशन घेण्याला तयार होतात, आणि पूर्वीचें जागा न देण्याचें धोरण बदललें असें पाहून हिंदी तरुणहि भराभर पुढें येऊं लागले आहेत. अमुक जात लष्करी पेशाची

आहे व अमुक नाहीं, हा जो खोटा भेदभाव तो काढून टाकण्यांत येऊं लागला आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें लष्कराचें हिंदीकरण हें फार दूर होतें तें किंचित जवळ येऊं पहात आहे. तथापि युद्ध संपल्यावर ही लहानशी सुधारणा तरी टिकेल किंवा नाहीं कोणाला ठाऊक ? शिवाय ब्रिटिश फौजा हिंदुस्थानांत कायम ठेवण्याचें कारण नाहीं. कायम खडी फौज हिंदी लोकांचीच असली पाहिजे. मग आयत्या वेळीं प्रसंगविशेषी त्याच्या भरीला मदतीला ब्रिटिश फौज घेणें आणणें ही गोष्ट वेगळी.

ह्याला उदाहरण ब्रिटिश वसाहतींचें देतां येईल. ह्या वसाहतींना स्वातंत्र्य देण्याचेवेळीं त्या तरी आत्मरक्षणाला कितपत तयार होत्या ? आणि ह्याच्यापुढें जाऊन असें म्हणतां येतें कीं, आज इंग्लंडला अमेरिकेची मदत नसती तर स्वत: इंग्लंडचें स्वातंत्र्य तरी कसें टिकतें ? आज वसाहती स्वतः सुरक्षित नाहींत हें दिसून आलें, त्याबरोबरच वसाहती अडचण सोसून इंग्लंडला थोडी बहुत तरी मदत करीत आहेत हेंहि सिद्ध झालें. म्हणून हेंच ठरतें कीं, आत्मरक्षणाची पूर्ण तयारी होईपर्यंत राजकीय स्वातंत्र्य देण्यास थांबण्याचें कारण नाहीं. इतर प्रधानांप्रमाणें लष्कर खात्यालाहि हिंदी प्रधानच असला पाहिजे, व तो विधीमंडळाला जबाबदार राहिला पाहिजे, तरच स्वतः हिंदी राष्ट्राची आत्मरक्षण करण्याची तयारी होईल.

या सर्व दृष्टींनीं कॅप्टन मोडक ह्यांनीं एक पुस्तक लिहून या विषयाची व्यापक दृष्टीनें चर्चा केली आहे. देशाचें दुर्दैव हें कीं, कॅप्टन मोडकासारखीं माणसें असतां, त्यांना आपले विचार सरकारावर लादण्यास व सफल करण्यास हल्लींच्या परतंत्र स्थितींत वाव नाहीं. इकडे पाहावें तों हिंदुस्थानाला युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याच्या घोषणा चालू आहेत. पण राजकीय स्वातंत्र्याबरोबर लष्करी स्वातंत्र्य देण्याच्या गोष्टी व त्याविषयींच्या योजना ह्याविषयीं सरकार कांहींच बोलत नाहीं. किंबहुना उद्यां राजकीय स्वातंत्र्याच्या सफलतेची चर्चा सुरू होईल, तेव्हां हिंदुस्थानची लष्करी दुरवस्था हीच राजकीय स्वातंत्र्य देण्याला एक अडचण म्हणून पुढे आणली जाण्याचा संभव आहेच !

कॅप्टन मोडक यांना ग्वाल्हेरची लष्करी नोकरी वरिष्ठांशी मतभेद

झाल्यामुळें सोडावी लागली. कॅ. मोडक यांच्यासारखीं तज्ज्ञ व राष्ट्रभक्ती प्रेरित लष्करी बाण्याचीं माणसें हिंदुस्थानाला जितकी लाभतील तितकी थोडी. कॅप्टन मोडक यांचेजवळ ही देशभक्ति व हा लष्करी बाणा असल्यामुळें त्यांच्याशीं थोडेंतरी सहकार्य घडावे म्हणून त्यांच्या मोठ्या इंग्रजी पुस्तकाला मी प्रस्तावना लिहिली आहे. आणि हल्ली डॉ. पेंडसे हे कॅ. मोडक ह्यांच्या विषयीं जें लहानसें पुस्तक काढीत आहेत त्याकरितां त्याच हेतूनें व त्याच दृष्टीनें कॅ. मोडक ह्यांच्या स्मरणार्थ हा लेख लिहिला आहे.

# देशांतील शक्तीची जोपासना

[ लेखक : डॉ. मो. ना. नातू ]

राष्ट्रांतील भावी पिढीच्या शिक्षणाच्या कार्यक्रमांत शारीरिक शिक्षणाला निश्चित व मानाचें स्थान असावे असा प्रयत्न ज्या अनेक व्यक्तींनीं गेल्या कांहीं वर्षांत केला, त्यामध्यें कै. मोडक यांचे नांवाचा निश्चित समावेश केला पाहिजे. कै. मोडक यांना लहानपणापासून खेळ, शारीरिक शिक्षण यांची आवड असल्यामुळें व ती वाढत जाऊन शौर्य धाडस या गुणांची ज्यांत जास्त वाढ होते त्या सैनिकी शिक्षणाकडे त्यांचें लक्ष वेधलें; व स्वतः सैनिक होऊन लष्करांत नांव नोंदवावें असें त्यांनीं ठरवून त्याप्रमाणें प्रयत्न केला. जेथें प्रबळ व मनापासून इच्छा तेथें मार्ग सांपडतो. या न्यायानें ३५ वर्षांपूर्वीं ज्यावेळीं कै. मोडकासारख्या सुशिक्षित साधारण पांढरपेशा व्यक्तींनीं लष्करांत सैनिक म्हणून शिरावे ही कल्पनाही सामान्य लोकांना कशीशीच वाटली, त्यावेळीं कै. मोडकांनीं ब्रिटिश सैन्यांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. तो अनेक कारणांनीं यशस्वी झाला नाहीं. तेव्हां जेथील लष्कर अनेक वर्षे पहिल्या प्रतीचें म्हणून मानिलेलें त्या ग्वाल्हेर संस्थानच्या लष्करांत ते गेले. व तेथें ३० वर्षें सैन्यांत अगदीं सैनिकाच्या

दर्जापासून वरच्या दर्जापर्यंत सर्व कामें केली. त्यांच्या चरित्रांत याचा विशेष वृत्तान्त आलाच आहे.

हे सर्व लिहिण्याचा उद्देश एवढाच कीं, स्वतःचें आयुष्य अगदीं लष्करी पेशांत व शिस्तींत गेल्यामुळें तेथून बाहेर पडल्यानंतर ज्या अनेक गोष्टी त्यांनीं हातात घेतल्या, त्या सर्वांपासून मिळालेला अनुभव व निष्कर्ष काढून त्यांनीं शारीरिक शिक्षणाविषयीं कांहीं मतें बनविली होती.

स्वदेशाचें संरक्षण करणें हे प्रत्येक देशभक्ताचे कर्तव्य. ही सर्वमान्य गोष्ट कोणत्याही राष्ट्रास लागू आहे. हिंदुस्थानांत मात्र स्वदेशरक्षणार्थ एतद्देशीयांना पुरेसा वाव अगदीं अलीकडेपर्यंत मिळत नव्हता. चालू लढाईमुळें निदान अंशतः या शिक्षणाचा अभ्यासक्रम पुष्कळांच्या आटो-क्यांत आला आहे. कै. मोडक ज्यावेळीं ही इच्छा करीत होते, त्यावेळची स्थिति अत्यंत भिन्न होती. लष्करांत शिरू इच्छिणाऱ्याना पायाभूत म्हणून अनेक तऱ्हेचें पूर्वशिक्षण अवश्यक आहे. त्याकरतां आतां शाळा निघूं लागल्या आहेत. त्यामध्यें केवळ बौद्धिक शिक्षणांवर भर न देतां शारीरिक शिक्षणावरही पुष्कळच भर देणें अवश्य असते, हे आतां मान्य होऊ लागले आहे. कै. मोडकांना हे लोकांना पटवून देतांना कष्ट पडले आहेत, व अनेकांच्या रोषास व निषेधांस तोंड द्यावें लागलें आहे. पाश्चात्य देशांतील अनुभवामुळें त्यांनीं वारंवार म्हटलें आहे कीं, देशांतील तरुण पिढीस एकांगीच केवळ बौद्धिक किंवा केवळ शारीरिक असे शिक्षण न देतां त्यांचा संपूर्ण मिलाफ झाला पाहिजे. व तो सध्याच्या एका शिक्षणयंत्राचा भाग असलेल्या शाळा करत नसतील, तर नवीन शाळा काढल्या पाहिजेत. किंवा शाळांना पूरक म्हणून एक सर्वग्राही कार्यक्रम मुलांपुढें ठेवला पाहिजे व तो प्रत्येकानें पार पाडण्याविषयीं जनतेनें प्रयत्न केला पाहिजे.

आफ्रिकेतील बोअर लढाई पासून धडा शिकलेले तेव्हां ले. ज. व नंतरचे लॉर्ड बेडन पॉवेल यांनीही खुद्द इंग्लिश मुलांपुढें, त्यांच्याकडे सैनिकी शिक्षणाची सोय असूनसुद्धां सर्व साधारण जनतेला लागेल त्यावेळीं 'तयार

रहाण्याचें' शिक्षण मिळावे म्हणून असाच कार्यक्रम ठेवला. तो सर्वमान्य झाला एवढेच नव्हें तर सर्व जगभर त्याचा फैलावही झाला.

राष्ट्राला जगाच्या लढ्यांत मानाचें स्थान पाहिजे असेल, तर राष्ट्राची तरुण पिढी अशी तयार झाली पाहिजे कीं तिला तें स्थान मिळविण्याची, टिकविण्याची महत्त्वाकांक्षा व शक्ति पाहिजे. युरोपमध्यें अशी महत्त्वाकांक्षा व शक्ति राखण्याकरतां इतरांना न बोचणाऱ्या नांवाखालीं अनेक चळवळी चालू असतात. शारीरिक शिक्षणांतील जागतिक चढाओढी, त्यांत राष्ट्राला मिळणारा मान व तो मान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा व त्यांकरितां तयारी, हाही या राष्ट्रीय कार्यांतला एक महत्त्वाचा भाग समजला जातो. व त्याकरतां युरोप अमेरिकेंतील शाळा कॉलेजापासून खेळाडूंची तयारी अत्यंत शास्त्रीय व वाढत्या कार्यक्षमतेच्या पायावर केली जाते.

तेव्हां अनेक तऱ्हेच्या राष्ट्रीय जोपासनेच्या चळवळी व कार्यक्रम याकडे राष्ट्राचें लक्ष वेधून त्यांमधून वर लिहिल्याप्रमाणें महत्त्वाकांक्षा व शक्ति निर्माण करणें हे ध्येय डोळ्यांपुढें ठेवून कै. मोडक यांनीं अनेक उद्योग केलें, व त्या सर्वांमध्यें शारीरिक शिक्षणाला प्राधान्य दिलें.

शारीरिक शिक्षणाच्या कार्यक्रमांतील कांहीं मूलभूत तत्त्वें त्यांनीं ठरविली होती. शरीर कमाविणें. निरोगी राखणें, काटकपणा आणणें, स्नायूची शक्ती वाढविणें, चपळाई, धाडस इत्यादि गुण वाढविणें, स्वसंरक्षणक्षम शरीर व मन तयार करणें अशा गोष्टी तर या कार्यक्रमांपासून निष्पन्न झाल्या पाहिजेतच; परंतु या सर्वांना अत्यंत मूलभूत अशी उच्च राष्ट्रीय वृत्ति, दृष्टि व भावना शारीरिक शिक्षणापासून निर्माण झाली पाहिजेत. जुने शारीरिक शिक्षण व नवें शारीरिक शिक्षण, जुने सैनिकी शिक्षण व नवें सैनिकी शिक्षण यामध्ये सर्व राष्ट्रांमधून हा एक महत्त्वाचा फरक म्हणून मानण्यांत येतो.

युरोप अमेरिकेंत सर्व साधनें, अभ्यासक्रम, खेळ, किंवा इतर कांहींही गोष्टी याच एकमेव उपयोगांत आणतात. सर्वांस मूलग्राही अशी राष्ट्रीय दृष्टि व वृत्ति या कार्यक्रमांत अशी अंतर्भूत करतात कीं, त्यांतून बाहेर पडणारा हा उत्तम इंग्लिश, अमेरिकन वा फ्रेंच खेळाडू झाला पाहिजे. हा खेळाडू जेव्हां जागतिक चढाओढीत भाग घेतो, तेंव्हां पूर्णपणे

आंतरराष्ट्रीय खेळाडू वृत्ति ठेऊन आपल्या राष्ट्राचा मान उच्च राखण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो.

दुसरी गोष्ट अशी कीं, शारीरिक शिक्षण हे आतां केवळ एकांगी-शरीर म्हणजे स्नायू, तयार करणारे शिक्षण राहीले नाहीं. वैयक्तिकरीत्या शरीराची जोपासना करून स्वतःचें स्नायू धष्टपुष्ट करणें, हा नवीन शारीरिक शिक्षणांतील केवळ एकच, अर्थात् महत्त्वाचा भाग ठरत नाहीं. आपल्या देशांत या भागानेंच आजपर्यंत शारीरिक शिक्षण किंवा ज्याला व्यायाम म्हणत, तें ओळखलें जात असे; व त्या दृष्टीनेंच सर्व साधनें, पद्धती वगैरे आखलेली असत. या भागाचें महत्त्व जरी राखले तरी इतर भागांना म्हणजे-'संपूर्ण शरीर' 'शरीर, बुद्धि व मन-' या सर्वांच्या सामुदायिक शिक्षणाला आतां पुष्कळच महत्त्व प्राप्त झालें आहे. किंबहुना स्नायूंची वाढ, बुद्धी व मन यांच्या वाढीला जर आड येईल तर ती तशी न होईल असा कार्यक्रम आंखणें आवश्यक भासूं लागले आहे.

पाश्चात्य देशांमध्यें शारीरिक शिक्षणाची चळवळ फार प्राचीन काळा-पासून एका राष्ट्रांपासून दुसऱ्यामध्यें याप्रमाणें प्रसृत होत गेली आहे, व प्रत्येक राष्ट्रांनीं धकाधकीच्या वेळीं प्रत्येक शतकांत नवीन धडे शिकून तिची जोपासना केली आहे. तिला शास्त्रीय कसोट्या लावल्या आहेत. राष्ट्रीय शिक्षणांत तिला महत्त्वाचें स्थान दिलें आहे. उत्कर्षाची ती एक आवश्यक बाब मानली आहे. प्रत्येक मूल कसे उत्कृष्ट तऱ्हेनें जोपासलें जाईल यांचा कार्यक्रम आंखला आहे,व या सर्वाला 'जाति संरक्षणाचा कार्यक्रम' ( Survival of Race ) 'वैयक्तिक कार्यक्षमतेचीं मोहीम' ( Keep Fit campaign)अशी नांवें देऊन तो जनतेच्या पुढें प्रामुख्यानें मांडून त्यांचें-कडून सहकार्य मिळवून तो पार पाडण्याचा कसोशीचा प्रयत्न केला आहे. गेल्या लढाईचें प्रारंभी जी लढवय्यांची दुःस्थिती राष्ट्रधुरीणांना दिसली, ती नाहींशी करण्याचा प्रयत्न ती लढाई संपल्याबरोबर लगेच सुरू झाला. खुद्द इंग्लंडमध्यें त्याला अत्यंत जोराची चालना मिळाली. अगदी प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांपासून तो सर्वसामान्य नागरिकापर्यंत शारीरिक शिक्षणाचें लोण पोचावें म्हणून ' बोर्ड ऑफ एज्युकेशन' नें अतीशय मेहनत घेतली; कार्यक्रम आंखले, विद्यालयें काढली पुस्तकें तयार केली व हें सर्वांच्या

आटोक्यांत येईल असा प्रयत्न केला. वैयक्तिक बलाच्या उपासनेनें राष्ट्रीय बल प्राप्त होते ही गोष्ट पाश्चात्य राष्ट्रांनीं डोळ्यापुढें ठेऊन तो एक राष्ट्रीय तयारीचा ( National Preparation ) कार्यक्रम म्हणून पार पाडण्याची सर्व दृष्टीनें आखणी केली. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेजे, फॅक्टरी, उद्योगधंदे, नागरिक संस्था अशा अनेक ठिकाणीं शारीरिक शिक्षणास प्राधान्य देण्यांत येऊन, प्रत्येक ठिकाणीं येणारा विद्यार्थी कामकरी नागरिक कोणीही असो, यास कोणत्या ना कोणत्या तरी तऱ्हेनें 'शरीरानें तयार' ( Physically fit ) करण्याच्या योजनेंत सामील केले व अशा तऱ्हेनें प्रगतिपर योजनेचें सहाय्य घेऊन 'राष्ट्रांतील भावी पिढीस राष्ट्राच्या उपयोगाच्या दृष्टीनें कार्यप्रवृत्त करण्याचा प्रयत्न ठेवला, त्याचा परिणाम व कसोटी सध्यां सर्वांस दिसतच आहे.

वरील सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन व आपल्या अनुभवांची त्यांना जोड देऊन कै. मोडक यांनीं शारीरिक शिक्षणाची एक योजना तयार केली. ( Scheme of Physical Training & Citizenship ) शारीरिक शिक्षण व नागरिकत्वाचें शिक्षण या दोहोंचा यांत अंतर्भाव व्हावा अशी त्यांची मनीषा होती. उत्तम नागरिकत्वाच्या मूलभूत तत्वांचें लहान वयांत शिक्षण देऊन पुढें त्यांना आवडणाऱ्या उद्योगांत यांनीं पडल्यावर या शिक्षणाचा प्रत्यक्ष उपयोग आपल्या आयुष्यांत त्यांनीं करावा. शीलसंपन्न नागरिक हे राष्ट्रांचें भूषण आहेत. नागरिकत्वाच्या तत्त्वांचें आचरण करणारें नागरिक ज्या राष्ट्रांत निर्माण होतात, तेच राष्ट्र उदयास येऊं शकते व आपलें वैभव टिकवूं शकते. हिंदी राष्ट्राला आपले जुनें वैभव प्राप्त करून घ्यावयाचें आहे; अशा वेळीं तर अशा नागरिकांची अत्यंत आवश्यकता आहे. अशा अनेक योजना आंखून त्या ध्येयनिष्ठेनें पार पाडणारे कै. मोडक यांचे-सारखे कार्यकर्ते राष्ट्रास आवश्यक आहेत.

कै. मोडक हे योजना आंखून स्वस्थ बसले नाहींत. बेळगांव येथें त्यांनीं त्या योजनेच्या पूर्ततेस प्रारंभही केला.त्यांना त्यांत अनेक तऱ्हेच्या अडचणी आल्या. त्यांतून मार्ग काढून योजनेचा त्यांनीं पाठपुरावा केला. त्यांचेबरोबर त्यावेळीं काम केलेले व शिकलेलें अनेक तरुण सध्यां त्या गोष्टीची आठवण

करूनच आनंद मानीत आहेत. कांहीं दिवसांनीं पुढें ती योजना ते चालवूं शकले नाहींत.

( १ ) शारीरिक व्यायाम. ( २ ) कवाइत. ( ३ ) हवाई बंदुकीच्या सहाय्यानें नेमबाजीचें शिक्षण. ( ४ ) नकाशा काढणें व वाचणें. ( ५ ) संघटना. ( ६ ) सर्वसामान्य ज्ञान ( General Knowledge ) ( ७ ) प्रथमोपचार शिक्षण. ( ८ ) संदेश. ( ९ ) खेळ. ( १० ) मैदानी शर्यती. ( ११ ) भूगोल. ( १२ ) वाटचाली. ( १३ ) निरीक्षण–शक्तीचें शिक्षण. ( १४ ) अंतरें अजमाविणें ( Judging Distances ). ( १५ ) पोहणें. इत्यादि अनेक बाबींचा समावेश त्यांच्या कार्यक्रमांत होता. स्काऊट शिक्षणांतील अनेक बाबींचा यांत समावेश केलेला दिसेल. या सर्व गोष्टी करण्यांत मुलांना शक्य तितके मैदानी शिक्षण मिळावें व वर्गाच्या चार भिंतीतून बाहेर पडून त्यांनीं सर्व शिक्षण उघड्या मैदानांत घ्यावे हा या कार्यक्रमांतील एक मुख्य भाग होता. वरील सर्व बाबींकडे पाहिलें असतां असे आढळून येईल कीं, त्यापैकीं बहुतेक–सर्वच–बाबी सैनिक शिक्षणांत अंतर्भूत केलेल्या आहेत. सैनिक हा उत्तम नागरिक असतो. आधुनिक सैनिकाचा हा बाणा आहे. हुडेलहप्पी शिक्षणांतून पार पडलेला सैनिक हें एक यंत्र असतें. तें आधुनिक काळच्या सैनिक कार्यक्रमांत अपुरें पडते. नागरिकत्वाच्या तत्त्वास अनुरुप असें सैनिक शिक्षण दिलें, तर तें वरील हुडेल-हप्पीपेक्षां अनेक पटीनें राष्ट्रसंवर्धक व अंतीं उपयुक्त होते असे तज्ज्ञांना आढळून आले आहे, व नवीन सैनिक शिक्षणाचें कार्यक्रम या दृष्टीनें आखण्यांत येत आहेत. अर्थात् ज्यावेळीं यंत्रांतून भराभरा माल काढून मागणी पुरी करावयाची असते व माल कसाही असो वापरता आला म्हणजे झाले अशी दृष्टी असते, त्यावेळीं मालाच्या कसोट्या कमी प्रतीच्या असतात व त्याची कार्यक्षमताही तशीच असते.

कै. मोडकांनीं वरील कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषाही आखून तयार केली होती. इंडियन बॉईज् सिटिझनशिप् ट्रेनिंग कोअर ( Indian Boys Citizenship Training Corps ) चा कार्यक्रम चालू होऊन त्यामधून प्रावीण्य मिळविणारांना ( Paper of Honour & Introduction ) मिळत असे. कांहीं वर्षें हें कार्य चाललें असते तर त्याचा अजमाविण्याजोगा

परिणाम दिसू लागला असता. परंतु वर्ष दीडवर्षांच्या आंतच तें थांबले; व पुढें पुन्हां ते सुरूं करण्याची संधीच कै. मोडक यांना मिळू शकली नाहीं. तथापि वर लिहिल्याप्रमाणें त्यामध्यें काम केलेल्या मुलांना अद्यापही तो काळ योग्य शिक्षणांत गेल्याचें व त्यामुळें त्यांच्यावर कांहीं विशिष्ट व उपयुक्त परिणाम झाल्याची व समाधानाची आठवण होत असली पाहिजे.

१९३७ सालीं ज्यावेळीं राष्ट्रीय सरकार सर्व प्रांतांतून प्रस्थापित झालें, त्यावेळीं त्या सरकारनें अनेक राष्ट्रोपयोगी कार्यें करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं मुंबई सरकारनें शारीरिक शिक्षणासंबंधीं योजना करण्याकरतां एक 'शारीरिक शिक्षण समिती' नेमली. त्या समितीमध्ये कै. मोडक हे सदस्य होते. यापूर्वी सरकारनें १९२७ सालीं अशीच एक समिति नेमली होती. तिनें लिहिलेला अहवाल सरकारी कपाटांत धूळ खात पडलाच होता. तेव्हां नवीन समिती नेमून काय होईल अशी साशंक वृत्ती अनेकांची होतीच. तथापि नवीन दृष्टीकोन असेल, तर कांहींतरी होईलही, या दृष्टीनें या समितीनें एक अहवाल तयार केला व त्याचा उपयोग करून सरकारनें शारीरिक शिक्षणांत थोडे लक्ष घातलें व त्या अहवालांतील कांहीं भागाचा प्रत्यक्ष अंमलही केला. तेही सरकार अल्पायुषी ठरलें व जितक्या प्रमाणांत शारीरिक शिक्षण हें महत्त्वाचें ठरेल अशी कल्पना होती ती फलद्रूप होत नाहीं असे आढळून येऊं लागले आहे.

कै. मोडकांनीं या समितीच्या कार्यांत महत्त्वाचा भाग घेतला. शारीरिक शिक्षणांत सैनिक शिक्षणाचा अंतर्भाव करून राष्ट्राभिमानी व शीलसंपन्न तरुण निर्माण करण्यासंबंधीं आपल्या अनुभवाच्या कसोटीवर घासून ठरविलेल्या योजना प्रत्यक्ष अमलांत आणण्याची ही एक अपूर्व संधिच चालून आलेली आहे व तिचा भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे, अशा भावनेनें कै. मोडकांनीं रात्रंदिवस अविश्रांत मेहनत घेतली. सर्व दृष्टींनीं पूर्ण विचार करून तयार केलेली एक विस्तृत योजना त्यांनीं समितीपुढें मांडली. ती योजना म्हणजे एक १०० पानांचें पुस्तकच होईल. त्यांत शारीरिक शिक्षणाचें ध्येय व्यक्तिगत शारीरिक वाढ, येवढे संकुचित न ठेवतां, तें बुद्धीचा विकास व राष्ट्रीयशीलसंवर्धन या दृष्टीनें कसें ठेवणें इष्ट

आहे, हें पाश्चात्य देशांतील भरपूर उदाहरणें घेऊन दाखविलें होते. आपल्या देशांतील पारतंत्र्याची व दारिद्र्याची परिस्थिती लक्षांत घेऊन कोणती साधनें व पद्धती ( Means and Methods ) या देशांत उपयोगांत आणतां येतील याचाही त्यांत विचार होता. या ध्येयाला धरून शिक्षणक्रम, शिक्षणसंस्था त्यांची संघटना, तज्ज्ञ शिक्षक, क्रीडांगणें, वगैरे सर्व गोष्टींचा विस्तृत उहापोह करून शेवटीं या सर्व योजनांचा आर्थिक दृष्ट्याही संपूर्ण विचार पुढें ठेवण्यांत आला होता. परकीय सत्तेखालीं दडपून गेलेल्या व आर्थिक शोषणामुळें दारिद्र्यांत व तदनुषंगिक दुर्गुणांच्या कचाट्यांत सांपडलेल्या देशाला यापेक्षां जास्त काटकसरीची, राष्ट्रीय दृष्ट्या कार्यक्षम अशी योजना निर्माण करणें अशक्य आहे, अशी स्पष्ट सूचनाही त्यांनीं दिली होती. यावरून त्यांचा अभ्यास व अनुभव यावर उभारलेला आत्मविश्वास किती दृढ होता याची सहज कल्पना हेईल. समितीनें आपल्या अहवालांत त्याचा भरपूर उपयोग केलेला दिसून येईल.

वरील समितीच्या कामानंतर कै. मोडक यांची प्रकृतीही बरीच खालावली. त्यामुळें पुढें त्यांना प्रत्यक्ष कांहीं करतां आलें नाहीं. मुंबई सरकारनें समितीच्या अहवालांत अंतर्भूत केलेल्या गोष्टीपैकीं विद्यालय, शिक्षक वर्ग, शारीरिक शिक्षण तपासणी, शारीरिक शिक्षणाकरतां शाळांना ग्रँटस्, इत्यादि गोष्टी अमलांत आणलेल्या कै. मोडकांनीं पाहिल्या. कांदिवली येथील विद्यालयांत ते गेलेही होते. शारीरिक शिक्षणांत त्यांच्या कल्पना अंशःत तरी सरकारनें स्वीकारल्या याबद्दल कांहींसें समाधान समितीच्या सर्व सभासदांप्रमाणें कै. मोडक यांनाही झाले. तथापि अजून पुष्कळच होणें नुसतें आवश्यकच नव्हे, अत्यंत तातडीनें आवश्यक आहे असें त्यांचें मत होतेच.

शारीरिक शिक्षणांमध्यें काम करतांना इतर अनेक संस्थाशीं त्यांचा संबंध आला होता. अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळातर्फे प्रतिवर्षी भरणाऱ्या शारीरिक शिक्षण परिषदेस ते बऱ्याच वेळां उपस्थित रहात व कार्यक्रमांत प्रामुख्यानें भाग घेत असत. मुंबई इलाख्यांतील व अन्यत्रही शारीरिक व सैनिक शिक्षणाबाबत ज्या ज्या गोष्टीं होत असत, त्याकडे त्यांचे सदैव लक्ष असें व त्यापैकीं जेथें त्यांना कांहीं करतां येणें शक्य आहे त्या ठिकाणीं ते

अगत्यपूर्वक जाऊन तें करणें हें आपलें कर्तव्य मानीत. त्यांची या कार्या-विषयीं कळकळ व निष्ठा ही वाखाणण्याजोगी व अनुकरणीय होती. त्याकरतां कांहींही करण्याची त्यांची तयारी होती.

अडचणी, कष्ट, कित्येक प्रसंगीं मानहानि, ही सर्व सोसून, शारीरिक व्याधि व आर्थिक विषमता याना न जुमानतां शारीरिक व सैनिक शिक्षणाचें कार्यांत कै. मोडक यांनीं आपलें आयुष्य खर्चिलें. शील व बल यांनीं युक्त असें स्वसंरक्षणक्षम व वैभवसंपन्न हिंदी राष्ट्र निर्माण करण्याचा शक्य तो प्रयत्न करण्याकरतां ज्या अनेक थोर व्यक्तींनीं आपलें आयुष्य घालविलें व हें कार्य अद्यापही करीत आहेत त्यापैकीं एक कै. मोडक हे महत्त्वाचे कार्यकर्ते. त्यांच्या स्मृतीस प्रणाम करून या ध्येयानें प्रेरित होणारे अनेक कार्यकर्ते हिंदभूमींत निर्माण होवोत एवढीं त्या 'भारतभाग्य विधात्याच्या' चरणापाशीं प्रार्थना करून हा लेख पुरा करतो.

# हिंदी संरक्षणाचा प्रश्न

[ लेखक : प्रो. दि. ह. लिमये, बडोदा ]

## राष्ट्रसंरक्षणाचें ध्येय व साधन

सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें व त्यांतल्यात्यांत हिंदी स्वराज्याच्या चाललेल्या वादामुळें " हिंदी संरक्षण " हा विषय लोकांच्या डोळ्यासमोर वारंवार येऊं लागला आहे. किंबहुना, त्या " हिंदी संरक्षणाच्या " खडकावरच हिंदी राज्यघटनेचें तारू आतांपर्यंत फुटत आलें आहे, व पुढेंही राहील असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

नुकत्याच निष्फळ ठरलेल्या क्रिप्स शिष्टाईतसुद्धां ह्याच संरक्षणाच्या प्रश्नावर मुख्यत्वेंकरून सर्व वाटाघाटी फिसकटल्या ही गोष्ट सर्वश्रुतच आहे.

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत राष्ट्रसंरक्षण हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा समजण्यांत येतो. ह्या अशा अतिमहत्त्वाच्या प्रश्नावर तेथें वादविवाद वगैरे होतात परंतु त्यावर फारसे दुमत अगर पक्षाभिनिवेष दिसून येत नाहीं. राष्ट्र-

संरक्षणाकरतां सैन्य, आरमार, व वैमानिकदल अशा तिन्ही प्रकारांची आवश्यकता असते व हें संरक्षणाचें कार्य चालू राहाण्यास प्रत्येक तरुण नागरिकानें हातभार लाविला पाहिजे, व ह्याकरतां प्रत्येक तरुणानें सैन्य, आरमार अगर वैमानिकदल ह्यापैकीं कोणत्यांतरी एका दलांत सक्तीनें अगर आपखुशीनें नांव नोंदविलें पाहिजे, व जरूर तें शिक्षण घेतले पाहिजे, असा दंडक बहुतेक प्रत्येक देशांत दिसून येतो.

"War is the ultimate resource of policy, and every nation must be ready, in the last instance, to protect its vital interests by force of arms unless it is prepared to forego them to an enemy without a blow."

राष्ट्रीय संरक्षण खात्याची जबाबदारी व धोरण वरील शब्दांत व्यक्त करण्यांत आलें आहे. हे धोरण अमुक एक देशांत अवलंबिलें जात नसून प्रत्येक देशाचें धोरण सर्व साधारणपणें वरीलप्रमाणेंच सांगतां येईल.

१९४१ च्या डिसेंबर महिन्यांत संयुक्त अमेरिकन संस्थानांतील वॉशिंग्टन शहरांत जपान, अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या ज्या वाटाघाटी चालू होत्या; त्यांवर लोकांचें लक्ष लागून राहिलें होतें. जपानचें जें कांहीं मनोरथ होते—त्यांना आपण राष्ट्रीय आकांक्षा म्हणूं हवे तर—ते पूर्ण करण्यास राजकीय अथवा इतर वाटाघाटी ही पहिली पायरी होय.

जपानला आशियाखंडांत जिकडे तिकडे आपले पाय पसरावयाचे होते व त्याकरितां वॉशिंग्टन येथें मित्र राष्ट्रांच्याबरोबर खलबतें करीत असतांना सुद्धां जपान लढाईची तयारी करीत असलेच पाहिजे. वाटाघाटींतून कांहींच निष्पन्न होत नाहीं अगर होणार नाहीं असें पाहून जपाननें एकदम लढाईला सुरुवात केली.

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला संरक्षणाचा प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा

वाटतो; व त्यासाठीं करावयाची तयारी अगर सिद्धता ही कांहीं एकाएकी होणारी गोष्ट नाहीं. एकंदर परिस्थितीचा पूर्ण विचार करून सर्व अनुकूल व प्रतिकूल गोष्टी ध्यानांत ठेवून प्रत्येक राष्ट्र स्वसंरक्षणाचा विचार व तयारी करीत असते. आपल्या हिंदुस्थानांत आतांपर्यंत संरक्षण म्हणजे सैन्य असा भलताच ग्रह होऊन बसला होता. अलीकडील १०–१२ वर्षांच्या अनुभवानें हिंदुस्थान सरकारनें फक्त हिंदी आरमार व हिंदी आकाशदलाची सुरुवात केली आहे. सध्यां तरी निदान हिंद संरक्षणाचा प्रश्न म्हणजेच हिंदी लष्कराचा प्रश्न असें आपल्याला सोईचें असें समीकरण घेऊन आपण ह्यापुढें हिंदी लष्कराकडे वळूं.

हिंदी लष्कराचें खालील मुख्य भाग पाडता येतील. ( १ ) हिंदुस्थानांतील गोरें लष्कर. ( २ ) हिंदी लष्कर, अर्थात् खडें सैन्य. ( ३ ) हिंदी संस्थानी सैन्यें ( Indian State Forces ) ( ४ ) प्रांतिक तत्त्वांवर उभारलेलें सैन्य ( Pioneers ) ( ५ ) यू. टी. संघ ( University Training Corps ) ( ६ ) राखीव सैन्य, ह्या प्रत्येकाचा आतां थोडक्यांत विचार करूं:—

## हिंदुस्थानांतील गोरें लष्कर ( British Forces in India )

हें गोरें लष्कर इंग्लंडमधील सैन्याचा एक भाग होय. साधारणपणें शांततेच्या काळांत अदमासे ६०,००० पर्यंत गोरें लष्कर हिंदुस्थानांत असते. दर तीन वर्षांनीं नवीन लोक येथें येतात. व ह्याप्रमाणें बहुतेक सर्व इंग्रज फौज एकदां तरी ह्या देशांत येऊन जाते. ह्या गोऱ्या लष्कराचा सर्व खर्च, पगार, भत्ता, जाण्यायेण्याचा खर्च, पेन्शन वगैरे गोष्टीवर होणारा खर्च हिंदुस्थान सरकारच्या अधिकाराबाहेरची गोष्ट आहे. इंग्लंडमध्यें वेळोवेळीं जी पगारवाढ अगर भत्त्यांत वाढ होईल त्याप्रमाणें येथील गोऱ्या लष्कराचाही खर्च वाढतो व तो हिंदवासीयांना निमूटपणें सहन करावा लागतो. वास्तविकरितीनें इंग्लंडमधील राहाणी आपल्या राहाणीपेक्षां बरीच खर्चाची आहे, त्यामुळें साहजिकच तिकडे आपल्यापेक्षां जास्त पगार वगैरे असणारच. ही एक गोष्ट जरी सोडली तरी ह्या व्यतिरिक्त ह्या गोऱ्या लष्करासंबंधीं ज्या

तीन कांहीं ठळक गोष्टी चटकन् दृष्टोत्पत्तीस पडतात त्यापैकीं पहिली म्हणजे, ह्या लष्कराची संख्या इंग्रज सरकारनें ठरवावयाची आहे. समजा उद्यां ६०,००० ऐवजी ८०,००० गोरें लष्कर येथें ठेविलें गेलें तर जादा २०,००० लष्कराचा सर्व खर्च हिंदी तिजोरीवर पडणार.

दुसरी गोष्ट म्हणजे, हें गोरें लष्कर हिंदुस्थानांत येते, तें जणूं काय आपल्या हिंदवासीयांवर उपकार करण्याचे हेतूनेंच असल्यानें ह्या लष्करा-बद्दल एक विशेष कर हिंदी तिजोरीवर लादला आहे. त्याला कॅपिटेशन चार्जेस् ( Capitation Charges ) म्हणतात. ज्याप्रमाणें गोऱ्या लष्करां-तील लोकांच्या हिंदुस्थानांतील नोकरीच्या हिस्सेरशीनें त्यांच्या पेन्शनपैकीं कांहीं भाग हिंदी तिजोरीवर पडतो त्याचप्रमाणें ह्या लष्कराच्या तयारी करता प्रथमतः जो खर्च इंग्रज–सरकारला सोसावा लागतो त्याचाही हिस्से-रशीनें होणारा भाग हिंदुस्थानचे डोक्यावर लादला जातो. समजा एक जवान सैन्यात रंगरूट म्हणून दाखल झाला, व त्याला एकंदर लष्करी शिक्षण संपविण्यास रु. २०० एक वर्षास लागले तर हिस्सेरशीनें दर माणशी रु. १० हा खर्च हिंदी तिजोरीस सोसावा लागतो. व उलट इंग्रजांचें म्हणणें असें कीं जर इतकेंच लष्कर हिंदुस्थान सरकारला ठेवणें असते तर त्याचा सुरुवातीचा खर्च ह्या "डोईपट्टी" ( Capitation Charges ) पेक्षां कितीतरी अधिक झाला असता. असो,

ह्या "डोईपट्टी" बद्दल आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे व ती म्हणजे ही डोईपट्टीं कायम ठरविली गेली नाहीं. तींत नेहमीं चढउतार होत असतो. जसजसा खर्च वाढेल तसतसा हा कर वाढतो. सुमारें १०० वर्षांपूर्वीं हा कर दर शिपायामागें ७ पौंड म्हणजे रु. १०० होता. इ. स. १८६० मध्यें ७॥ पौंड प्रमाणें म्हणजे रु.११० केला गेला. १९०७ मध्यें रु. ११० वरून हा कर १५५ रु. पर्यंत वाढला. १९२० च्या एप्रिल महिन्यांपासून हा आकार एकदम ४०० रु. केला आहे. प्रत्येक वेळीं होणारी ही वाढ हिंदुस्थान सरकारनें नाकारून १९२३–२४ सालापासून सरासरी २५ पौंड अथवा रु. ३५० कबूल करण्यांत आले. ६०,००० गोऱ्या शिपायाकरतां दरवर्षीं प्रत्येक सोजीरामागें रु. ३५० उकळ-

णाऱ्या इंग्लंड देशास ह्याप्रमाणें प्रतिवर्षी लक्षावधीं रुपये इकडून पाठवावे लागतात व ह्याचें कारण म्हणजे आपलें पारतंत्र्य !

तिसरी गोष्ट ह्या लष्कराविषयी लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, हें गोरें लोक थंड देशांतून हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशांत आल्यानें त्यांच्याकरतां हिंदुस्थान सरकारला शेंकडो सोयी कराव्या लागतात. उदाहरणार्थ:—समुद्र सपाटीपासून जास्त उंचावर असलेली, मसूरी, डेहराडून, दार्जिलींग वगैरे ठिकाणें ह्या गोऱ्या लष्करासाठीं राखून ठेवणें जरूरीचे असते. तसेच खाणें पिणें व इतर रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या वस्तू येथील स्थानिक शिपायांपेक्षां ह्या लोकांना अधिक लागतात, तेव्हां त्यांची तरतूद करणें. गोरा शिपाई जेवणांत व इतर वेळीं पाणी पीत नाहीं त्याची तृषा फक्त सोडा, लेमन वगैरे पेयांनीच भागते, गोऱ्या शिपायाला हिंदुस्थानांतील थंडीतसुद्धां उकाडा होतो मग उन्हाळ्यांत काय होत असेल ? त्यामुळें बाराही महिने बर्फ, पंखे वगैरेसारख्या सुखसोयींची तरतूद करावी लागते. प्रवासाचें सुद्धां तसेच. हिंदी शिपाई तिसऱ्या वर्गांतून सुद्धां प्रवास करूं शकतो पण गोऱ्या शिपायाला दुसऱ्या अगर पहिल्या वर्गांनेच प्रवास करणें माहीत. अशा एक ना दोन, पण अनेक बाबी दाखवून देता येतील कीं त्यामुळें हें गोरें लष्कर म्हणजे हिंदुस्थानला पोसावा लागणारा एक पांढरा हत्तीच आहे. ह्याचे वर्णन करावे तेवढे थोडेच होईल. ही झाली गोऱ्या लष्कराची गोष्ट. ह्या गोऱ्या लष्करांत शिपाई व अंमलदार सर्वच गोरे असतात. हिंदी लष्करांत बरेच भाग असे आहेत कीं ते नाममात्र हिंदी पण वस्तुतः ९९ टक्के गोरें आहेत. कै. मोडकांनीं आपल्या पुस्तकांत, लष्करी, शारीरिक व आर्थिक अशा सर्व दृष्टीनीं गोरें सैन्य कसें नालायक ठरते हें आंकडें घेऊन सप्रमाण दाखवून दिलें आहे.

हिंदी लष्करापैकीं तोफखाना, दारुगोळा वगैरे शाखा अशा आहेत कीं ज्याची "खाने हम् और लढनेको मेरा भाई" अशी स्थिती आहे. ह्या सर्व भागांत अंमलदार, मुख्य यांत्रिक वगैरे सर्व गोरें लोक. परंतु माल वाहू अगर कामकरी काय ते फक्त हिंदी लोक अशा प्रकारास हिंदी म्हणण्याचें कारण एकच असावें व तें म्हणजे ते सर्व भाग हिंदुस्थानांत आहेत. हिंदी

लष्करांत ज्या अनेक मार्गांनीं गोऱ्या लोकांची वर्णी कायमची लावून ठेविली आहे त्यापैकीं वरील एक भाग होय.

वरील विवेचनावरून एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे कीं, हिंदुस्थानच्या लष्करी खर्चात काट करावयास एक भली मोठी जागा आहे व ती म्हणजे हें गोरें लष्कर. हिंदी लष्कराचें जसजसे निर्भेळ हिंदीकरण होईल तसतसा हा खर्च कमी कमी होत जाईल. ६०,००० गोऱ्या शिपायां-ऐवजी जर हिंदी शिपाई ठेविले तर दरवर्षी कोट्यावधी रुपयांची बचत होईल; परंतु ही गोष्ट लष्कराचा ताबा हिंदी लोकांचें हातांत असेल तरच होणारी आहे.

## हिंदी सैन्य

हिंदी लष्कर अर्थात् हिंदुस्थानांतील खडें सैन्य (Standing army) ह्या विषयीं थोडासा विचार करूं. शांततेच्या काळांत साधारणपणें हिंदी खडे सैन्य सुमारें १॥ लाख असतें. ह्यामध्यें पायदळ व घोडदळ असे दोन भाग आहेत. पायदळ सुमारें १ लाख ते ९० हजार व घोडदळ २५-४० हजार असें असतें. तोफखाना वगैरे हिंदी लष्कराचें बाकीचें भाग नाममात्रच हिंदी आहेत हें मागें सांगितलेच आहे.

ह्या खड्या सैन्यास सर्व साधारणपणें हिंदी सैन्य म्हणतात, परंतु हें नांव फारसे सार्थ नाहीं. ह्या सैन्यामध्यें जी भरती करण्यांत येते ती मुख्यतः कांहीं जातींतील लोकांचीच असते. व त्यांना लढाऊ जाती असें नांव ठेवण्यांत येते.

इ. स. १८५६ पासून १९३० पर्यंत लष्करी भरतीच्या आंकड्यांची जर बारकाईनें छाननी केली तर बऱ्याच गोष्टी उजेडांत येतील.

| | १८५६ | १८५८ | १८८३ | १८९३ | १९०५ | १९११ | १९३० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ( १ ) पंजाब व वायव्य सरहद्द | १०% | ४७% | ४८% | ४३% | ४७% | ४६% | ५८·५% |
| ( २ ) नेपाळ गढवाल | १% | ६% | २७% | २३% | १५% | १४·८% | २२% |
| ( ३ ) वरीलखेरीज उ. हिंदुस्थान | ९०% | ४७% | ३५% | २५% | २२% | २५·६% | २२% |
| ( ४ ) दक्षिण हिंदुस्थान | दुर्लक्षणीय | — | — | — | १८% | १२% | ५·५% |
| ( ५ ) ब्रम्हदेश | शून्य | — | — | — | — | १·७% | ३% |

सुमारें शंभर वर्षांपूर्वी ज्या हिंदी सैन्यांत शेंकडा ९० पेक्षां जास्त लोक रजपूत वगैरे होते त्याच हिंदी सैन्यांतून त्यांची संख्या घटत जाऊन हल्लीं ती केवळ २२./. वर आली आहे. ह्याच्या उलट वायव्य सरहद्द प्रांत, नेपाळ वगैरे सारखे मुलुख व ब्रह्मदेश ह्या भागांतून भरती होणाऱ्या लोकांचें प्रमाण शून्यावरून हल्लीं इतकें वाढतें आहे कीं, जवळजवळ हिंदी सैन्य म्हणजे गुरखे, शीख, पठाण व पंजाबी मुसलमानांचेच, असे जणूं काय समीकरणच होऊन बसलें आहे. अगोदरच चार भय्ये आणि पांच चुली ह्या म्हणीप्रमाणें मतामतांचा गलबला असलेल्या हिंदुस्थानांत जे अनेक पक्षोपपक्ष आहेत त्यांत ह्या सरकार–प्रणीत भेदानें आणखी भरच पडली आहे. ह्याप्रमाणें एका बाजूनें राष्ट्रसभा इत्यादी संस्था सर्व हिंदवासीयांच्या एकीकरणाकरितां खटपट करीत आहेत व सरकार मात्र सैन्यामध्यें इतकें भेद जारी करून ठेवतें कीं ते फारसे निवारतां येणार नाहीत. हे भेद हल्ली सरकारी नोकऱ्यांतही शिरूं लागले आहेत. मुसलमान लोकांकरता १२ जागा, मागासलेल्या लोकांकरता २० जागा, पांढरपेशा परंतु ब्राह्मणेतर अशा लोकांकरता १५ जागा व शिल्लक राहिलेल्या तीन जागा चढाओढीनें भरावयाच्या अशा नित्य अवलोकनांत येणाऱ्या जाहीराती, व त्याही ( पब्लिक सर्व्हिस कमिशन ) सारख्या वजनदार समितीच्या मंजुरीनें प्रसिद्ध झालेल्या पाहिल्या कीं, वाटूं लागते राज्यकारभार चालवितांना बुद्धीपेक्षां सुद्धां जातीची जास्त जरूरी लागते. बाकीच्या सर्व राष्ट्रांकडे नजर फेकल्यास याच्या उलट स्थिती असलेली आपणांस दिसून येईल.

हिंदी सैन्यामध्यें हल्ली कांहीं विशिष्ट लोकांचाच भरणा अधिकाधिक होऊं लागल्यामुळें ह्या सैन्याकडे पाहण्याची हिंदी नागरीकांची दृष्टी जरा साशंकच असते. ज्या सैन्यामध्यें ह्या राष्ट्रांतील निरनिराळ्या घटकांतील लोकांना एकसारखा वाव नाहीं, तें सैन्य राष्ट्रीय म्हणून कोणताच जमंजस मानणार नाही व आत्मियतेच्या भावनेनें त्याकडे पाहाणार नाहीं. म्हणूनच या हिंदी सैन्यास धंदेवाईक किंवा भाडोत्री उघड उघड म्हटले जात आहे.

हिंदी सैन्यांत गुरखे व वायव्य सरहद्दीवरील व पलीकडीलही पठाण जसजसे जास्त भरती करण्यांत येऊं लागले तसतशी हिंदी सैन्याची अवस्था

जास्त जास्तच भाडोत्री होऊं लागली. सर्वांत जास्त विचित्र गोष्ट म्हणजे हिंदी सैन्यांत भरती करतां वाटेल त्या जातीचे लोक न घेता कांहीं विशिष्ट जातीतीलच लोक भरती करण्यांत येऊ लागले. साधारणपणे आजपर्यंतच्या परिस्थितीवरून सरकारला सैन्यामध्ये "साहेब" परब्रम्ह मानणारे, साहेबाचा शब्द वेदवाक्य मानणारे, ज्यांना राष्ट्रीय विचारांचा गंधही नाही अशा लोकांनाच प्राधान्य देण्यांत आले इतकेंच नव्हे तर ह्या व्यतिरिक्त तुरळक येऊं पाहाणाऱ्या पुढारलेल्या जातींतील लोकांस सैन्याचें द्वार बहुतेक बंदच झाले. "सध्याची लढाई आपली–हिंदुस्थानचीही–आहे असे तुम्ही समजा व सरकारास मदत करा" असे नेंहमीं सांगण्यांत येते व ह्याला हिंदी लोकांकडून असे उत्तर देण्यांत आले आहे कीं लष्कराचा ताबा हिंदी लोकांकडे द्या, म्हणजे ही लढाई आम्ही हिंदुस्थानची समजूं." ह्याप्रमाणेच हल्लीचे हिंदुस्थांनी सैन्य पूर्णपणे राष्ट्रीय झाल्यास हिंदुस्थानला हल्लीपेक्षां कितीतरी पटीनें अधिक युद्ध सहाय्य देतां येईल.

सध्यांचें हिंदी सैन्य संपूर्ण राष्ट्रीय करा असे सरकारला सुचविण्यांत दोन गोष्टींकडे पूर्ण लक्ष दिले गेले आहे. पहिली म्हणजे राष्ट्रांतील कोणत्याही भागांतून सैन्यांत भरती केली जावी. व भरती करतांना चढाओढीच्या तत्त्वाचा अवलंब केला तर सध्यांची विषम परिस्थिती थोड्याच काळांत नाहीशी होऊन निरनिराळ्या प्रांतांतील लोक सैन्यांत दाखल झाल्यानें हिंदी लष्कराचा नूर बदलून जाईल.

दुसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय संरक्षण ही कांहीं हल्लींच्या विसाव्या शतकांत तरी केवळ शक्तिवाद्यांची मक्तेदारी राहिली नाहीं. शक्तीबरोबर युक्ती अगर बुद्धीचीही जरूरी सध्यांच्या शास्त्रीय युद्धाच्या जगांत फार आहे. पूर्वी साधारणपणें लष्करांतील शिपाई हा शरिरानें धिप्पाड असा मनुष्य अशी कल्पना होती व वस्तुस्थितीही तशीच होती. सध्याच्या विसाव्या शतकांत लढाईचा रुपरंग यच्चयावत पालटून गेला आहे म्हणून केवळ धिप्पाडपणावर अगर शारिरीक बलावर फारसा भरंवसा ठेवणें योग्य नाही. तेव्हां बदलत्या परिस्थितीनुरुप पूर्वीचे "लढाऊ" व "बिन लढाऊ" असे क्षुद्र भेद बाजूला ठेऊन पूर्णपणें लायकीच्या तत्वावर–सैन्याची भरती ठेवावी

याबाबत एक प्रसिद्ध इंग्रज लष्करी अधिकारी, सर एडवर्ड आयर्नसाईड हे काय लिहितात पहा.

" It is the educated classes or brain which will best stand the strain of war, and the regular Army in Great Briton insists upon a high educational standard."(Page 127, Study of War')

जी गोष्ट इंग्रज लोक स्वतःच्या देशांत राष्ट्रहितकारक म्हणून लागू करून आचरणांत आणतात; तीच गोष्ट हिंदुस्थानांत अहितकारक आहे, असें त्यांना वाटत असल्यास हें एक नवीन आश्चर्यच म्हटलें पाहिजे.

## हिंदी संस्थानी-फौजा

ह्यानंतर आतां आपण हिंदी सैन्याच्या आणखी एका भागाकडे दृष्टी वळवूं. हा भाग म्हणजे हिंदी संस्थानांतील सैन्य (Indian State Forces)

आपल्या हिंदुस्थान देशांत लहानमोठी एकंदर ७५० संस्थानें आहेत. त्यापैकीं मोठमोठ्या संस्थानांत पहिल्यापासून संस्थानी सैन्ये होतीं व आहेत. गेल्या महायुद्धांत साम्राज्यसरकारला मदत करणाच्या उच्च हेतूनें ह्या संस्थानांनीं आपआपलीं सर्व सैन्यें साम्राज्यसरकारच्या हवाली केली. गेल्या महायुद्धानंतर ह्या निरनिराळ्या संस्थानांतील सैन्यांची पुनर्घटना करण्यांत येऊन त्यांचा हिंदी सैन्याचा एक स्वतंत्र विभाग पाडण्यांत येऊन त्याला हिंदी संस्थानी सैन्यें असें व्यापक नांव देण्यांत आलें. हिंदी सैन्यांत सार्वत्रिक भरती करण्याच्याविरुद्ध जें अविश्वासाचें धोरण सरकार आजपर्यंत अंमलात आणीत आहे, त्याचप्रमाणें ह्या संस्थानी फौजांच्या बाबतीतही आहेच, ह्या प्रश्नाचा थोडासा पूर्वेतिहास पाहिल्यास १८५७ सालापासून सरकारचें सर्व प्रयत्न या संस्थानी फौजा कायमच्या नाहींशा कराव्या, अगर त्यांची संख्या शक्य तितकी कमी ठेवावी ह्याबद्दल चालू होते. गेल्या ७०–८० वर्षांत ज्या निरनिराळ्या समित्या हिंदी लष्कराच्या पुनर्घटनेकरतां सरकारनें नेमल्या त्या प्रत्येक समितीनें व त्या समितीपुढें साक्ष देण्यास आलेल्या इंग्रज अधिकारी अगर बिन्अधिकारी लोकांचा डोळा ह्या संस्थानीं फौजेवर

विशेष होता असे स्पष्ट दिसून येते. केवळ ह्याचमुळें गेल्या महायुद्धाच्या सुरवातीस ह्या संस्थांनी सैन्याची स्थितीं फारच निराशाजनक होती. त्यांचें लष्करी शिक्षण फारच नित्कृष्ट प्रतिचे होते तेव्हां अशा सैन्यास लढाईवर पाठवण्यापूर्वी त्यांच्यात बऱ्याच सुधारणा कराव्या लागल्या; ह्या सर्व अनुभवानें सरकारनें जागे होऊन ह्या सर्व संस्थानी फौजेची पुर्नघटना केली. हल्ली ह्या फौजेचें मुख्य तीन भाग आहेत—( १ ) हा भाग हिंदी लष्कराच्या तोडीचा आहे. परंतु त्याबरोबरच त्यांची संख्या फार मर्यादीत आहे एकंदर ४०–५० हजार संस्थानी फौजेपैकीं सुमारे ८ हजार फौजच पहिल्या प्रतिची आहे. ह्या फौजेचें शिक्षण, हत्यारें, दारूगोळा, पोषाख वगैरे सर्व हिंदी सैन्याबरहुकूम आहे. ह्या सैन्याची वेळोवेळीं हिंदी लष्करी अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाते.

( २ ) **दुसरा वर्ग**—ह्या फौजा थोड्याशा जादा शिक्षणानें थोड्याच दिवसांत पहिल्या वर्गाच्या तोडीच्या करतां येण्यासारख्या आहेत. ह्यांची संख्या १५ ते २० हजारापर्यंत आहे. त्यांची देखरेख पहिल्या वर्गाप्रमाणेंच हिंदी लष्करी अधिकाऱ्यांकडून केली जाते.

( ३ ) **तिसरा वर्ग**—ह्या वर्गातील फौज बरीच मोठी म्हणजे सुमारें २५ ते ३० हजारापर्यंत आहे.

ह्या वर सांगितलेल्या तीन वर्गाव्यतिरिक्त कांहीं कांहीं संस्थानांत संस्थानिकांच्या स्वयंपूर्ण अंमलाखालील कांहीं कवायती फौज ( State Army ) आहे. संस्थानिकांचे शरीररक्षक वगैरे कामाकरितां कांहीं फौज निराळी आहेच, परंतु आधुनिक शस्त्रास्त्रांच्या अभावी अशा फौजेची फारशी दखलगिरी घेण्याचें कारण नाहीं.

या संस्थानीं सैन्यांविषयीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती म्हणजे ह्या फौजेची आवश्यकता ही होय. ज्याप्रमाणें हिंदी लष्कराचा उपयोग परकीय आक्रमणाला व देशांतील बंडाळी मोडण्याकडे केला जातो, त्याप्रमाणें संस्थानी फौज संस्थानिकांचें संरक्षण व साम्राज्यसरकारला मदत. अशा दोन्ही तऱ्हेनी उपयोगी पडते. संस्थानिकांचे पूर्वीपासून असे म्हणणें आहे कीं, लॉर्ड वेलस्लीनें जे तह ( Subsidiary Alliances ) घडवून

आणले, त्या तहनाम्याप्रमाणें संस्थानिकांची सुरक्षितता इंग्रज सरकारनें आपल्या शिरावर घेतली असल्यानें संस्थानिकांनीं सैन्य ठेवणें अगर न ठेवणें ही त्यांच्या इच्छेची गोष्ट आहे. पूर्वीच्या तहनाम्याप्रमाणें प्रत्येक संस्थानचें रक्षण करण्याकरतां सरकारनें जरूर लागणारें सैन्य ठेवावयाचें व त्याला लागणाऱ्या खर्चाकरता संस्थानिकांनीं मुलूख तोडून द्यावयाचा, व असा वेगवेगळा मुलूख प्रत्येकाकडून पूर्वीच घेतला गेला असून, शिवाय पुन्हा संस्थानिकांनीं फौज ठेवणें म्हणजे त्यांच्यावर विनाकारण खर्चाचा बोजाच लादणें होय. परंतु संस्थानिकांच्या स्वतःच्या इभ्रतीकरतां व साम्राज्य सरकारला मदत करण्याकरतां म्हणून संस्थानिक ही फौज ठेवतात. ह्या संस्थानी फौजांचा खर्च हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें संस्थानिक करतात. ह्या फौजेवर सर्व सत्ता हिंदी सरकारची असते व संस्थानिक मात्र ह्याच्या खर्चाचा भार वाहतात.

प्रांतिक तत्वावर उभारला गेलेला सैन्यविभाग (Pioneer forces) पाहतां, हा नवीन प्रघात गेल्या महायुद्धसमाप्तीनंतरच पाडला जात असल्याचे दिसते. इंग्लंडमध्यें अगर इतर स्वतंत्र देशांत राष्ट्रीय सैन्यांमध्यें शक्यतितका एकोपा टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. हिंदुस्थानांत मात्र ह्या देशाच्या अगडबंब विस्तारामुळें ही एकी घडून येणें अशक्य आहे अशी खोटी समजूत करूनच सरकार ह्या सैन्यांत शक्य तितकी कमी एकी होईल अशाबद्दल दक्ष राहिलेले दिसते ! असे नसतें तर मराठी पलटण म्हणून जिला नांव आहे. अशा पलटणींत २५% मराठे व ७५% इतर रजपूत, शीख पठाण वगैरे आलेच नसते. ही परिस्थिती अंशतः दूर करण्याकरतां युद्धोत्तर काळांत नेमल्या गेलेल्या समितीच्या शिफारशीप्रमाणें ही प्रांतिक दलें स्थापिली गेली. सरकारी प्रवृत्ति मात्र ह्या नवीन सुधारणा फलद्रुप करण्याच्या आड आल्यामुळें ह्या प्रांतिक दलाची फारशी प्रगती झाली नाहीं. हे प्रादेशिक दल संस्थानी फौजांच्या तिसऱ्या दलाच्या दर्जाचे असल्यामुळें त्याबद्दल फारशी उत्सुकताही क्वचितच आढळते.

जी गोष्ट या प्रांतिक अगर प्रादेशीक दलाची तीच गोष्ट विश्वविद्यालयीन दलाची (University Training Corps) ची आहे. आपल्या मुंबई युनिव्हर्सिटींत दरवर्षी ३०–३५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचें

दिसून येते. ह्या ३०–३५ हजार विद्यार्थ्यांच्या लष्करी शिक्षणाची सोय सरकारनें फक्त एक बटॅलियन ( म्हणजे सुमारें ८०० लोक ) स्थापन करून केली आहे. ३०–३५ हजार विद्यार्थी असलेल्या मुंबई विश्वविद्यालयाला ह्यापेक्षां जास्त सढळ सवलती दिल्या तर एकट्या विश्वविद्यालयाची एक स्वयंपूर्ण सेना सहज तयार होईल. अगदी थोड्या दिवसांपूर्वी विद्यालयाच्या सिनेटनें सरकारला आणखी एक बॅटलियन तिर्माण करण्याबद्दल विनंती केली होती, परंतु कांहीं तरी कारण काढून सरकारनें ही मागणी फेंटाळून लाविली सरकारी धोरण व कृती लोकमताशीं किती विरोधी असतात ह्याचा हा एक नमुना आहे.एका इंग्रजी म्हणीप्रमाणें इच्छा असेल तर मार्ग सांपडेल; जर इच्छाच नसेल तर मार्ग तरी कसा सांपडणार? हल्ली यू. टी. सी. ची दोन बॅटलियनस् आहेत असे दिसलें, तरी संघटनेंतच केलेल्या फेरफारामुळें एकंदर संख्येंत कांहीं फारशी प्रगति झाली नाही हें लक्षांत घेण्यासारखे आहे.शिवाय यू. टी. सींत पायदळाशिवाय सैन्याच्या तोफखाना, टॅंक,वगैरे इतर अंगाचा समावेश अजूनही करण्याची सुबुद्धी सरकारास होत नाहीं.

विश्वविद्यालय म्हणजे कांहीं एकच प्रकारचें शिक्षण देणारी संस्था नाहीं. त्यांत वैद्यकीय, शेतकी, औद्योगिक वगैरेसारख्या अनेक शाखा आहेत. अर्थात् प्रत्येक विश्वविद्यालयाला एक बटॅलियन् देण्याऐवजी लष्कराच्या पायदळ, घोडदळ, तोफखाना मेडिकल, एंजीनियअर्स वगैरे सारखी निरनिराळी पथकें दिली तर प्रत्येक विश्वविद्यालयाची एक लहानशी सेनाच ( Army ) तयार होईल, व त्याप्रमाणें मुख्य सैन्य व त्याहीपेक्षां राखीव सैन्य ह्यांतही ह्याचा पूर्ण उपयोग करून घेता येईल. यावरून परत सरकारी इच्छेचा अभावच सिद्ध होत नाही काय ? सरकारला ह्या गोष्टी सुचत नाहीत असें नाहीं. परंतु मनांतून त्यांना अशा गोष्टी रुचल्या पाहिजेत ना ?

आतां राहतां राहिलें राखीव सैन्य. ह्या राखीव सैन्याचा इतिहास मोठा विचित्रच आहे. गेल्या महायुद्ध–समाप्तिपर्यंत ह्या राखीव सैन्यांत बहुतेक पेन्शनर लोकच होते. म्हणजे राखीव सैन्याच्या मूलभूत तत्वाविरुद्धच गोष्ट. मग केवळ लोकांची दिशाभूल करण्याकरतांच हा भाग ठेवण्यांत आला होता काय ? ह्या राखीव दलाचा बुडबुडा गेल्या महायुद्धाच्या अखेरीस

मेसोपोटेमियन लढाईत फुटला गेल्यावर, हिंदी राखीव सैन्यावर इंग्लंडमध्यें फार निर्भिड टीका केली गेली. शेवटीं मेसॉपोटेमियन कमिशननें चौकशी करून हिंदुस्थान सरकारास कानपिचक्या दिल्यावर मग ह्या राखीव सैन्याबाबतचें धोरण बदललें गेलें, सध्यां अस्तित्वांत असलेल्या नियमांप्रमाणें हिंदी लष्करांत भरती झालेला शिपायी फार तर १०–१२ वर्षें खड्या सैन्यांत राहतो व शेवटचा काळ त्याला राखीव सैन्यांत काढावा लागतो. ही सुधारणाही फारशी हितावह नाहीं, परंतु पहिल्यापेक्षां बरी असे म्हणणें भाग आहे.

येथपर्यंत आपण हिंदी लष्कराच्या अंगोपांगांचा विचार केला. आतां ह्या जगड्व्याळ प्रश्नाला चालना कशी द्यावी व शेवटीं हल्लीच्या सैन्याची पुनर्घटना पूर्ण राष्ट्रीय तत्वावर कशी करावी ह्याबद्दल थोडासा विचार करूं.

प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आपल्या देशांत दारिद्य अतिशय असल्यामुळें आपल्याला आपली कुवत पाहुनच पाय पसरावे लागतील. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान वगैरे सारखे, हिंदुस्थानशी तुलना करतां चिमुकले ठरणारे देश कोट्यावधी रुपये राष्ट्रीय संरक्षणाच्या खातीं खर्च करतात म्हणून हिंदुस्थाननेही मागला पुढला कांहींच विचार न करतां, त्याप्रमाणेंच केलें पाहिजे असें म्हणता येणार नाहीं.

हिंदुस्थान सरकारच्या अंदाजपत्रकांत साधारणपणें १३० कोटी जमा दरवर्षी दिसते. इतर देशांची अंदाजपत्रकें पाहून आपणांस असे दिसून येईल कीं, त्यापैकीं प्रत्येक राष्ट्र आपल्या एकंदर वार्षिक उत्पन्नापैकीं जास्तीत जास्त म्हणजे शेंकडा २० टक्के भाग राष्ट्रीय संरक्षणाच्या कामीं खर्च करते. १३० कोटी रुपयांचे २० टक्केप्रमाणें म्हणजे अदमासे ३० कोटी रुपये होतात. तेव्हां हिंदी संरक्षणाच्या कामी ३० कोटीपेक्षां जास्त खर्च शक्यतों होता कामा नये. आपण मागें पाहिलेच कीं, राष्ट्र संरक्षण म्हणजे नुसते लष्कर नव्हे. तर आरमार, विमानदल वगैरेचाही राष्ट्रसंरक्षणांमध्यें अंतर्भाव होतो. कांहीं स्वतंत्र प्रमुख राष्ट्रांची अंदाज–पत्रकें पाहतां असे दिसून येईल कीं, सर्व साधारणपणें राष्ट्रसंरक्षणाच्या खात्यावर होणाऱ्या खर्चाचा ४० टक्के लष्करावर, ३० टक्के विमानदलावर व राहिलेला ३० टक्के आरमारावर खर्च केला जातो. अर्थात् ह्या प्रमाणें टक्केवारी केव्हांही

कायम असणें शक्य नाहीं. एकंदर परिस्थितीची पूर्ण माहीती मिळवून मगच प्रत्येक राष्ट्राला आपलें स्वतःचे राष्ट्रसंरक्षणाचें कार्य पार पाडावयाचें असतें व त्यासाठीं लागणारा कमी जास्त खर्च तें तें राष्ट्र फारशी तक्रार न करतां सोसते. हिंदुस्थानची परिस्थिती लक्षांत घेतां सुमारें वार्षिक १३० कोटी रुपयांपैकीं २०% म्हणजे ३० कोटी रुपये एकंदर राष्ट्र संरक्षण खात्यावर म्हणजे आरमार, लष्कर व विमानदल ह्या तिन्हीवर खर्च करणें रास्त होईल, व ह्या ३० कोटी रुपयांचा ४० टक्के म्हणजे फक्त १२ कोट रुपयेच लष्करावर खर्च करणें शक्य आहे. मग सध्या केवळ लष्करावर होणारा बेसुमार खर्च, शक्यतितका कमी करून उरलेल्या पैशांवर आरमार व वैमानिक दळ ह्यांचीही वाढ होईल.

हल्लींचें महायुद्ध सुरुं होण्यापूर्वी हिंदी संरक्षण खात्याचा खर्च सुमारें ५० कोटी रुपये होता. ह्या ५० कोटी रुपयांपैकीं, निव्वळ लष्करी खर्चच जवळ जवळ ४० कोटी रुपये होता. ह्या चाळीस कोटी रुपयांचा खर्च १२ कोटींवर आणून ठेवणें म्हणजे हास्यास्पद गोष्टच आहे, असा पुष्कळ लोकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिती जितकी दिसते तितकी हास्यास्पद खास नाहीं.

पहिल्यानें नुसत्या गोऱ्या लष्कराचाच विचार केला तर आपल्यास असे दिसून येईल कीं, ह्या गोऱ्या लष्कराप्रीत्यर्थ त्यांचा पगार, भत्ता, वार्षिक कर,, रजेवरील लोकांचे पगार, पेन्शनीचे हिस्से वगैरेकरतां जवळ जवळ १२ कोटी रुपये पाठवावे लागतात. ह्या १२ कोटी खेरीज गोऱ्या सोजीरांच्या येथील खर्चाचा आंकडा आणखी १२।१५ कोटीपर्यंत सहज जाईल. ह्या खेरीज ह्या गोऱ्या सोजीरांच्या निरनिराळ्या सुखसोयीसाठीं केला जाणारा खर्च वगैरे गोष्टी लक्षांत घेतां हें गोरें लष्कर जसजसे कमी होत जाईल तसतसे खर्चाचें मान कमी होईल, हे कोणासही कबूल करावे लागेल. ह्याप्रमाणें हळू हळू ही संख्या कमी कमी करीत आणखी १० वर्षांनीं गोरें लष्कर पूर्णपणें कमी करतां आलें तर ताबडतोब २०।२५ कोटी रुपयांची बचत सहज होईल, व गोऱ्या सोजीरांच्या कितीतरी पट अधिक हिंदी लष्कर हिंदुस्थानांत उभारता येईल. हल्ली गोऱ्या लोकांस मिळणारा

भरमसाट पगार व भत्ता कमी केला तर खर्चांत कितीतरी बचत होऊन विमानदल व आरमार वाढविण्यास सुलभ जाईल.

गोऱ्या लष्करामुळेंच हिंदुस्थानांत शांतता व सुव्यवस्था आहे असें इंग्रजांचें म्हणणें आहे; नाहींतर येथें अराजकता माजेल. त्यांचे हें म्हणणें वस्तुस्थितीचा किती विपर्यास करणारें आहे, ते येथें चर्चिण्याची जरूरी नाहीं. त्यांचे हें म्हणणे क्षणभर गृहित धरले तरी मुख्य प्रश्न आपल्या पुढें उभा राहातो तो असा कीं, जरी ह्या गोऱ्या लष्करामुळें हिंदुस्थानांत शांतता नांदत असली,तरी ही शांतता टिकविण्यास गोऱ्या लष्कराचा सध्याचा खर्च ही फारच बेसुमार किंमत आहे. कल्पना करूं, आपल्या घराचें संरक्षण करण्यास एक भय्या अगर गुरखा ठेविला, व उद्यां हाच गुरखा जर एक पांढरा हत्ती होऊन बसला, तर त्या गुरख्याचे पायी इतका खर्च करून घरांत वित्त किती शिल्लक राहील? तेव्हां साधारणपणें त्या गुरख्याइतकाच कार्यक्षम परंतु कोणीतरी कमी खर्चाचा रक्षक कामावर ठेवणें जास्त श्रेयस्कर होय. हीच स्थिति येथील गोऱ्या लष्कराची आहे. ऐतिहासिक दाखले, निरनिराळ्या लढाया व मोठमोठ्या लष्करी अधिकाऱ्यांच्या लिखाणावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते कीं, आपले हिंदी शिपाई कोणत्याहि प्रकारें गोऱ्या लष्करापेक्षां कमी प्रतीचे नाहींत. तेव्हां गोऱ्या लष्कराऐवजीं हिंदी लष्कर ठेवल्यासहि शांतता राहीलच व खर्चहि कमी होईल.

ही नुसत्या सैन्याची गोष्ट झाली. ह्याप्रमाणें तोफखाना, सिग्नलर्स वगैरे उपांगांचेहि जसजसे हिंदीकरण होईल तसतशी खर्चांत बचत होईल.

आतां राहतां राहिला हिंदी लष्कराच्या हिंदीकरणाचा प्रश्न. लष्कराचें हिंदीकरण म्हणजे शिपाई व अंमलदार या दोहोंचें हिंदीकरण होय. प्रथमतः आपण पाहिलें कीं, सध्यांच्या हिंदी लष्करांत शेंकडा ५० टक्के अगर जास्त हिंदीतर शिपाई आहेत. हिंदुस्थानचें संरक्षण करण्यास हिंदुस्थानच्या बाहेरील लोक सैन्यांत भरती केले जातात परंतु फारच थोडे लोक ह्या देशांतील असतात.

मनुष्यप्राणी हा जन्मतःच लढवय्या असतो. दुसऱ्यानें आगळीक केली असतां त्याचा प्रतिकार न करणारे फारच थोडे आढळतात. उलट प्रतिकार, मग तो कोणत्याहि तऱ्हेनें कां होईना, करणारेच पुष्कळ सांपडतात.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लढाऊ व बिनलढाऊ, हे जें सरकारप्रणीत दोन भाग पाडले गेले आहेत, ते चुकीचेच आहेत.

लष्करांतील ·शिपायांच्या हिंदीकरणाइतकीच जरूरीची दुसरी एक महत्त्वाची गोष्ट आहे व ती म्हणजे लष्करी अधिकाऱ्यांचे हिंदीकरण ही होय. प्रत्येक राष्ट्रीय सैन्याची मदार सैन्याधिकाऱ्यावर आहे. हिंदी सैन्यांतील शेंकडा ९० पेक्षां जास्त अधिकारी युरोपियनच आहेत. हिंदी सैन्यांतील अधिकाऱ्याची जागा कोणत्याहि गोऱ्या माणसास मिळणें जितकें सुलभ आहे, तितकीच ती हिंदी माणसास मिळणें अवघड आहे. गेल्या महायुद्धापर्यंत हिंदी लष्करांत एकाही हिंदी मनुष्यास बादशाही कमिशन देण्यांत आलें नव्हतें. पण महायुद्धाच्या समाप्तिनंतर थोड्याजणांस हें कमिशन देऊन त्यांनीं किंचितशी सुधारणा केली.

महायुद्धामध्यें हिंदुस्थाननें केलेली बहुमोल मदत जाणून सरकारनें लष्करांतील आधिकाऱ्यांच्या हिंदीकरणाचा प्रश्न हातीं घेतला. पण ह्या बाबतींतील सरकारची उदारता इतकी कोती कीं, त्यामुळें देशभर असमाधान उत्पन्न झाले; व ह्यातूनच स्कीन कमिटीची स्थापना झाली. ह्या कमिटीनें हिंदीकरणांत पुष्कळच सुधारणा सुचविल्या, पण सरकार दरबारी मात्र ह्या कमिटीचा रिपोर्ट गुंडाळून ठेवण्यांत आला. ह्यानंतर लवकरच हिंदुस्थानांत लष्करी अधिकारी तयार करण्याकरतां एक कॉलेज् स्थापन करण्यांत आले. ह्या कॉलेजमध्यें दरवर्षी घेण्यांत येणाऱ्या विद्यार्थ्यांचीं संख्या तर मर्यादित करण्यांत आलीच, परंतु ह्या मर्यादित संख्येमध्येंसुद्धां संस्थानी सैन्यांतील अधिकाऱ्यांकरता खास जागा व हिंदी लष्करांतील होतकरू विद्यार्थ्यांच्याकरता निम्या जागा देण्याचें कायम करून सरकारनें लष्करी कॉलेजच्या तत्वांचा खून केला. स्थलाभावी ह्या विषयावर फारसे लिहीतां येणार नाहीं.

ज्या सैन्यांतील अधिकारी अधिक तल्लख बुद्धीचे व सुशिक्षित असतील त्या सैन्याचा नंबर वर लागतो, म्हणून पुढारलेल्या सर्व स्वतंत्र देशांत विश्वविद्यालयीन विद्यार्थी जर लष्करी शिक्षण घेत असला तर त्याला अधिकाऱ्याची जागा त्याचें शिक्षण संपतांच देण्यांत येते. अशा रितीनें परदेशी सर्वतोपरी सुशिक्षीत माणसास जास्त जास्त लष्कराकडे वळविण्याचे प्रयत्न

चालले असता आपल्याकडे मात्र उलट्या दिशेनें प्रयत्न चालू आहे व ह्या प्रयत्न, जो नक्की निष्फळ ठरावयाचा, तो निष्फळ ठरून फुकट गेला म्हणजे सर्व हिंदवासीयांची त्यावरून नालायकी सिद्ध करावयाची.

ज्या लष्करी विद्यालयांतील शेंकडा २० जागा संस्थानी लष्करी अधिकाऱ्याकरितां राखून ठेविल्या जातात, व उरलेल्या ८० जागांपैकीं ४० जागा पुन्हां लष्करी शिपायांमधून सरकारी कृपेनें अधिकारी होण्याकरतां पाठविण्यांत आलेल्या अप्रबुद्ध व अशिक्षीत शिपायांकरता राखून ठेवल्या जातात, त्या देशांतील सैन्याची काय स्थिती असेल !!

आतांपर्यंत हिंदी लष्कराच्या बऱ्याच गोष्टींचा उहापोह केला. आतां थोडक्यांत हिंदी लष्कराची पुनर्घटना कशी करावयाची, राष्ट्रीयकरण कसें करावयाचें, त्यापासून फायदे काय वगैरे गोष्टींचा विचार करूं.

हिंदी लष्कराचें शुद्ध हिंदीकरण जसजसे होत जाईल तसतसा आपल्यास करावा लागणारा अवाढव्य लष्करी खर्चही आपल्या कल्पनेपेक्षां कमी होईल व त्यामुळें इतर राष्ट्रसंवर्धक खात्याकडे पैसा खर्च करण्यास आपणांस शक्य होईल ही एक महत्वाची गोष्ट आपण नेंहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. गोऱ्या सोजीरापेक्षा हिंदी सोजीर धैर्य, शौर्य वगैरे बाबतींत हलका व कुचकामी आहे असे सांगितले जाते व म्हणून हिंदी लष्कराचें पूर्ण हिंदीकरण करणें ही एक वेडगळ कल्पना आहे, त्यामुळें हिंदुस्थानांत यादवी माजेल वगैरे सारखे बाष्कळ बोल बोलणाऱ्या हिंदुस्थानच्या हितशत्रूकडे लक्ष देणें बरोबर नाहीं. वास्तविक प्रत्येक युद्धामध्यें हिंदी सैनिकांच्या शौर्य धैर्यादी गुणांची इतकी वाखाणणी केली जाते कीं ही युद्धकालीन प्रशंसा म्हणजेच पुढील शांततेच्या काळांतील कुटील व मत्सर ग्रस्त टिका आहे किंवा काय,असा साहाजीकच संशय येऊं लागतो. नुसत्या गोऱ्या लष्करा-पायी जर आपल्याला वार्षिक सुमारें २० कोटी रु. खर्च करावे लागतात तर हे इतके पैसे वाचविण्याकरतां आपली कंबर आपणच कां बांधू नये ? आपल्या हाती संपूर्ण सत्ता आल्याखेरीज ही गोष्ट होणारी नाहीं.

दुसरी तितकीच महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदी लष्कराचें राष्ट्रीयकरण ही होय. सध्यांतरी ह्या देशांत परकीय राज्य आहे. कोणत्याही जहाल व राष्ट्रीय

विचाराच्या माणसाला कोणतीही सरकारी नोकरी मानवत नाहीं. लष्कराच्या हिंदीकरणाबरोबरच हें लष्कर हिंदी आहे, त्याच्या मदतीनेंच आपण आपल्या लोकांचे आपल्या जन्मभूमीचे, व आपल्या मालमत्तेचे संरक्षण करणार आहो,अशी राष्ट्रीयवृत्ती प्रत्येक लष्करी शिपायी व अधिकारी ह्यांचे मनांत बिंबविली पाहिजे. थोडक्यांत म्हणजे सध्याची भाडोत्रीवृत्ती नाहीशी झाली पाहिजे. राष्ट्रांतील तरुणांच्या मनांत लष्कराबद्दलचा उत्साह एकसारखा वाढत राहील अशी लष्कराची उभारणी झाली पाहिजे.

राष्ट्रीय सैन्य हेंच हिंदी राष्ट्राचें ध्येय असणें जरूर आहे. कोणत्याहि देशाच्या शासनपद्धतींत ' राष्ट्रीय सैन्य ' ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. हें ध्येय पुढें ठेवल्यास सैन्याच्या हिंदीकरणाचा .प्रश्न ताबडतोब निकालांत निघतो. कॅ. मोडक यांचा याबाबत फार मोठा कटाक्ष असे. ते आपल्या 'इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम्' या ग्रंथांत शेवटीं याच निर्णयाची स्पष्ट घोषणा करतात.

" No Constitution would be ever complete without a National Army " that is the solution of the problem of Indianisation: "

सैन्याची पुनर्घटना करतांना मुख्यतः तीन गोष्टींवर ते नेंहमीं भर देत असत.

( १ ) हे सैन्य राष्ट्रीय पाहिजे.

( २ ) नेंहमींच्या खड्या सैन्याचा खर्चही प्रमाणशीर व काटकसरीचा पाहिजे.

( ३ ) आयत्या वेळीं शक्य तितकीं जास्त लोकसंख्या रणांगणांत उभी करण्यास लायख असली पाहिजे.

कॅ. मोडक यांच्या सर्व योजना व विचार या तीन मूलग्राही मुद्यांनाच धरून असत. त्यांच्या ' रायफल क्लब्स् ' ( Rifle Clubs ) वरील एका लेखांत या संघटनेंचा उद्देश सांगतांना वरील तीनही मुद्दे ते तीनच सूत्रमय शब्दांत सांगतात.

" To create huge and cheap National reserves. "

आपण खडें सैन्य जर भरमसाट वाढवीत सुटलो तर सैन्यावरील खर्चाचा बोजाही वेसुमार वाढेल, व इतर राष्ट्रहिताच्या कार्याला पैसे मिळणार नाहीत, तेव्हां नुसत्या खड्या लष्कराची वाढ योग्य ठरणार नाही. परंतु हल्लीच्या एकंदर जागतिक परिस्थितीत देशांत जितकी जास्त तरुणांची संख्या थोड्याशा वेळांत रणांगणांत उभी करण्याइतक्या तयारिनें ठेवतां येईल तितके महत्त्वाचे आहे. याकरितां देशांत शाळा, विश्वविद्यालयें, व्यायामशाळा, आखाडे, संघ, वगैरे सर्व ठिकाणीं असें शारीरिक शिक्षण देणें जरूरीचें आहे कीं, ज्याचा लष्करी दृष्टीनेंही पुष्कळ उपयोग होईल. याच उद्देशानें कॅ. मोडक यानीं कॅडेटकोअर, सिटिझनशिप् ट्रेनिंगकोअर, ड्रील क्लब्ज, बॉईज् ब्रिगेडस् वगैरे निरनिराळ्या योजना आंखल्या होत्या. यांतून निघालेले तरुण लष्करी दृष्ट्या राष्ट्रसंरक्षणार्थ नेंहमीं तयार राहून याचा खर्च सरकारी तिजोरी-वरही फारसा पडत नाही. मागें दर्शविल्याप्रमाणें गोऱ्या सैन्याच्या ऐवजीं जर पूर्ण हिंदी सैन्य ठेवतां येईल, तर खड्या सैन्याचा खर्चही प्रमाणशीर व काटकसरीचा होईल, आणि वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें निरनिराळ्या संस्था काढून, सध्याच्या तरुणांच्या शिक्षणांत योग्य अशा लष्करी शिक्षणाची भर टाकल्यास वेळप्रसंगीं या सर्वांचा उपयोग राखीव सैन्यासारखा करतां येईल. कॅ. मोडक म्हणत—

" What we want is a National Army for our National Defence primarily, and thus we have to introduce several institutions in our country, which would supplement the need, with the efficient and at the same time economic material. "

कांहीं देशांत लष्करी शिक्षण सक्तीचें आहे आणि खड्या सैन्यांतील नोकरी थोड्या मुदतीची आहे. यामुळें राष्ट्रांतील सर्व तरुण कार्योन्मुख होऊन अवघड प्रसंगीं लष्करीदृष्ट्या लायक ठेवतां येतात. फील्ड मार्शल

रॉबर्टस् यांनीं केवळ याच हेतूनें गेल्या महायुद्धापूर्वी नेशन्-इन्-आर्मस्‌ची कल्पना प्रसृत केली. सक्तीच्या लष्करी शिक्षणानें बौद्धिक व शारीरीक उन्नति होऊन उत्तम नागरीक कसे तयार होतात व त्यांचा उपयोग विविध क्षेत्रांत कसा करून घेतां येतो, ह्याचें वर्णन करतांना एक जपानी लेखक गोटॅको ओगावा (Gotaco Ogawa) 'जपानमधील सक्तीची लष्कर भरती' या पुस्तकांत लिहितो,

"There is no doubt that the influence of conscription even upon economic conditions, is a very great and important subject. It beneficially affects the death-rate, birth-rate, efficiency of labour, agricultural employment etc. The Army is a National school, so to speak. Remarkable is the effect of Army life for a period of two to three years under training upon the improvement of character of the people."

सक्तीच्या लष्करभरतीचें देशांतील आर्थिक जीवनावरील परीणाम हा एक महत्वाचा विषय आहे. समाजाची मरणसंख्या व जननसंख्या यांचे प्रमाण, शेतकी व इतर मजूरीची कामें, यांवर या गोष्टीपासून सुपरिणामच होतात. देशांतील सैन्य ही एक राष्ट्रीय शिक्षणाची शाळा आहे २–३ वर्षांच्या सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा मनुष्याच्या चारित्र्य व शीलसंवर्धनाकडेही उपयोग होतो; असे त्या जपानी लेखकाचें म्हणणें आहे. व तें खरें नाही काय? आपल्या देशांतील लष्कराचाही उपयोग खरोखरीच राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेसारखा व्हावा हेच कॅ. मोडक यांचे ध्येय होते व त्याकरितां ते अविश्रांत परिश्रम करीत. परंतु ज्या देशांत लष्करी नोकरी सक्तीचीं नाही अशा सर्व देशांत कॅडेटकोअर, बॉईज ब्रिगेडम्, रायफल-क्लब्ज वगैरे सारख्या अनंत संस्था लोकांना खुशीनें शिक्षण देऊन तेच कार्य करीत आहेत असे दिसते. रायफलक्लब्ज सारख्या संस्थांच्याबाबत जरी

आपण आपल्या देशाची इतराशीं तुलना करूं लागलो, तरीही आपली केविलवाणी स्थिती नजरेस आल्याखेरीज राहात नाहीं.

| देश | रायफल्क्लब्ज् | सभासद |
|---|---|---|
| कॅनडा | २६६ | ३२२८० |
| ग्रेट ब्रिटन | १००० | ८०००० |
| हिंदुस्थान | दुर्लक्षणीय | |

( आंकडें जरी जुने असले तरी बोधप्रद आहेत ह्मणून देत आहो )

विश्वविद्यालयीन यू. टी. सी. च्या शिक्षणांतही आवश्यक व योग्य ते फेरफार करून तें शिक्षण इंग्लंडमधील ओ. टी. सी. च्या धर्तीवर झाले पाहिजे हाही कॅ. मोडक यांचा आग्रह त्यांच्या पूर्वीच उद्धृत केलेल्या उद्देशास धरूनच आहे. ही संस्था तेथील सर्व २२-२३ विश्वविद्यालयांत आहे. युद्ध पुकारल्याबरोबर थोड्याच आठवड्यांत कित्येक लाख सैन्य या देशांना युद्धभूमिवर उतरवितां येते. कारण मुलांना लहानपणापासून कॅडेटकोअर व चर्चलॅडब्रिगेस पासून विश्वविद्यालयांतही ओ. टी. च्या द्वारां बरेच लष्करी शिक्षण मिळालेलें असतें. ओ. टी. सी. चें येथींल यू. टी. सी. सारखे नुसते पायदळच नसते. त्यांत तोफखाना, एंजीनियर्स, व्हेटरिनरी, सिग्नलर्स, अशा सर्व शाखांचा समावेश होतो; व त्यामुळें हे एक लहानसे सुसज्ज सैन्यच तयार होते. मागच्या एका लेखांत या संबंधीं माहिती येऊन गेलीच आहे. यावरून यांच्या शिक्षणाची कल्पना सहज करतां येईल.

तात्पर्य अशा प्रकारच्या संस्था देशभर निर्माण करून जर तरुणांना शिक्षण दिलें, तर भरमसाट खड्या सैन्याची आवश्यकता नाहीशीं होते, आणि प्रमाणशीर खर्चातच पुष्कळ लष्करी शिक्षण मिळालेली लढाऊ संख्या वेळप्रसंगीं सुसज्ज मिळू शकते. हिंदुस्थानला अशाच प्रकारची पद्धत जास्त हितावह होईल. कॅ. मोडक यानीं या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन एकाबाजूनें सैन्याचें पूर्ण हिंदीकरण आणि दुसऱ्याबाजूनें देशांतील सुशिक्षित तरुण पिढी

शरीरानें व बुद्धीनें नेहमीं देशाच्या रक्षणांस सुसज्ज रहावी, म्हणून कॅडेट-कोअर, ड्रिलिक्लब्, ओ. टी. सी. अशा संस्था निर्माण करण्याचे प्रयत्न झालें पाहिजेत असें प्रतिपादन केले; व हे प्रयत्न यशस्वी झाल्यास राष्ट्रीय सैन्याचें ध्येय दृष्टीपथांत येण्यास कांहीं कठीण आहे काय?

कॅ. मोडकांचीं ही दृष्टी या देशाच्या खऱ्या हिताच्या व अभ्युदयाच्या दृष्टीनें फारच उपयुक्त व महत्वाची आहे. जागतिक धकाधकीच्या मामल्यांत राष्ट्र निर्माण करून जगण्यास याच मार्गानें विचार करणें प्राप्त आहे. व तसें झाल्यास आपला भाग्योदय जवळ आला असे समजण्यास हरकत नाहीं.

# हिंदुस्थानचे राष्ट्रीय सैन्य

[ लेखक : दा. न. शिखरे, एम. ए. ]

राष्ट्रच्या राष्ट्र निःशस्त्र करण्याचें धाडस सर्व मानवजातीच्या इतिहासांत बहुधा एकट्या इंग्रजांनींच केलें असेल! संस्कृतिसंपन्न व क्षात्रगुणसंपन्न अशा तीस कोटि हिंदी प्रजेला तब्बल शंभर वर्षें शस्त्रहीन व पौरुषहीन स्थितींत इंग्रजांनीं डांबून ठेवलें; याचें प्रायश्चित्त म्हणूनच कीं काय, चालू युद्धांत ब्रिटिश साम्राज्याचें अधःपतन टाळण्याकरितां मि. चर्चिल यांना अमेरिकेच्या दाराशी चारदां लोटांगणें घालावीं लागलीं!! सामदामादि सूक्तासूक्त उपायांनीं हिंदुस्थानांत आपण स्थापिलेली राज्यसत्ता अबाधित रहावी या हेतूनें १८५७ सालानंतर राज्यधुरंधर इंग्रजांनीं पुष्कळ सावधगिऱ्या घेतल्या;—त्यापैकीं हिंदी जनतेचे पूर्ण निःशस्त्रीकरण आणि 'भेदा व नांदा' हें धोरण, या दोन गोष्टी सर्वांना परिचित असून, त्यांवर वेळोवेळीं लोकाग्रणींनीं भरपूर कोरडेही ओढलेले दिसतात. 'आम्ही समशेरीनें जिंकलेला हिंदुस्थान समशेरीनेंच टिकवूं' अशी गुर्मीबाज ग्वाही कैक ब्रिटिश सेनानींनीं निःसंदिग्ध भाषेंत दिलेली आहे. या चढेलपणाचें

दृश्य फल म्हणजे हिंदुस्थानच्या लष्करी खात्याचीं मुख्य मुख्य द्वारें हिंद-भूमीच्या सुपुत्रांना कडींकुलुपें लावून अज्जीबात बंद करण्यांत आलीं. सध्यां चालू असलेल्या 'जगद् युद्धा'च्या (Global War) झंझावातानें तीं सारीं दारें खडाखड उघडलीं, एवढेंच नव्हे, तर निखळून पडलीं; या एका घटनेवरूनहि पूर्वीचें प्रतिबंधाचें धोरण अकारण होतें, हें उघड होत नाहीं काय? 'बिनलढाऊ' जातींच्या रक्तांत लढाऊपणाचा गुण इंग्रजांना अकस्मात् दाखविणाऱ्या रणदेवतेला खरोखर धन्यवादच दिले पाहिजेत. वसिष्ठाच्या धेनुप्रमाणें हिंदभूमीच्या कुशींतून एकाएकीं वीस लक्ष सैनिक बाहेर पडतात काय, शिस्त शौर्य व काटकपणा हे लष्करी गुण प्रगटवितात काय आणि 'राजपदकें' व 'उपराजपदकें' कमावून व आफ्रिकेंत बहादुरी गाजवून चर्चिलसकट सर्व साम्राज्यवाद्यांची शाबासकी मिळवितात काय,–साराच चमत्कार! सत्य कोणतें–पूर्वीचें कीं आतांचें? हिंदुस्थान स्व–संरक्षणक्षम नाहीं हें पूर्वीचें आंग्लमत खरें, कीं हिंदुस्थान साम्राज्याचेंहि संरक्षण करूं शकतो हा आतांचा अनुभव खरा? हिंदी लष्करांतील अधिकाऱ्यांच्या बाराशें जागा भरून काढण्यास गुणानें व संख्येनें पुरेसे हिंदी उमेदवार पुढें येतच नाहींत,ही ब्रिटिश सत्तांधाऱ्यांची तेव्हांची तक्रार कांगावखोरपणाची नव्हती असें आज कोण म्हणेल? आणि त्या १२०० उच्च जागाच काय, पण ६०००० ब्रिटिश सोजीरांचीहि एकूणएक जागा उत्तम रीतीनें भरून काढण्यास हजारों–लाखों हिंदी तरुण समर्थ व सिद्ध आहेत, असें छातीला हात लावून बजावणारे कॅ. मोडकांसारखे देशभक्त रणपंडित हेच सत्यवक्ते व दूरद्रष्टे होते असें आज इंग्रज सेनापतीनातीहि बिनतक्रार कबूल केलेंच पाहिजें. जगांतील सर्वांत श्रीमंत राष्ट्रानें सर्वांत कंगाल अशा देशावर त्याच्या खर्चानें लादलेलें सैन्य म्हणजे हिंदुस्थानांतील गोरें लष्कर. गोऱ्या लष्कराचें संपूर्ण हिंदीकरण (Replacement) केल्यानें या गरीब देशाच्या तिजोरींतील तीस कोटि रुपये वांचतील असा सिद्धांत आधारानिशीं जगजाहीर करण्याचें श्रेय कॅ. मोडकांनाच काहे.

१९३३ साल. गोलमेज परिषद त्रिवार भरली व ओसरली. 'श्वेतपत्रिका' अजून बाहेर पडावयाची होती. म. गांधींनीं मुलाखत मागितली असता बड्या लाटांनीं त्यांना तुरुंगाची वाट दाखविली. हजारों राष्ट्रसभाभक्त कारां-

बद्ध झाले. त्यामुळें 'श्वेतपत्रिका' म्हणजे एक पांढरा ढगच ठरणार असा बहुतेक सर्वांचा कयास. तरी कांहीं नेमस्त पुढारी आशा बाळगूनच होते—स्वराज्याच्या साऱ्याच हक्कांचें गांठोडें इंग्रजानें परत केलें तर तें झेलण्यासाठीं ते आपले बाहु पीळदार करीत होते! कोणी सांगावें, चुकून ब्रिटिश सरकारला सुबुद्धि सुचली तर पट्दिशीं तें स्वराज्य देऊनहि टाकतील, अशी भोळी आशा देशाच्या कांहीं कोपऱ्यांत फोंफावत होती. पूर्ण स्वातंत्र्य मिळेल, निदान वसाहतीचें स्वराज्य निश्चित येईल, अशी वाट बरेच पोक्त मुत्सद्दी पहात होते. अशा संधिकालांत हिंदी राजकारणांतील एक प्राणभूत प्रश्न उलगडून दाखविण्यासाठीं कॅ. मोडक यांनीं इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम ( Indian Defence Problem ) हा आपला बहुमोल ग्रंथ लिहिला व प्रसिद्ध केला. या दोन्ही क्रिया सामान्यत: एकाच वेळीं झाल्या म्हटलें तरी चालेल. देशहिताच्या दृष्टीनें या वेळीं हा ग्रंथ लोकांपुढें व सरकारपुढें येणें अवश्य आहे, अशी खात्री मनाला पटतांच कॅ. मोडक यांनीं रात्रींचा दिवस करून अवघ्या तीन महिन्यांतच चार—साडेचारशें पृष्ठांचा माहितीपूर्ण ग्रंथ लिहिला व प्रसिद्धिला; केवळ साहित्याला भूषणभूत होणाऱ्या ग्रंथापेक्षां सर्व राष्ट्राचा दृष्टिकोन बदलून टाकणाऱ्या, त्याची क्रिया पालटविणाऱ्या प्रेरक ग्रंथांत कॅ. मोडकांच्या पुस्तकाचें स्थान आहे;—आणि ते वरचें आहे. ग्रँट डफ्पासून सीलीपर्यंतच्या इंग्रज इतिहासकारांनीं 'मराठे म्हणजे लुटारू;' 'शिवाजी म्हणजे बंडखोर,' 'मराठ्यांच्या राजकारणाला ना ध्येय, ना धोरण' अशी नालस्ती आरंभिली; तेव्हां त्या दुर्मताचा डोंगर जमीनदोस्त करण्यासाठीं व 'मराठा फेडरेशनचें' तत्वज्ञान सिद्ध करण्यासाठीं न्या. रानडे यांनीं 'दि राईझ् ऑफ मराठा पॉवर'(The Rise of Maratha Power) हा ग्रंथराज रचला. कॅ. मोडकांच्या ग्रथाचीहि जात हीच आहे. सतत वीस वर्षे लष्करी शास्त्राचा व कलेचा साक्षात् अनुभव घेऊन मगच त्यांनीं हा ग्रंथ लोकांपुढें मांडला. या विषयावरील हा ग्रंथ पहिलाच. या अपूर्वाई-प्रमाणेंच साधार व सडेतोड प्रतिपादन यामुळें या ग्रंथाकडे राजकारणी लोकांचें लक्ष एकदम वेधलें गेलें. त्यांत येथून तेथून सर्वत्र शिपाईबाणा दृष्टीस पडतो. याच शिपाई बाण्याला अनुसरून ज्या ज्या इंग्रज सेनानींनीं या प्रश्नाविषयीं सत्य व सरळ अभिप्राय बोलून दाखविले; त्यांच्या वच-

नांचा वापर कॅ. मोडकांनीं मुक्तहस्तानें केला आहे. त्यामुळें संगिनीच्या पहाऱ्यांत, कडीकुलुपांत घालून, तळघरांतील तिजोरींत बंदीस्तपणें ठेवलेल्या जडजवाहिराचें दुर्लभ दर्शन झाल्याचा भास सर्वसामान्य वाचकांना या ग्रंथांतील अज्ञात पण बहुमोल माहिती नव्यानेंच वाचतांना झाला यांत नवल काय ! या प्रश्नाचें महत्व गोलमेज परिषदेपासून क्रिप्स योजनेपर्यंत घडलेल्या सर्व प्रकरणांवरून स्पष्ट झालें आहे. हिंदुस्थानचा गुंता न उलगडण्यास लष्कर, खजिना व परराष्ट्रसंबंध हेच तीन विषय कारण आहेत.

हिंदुस्थानच्या लष्कराचीं तीन कार्यें आहेत, तीं म्हणजे—( १ ) परचक्रापासून निवारण, ( २ ) देशांतील दंगलीचें निराकरण, ( ३ ) ब्रिटिश साम्राज्याचें संरक्षण. या त्रिविध कार्यासाठीं या युद्धापूर्वी ६०००० ब्रिटिश व १५०००० हिंदी सैन्य ठेविलें जाई व त्याप्रीत्यर्थ दरसाल सुमारें ५० कोटी रुपये हिंदुस्थानच्या उत्पन्नांतून खर्च होत. हिंदुस्थानचें उत्पन्न एकूण १३० कोटींचें असून लष्कराइतका खर्च दुसऱ्या कोणत्याहि एका खात्यावर होत नसे हें लक्षांत घेतलें पाहिजे. देशाच्या केवळ रखवालीसाठीं कोण किती खर्च करतें याची तुलना पुढील कोष्टकावरून करतां येतें.

## राष्ट्राचें उत्पन्न व लष्करी खर्च

| राष्ट्र | लोकसंख्या कोटि | लक्ष | पुरुषसंख्या को. | ल. | लष्करी शिक्षण घेतलेलें | वार्षिक उत्पन्न (कोटि) | लष्करी खर्चाचें प्रमाण (शेंकडा) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्लंड | ४ | ५० | २ | २० | ६० लक्ष | ८० पौंड | १४·७५ |
| फ्रान्स | ४ | — | — | — | — | ४८७२ फ्रँक | १८-७५ |
| कॅनडा | ९ | ५० | ४ | | ११ लक्ष | ४५½ डॉलर | ४·७५ |
| हिंदुस्थान | ३५ | | १७ | ५० | १ लक्ष | १३४ रुपये | ४५·२९ |

या खास लष्करी खर्चाशिवाय रेल्वे, पोस्ट, रस्तें वगैरे खात्यांतहि लष्करासाठीं लाखो रुपये हिंदुस्थानांत खर्चिले जातात. ते जमेस धरले

म्हणजे लष्करी खर्चाचा आंकडा आणखी फुगतो. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींचा लष्करी खर्च तर शेंकडा ४, ३, ५ इतकाच होता. राष्ट्रांतील एकूण एक तरुणाला लष्करी शिक्षण दिलें व त्याला सशस्त्र ठेवलें, तर तेंच युद्धकालांत राष्ट्रीय सैन्य म्हणून उपयोगीं पडतें. पण हिंदी सैनिकाच्या चौपट पांचपट तनखा घेणारे गोरें सोजीर येथें ठेवण्यांत येतात. या रीतीनें स्वतःच्या पारतंत्र्यासाठीं हिंदुस्थानला आतांपर्यंत १२०० कोटि रुपयांची किंमत इंग्लंडच्या पदरांत टाकावी लागली असा हिशेब कॅ. मोडकांनीं आपल्या ग्रंथांत दिला आहे. याखेरीज हिंदुनाच्या लष्करासाठीं इंग्लंडांत दरसाल बारातेरा कोटि रुपये खर्चिले जातात ते निराळेच. एकंदर लष्कराच्या या बकासुरीं खर्चामुळें हिंदुस्थानांतील किती सत्कार्यांची उपासमार होत असेल! ना. गोखले यांच्यावेळेपासून जो तो प्राथमिक शिक्षण सक्तीचे करा असा टाहो फोडीत आहे, पण त्यासाठीं खर्च करण्यास वीस कोटि रुपयें आपलेजवळ नाहींत अशी सबब सरकार —हेंच उधळें सरकार—बिनदिक्कतपणें सांगत असतें!

दक्षिण आफ्रिका, कॅनडा वगैरे आपल्या वसाहतींत ब्रिटिश सरकारानें आपलीं सैन्यें ठेवलीं आहेत, नाहीं असें नाहीं; पण त्या सैन्यांचा खर्च ब्रिटिश सरकार स्वतः सोसतें व तें सरळच आहे. पण आपल्या स्वामित्वासाठीं लादलेल्या लष्कराचा खर्च ब्रिटिश सरकार हिंदुस्थानाकडून उकळतें या अन्यायाला जगांत तोड सांपडणें शक्य नाहीं.आधीं साम्राज्याचें बंडखोर पण आतां आधारस्तंभ बनलेलें फील्ड मार्शल स्मटस् यांनीं ब्रिटिश अधिकाऱ्यांना उद्देशून बारा वर्षांपूर्वींच एका भाषणांत खडखडीतपणें बजावलें कीं,

" South Africa must not have a Boer Army or an English army but a South African Army."

इंग्लंडला इंग्रजांची, कॅनडाला कॅनेडियनांची, आफ्रिकेला आफ्रिकनांची सेना असणें जसें इष्ट, न्याय्य व अवश्य असून ती खर्चांत काटकसरीची व उपयुक्ततेत हिताची ठरेल; तशीच हिंदुस्थानाला हिंदी सेनाच सर्व दृष्टींनीं उपकारकर्ती होईल हा सिद्धांत कॅ. मोडक यांनीं सर्व बाजूंनीं सिद्ध करून दाखविला आहे. अंतःस्थ वा बाह्य शत्रूंचें निवारण करण्यास हिंदी सैनिक समर्थ व सिद्ध आहे, अशी साक्ष पूर्वीचा इतिहास तर देत आहेच; पण

गेल्या महायुद्धांत व चालू जगद्‌युद्धांतहि त्याची पुरेपूर प्रचीति आली आहे, हें ब्रिटिश मुत्सद्यांनीं तोंड फाटेपर्यंत केलेल्या त्यांच्या प्रशंसेवरून उघड होते. वायव्य सरहद्दीवरहि पठाणांशीं सामना देण्यांत गोऱ्यापेक्षां काळेच शिपाई पटाईत आहेत व त्यांचेवरच तेथल्या लढायांचा मुख्य भार टाकण्यांत येई हें ब्रिटिश सेनापतींच्या खलित्यावरून सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट झालें आहे. त्याशिवाय जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांतून हिंदी शिपायांच्या बहादुरीचें पडसाद उठत आहेत. सुदान, अबिसिनिया इजिप्त, जावा, मॅनिला व चीन या देशांत तर हिंदी सैन्य लढलेंच, पण त्याशिवाय गेल्या महा-युद्धांत फ्रान्स, इजिप्त, डार्डानेल्स येथल्या गोऱ्या रणांगणावर व दक्षिण आफ्रिका, मेसोपोटेमिया, इराक वगैरे देशांतील काळ्या रणभूमीवर हिंदी शिपायानें आपल्या क्षात्रवृत्तीचें पाणी दाखविलें आहे; आणि गोऱ्या वरिष्ठां-कडून धन्यवाद मिळविले आहेत. भाडोत्री शिपायांचा हा अनुभव, मग देशाभिमानानें भारले गेलेले, स्वातंत्र्याची संजीवनी प्राशन केलेले, सोळा रुपये पगारापेक्षां कांहीं उज्वल ध्येयासाठी तळहातावर शीर घेतलेलें हिंदुस्थानांतील "राष्ट्रीय सैनिक" जेव्हां रणांगणावर स्वामित्त्वानें, स्वाभि-मानानें, स्वतंत्रत्वानें उभे ठाकतील; तेव्हां आपल्या पितृभूमीं'तील घर न् घर व त्या घरांतील इंच न् इंच यासाठीं आपलें रक्त सांडणाऱ्या 'लाल सेनेवर' ते ताण करतील यांत संशय काय? तसा अलौकिक पराक्रम पूर्वी मराठा–शीखांच्या इतिहासांत घडलेला आहे, तसें अद्‌भुत शौर्य गाजवि-ण्यास भावी संताजी-धनाजींना संधि द्या असा कंठशोष कॅ. मोडकांनीं जीव तोडून केला आहे.

दोन वर्षांत साठ हजार ब्रिटिश सैनिकांना हिंदुस्थानांतून परत पाठवा व १६ वर्षांत ब्रिटिश अधिकाऱ्यांना रजा द्या, आणि त्या सर्व जागा हिंदी लोक उत्कृष्टपणें भरून काढतात कीं नाहीं तें पहा, असें आव्हानच कॅ. मोडकांनीं ब्रिटिश सरकारला दिलें आहे. कॅ. मोडकांसारखा देशप्रेमानें वेडा झालेला हिंदी माणूसच अशी मागणी करतो असें नव्हे, तर सत्याची शपथ खाऊन, न्यायदेवतेला साक्षी ठेवून ज्या ज्या ब्रिटिश सेनापतींनीं प्रांजल व प्रामाणिक मत दिलें; त्या सर्वांनीं सरकाराला हाच सल्ला दिला आहे. पण सरकारनें आपल्या विश्वासांतहि तज्ज्ञाच्या अध्यक्षतेखालीं आप-

णच नेमलेल्या बहुतेक साऱ्या लष्करी कमिट्या–कमिशनांचे अहवाल सप्त-पाताळांत गाडून टाकले. राज्यघटना ठरवूं पहाणाऱ्या गोलमेज परिषदेंतील ' सरदारांना ' हि त्यांचें नखदर्शन होऊं दिलें नाहीं. रॉलिन्सन कमिशननें हिंदुस्थानांतील लष्कराचें पूर्ण हिंदीकरण २८ वर्षांत करावें अशी शिफारस केली होती. स्कीन कमिटीनें अर्धवट हिंदीकरणाला २५ वर्षांची मुदत घातली होती. शी कमिटीनें रायफल क्लब वगैरे स्थापण्याची सूचना केली. पण हें सारें उघड्या घड्यावर पाणी ओतणेंच ठरलें; त्यांचे अहवाल दडपण्यांत आले; उलट सायमन कमिशन, चेटवुड कमिशन वगैरे आपल्या हस्तकांच्या मुखानें लष्करीकरणाला विरोध करण्याचें पुण्य सरकारानें संपादिलें. हिंदुस्थानांत पुरेसे ( Sufficient ) सैनिक मिळाले तरी हवेतसे ( Efficient ) सैनिक मिळत नाहींत अशी कुटिल व खोटी कुरकुर बहिष्कृत अशा सायमन कमिशननें केली. हें अपमानास्पद विधान किती असत्य आहे हें मेरिडिथ् टौन्शेंड या हिंदुस्थानांत दीर्घकाल राहिलेल्या मुरब्बी सेनानीच्या पुढील उद्गारांवरून कोलालाहि कळून येईल.

**" हिंदुस्थानांतील पुरुष आमच्याइतकेच धिप्पाड व मरणाला न डरणारे आहेत. त्यांच्यामधून १२कोटि सैनिकांचें लष्कर सहज उभारतां येईल व तें लष्कर सर्व जगाला आपल्या काबूंत ठेवूं शकेल. "**

सायमन कमिशनच्या आधीं १९१७ सालीं ' मेसोपोटेमिया रिपोर्टांत ' खुद्द हिंदुस्थान सरकारनें असे कबूल केले आहे कीं, हिंदुस्थानांतून पांच कोटि सैनिक उभे करतां येतील.

अशी अनुकूलता असतांना हिंदभूमीच्या रक्षणार्थ इंग्लंडचे, अमेरिकेचे आणि चीनचे सैनिक येथें आणावे लागतात याचा अर्थ काय ? सर्व जगाला अजिंक्य असें स्वकीय सैन्यबळ उभारण्याची शक्यता येथें असतांना उपऱ्या गोऱ्या सोजीरांसाठीं सालोसाल क्रोडों रुपयांचा चक्काचूर व्हावा याचें कारण काय ? जेत्यांना आपलें राज्य जितांवर कायमचें ठेवावयाचें आहे, आणि त्यासाठीं वंशश्रेष्ठतेचें व अविश्वासाचें धोरण ते चालवीत आहेत; याशिवाय या विपरीत परिस्थितीचा दुसरा कांहीं अर्थ लागणें शक्य आहे काय ? 'भेदा व नांदा' या धोरणानें इंग्रजांनीं हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान असा जो भेद केला, त्याचें लोण लष्करापर्यंत पोंचलेलें आहे. सत्तावनी क्रांतियुद्धासारखें

संकट आपल्या सत्तेवर पुनः कोसळूं नये म्हणून जातवारीनें पलटणी उभाराव्या व वेळप्रसंगीं त्या एकमेकांविरुद्ध वापराव्या असा कुटिल सल्ला सर एच्. टॉम्स् यासारख्या सेनाधुरंधरांनीं स्वच्छ शब्दांनीं देऊन ठेवलेला आहे. दुसरा भेद संस्थानिकांचा. संस्थानिक आज कितीहि राजनिष्ठ दिसले, तरी नोकराला धनी होऊं नये असें कसें वाटेल? असा सूचक प्रश्न मि. ब्राऊनस्लो यांनीं विचारला होता व लॉर्ड किचनेर यांनीं तर १९०३ सालींच 'Certain Native States might require watching' कांहीं संस्थानांवर नजर ठेवली पाहिजे, असा इषारा दिला होता. सुधारलेलीं शस्त्रास्त्रें व शास्त्रीय यंत्रें हिंदी सैनिकांच्या हातीं पडूं देऊं नका असा सल्ला लॉर्ड एलनबरो, सर एस्. कॉटन प्रभृतींनीं उघडपणें दिला होता. नुसता सल्लाच नव्हे तर तसें धोरणहि हिंदी सैन्याच्या रचनेंत पाळलें जातें. 'मराठ्यांची पलटण' असें नांव धारण करणाऱ्या पलटणींतहि नुसते मराठे सैनिकच नसतात. त्या 'मराठा पलटणींत'हि मुसलमान शिपायांची भरती केली जाते. भिमथडीच्या तट्टांना गंगाथडीचे पाणी पाजणाऱ्या मराठा घोडेस्वारांची एकहि पलटण आजमितीला खडी नाहीं. तोफखान्यांत तर केवळ ब्रिटिश सैनिकांचाच भरणा; त्यावर 'काळ्या आदमी'ची सावलीहि नको. ही 'अस्पृश्यता' चालू जगद्युद्धांत दूर करून सर्वांना सर्वत्र लढण्याची सवलत सरकारनें हिंदुस्थानला दिल्याचें कळतें! पूर्वी मात्र तोफाच काय पण इतर दारुगोळाहि हिंदी सैनिकांचे हातीं ब्रिटिश सोजीरांपेक्षां पुष्कळच कमी देत. मुख्य म्हणजे लष्करी खर्चाच्या अंदाजपत्रकावर मत देण्याचा अधिकार मध्यवर्ती विधिमंडळाला दिलेला नाहीं. लोकप्रतिनिधींच्या कक्षेबाहेर तो विषय मुद्दाम ठेवला आहे. हा अन्याय दूर व्हावा असा आग्रह कॅ. मोडकांनीं धरला.

सरकाराच्या या विभक्तीकरणाच्या धोरणाला अलम दुनियेंत कोठें आधार मिळणार नाहीं. इटालीमध्यें जे लष्कर आहे, त्यांत तीस वंशाचे व तीस भाषा बोलणारे लोक आहेत. कॅनडामध्येंहि तीच स्थिती. तरी त्या दोन्ही देशांत राष्ट्रीय सैन्य आहे. मग हिंदुस्थानांतच राष्ट्रीय सैन्य उभे करणें अशक्य कां व्हावें? हिंदुस्थानांत कितीही भाषा नांदत असल्या तरी हिंदी लष्करांत हिंदी ही एकच भाषा रूढ आहे. 'भाषा, चालीरीति,

स्वभाव या बाबतींत हिंदी लष्करांत तादृश फरक कांहींच नाहीं ' हें माल्कम् यांचें मत सरकारी आक्षेपाचें खंडन करण्यास पुरेसें आहे. उलट नानाभाषा त्याच्या निमित्तानें सरकारच आपल्या रोमन लिपीचा चंचुप्रवेश हिंदी फौजेंत करीत आहे. यावर कॅ. मोडकांनीं आपलें टीकास्त्र सोडलें आहे; एवढेंच नव्हे तर ' फौजी अखबार ' या नांवानें स्वतंत्र मासिक काढण्यासहि प्रारंभ केला. गोरा सोजीर हा अधिक कार्यक्षम, अधिक शूर, अधिक निर्भय व हिंदु मुसलमानांच्या पक्षभेदापासून अलिप्त असतो म्हणून त्यांचें सैन्य हिंदुस्थानांत ' शांतता व सुव्यवस्था ' राखण्यासाठीं अवश्य आहे या वल्गनेच्या तर कॅ. मोडकांनीं ठिकऱ्याच उडविल्या आहेत. सरहद्दीवरच्या लढायांत तर गोऱ्या पलटणी विसावाच घेत; लढण्याचा सारा भार हिंदी शिपाईच उचलीत. आरोग्याच्या बाबतींत तर गोऱ्या शिपायाची बाजू आपल्या हिंदी बांधवापेक्षां फारच काळी आहे. उपदंशादि रोगांचें प्रमाण गोऱ्यांमध्यें हजारीं २४·९१ तर काळ्यामध्यें फक्त ३·१. इतर सर्व रोगांचे बाबतींतहि गोऱ्यांची काळयावर सरशीच! फार काय, रोग निवारणाच्या खर्चांतहि त्याचा आंकडा मोठा. औषधपाण्यासाठीं प्रत्येक हिंदी शिपायामागें सरासरीनें २९ रु. वर्षाला खर्च होतात, तर इंग्रज शिपायासाठीं १२१ रु. लागतात. ' काम थोडें, खर्च फार ' असा थाट या बादशाही सैन्याचा असतो. त्यांना लग्नाचा भत्ता, विरहाचा भत्ता, बाळंतपणाचा भत्ता आणि मुलाचा भत्ता व त्याच्या शिक्षणाचाहि भत्ता. अशा भरमसाट भत्त्यांची जी लांबलचक यादी कॅ. मोडकांनीं दिली आहे; ती वाचून हिंदुस्थानाला लागलेल्या जळवांची पूर्ण कल्पना येते. असें महागडें गोरें लष्कर हिंदुस्थानावर त्याच्या इच्छेविरुद्ध सरकार कां लादीत आहे? याचीं आठ कारणें कॅ. मोडकांनीं दिलीं आहेत, तीं अशीं:—

(१) हिंदुस्थानावरील स्वामित्त्व अबाधित ठेवणें.

(२) हिंदी सैन्याला बिथरूं न देणें.

(३) संस्थानिकांच्या सैन्यावर वचक बसविणें.

(४) हिंदुस्थानांतून इंग्लंडला अन्नाचा पुरवठा अखंडितपणें करणें.

(५) ब्रिटिशांचा व्यापारधंदा सुरक्षित ठेवणें.

( ६ ) इंग्रज सैन्याला प्रारंभींचें शिक्षण देण्यासाठीं हिंदुस्थान प्रयोग-शाळा म्हणून वापरणें.

( ७ ) त्यायोगें इंग्लंडांतील लष्करी खर्चांत बचत करणें.

( ८ ) ब्रिटिश साम्राज्याचें रक्षण करणें.

याशिवाय इंग्लंडमधील सँढर्स्ट, वुलविच्, चॅथॅम येथील लष्करी शाळांना दरसाल सुमारें सोळा सतरा लाख रुपयांची खिरापत वाटली जाते. त्या शाळांतून दरसाल सुमारें ८०० विद्यार्थी लष्करी शिक्षण घेतात; पण त्यामध्यें हिंदी तरुण किती असतात? दहा किंवा पांच! त्या विद्यालयाचें धर्तीवर हिंदुस्थानांत डेहराडून येथें जी लष्करी शाळा सरकारनें चालविली आहे; ती किती जणांची सोय करते? तर फक्त ६०· इंग्लंडच्या आठपट लोकसंख्या येथें असतां लष्करी शिक्षणाची सोय मात्र अष्टमांश प्रमाणांतहि न करणाऱ्या सरकारला काय म्हणावे? डेहराडूनच्या शाळेचा पोकळपणा कॅ. मोडकांनीं सँढर्स्ट कमिटीपुढील आपल्या निर्भीड साक्षींत पुढें आणला. लष्कराचें ताकपिठी शिक्षण देणाऱ्या त्या डेहराडूनच्या शाळेंतहि विद्यार्थ्यांची गर्दी न होण्याची कारणें कॅ. मोडकांनीं आपल्या स्कीन कमिटी-पुढील साक्षींत उघड मांडली होती.

सरकारनें आपलें हें अविश्वासाचें व घातुकपणाचें लष्करी धोरण तत्काळ सोडावें व त्यामुळें हिंदुस्थानचा होणारा अपमान व अन्याय ताबडतोब थांबवावा अशीं आरोळी ठोकणारांत कॅ. मोडक हे अग्रेसर होत. नुसतें दोष-दर्शन न करतां त्यांनीं सरकारला मार्ग-दर्शनहि केलें आहे. तें आजहि सरकारानें डोळ्यापुढें ठेवावें इतक्या महत्त्वाचें आहे. त्यांनीं सुच-विलेल्या सुधारणा अशा:—

( १ ) महागडें ब्रिटिश सैनिक व अधिकारी यांना मायदेशाला पाठवून त्यांच्या जागीं हिंदी तरुणांना मायदेशाचें रक्षण करण्याची संधि द्यावी. यामुळें लष्कराचें बळ अणुमात्र कमी न होतां खर्चांत मात्र २८—३० कोटि रुपयांची बचत होईल.

( २ ) सर्व जातींच्या लोकांना लष्करांतहि सर्व खात्यांत प्रवेश मिळावा. हिंदी सैनिक जगांतल्या कोणत्याहि सैनिकांपेक्षां उणा नाहीं.

( ३ ) हत्यारांचा कायदा गाडून टाकावा.

( ४ ) लष्करी अंदाजपत्रकावर लोकमतानुवर्ती मध्यवर्ती विधिमंडळाला मतदान करतां यावें.

( ५ ) इंग्लंडप्रमाणेंच येथेंहि युद्धमंत्री लोकप्रतिनिधि असावा,–त्याच्या उलट सध्यां व्हाइसरॉयाची मुलकी गादीहि फील्ड मार्शल वेव्हेल या लष्करी अधिकाऱ्यास बहाल केलेली आहे,—

( ६ ) हिंदी सँढर्स्ट येथें काढावें. या लष्करी विद्यालयाला वार्षिक २० लाख रुपयांहून अधिक खर्च येणार नाहीं. त्यांतील विद्यार्थ्यालाहि एकूण शिक्षणासाठीं चारपांच हजार रुपयांपेक्षां जास्त खर्च पडणार नाहीं. संस्थानी प्रजेसाठीं स्वतंत्र ‘ लष्करी विद्यालय ’ उघडावें.

( ७ ) हिंदुस्थानांतील प्रत्येक कॉलेजांत यु. टी. सी. चा सक्तीनें प्रसार करावा. त्यांना लष्करांत उच्च जागा सहज मिळाव्या. ‘ हिंदी लष्कराचा इतिहास ” हा विषय अभ्यासक्रमांत असावा.

( ८ ) प्रत्येक शहरांत नागरिकांना सैनिकी शिक्षण द्यावें; रायफलक्लब सर्वत्र काढावें.

ही अष्टांग सुधारणा सरकाराच्या हातून घडविण्यासाठीं ‘ नॅशनल डिफेन्स लीग ’ नांवाची संस्था काढावी व तिच्या शाखा प्रांतोप्रांतीं पसराव्या अशी योजना कॅ. मोडकांनीं मांडली, एवढेंच नव्हे तर त्याप्रमाणें त्यांनीं तशी संस्था १९३३ सालीं स्थापनहि केली. पण चाळीस कोटी लोकांचा हा अवाढव्य प्रश्न सुटलेला पहाण्यापूर्वीच ते कालवश झाले. पण फील्ड मार्शल वेव्हेल हे लष्करी व्हाइसरॉय आहेत आणि सध्यांच्या जगद्युद्धानें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या मनांतील पुष्कळ आढ्या–आढ्या मोडून पडल्या आहेत. अशा निवळत जाणाऱ्या परिस्थितींत लष्करी व्हॉइसरॉय यांनीं कॅ. मोडकांचें जीवित–कार्य जर हातीं घेतलें; तर “ सच्चा मित्र या नात्यानें हिंदुस्थानची सेवा मी करूं इच्छितों ’ या त्यांच्या सदिच्छेला कांहीं अर्थ राहील. तसें

केलें नाहीं तर त्याचा परिणाम काय होईल याचें भविष्य इंग्लंडचे माजी प्रधान मि. रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं अचुक शब्दांनीं वर्तविलें आहे. ते शब्द असे.—

"Too late' is the epitaph that can be written over most of Britain's great concessions. We held Ireland by the sword, until all that was best in that country was estranged from us and then surrendered to force what we would not concede to reason. Is India to be another Ireland, but on an immensely greater scale ?"

# आठवणी व उद्गार

१

# कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, अधिपति इचलकरंजी

ता. ३१–८–४३ च्या केसरीच्या अंकांत कै. कॅ. मोडक यांच्या स्मृति-ग्रंथाबद्दलची जाहिरात असून ज्या कोणास त्यांच्यासंबंधीं आठवणी वगैरे पाठविणेच्या असतील त्या पाठविण्याविषयीं मागणी करण्यांत आली आहे. तेव्हां त्यांच्या संबंधीच्या आठवल्या त्या एकदोन गोष्टी लिहून पाठवीत आहे.

मागील जागतिक युद्धाचें वेळीं जखमी व आजारी सैनिकांची व्यवस्था व शुश्रूषा करण्याकरितां रेडक्रॉसमार्फत स्थापन करण्यांत आलेल्या दवाखान्यांतून सैनिकांची विचारपूस करून त्यांच्याशीं सुखा–समाधानाच्या दोन गोष्टी बोलण्याकरितां कांहीं बिनसरकारी स्त्रीपुरुषांची नेमणूक करण्यांत आली होती. त्यावेळीं मी पुण्यामुंबईकडे, मुंबई कौन्सीलचें व आमचें संस्थानचें, कामकाजानिमित्त वरचेवर जात येत असे. लढाईचे कामींही आपणाकडून होईल तितकी मदत मी करीत होतों. व सैनिकांची विचारपूस करण्याकरितां नेमलेल्या मंडळींत माझेही एक नांव होते. तेव्हां मुक्कामांत सवड काढून दवाखान्यांत जाऊन मी ऑपरेशन केलेल्या व आजारी सैनिकांचा समाचार घेऊन कोंणास फळे तर कोणास पुस्तकें अशा भेटीदाखल वस्तू त्यांना देऊन दोन गोड शब्द बोलून येत असे. तेथील सैनिकांत बहुधा शिपाई, नाईक, हवालदार अशा दर्जाचे लोकांचा भरणा असे व बहुतेक सर्व सरहद्द प्रांत, पंजाब, बलुचिस्तान वगैरे बाजूकडील असत. असाच एक दिवस मुंबईत दवाखान्यांत गेलो असतां दवाखान्यां-वरील मुख्यांनीं सांगितले कीं, “ दवाखान्यांत रुग्ण म्हणून कांहीं अंमलदार असून त्यांत एक दक्षिणी महाराष्ट्रीय गृहस्थ आहेत व आतां बरे होत आलेले

आहेत. त्यांना भेटल्यास दोघांनाही संतोष वाटेल." मी लगेच त्यांचेंबरोबर त्या महाराष्ट्रीय अंमलदाराकडे गेलो. ते बिछान्यावर स्वस्थ पडून होते. मी त्यांना मराठींत 'कसें काय आहे' म्हणून विचारलें. तेव्हां त्यांनीं चमकून हंसतमुखानें माझ्याकडे पाहिले. दवाखान्यावरच्या मुख्यांनीं मोडकांची मला व माझी त्यांना ओळख करून दिली व ते निघून गेले. मोडकांना आपलें घरापैकींच कोणीतरी व्यक्ती भेटल्याप्रमाणें आनंद झाला. पुढें त्या दवाखान्यांत ज्या ज्या वेळीं मीं जात असें तेव्हां तेव्हां त्यांचेपाशी निदान थोडा वेळ तरी बोलत बसल्याखेरीज राहात नसे. त्यांना फ्रान्समध्यें बहुधा घोड्यावरून पडून पोटाला मोठी इजा झालेलीं होती व दोनतीन वेळां चिरफाड करावी लागली होती. आतां तें थोडे बरे झाले होते, तरी पुन्हां घोड्यावर बसण्याचें श्रमाची दगदग त्यांना झेपण्यासारखी नव्हती. ते ग्वाल्हेरच्या सैन्यांत नोकरीस होते व त्यां सैन्याबरोबरच युरोपांत गेले होते. त्यांची वृत्ति स्वतंत्र बाण्याची होती व तीच त्यांना अधिक मानाच्या व मोठ्या जागा दरबारांत मिळण्याच्या आड येत होती असें एकंदरींत त्यांचेशी झालेल्या संभाषणावरून दिसून आले.

माझी व कै. मोडक यांची अशाप्रकारें झालेली ओळख अखेरपर्यंत कायम होती. ते पुणें वगैरे ठिकाणी वारंवार भेटत असत. त्यांनीं प्रतापगडचें युद्ध व इतर पुस्तकें लिहिण्यास घेतल्यावेळीं त्यांतील विषयासंबंधीं ते माहिती सांगत असत व थोडक्यांत लिखाणासंबंधीं रुपरेखाही देत व कांहीं शंका कुशंकाहि विचारीत. प्रतापगडच्या युद्धासंबंधीं ते म्हणत कीं, "शत्रूला अडचणींचें जागीं घेऱ्यांत धरण्याचे कामीं व आपल्या छोट्या सैन्याची व्यवस्थित रीतीनें मांडणी करण्याचें कामीं श्रीशिवाजी महाराजांचा लोकोत्तरपणा व कुशल सेनानायकत्व दिसून येतें. व या त्यांच्या कौशल्याची वाखाणणी आधुनिक कालाचे सेनानायकांनाही मुक्तकंठानें करावी लागेल." या रचनेंत एकहि मान्याची जागा वाया जाऊं दिलेली नव्हती व जागेच्या महत्त्वाप्रमाणें कमीजास्ती बंदोबस्त ठेवण्यांत आलेला होता व ही लढाई हटकून जिंकली जावी अशी योजना केलेली होती. या लढाईचें बाबतींत त्यांनीं सांगितलेली एक माहिती विशेष प्रकारची होती. या मोहिमेंत भाग घेणारें जवळ जवळ निम्मे मुत्सद्दी व सेनानायक ब्राह्मण होते व त्यांपैकीं

बरेचसे कोंकणस्थ होते, असे कै. मोडक म्हणाल्याचें मला स्पष्ट आठवते. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या उदयानंतर कोंकणस्थ ब्राह्मण घाटावर फार करून येऊं लागले असें मानले जाते. पण तशी वस्तुस्थिती नसून श्रीशिवाजी महाराजांचे वेळींही त्यांचा तत्कालीन स्वराज्यस्थापनेच्या महाराजांचें कार्यांत चांगला हातभार होता असें दिसते. या मोहिमेची योजना आंखण्याकरितां महाराजांनीं आपले मुत्सद्दीं व सेनानायक एकत्र जमविले होते. त्यांची यादी कै. मोडक यांनीं "प्रतापगडचें युद्ध" या पुस्तकांत दिलीच आहे. त्यावरून त्यापैकीं बरेचसे ब्राह्मणच होते असें दिसून येते. या बाबतींतील त्यांच्याशी झालेल्या संभाषणासंबंधीची माझी आठवण पुन्हां एकदां खरी करून घेण्याकरितां मी त्यांना बेळगांवास पत्रेंही पाठविली होती, पण ते तेव्हां आजारीच असल्याचें समजून आले व नंतर लौकरच ते कैलासवासी झाले.

एकदां मी दिवसाचेच गाडीनें पुण्याहून मिरजेचें बाजूस येत असतां कॅ. मोडकही त्याच गाडीनें प्रवास करीत होते. गाडींत मी आहे असें कळतांच अर्थातच गाडींत आमच्या गप्पागोष्टी व्हाव्यात हें स्वाभाविकच होते. त्यावेळीं नुकतेंच पुण्यास "श्रीशिवाजी मिलिटरी प्रिपरेटरी स्कूल" निघालेलें होते. डेहराडूनलाही एक शाळा होती. अशा प्रकारें लष्करी शिक्षणाच्या शाळा आपल्या देशांत निघत आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे असें मी त्यांना म्हटलें. तेव्हां "अशा शाळांना आपण लष्करी शाळा म्हणता?" असे त्यांनीं उद्‌गार काढून मोठे आश्चर्य प्रगट केलें. इंग्लंड अमेरिका किंवा कोणत्याही युरोपीय व अमेरिकेमधील देशांत अशा प्रकारचें कवाईत, निशाण मारणें वगैरेचें शिक्षण साध्या शाळांतून मुलांना मिळतें. श्रीमंत मुलाकरितां असलेल्या शाळांतून वरील शिवाय घोड्यावर बसणें निशाण मारणेंही शिकविलें जाते. पण हें लष्करी शिक्षण नसून सर्वसाधारण माणसाला परदेशांत जें शिक्षण मिळतें तेंच असतें असें मोडक म्हणाले. आम्हांला लष्करी शिक्षण म्हणूनच अशाप्रकारचें शिक्षण लहानपणीं दिलें गेलेलें; तेव्हां कॅ. मोडक यांचे वरील उद्‌गाराचे नवल वाटलें पण लगेच ते पुढें म्हणाले, "खरें लष्करी शिक्षण म्हणजे लष्करची रचना लढाईचे व्यूह रचणें, हल्ले व प्रतिहल्ले, किल्ले बांधणें व ते लढविणें, तोफखाना

व रिसाला यांची सर्वांगीण माहिती, दारूगोळा कसा तयार करावा याची माहिती, सैन्याच्या मोठ्या प्रमाणावर हालचाली कशा कराव्या याची माहिती इत्यादि गोष्टींना लष्करी शिक्षण म्हणतां येईल." कै. मोडक यांची विचारसरणी किती सरळ व बरोबर होती! त्यामुळें माझ्या डोक्यांत चांगला प्रकाश पडला व आपण खऱ्या लष्करी शिक्षणापासून किती दूर व मागें आहों याची पुरेपूर कल्पना आली.

## २

# हिज् हायनेस् श्रीमंत सदाशिवराव खासेराव पवार, अधिपति, देवास.

कै. मोडकांच्या निधनानें सैनिक शास्त्राचा एक निष्ठावंत आणि उद्यमशील व्यासंगी इहलोकांतून नाहींसा झाला याबद्दल मनास वाईट वाटतें. त्यांचा व माझा परिचय व त्यांचेविषयीं माझा वैयक्तिक अनुभव मी ग्वाल्हेर येथें असल्यावेळेपासूनचा आहे.

सैनिक वृत्तीस साजेसा बाणेदारपणा हा रा. मोडक यांचे अंगचा विशिष्ट गुण होता. आपल्या बरोबरीच्या अधिकाऱ्यांचा वरचढपणा ते कधींच सहन करीत नसत आणि या स्वभावविशेषापायीं त्यांना आपल्या सांसारिक उत्कर्षासहि मुकण्याचें प्रसंग आले परंतु त्यांची त्यांनीं कधींच क्षिती बाळगली नाहीं.

हिंदुस्थानी लोकांविषयीं एक अशी कागाळी करण्यांत येतें कीं, त्यांना सैनिक जीवनाची आवडच नाहीं व म्हणून ते सैन्यांत भरती होत नाहींत. ही कागाळी सर्वस्वी निराधार असून हिंदुस्थानी लोकांच्या एतद्विषयक उदासीनतेचें खरें कारण पुढें मांडण्याची व ते विश्वसनीय पुराव्याच्या आधारावर सिद्ध करून टीकाकारांची तोंडें बंद करण्याचीं महत्त्वाची कामगिरी रा. मोडक यांनीं बजाविली आहे. हिंदुस्थानच्या सैनिक खात्यांत होत असलेला खर्च, कार्यक्षमता कमी न होऊं देतां कसा कमी करितां येईल ही गोष्टदेखील रा. मोडक यांनीं आंकड्यांच्या आधारानें सिद्ध करून दाखविली आहे.

हिंदुस्थानच्या तरुण पिढीस सैनिकशास्त्राचा पद्धतशीर अभ्यास करण्यास संधि मिळावी व याबाबतींत विश्वविद्यालयांनीं पुढाकार घ्यावा म्हणून रा. मोडकांनीं अविश्रांत परिश्रम केले.

या सर्व कारणांमुळें रा. मोडकांच्या निधनाबद्दल महाराष्ट्रास हळहळ वाटावी हें साहजिकच आहे.

## ३

# सरदार माधवराव वि. किबे, इंदूर.

कै. कॅप्टन गणपतराव मोडक यांचा माझा परिचय माझे सन्मान्य व पिढीजाद मित्र जनरल राजा नानासाहेब राजवाडे, सी. बी. ई.–जे ग्वाल्हेर फौजेचे सेनापती त्यावेळीं होते, त्यांच्या घरीं झाला. त्या दिवसांत मला लष्करास वारंवार जावे लागत होते व प्रत्येक खेपेस जनरलसाहेबांच्या घरीं मुक्काम लांबत असें. त्यावेळीं बहुधा रोज कॅप्टन मोडक यांची गांठ पडत असे व युद्धकौशल्य, कला व रचना या विषयांवर बोलणीं होत असत. “ मराठी इतिहासांत वर्णिलेलीं युद्धें ” हा त्यांच्या मननाचा विषय असें. आपल्या इकडील बखरींतून युद्धाच्या प्रत्यक्ष मांडणीबद्दल खुलासे कमी–नाहींच–म्हटलें तरी चालेल, तरी पण बारकाईनें शोध करून व त्यांत आपल्या वाचनाची, निरीक्षणाची आणि युद्ध–कल्पकतेची भर घालून त्यांनीं प्रतापगडच्या युद्धावर मौलिक ग्रंथ लिहिला; त्यांस परमेश्वरानें दीर्घायुष्य दिलें नाहीं त्यामुळें पुढील पिढीची मोठी हानी झाली आहे. त्यांचे उदाहरण स्फूर्तिदायक होवो व त्यांचें कार्य पुढें चालविणारा कोणी निघो अशीं आशा प्रगट करितों. त्यांची युद्धविषयक कल्पना योजना–सैन्याच्या तीन अंगावर पायदळ, घोडेस्वार व तोफखाना–उभारलेली होती. हल्लीं अर्थातच विमानामुळें ती चतुरंग झाली आहे, पण त्यांच्या बुद्धीनें तिचेहि आकलन केलें असतें.

१९।७।१९४३

## ४

# श्री. द. गो. जोशी, बंगलोर

सन १९०५ किंवा १९०६ सालांतली गोष्ट. बेंगळुरांत प्रो. शंकररावांची कार्लेकर सर्कस खेळ करीत होती. शंकररावांची व कै. मोडकांची विशेष ओळख असल्यामुळें मी व तात्या शंकररावांना भेटण्यासाठीं त्यांच्या मुक्कामीं गेलो. तात्यांच्या भेटीमुळें त्यांना फार आनंद झाला. आणि दिवसाच्या खेळाला येण्याविषयीं आग्रह झाल्यामुळें आम्ही दोघेही खेळास उपस्थित होतों. त्या दिवशी खेळास पुष्कळ गर्दी होती. बरीच बडी बडी मंडळी आली होती. शंकररावांनीं आम्हां दोघांस खुर्च्यांच्या रांगेंत बरेंच पुढें बसविलेले होते स्वतः शंकररावच 'रिंग'मध्यें होते. त्यादिवशीं म्हैसूर संस्थानचें चीफ् कमांडंट हेस राजर्स ( म्हैसूर महाराजांचे मेहुणे ) हेहीं प्रयोगास आले होतें. त्या दिवशींचा एकंदर खेळ व जनावरांचे काम फारच प्रेक्षणीय झालें. शेवटचा प्रयोग व्हावयाचा होता, पिंजऱ्यावरच्या नोकरानें पिंजरा उघडतांच सिंह, वाघ व इतर जनावरें रिंगणांत आली व कामें सुरू झाली. मध्येंच शंकररावांनीं चाबकाचा एक फटकारा सिंहिणीला दिला. त्याबरोबर ती सिंहीण एकदम चवताळलीं व तिनें एकदम रिंगणांतून कठड्याबाहेर उडी मारली; झाले, सगळे लोक एकदम घाबरले. खुर्चीवर तात्या बसले होते, त्यांनीं ताडकन् उडी मारून एकदम त्या सिंहिणीजवळ येऊन आपल्या कंबरेंतील बेल्टनें सिंहीणीच्या गळ्याला विळखा घातला; १–२ मिनिटांच्या अवधींत एवढा प्रकार झाला. पट्ट्याचा विळखा घालून आपल्या उजव्या पायाची एक लाथ त्यांनीं सिंहिणीवर हाणली, इतक्यांत शंकरराव व रिंगणांतील मंडळीं धांवून आली व त्यांनीं मग युक्तीनें सिंहिणीला पिंजऱ्यांत कोंडलें. अशा रितीनें त्यावेळचें लोकांवर आलेलें संकट तात्यांच्या अचूक धाडस व समयसूचकतेमुळें टळलें. प्रेक्षकांपैकीं बडेबडे लोक व चीफ कमांडर यांनीं तात्यांच्या ह्या धाडसाबद्दल फार तारीफ करून पाठ थोपटली. शंकररावांनीं तर तात्यांच्या धाडसाची मुक्तकंठानें प्रशंसा करून संकट टळल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानले. खूष झालेल्या चीफ् कमांडरनीं

तात्यांना आपल्या भेटीस बोलाविले. आणि तुमच्यासारखा धाडसी व पाणिदार तरुण आमच्या सैन्यांत दाखल व्हावा असा सवाल केला. आपल्या मनांतील हेतु अनायासे सफल होण्याचा योग आलेला पाहून, तात्यांनीं ताबडतोब होकार दिला. ह्या होकाराची हकीकत तात्यांनीं आपले स्नेही कृष्णॅअर्स ( कर्नल म्हैसूर मिलिटरी ) यांना सांगितली तेव्हां त्यांनीं तात्यांचे हार्दिक अभिनंदन केलें व स्वतः पुष्कळ खटपटही केली. नंतर म्हैसूरचे महाराज व युवराज यांनीं तात्यांना शिकारीला स्वारीबरोबर नेले. तात्यांनीं आपल्या लष्करांत यावें अशी युवराजांची इच्छा होती; परंतु कांहीं कारणामुळें हा संबंध जुळून आला नाहीं.

५

# कॅ. मोडक व स्कीन कमिटी

[ लेखक : श्री. त. कट्टी, ग्वाल्हेर ]

१९०८ पासून कै. मोडक ग्वाल्हेरच्या फौजेंत काम करूं लागले. प्रस्तुत लेखकाचा परिचय तेव्हांपासूनचा आहे. तात्या डॉ. सदाशिवराव चिंतामण लेले; त्यावेळचे हेल्थ ऑफिसर लष्कर–ग्वाल्हेर, यांजकडे नेंहमीं येत असत. मी त्यावेळेस कॉलेजांत विद्यार्थी होतो; व डॉ. लेले यांजकडे रहात असे. तो काळ स्वदेशी चळवळीचा होता. डॉ. लेले अंतर्बाह्य स्वदेशीचे पुरस्कर्ते असून त्यांना त्या वेळेस चहासुद्धा घरीं झालेला खपत नसे. पण अद्यावत् युरोपियन पोषाखांत चिरूट किंवा सिगारेट फुंकीत तात्या त्यांजकडे आले तर चहा हटकून मिळे. तात्यांचे बहिरंग नखशिखांत युरोपियन असे. स्नानसंध्याशील डॉक्टर लेल्यांना युरोपियन राहणीचा अत्यंत तिटकारा असे. पण तात्यांच्या बाबतींत मात्र त्यांची वागणूक अगदीं निराळी असे. बरेच दिवस हें कोडें आम्हांस उलगडलें नव्हतें. पण जसजसा तात्यांचा परिचय वाढूं लागला तसतसें त्यांच्याबद्दल प्रेम व आदरही वाटूं लागला. बहिरंग पाहतां नखशिखांत युरोपियन पण अंतरंग ज्वलज्जहाल देशभक्ताचें. राष्ट्रीय सैन्याचें एकमेव ध्येय मनांत वागवून नाना तऱ्हेच्या अडचणी व अपमान सोसून तात्या फौजेंत शिरले होते. मराठ्यांनीं केलेले पराक्रम कोणत्याहीं देशांतील वीरांना अभिमानास्पद आहेत,अशी त्यांची खात्री होती. परकीय इतिहासकारांनीं लिहिलेलीं विकृत वर्णनें वाचून त्यांना संताप येत असे. युद्धशास्त्रास अनुसरून बखरींचें व ऐतिहासिक साधनांचें त्यांनीं अध्ययन सुरू केलें. शिवाजीपासून सवाई माधवरावापर्यंत–प्रतापगडापासून खर्ड्यापर्यंत बहुतेक महत्त्वाच्या युद्धांचीं टांचणें व नकाशे त्यांनीं तयार केले.

महायुद्ध संपेपर्यंत शेंकडों हिंदी तरुणांना हंगामी फौजी अधिकाऱ्यांच्या जागा मिळाल्या. पण युद्ध संपतांच ब्रिटिश सरकारची नीति पूर्वीसारखीच

संकुचित व ताठर झाली. फक्त १० हिंदी तरुणांना सँढर्स्टचेंशिक्षण व कमिशन देण्यांत येईल असें जाहीर झालें.

फौजेमध्यें हिंदी तरुणांचा अधिकारी या नात्यानें प्रवेश कसा होईल इकडे आतां तात्यांचें लक्ष वेधलें.

१९२१ त मांटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा सुरू झाल्या, पण लोकांतील असंतोषही वाढून असहकारांत त्याचें पर्यवसान झालें. कॉंग्रेसचा कौन्सिल बहिष्कार कांहीं वर्षें राहिला पण पुढील निवडणुकींत कॉंग्रेसनें आपलें धोरण बदलून कौन्सिल प्रवेश केला व दास, नेहरू, केळकर यांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्यपार्टी स्थापिली. फौजेसंबंधीं सरकारी धोरणावर कडक टीका सुरू झाली. हिंदी तरुणांस फौजेंतील अधिकाऱ्यांच्या जागा कशा देतां येतील व हळूहळू फौजेचें हिंदीकरण ( Indianisation ) कसें करतां येईल यासंबंधीं कांहीं योजना ठरविण्याकरितां जनरल स्कीन यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिती नेमण्यांत आलीं. पं. मोतीलाल नेहरू, वगैरे मंडळी या कमिशन-मध्यें प्रथम होती. पण सरकारी कोणत्याही कामांत भाग घ्यावयाचा नाहीं असा कॉंग्रेसचा फतवा निघाल्यामुळें यांनीं आपली नांवें काढून घेतली. त्यांच्याऐवजीं दुसरें सभासद झाले व समितीचें काम चालू झालें.

प्रथम कमिटीनें एक विस्तृत प्रश्नपत्रिका प्रसिद्ध केली व तज्ञ लोकांकडून त्यांचीं उत्तरें मागविलीं. असली संधि कै. तात्या फुकट थोडीच जाऊं देणार होते! त्यांनीं या संधीचा पूर्ण फायदा घेऊन रात्रंदिवस अध्ययन करून पत्रिकेंतील सर्व प्रश्नांचीं सांगोपांग उत्तरें आधारांसह कमिशनकडे टाइप करून पाठविलीं.

कमिशननें आणखी खुलासा करून घेण्याकरितां उत्तरें पाठविणाऱ्यांपैकीं कांहीं जणांच्या तोंडी साक्षी घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें लोकांस—सरकारी व बिनसरकारी—दिल्लीस पाचारण केलें. कै. मोडक यांचीं लेखीं उत्तरें अत्यंत सडेतोड व मूलग्राही असल्यामुळें त्यांसही तोंडी साक्षीकरितां दिल्लीस कमिशनकडून बोलाविण्यांत आलें. प्रस्तुत लेखकांस तात्यांनीं आपल्याबरोबर नेलें होतें; आणि आपला सेक्रेटरी म्हणून कमिशनचे अ. सेक्रेटरी क. लुंबी यांच्याशीं माझा परिचय करून दिला, व कमिशनचें काम चालू

असतां आपल्याजवळ मला बसविण्याची परवानगी घेतली. यामुळें तात्यांची तोंडी साक्ष ऐकण्याचा सुप्रसंग मला प्राप्त झाला.

कॅ. मोडकांचें नांव या साक्षीमुळें हिंदुस्थानभर गाजलें. या गोष्टीस १८ वर्षें होत आलीं पण अजूनहि माझ्या कानांत तात्यांची दणदणीत उत्तरें घुमत आहेत. या साक्षीमुळें तात्यांचा हजरजबाबीपणा, युद्धशास्त्राचा खोल अभ्यास, इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन, आंग्लभाषाप्रभुत्व, वाद कुशलता आणि राष्ट्रीय सैनिकीकरणाची तळमळ यांचें प्रत्यक्ष दर्शन झालें. मिलिटरी खात्यावरील बुरखा दूर करून त्याचें राष्ट्रविघातकी स्वरुप तात्यांनीं उजेडांत आणलें. इंग्रजांपुढें आपण अगदीं नादान आहोंत अशी समजूत उराशीं घट्ट बाळगून असलेल्या हिंदी नेत्यांतहि आत्मविश्वास उत्पन्न केला.

त्यांची साक्ष ३-३॥ तास चालली होती. स्कीन कमिटीच्या शिफारशी पुढें प्रसिद्ध झाल्या पण प्रोसिडिंग्ज प्रसिद्ध नाहींत. तात्यांच्या साक्षींतील कांहीं महत्त्वाचीं प्रश्नोत्तरें मी येथें देत आहे.

आरंभीं अब्दुल कयूम, हें पुढें 'सर' झालें व सरहद्द प्रांतांत मिनिस्टर झाले,यांनीं Martial व Non- Martial लढाऊ व बिनलढाऊ जातींसंबंधीं प्रश्न विचारले. तात्यांनीं आपल्या लेखी उत्तरांत हा भेद कृत्रिम—केवळ हिंदुस्थानांत मुद्दाम उत्पन्न केलेला आहे असें लिहिलें होतें. ' ज्यांच्या कुलांत युद्ध करण्याचें सातत्य व परंपरा ( Traditions ) नाहींत ते लोक लढवय्ये ( Martial ) कसे बनतील ? ' मोडकांनीं उत्तर दिलें, 'संधि दिली असतां कोणीहि मनुष्य उत्तम शिपाई होऊं शकतो. मार्शल नॉन मार्शल हा भेद किती कृत्रिम आहे याचें थोडक्यांत उदाहरण मी देतों. समजा एक हिंदु बिनलढाऊ ( Non martial ) आपल्या धर्मास चिकटून राहातो व त्याचाच भाऊ मुसलमान किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारतो. या दोन्ही धर्माच्या लोकांना त्यांच्या परंपरेकडे लक्ष न देतां लढवय्ये समजण्यांत येतें. अर्थात् वरील उदाहरणांतील हिंदुही मुसलमान अथवा ख्रिश्चन धर्मांत धर्मांतरित होऊन एकदम लढवय्या बनतो आणि त्याचाच धर्मनिष्ठ भाऊ ' बिन लढवय्या ' समजला जातो ! आपण सर्व लोक विज्ञान युगांतील आहांत असें मी समजतों. मुसलमान किंवा ख्रिश्चन या धर्मांच्या केवळ दीक्षासंस्कारानें किंवा बाप्तिस्म्यानें एका ' बिन लढाऊ ' चें

'लढाऊंत' परिवर्तन होतें असें या विसाव्या शतकांत आपण मानावयास तयार आहां काय?' हा उलट प्रश्न ऐकून सारे सभासद स्तंभित झाले इतकेंच नव्हे तर अध्यक्ष जनरल स्कीन यांनीं उठून सांगितलें कीं, 'Gentlemen, no more questions on the point martial & non-martial races please. It has now been dealt with threadbare' 'सभ्य गृहस्थहो, 'लढाऊ, बिन लढाऊ,' जातींसंबंधीं यापुढें कोणीहि कृपा करून प्रश्न करूं नयेत. या प्रश्नाच्या आतां चिंधड्या होऊन गेल्या. त्यांत कोणताहि विचारणीय मुद्दा राहिला नाहीं.' तरी कांहीं सभासदांनीं आपले ठेवणीचे प्रश्न मोडकांना कुंठित करण्याच्या हेतूनें खोंचकपणानें केलेच. कॅ. हिरासिंग म्हणाले, 'कां हो मोडक! ब्राह्मण व बनिया यांनीं लढाया केल्याचीं उदाहरणें हिंदुस्थानच्या इतिहासांत आहेत काय? पेशव्यांचेच एक उदाहरण मला माहीत आहे.' मोडक—'सैनिक होण्याकरितां पूर्वी कोणतेही जातिनिर्बंध नव्हते. अठरापगड जातींना प्रवेश मिळूं शके. अकबराचा प्रख्यात प्रतिस्पर्धी हेमू हा बनिया होता. मुसलमान होऊन तो त्यावेळच्या राजकारणांत शिरला. तो उत्कृष्ट सेनापति होता. दुसऱ्या पानिपतापूर्वीं त्यानें बावीस लढाया जिंकल्या होत्या. शिवाजीचे अष्टप्रधान बहुतेक ब्राह्मण होते व ते जसे राजकारणांत मुत्सद्दी तसेच उत्कृष्ट सेनापतिही होते. अकबराचे मंत्रीहि जसे वीर तसे मुत्सद्दी होते. राजा बीरबल ब्राह्मण होता. व तोडरमल्ल बनीया किंवा खत्री होता. काबूलसारख्या प्रांताचे हे सुभेदार नेमले जात. पेशव्यांचे वेळेस तर ब्राह्मण सेनापती पुष्कळ होते. शेंकडो ब्राह्मण सेनापतीचीं नांवें मी आतां सुद्धां सांगूं शकेन!' ('I bow to your knowledge of Indian history') 'आपली माहिती, हिंदी इतिहासाचें आपलें ज्ञान–मला सर्वस्वी मान्य आहे', असें दुसऱ्या एका सभासदानें म्हटलें आणि मोडकांना विचारलें 'शील' (Character) व शिस्त (Discipline) यांचे योग्य शिक्षण मिळण्याकरितां हिंदी विद्यार्थ्यांचें सँढर्स्टला जाणें आपणास आवश्यक वाटत नाहीं काय? इंग्लिश विद्यार्थ्यांबरोबर रहाण्यानें या गुणांचा लाभ येथील विद्यार्थ्यांस अधिक होणार नाहीं काय?

हा प्रश्न ऐकतांच कॅ. मोडक किंचित् गरम झाल्यासारखे दिसले, ते

म्हणाले, ‘आपण सर्व हिंदी सभासद कोणत्या ना कोणत्या तरी युनिव्ह-र्सिटीचे पदवीधर किंवा विद्यार्थी आहांत असें मी समजतों. हिंदी युनिव्ह-र्टीचा विद्यार्थी शीलरहित असतो अशी आपली समजूत आहे काय? चंद्रगुप्त, अशोक, हर्षांच्या वेळेपासून सर्व परकीय प्रवाशांनीं हिंदी मनुष्या-च्या शीलाची वाखाणणी केली आहे. आज देखील आपणांस कोणी शील-रहित ( Devoid of Character ) म्हणू शकेल काय? शिस्त तर साधी गोष्ट आहे. ती शिक्षणानें सुलभ साध्य आहे.’

“ You are an embodiment of Indian Character, Capt. Modak. ’ “ हिंदी चारित्र्याची आपण मूर्ति आहांत.”—स. जोगेंद्रसिंह म्हणाले. “ शीलाकरितां कोणा परक्या देशाकडे आपणास पहावयास नको,” असेहि त्यांनीं उद्गार काढले.

फौजेची भाषा रोमन–उर्दू काढून हिंदी व लिपी नागरी ठेवावी यावर तात्यांचा कटाक्ष होता. कांहीं सभासदांनीं इंग्लिश भाषेवर जोर दिला व काँग्रेस पुढारी आपसांत इंग्रजींत बोलतांत, व काँग्रेसचें काम देखील त्याच भाषेंत चालतें; असें म्हटल्यावर मोडकानीं हिंदी भाषा आसेतु हिमाचल अनादि कालापासून कशी बोलली जाते, सर्व प्रांतांतील प्रवासी व यात्रेकरू त्याच भाषेचें कसें अवलंबन करतात व संस्कृत बहुसंख्य हिंदूंची धर्मभाषा असल्याभुळें नागरी लिपीच्या व संस्कृतो-त्भव हिंदीचा पगडा देशाच्या बहुतेक भागांत कसा आहे व हिंदी भाषाच राष्ट्रीय होण्यास कशी लायक आहे हें सोदाहरण सांगितलें.

“ सँढर्स्ट्सारखी कॉलेजें हिंदुस्थानांतच पाहिजेत. हिंदी विद्यार्थ्यांस विलायतेंत पाठविण्याचें कांहीं कारण नाहीं. युद्धशास्त्रवाङ्मय सर्व प्रांतिक भाषांतून विशेषतः हिंदीत प्रसिद्ध केलें पाहिजे. युनिव्हर्सिटयांनीं युद्धशास्त्र आपल्या अभ्यास क्रमांत ठेवल्यास वाटेल तितके युद्ध वाङ्मय तयार होईल, मागणीप्रमाणें पुरवठा होतोच. युद्धवाङ्मयाकरितां जर्मनी, जपान अथवा चीन इंग्लंडवर किंवा इंग्रजी भाषेवर अवलंबून आहेत काय? ज्या गोष्टी त्या देशांस करतां आल्या त्या हिंदुस्तानांस का करतां येऊ नयेत? कितीसे जर्मन किंवा रशियन किंवा फ्रेंच सँढर्स्टमध्यें जातात?” असे उलट प्रश्न विचारून मोडकांनीं सभासदांची तोंडे बंद पाडली.

युद्धशास्त्र शिक्षणाचीं साधनें व अध्यापक जितके इंग्लंडमध्ये उपलब्ध आहेत तितके या देशांत कोठून मिळणार ? या प्रश्नास मोडकांनीं उत्तर दिलें. "आज देखील कांहीं अध्यापक येथें मिळूं शकतील. हिंदुस्तानसारखा सर्व बाजूंनीं समृद्ध देश सर्व तऱ्हेचीं साधनें उत्पन्न करूं शकेल. कांहीं दिवसांकरितां युरोपिअन किंवा इंग्रज अध्यापक व कारागीर यांवर अवलंबून राहावे लागेल. पण ३-४ वर्षांपेक्षां जास्त काल याला लागणार नाहीं.

युद्धशास्त्राचीं तत्वें, महाभारत, अलेक्झांडर हॅनिबालपासून आतापर्यंत एकच आहेत. ती त्रिकालाबाधित आहेत. फक्त शास्त्रीय शोधांमुळें युद्ध-साधनांत हत्यारें, शस्त्रास्त्रें व दळणवळणाची साधनें यांत फरक होत असतो. या फरकामुळें युद्धशास्त्र बदलत नाही. हॅनिबालनें जे डावपेंच लढविले असतील तेच शिवाजीनें किंवा नेपोलियननें अवलंबिले आहेत असें आपणांस आढळून येईल. हिंदी विद्यार्थ्यांचें आपल्या देशाचें रक्षण करणें हें आद्य कर्तव्य आहे. त्यांना येथील भौगोलिक परिस्थितीचें व रणभूमिचें अध्ययन करणें जास्त आवश्यक आहे. जेना ऑस्टर्लिट्झ, वॉटर्लू या लढायांच्या अभ्यासापेक्षां त्यांना बाबर-अकबर, प्रताप, शिवाजी, बाजीराव, महादजी शिंदे, रणजितसिंह, हैदर, टिपू, क्लाइव्ह, ऑर्थर वेलस्ली, हार्डिंज, लॅरेन्स वगैरे योद्धयांच्या लढाया अभ्यासिल्या पाहिजेत. यासंबंधीं सध्या पुस्तकांची उणीव आहे, ही गोष्ट खरी. पण ही उणीव कशी दूर करतां येईल हें पूर्वी सांगितलेच आहे."

हिंदी शिपाई किंवा ऑफिसर इतर कोणत्याही दृष्टीनें इंग्रजांहून किंवा इतर कोणत्याही देशांतील मनुष्यापेक्षां कार्यक्षमतेंत ( Efficiency ) कमी नाहीं हें गेल्या महायुद्धांत पूर्णपणें व्यक्त झालें आहे. इतकेंच नव्हे तर हवापाणी व परिस्थिति अत्यंत प्रतिकूल असतांही जर्मनसारख्या जगांतील नामांकित शूर सैनिक व अधिकारी यांच्याशीं उघड सामना करून हिंदी लोकांनीं त्यांना कित्येक वेळां धूळ चारली आहे. असे सैनिक व अधिकारी आपल्याच देशांत सर्वस्वी अनुकूल परिस्थितींत कसे नालायक ठरतील ? संधि मिळण्याचा अवकाश आहे. कोणताही हिंदी मनुष्य वाटेल त्या परि-स्थितींत आपली कार्यक्षमता दाखवूं शकेल.

गेल्या महायुद्धाप्रमाणें इंग्लंडवर पुन्हां संकट उत्पन्न झाल्यास येथील

काळी गोरी सगळी फौज तिकडे जाईल, सुदैवानें गेल्या युद्धांत जपान इंग्लंडचा दोस्त राहिल्यामुळें हिंदुस्थानवर विशेष आपत्ति आली नाहीं.

एम्डेननें हिंदुस्थानची दुर्बलता—सर्वस्वी परावलंबिता जगजाहीर केली. जपानची दोस्ती कायम राहिली. अमेरिका युद्धांत इंग्लंडच्या बाजूनें पडली आणि जर्मनीचें अपेक्षेपेक्षांही लवकर उपासमारीनें धैर्य गळालें म्हणून हिंदुस्थान निभावले, जपान त्या वेळेस उलटला असतां तर हिंदुस्थानचें काय झालें असते ? अशा प्रसंगाकरितां हिंदुस्तानांत राष्ट्रीय—हिंदी सैन्य-सेना व अधिकारी सर्वस्वी हिंदी पाहिजेत. हिंदी लोकच आपल्या देशाचें रक्षण करूं शकतील. भाडोत्री सैन्यावर याबाबतींत अवलंबून राहतां येत नाहीं हें इतिहासांतील अनेक उदाहरणांवरून आपणांस दाखवितां येईल.

हिंदुस्तानचें मनुष्यबळ एवढें मोठें आहे कीं, त्याचा उपयोग केवळ हिंदुस्तानाकरितांच नव्हे तर इंग्लंडला कोणत्याही आक्रमक राष्ट्रांविरुद्ध करतां येईल. इंग्लंडनें थोडी दूरदृष्टि ठेविली पाहिजे. स्वावलंबी हिंदुस्तान त्यांचा मित्र राहून जगाची शांतता राखण्यास तयार राहील."

अशा तऱ्हेचा मोडकांचा अनेक प्रश्नांच्या उत्तरादाखल वाक्प्रवाह चालू होता. सारे सभासद त्यांचे कोटीक्रम, सूक्ष्म अध्ययन व राष्ट्रीय सैन्याची त्यांची ध्येयनिष्ठा पाहून चकित झाले. कांहीं तर गहिंवरले, व त्यांनीं सैन्यांत प्रवेश कसा केला, कोठें अध्ययन केलें वगैरे त्यांच्या पूर्वचरित्राची माहिती विचारली.

ही माहिती देत असतां ब्राह्मण म्हणून म्हैसूर, हैद्राबाद, बिकानेर, इंदूर वगैरे ठिकाणीं त्यांना कसा मज्जाव झाला, सिकंदराबाद, बंगलोर महू वगैरे टिकाणीं ब्रिटिश छावणींत तर साधा सैनिक म्हणून सुध्दां प्रवेश मिळणे कसें कठीण झालें, ब्राह्मण आणि त्यांत चित्पावन म्हणून कशा दुर्लंघ्य अडचणी उत्पन्न करण्यांत आल्या; शिक्षण व सर्व तऱ्हेची लायकी अजमावून मग प्रवेश करावा म्हणून विनविले असतां ही त्यांची विनंति कशी झिडकारण्यांत आली आणि शेवटीं ग्वाल्हेर महाराजांच्या सौजन्यानें प्रवेश कसा मिळाला याचे त्यांनीं मोठें मनोरंजक वर्णन केलें व त्याच वेळेस ब्रिटिश धोरणावर विदारक प्रकाश पडला. त्यावेळच्या हिंदुस्तान टाइम्सनें यांच्या साक्षीचें फार कौतुक केलें होतें. कमिशन मिळण्याबद्दल कितीदां

'गड–सासवड ' करावा लागला याचें वर्णन हिंदुस्तान टाइम्सनें या शीर्षकांत दिलें होते. Indian Gentleman driven from post to pillar & pillar to post for commisson in the Army

साक्ष आटोपल्यावर प्रत्येक सभासदानें–अध्यक्षासुध्दां मोडकांचें हस्तांदोलन करून सैनिक प्रश्नासंबंधीं नवी व बहुमोल माहिती दिल्याबद्दल व नवी दृष्टि दिल्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें व आभार मानले कांहीं जणांनीं त्यांच्या सहवासाचा अधिक लाभ घेतां यावा, म्हणून त्यांना लंचकरितां, कोणी डिनरकरितांस आमंत्रणें दिलीं. परंतु तात्यांना मुळींच वेळ नसल्यानें व संध्याकाळीं परत ग्वाल्हेरीस जाण्याचे असल्यानें आमंत्रणाचा स्वीकार करतां येत नाहीं, त्याबद्दल खेद प्रकट करून व त्यांचे आभार मानून महाराष्ट्र स्नेहसंवर्धक समाजाकडे वळलें व थोडासा उपहार करून आम्ही दोघे गाडीची वेळ झाली असल्यानें ग्वाल्हेरीस परत जाण्याकरितां स्टेशनकडे गेलों.

६

# महाराजपूर लढाईचीं टिपणें

[ लेखक : डॉ. ल. शं. भावे ]

कै. कॅ. मोडक यांची हिंदुस्थानांतील तरुणांस युद्धेतिहास व युद्धशास्त्र शिकविलें जावें यासंबंधींची तळमळ आणि अविश्रांत खटपट सर्वविश्रुत आहे. त्यांच्या प्रयत्नांचें चीज देशाच्या दुर्दैवानें झाले नाहीं ही गोष्ट वेगळी.

ते स्वतः आपल्या हाताखालील व इतर उत्सुक अधिकारी मंडळीस आपल्या या विषयावरील ज्ञानाचा कसा फायदा करून देत, नवी दृष्टि आणून देण्याचें कार्य किती सफाईनें करीत, याचे एक उदाहरण म्हणून त्यांच्या शिष्य वर्गाकडून मिळालेल्या दैनंदिनींतील उतारा उधृत केल्यास नवीन युद्धशास्त्राच्या अभ्यासकास खास मार्गदर्शक होईल. विषय महाराजपूर युद्धभूमीची सफर हा आहे.

" महाराजपूर हें गांव ग्वाल्हेरहून वायव्य दिशेस १५ मैलावर आहे. येथें सन १८४३ चे डिसेंबर मध्यें दि. २९ रोजीं शिंदे व इंग्रज यामध्यें युद्ध होऊन शिंद्यांचा पूर्ण पराभव झाला. युद्धेतिहास संशोधनाचें दृष्टीनें दिनांक २९–५–३२ रोजीं आम्ही नकाशे कंपास वगैरे बरोबर घेऊन गेलो. कॅप्टनसाहेब यावयाचें आधीं आम्ही तेथील, ले. क. सॉंडर्स ( रॉयल इंजीनिअर ) व कर्नल चर्चिल यांची स्मारकें पाहिलीं व त्यावरील स्मृतिलेख वाचले. तात्या ( कॅ. मोडक ) आल्यानंतर त्यांनीं नकाशे सेट केले, रा. × × यास महाराजपूर युद्धक्षेत्राचें रेंज फाइंडरनें रेंज घेण्यास सांगितले. रा. × याना युद्ध क्षेत्राचे स्नॅप्स् घेण्यास सांगितले. व यानंतर त्यानीं युद्धक्षेत्राची रचना समजावून सांगून, महाराजपुर युद्धाचा इतिहास अस्खलित इंग्रजीमध्यें वर्णन केला त्याचा त्रोटक सारांश असा. 'या युद्धासंबंधीं विशेष हकीगत शिंदे यांचे सैन्यांतील अधिकारी लुई फर्नांडिस व इंग्रजांकडील अधिकारी ले. गॉर्डन यांच्या दैनंदिनीवरून

विशेष विस्तृत मिळते. युद्धेतिहासाच्या विद्यार्थ्यांस युद्धपूर्व राजकीय परिस्थिती ठाऊक हवी. इंग्रजांनीं कपटनीतीनें, लढाईनें, फोडाझोडा या रितीनें येथील हिंदी राज्यांचा स्वाहाकार चालविला होता, उदाहरणार्थ रणजितसिंहाशीं १८०३ मधील युद्ध, १८०४ मधील होळकरांचा पराजय १८१४ मधील गुरखायुद्ध १८२४ मधील भरतपुरचें युद्ध वगैरे.

इंग्रजांची कपटनीती जाणून ठोशास ठोसा या न्यायानें वागणारा एकही उत्कृष्ट सेनानी शिंद्यांकडे नव्हता. त्यांचे सैन्यांत फ्रेंच, रशियन, पोर्तुगीज, जर्मन वगैरे परदेशी भाडोत्री अधिकारी ६७६ होते.

केवळ गोरें–म्हणून अधिक पगार देऊन सैन्यांत अधिकारी नेमण्याची प्रवृत्ति तेव्हां फारच वाढली होती. हे लोक केवळ पगारासाठी नोकरी करीत. दुसरीकडे हा पगार दहा रुपये जास्त मिळतोसे दिसल्यास शिंद्याची नोकरी सोडण्याची त्यांची तयारी असे. शिंद्यांच्या सुखदुःखांबद्दल त्यास जिव्हाळा नसल्यास नवल काय ? यावरून अभ्यासू विद्यार्थी असा निर्णय काढील कीं श्रीमंत महादजी शिंदे यांचे कारकीर्दीपासूनच सैन्यांत भाडोत्री लोकांचा प्रवेश झाला होता व सैन्यांत स्वहिताचें महत्त्व सुटलें होते. शिंद्यांचें सैन्य संख्येनें भरभक्कम पण अकलेचे कमी व शिस्तीचा अभाव. शिवाय हेरखातें अगदींच कुचकामाचें. याबाबत सर शेक्सपीअर लिहितो. Intelligence was minus in Sindhia's Army आतां शिंद्यांचे दरबारची हकीगत पाहू—( १ ) नारिंगीबाई ही दासी इंग्रजांसाठीं शिंद्यांचें गोटांत हेरगिरी करी ( २ ) जनकोजीराव शिंदे यांचे अल्पवयी पत्नीचें मांडीवर श्रीमंत भगिरथराव शिंदे यास दत्तक दिले होते व कारभार जनकोजीराव यांचे मामा पहात, त्याजविरुद्ध इंग्रजांचे ३२ आरोप होते. ( ३ ) रामराव फाळके हे दरबार वकील म्हणून काम पहात पण इंग्रजास अनुकूल असत ( ४ ) दादा खाजगीवाले हे फार स्वाभिमानी व मराठा पातशाही तगविण्यासाठीं तळमळणारे होते; त्यास जाणून बुजून ढवळाढवळ करून इंग्रजांनीं ताब्यांत घेऊन चर्नाळ गडावर बंदीवासांत ठेविलें. ( ५ ) जीन बॉप्टिस्ट फेलोज हा शिंद्याकडील अधिकारी शेवटीं राजद्रोही ठरला कारण ई. इं. कंपनीचे चार लाखांचे भाग त्यानें विकत घेतले होते. सहाजीकच कंपनीकडे (इंग्रजाकडे) त्याचा ओढा

होता. इंग्रजांनीं शिंद्याकडील पुष्कळ अधिकाऱ्यांस फोडून वश केले होते व सुसूत्रपणें चाळीस वर्षे या धोरणाचा पाठपुरावा त्यांनीं केला.

प्री वॉर सिच्युएशनमध्यें आर्थिक परिस्थितीचा विचार प्रामुख्यानें करावा लागतो. शिंद्यांचे खजिन्यांतून तैनाती फौजेच्या खर्चासाठीं फार मोठी खंडणी द्यावी लागे. व त्यामुळें आर्थिक चणचण वाटून त्यांच्या खास सैन्यास पैशाची ओढाताण होई. व नेंहमीं असंतोष व बंडाची वृत्ति (इंग्रजांचे दृष्टीनें) असे. मिलिटरी रिसोर्सेस मोबिलायझेशन व अखेर बचावाचे हुकूम शिंद्याकडील सैन्यास नव्हतें. तैनाती फौजेची वाढ, शिंद्याचे खास सैन्य कमी करणें, तैनाती फौजेच्या खर्चासाठीं शिंद्यांकडील कायम उत्पन्नाचे प्रान्त तोडून मिळविणें व इंग्रज रेसिडेन्टाचें तंत्रानें राज्यकारभार चालविणें, अतएव शिंद्यास संपूर्ण नामधारी बनविणें, या दृष्टीनें इंग्रजांच्या हालचाली युद्धाच्या दृष्टीनें युद्धपूर्व आठ महिन्यापासून चालू होत्या. व युद्धापूर्वीं १८४३ मध्यें चंबळा नदीचे पलीकडे दिंगोना येथें तळ देऊन इंग्रज फौज बसली होती. जयाजीराव (भगिरथराव) शिंदे यांच्या व ग. ज.च्या भेटीचा दिवस चुकल्याच्या क्षुद्र निमित्तानें पूर्वींची प्रथा मोडून इंग्रज सैन्यानें सेनापती सर ह्यूगो यांचे अधिपत्याखालीं चंबळा पार होऊन शिंद्याचे राज्यांत प्रवेश केला. शिंद्याकडील सैन्य पन्यार सिमरिया या रस्त्यानें महाराजपूर येथें येऊन त्यांनीं इंग्रज सैन्यांस अडविलें. महाराजपूर हें शिंद्यांचें बचावाचें पहिलें स्थान व मुख्य तळ चोंदा येथें मागील अधिक बळकट ठिकाणीं होता.

शिंद्याकडील एकंदर १५००० सैन्यानें या लढाईत भाग घेतला व इंग्रजाकडील सैन्य १२००० होते. पायदळ, घोडदळ, घोडदळ तोफखाना हे दोघांकडे सारखेच होते. शिंद्यांच्या एकंदर सात रेजिमेन्टस् होत्या व प्रत्येक रेजिमेंटजवळ चार तोफा होत्या, जनरल सर ह्यूगो यांनीं आपल्या सैन्याचें तीन विभाग केले होते. शिंद्यांची डावी बगल कॅ. व्हॅलियंट याजकडे होती. त्यांच्याकडे दोन ग्रेनेडिअर्स एक लान्सर्स, तीन पायदळ व एक घोडदळ तोफखाना इतकी पलटणें होती. या सैन्यानें डाव्या बगलेप्रमाणें मागूनही हल्ला चढविला. समोरून हल्ला चढविण्यांत दोन गोरी व दोन हिंदी पलटणें, एक फील्ड बॅटरी डिव्हिजन व त्यास मदत म्हणून एक गोरी

व एक हिंदी व एक तोफखाना पलटण अशी मागून ठेवण्यांत आलीं या विभागाचें नेतृत्व स्वतः जनरल ह्यूगो याजकडे होते. उजव्या बगलेनें कॅ. लिटलर याचे हाताखालीं लान्सर घोडदळ अशी मिळून तीन पलटणें होती. या सैन्यानें महाराजपूरपासून आठ मैलावर कहारी नदी ओलांडून बरोबर सकाळीं आठ वाजतां महाराजपूरपासून एक मैलावर ठाणें दिलें. मराठ्यांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ केली व त्यांच्या शौर्यामुळें विजय झाला तरी बराच महागांत पडेल असे इंग्रजांनीं म्हटलें आहे. शिंद्याचें बळ एकवटूं नये म्हणून कर्नल ग्रे यांचे अधिपत्याखालीं पनियार येथील शिंदे यांच्या सैन्यावर रोबरच हल्ला करण्यांत आला होता. दैव शिकंदर म्हणूनच इंग्रजास यश आले. युद्धांत मराठ्याकडील १८३५ लोक कामास आले. त्यांनीं आपल्या ५६ तोफा व दारुगोळ्याच्या सर्व गाड्या गमावल्या. इंग्रजाकडील लहान मोठे १०६ लोक मारले गेले व ६८६ जखमी झाले. युद्धानंतरची परिस्थिति पहातां, शिंद्याकडील खडे सैन्य आठ हजारावर आणण्यात आले. खडी फौज तैनातीची दहा हजार करवून खर्चीसाठीं म्हणून अधिकाचे उत्पन्नाचें प्रांत तोडण्यांत आले व कारभारांत इंग्रजांचें वर्चस्व सर्वस्वी वाढविण्यांत आलें. अशा रीतिनें शिंद्याचे हातपाय चांगलेच बांधले जाऊन पुन्हा स्वतंत्र रीतीनें डोकें वर काढण्यची शक्यता नष्ट झाली ”

यानंतर सर्व मंडळीं ग्वाल्हेरीस छावणींत परतलो. वाटेंत तात्यानीं आमच्या लष्करी हालचाली संबंधीं विचारलेल्या अडचणींचे निवारण केले.

७

# इन्डियन नॅशनल डिफेन्स लीग

[ लेखकः—श्री. न. गं. आपटे ]

कॅप्टन गणपतराव ऊर्फ तात्यासाहेब मोडक यांच्या स्मृतिग्रंथांत इंडियन नॅशनल डिफेन्स लीगची माहिती देण्यास डॉ. पेंडसे यांनीं सुचविलें व त्याप्रमाणें लीगचे व्यवस्थेचें काम बहुतेक माझेच हातून झालें असल्यानें कॅ. मोडकांच्या राहिलेल्या या अपुऱ्या प्रयत्नाची हकीगत जनतेपुढें मांडणें हें एक कर्तव्यच ठरतें.

कॅ.मोडक यांनीं सेवानिवृत्तीनंतर स्वतःच्या आवडीचा विषय जो सैन्याचें हिंदीकरण व सार्वत्रिक शिक्षण त्यास या संस्थेमार्फत चालना देण्याचे त्यांनीं ठरविलें. याचेपूर्वी त्यांनीं वैयक्तिक असे बरेच प्रयत्न केले होते; परंतु सार्वजनिक रीतीनें चालविलेला असा हा एकच प्रयत्न होय. हा प्रयत्न करतांना कॅ. मोडक यांच्या मनांत सर्व राष्ट्रांत लष्करी बाणा भिनला जाऊन स्वराज्यप्राप्ती जवळ यावी हा होता व त्यासाठीं ते रात्रंदिवस तळमळत असत, त्यामुळें त्यांना कोणीहि आपापल्या परीनें शिकस्तीचे प्रयत्न केले तरी ते अपुरे वाटत व जास्त काम कां होऊं नये; असें त्यांना वाटे. डिफेन्स लीगचा प्रचार करतांना त्यांनीं कोणत्याहि प्रकारचें परिश्रम करण्यांत कसूर केली नाहीं.

लीगचें कार्य अवघे १-२ वर्षेंच चालूं शकलें. त्यानंतर कॅ. मोडक आजारी पडले. त्या आजारीपणांतहि त्यांना या कामाचा ध्यास असेच. या ध्यासांतच त्यांचा अकाली अंत झाला याची प्रचिती मरणाच्या आधीं १।२ दिवस त्यांची त्यांच्या निवासस्थानीं गांठ पडली असतां पहावयास मिळाली.

**कल्पनाः**—अशा प्रकारची संस्था काढावयाची मूळ कल्पना कॅ. मोडक हे महायुद्धाचेवेळीं युरोपमध्यें असतांना त्यांना सुचली. त्यावेळीं एका लष्करी मासिकांत इंग्लंडमधील ‘ नॅशनल सर्व्हिस लीग ’ संबंधींची माहिती

त्यांनीं वाचली. त्या संस्थेच्या अध्यक्षांची यादी वाचून आणि प्रत्येक खेडेगांवांपर्यंत लष्करी शिक्षण देण्याची तयारी पाहून कोणत्याहि उदयोन्मुख राष्ट्राला कशी खोल व दूरवर पसरलेली तयारी करणें आवश्यक आहे, याची कल्पना त्या लेखांवरून त्यांना आली. साहजिकच या प्रकारची संघटना आपल्या देशांत असणें किति आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना होऊन शक्य तर अशा प्रकारचा प्रयत्न येथें करण्याचें त्यांनीं ठरविलें.

कॅ. मोडक हे ग्वाल्हेर संस्थानांत नोकरीस असल्यानें नोकरींतून निवृत्त होईपर्यंत प्रत्यक्ष प्रयत्न असा त्यांना करतां आला नाहीं. सन १९३२ च्या जुलै महिन्यांत सेवानिवृत्त झाल्यावर लागलीच ' इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम ' हें पुस्तक १९३३ सालच्या मार्चच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत प्रथमतःच सार्वजनिकरीत्या कॅ. मोडक यांनीं ' इंडियन नॅशनल डिफेन्स लीग 'ची कल्पना समाजापुढें मांडली. ' इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम ' हें पुस्तकहि लीगच्या इंग्रज सरकारचें धोरण जनतेस समजावून सांगण्याच्या प्रयत्नापैकींच एक प्रयत्न होय.

पुस्तक प्रकाशनानंतर ' इंडियन नॅशनल डिफेन्स लीग ' स्थापन करण्याच्या प्रयत्नास सुरवात झाली. याच सुमारास श्री. तात्यासाहेब केळकर हे विलायतेला जॉ. पा. कमिटीसाठीं जाणार असल्याचें प्रसिद्ध झालें. त्यांनीं या प्रयत्नास प्रारंभापासूनच पाठिंबा दिला असल्यानें व ते विलायतेस जात असल्यानें या प्रश्नाचा पुरस्कार सहजच होईल, अशा समजुतीनें ता. १८ एप्रिल १९३२ रोजीं ' केसरी ' कचेरींत एक सभा बोलावण्यांत आली. त्यावेळीं श्री. केळकर श्री. लिमये, श्री. वझे, रा. ब. पाटील, तपस्वी बाबासाहेब परांजपे, प्रो. पोतदार, श्री. द. वि. आपटे, श्री. बाबुराव गोखले वगैरे मंडळी जमली होती. यावेळीं कॅ. मोडक यांना जॉ. पा. कमिटीपुढें हिंदी लोकांची लष्कराबाबत बाजू मांडण्यासाठीं पाठवावें, असा ठराव करण्यांत आला व यासाठीं द्रव्यसहाय्य जमवावें व तें जमल्यावर त्यांना या संस्थेमार्फत संस्था ताबडतोब सुरू करून पाठवावें असाहि ठराव करण्यांत आला. या कल्पनेस याप्रमाणें पुढारी लोकांकडून मान्यता मिळाल्यासारखेंच झालें.

याचवेळीं (ता. १५, १६, १७ एप्रिल १९३३) किर्लोस्करवाडी येथें तिसऱ्या ग्रामोद्धार परिषदेच्या वेळीं जी मंडळी जमली होती त्यांपैकीं श्री. किर्लोस्कर, रा. ब. काळे, तपस्वी बाबासाहेब परांजपे ही प्रमुख मंडळी होती. त्यांना लीगसंबंधीं माहिती देण्यांत आली.

वरील १८ तारखेची सभा झाल्यावर श्री. तात्यासाहेब केळकर व कै. बाबासाहेब देवधर यांनीं कॅ. मोडक यांना विलायतेस पाठविण्यासाठीं व त्यासाठीं लागणारें द्रव्यसहाय्य देण्यासाठीं आपल्या सहीनें पत्रें पाठविलीं. वरील १८ तारखेच्या सभेंत श्री. तात्यासाहेब केळकर व श्री. पोतदार यांनीं कांहीं द्रव्यसहाय्य मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. पुढें अपेक्षेप्रमाणें पैसे न जमल्यामुळें कॅ. मोडकांना विलायतेस पाठविण्याचा बेत रहित करावा लागला; पण लीगचें कार्य मात्र जास्त नेटानें सुरू झालें.

मे महिन्यांत ही लीगची योजना तयार झाली व ती पूर्णपणें कागदावर मांडली. त्या योजनेचा खर्डा श्री. केळकर, श्री. देवधर, पं. कुंझरू वगैरेंना खाजगी रीतीनें दाखविला. त्यांना तो पसंत पडला. याच खर्ड्याची माहिती जून महिन्यांत येथें जमलेल्या **भारत सेवक समाजाच्या** (सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी) सभासदांसहि देण्यांत आली. खालीं दिलेल्या तारीख ९।५।३३ च्या ' केसरीं 'तील उताऱ्यावरून लीगच्या कार्यास हळूहळू सहानुभूति कशी मिळत गेली याची कल्पना येईल. जॉइंट पार्लमेंटरी परिषदेपुढें हा प्रश्न या स्वरूपानें मांडतां येण्यासारखा आहे. तो मांडण्याचा योग कॅ. मोडक यांस लाभला तर उत्तमच. नाहींपेक्षां त्यांनीं आपल्या **' इन्डियन नॅशनल डिफेन्स लीग '**ची स्थापना लवकर करून तीमार्फत हिंदी तरुणांस लष्करी शिक्षणाची गोडी लावावी व यू. टी. सी., इंडियन टेरिटोरियल व रायफल क्लब्ज, यांसारखीं जेवढीं लष्करी शिक्षणाचीं साधनें उपलब्ध आहेत, त्यांचा पूर्ण फायदा घेऊन लष्करी शिक्षणाच्या प्रसारास सहाय्यभूत व्हावें, हें एकच कार्य त्यांच्या हातून शेवटास गेलें तरी ती त्यांची देशसेवा उच्च प्रतीचीच समजण्यांत येईल याविषयीं संशय नाहीं."

याच सुमारास पुणे येथें निरनिराळें पुढारी १।२ महिने येतच होते. त्यांनाहि भेटून लीगची योजना समजावून सांगण्यांत आली. त्यांपैकीं बहुतेकांना ही योजना पसंत पडली. या अवधींत सुमारें ३०० निरनिराळ्या

कार्यकर्त्यांना या कामाची माहिती देण्यांत आली, व लीगच्या कार्याचें क्षेत्र समजावून सांगण्यांत आलें. लीगचें कार्य **पक्षातीत व राजकारणापासून अलिप्त** कसें आहे याची प्रत्यक्ष माहिती देण्यांत आली व कार्याचा मुख्य भर प्रारंभीं **शैक्षणिक व माहिती देण्यावरच** कसा आहे हेंहि समजावून सांगण्यांत आलें. या प्रकारचें काम प्रत्यक्ष भेटूनच प्रारंभीं करणें भाग पडलें. या कामास जून व जुलै हे दोन महिने लागले. याच अवधींत लीगची योजना ( ता. १० जुलै १९३२ ) रोजीं छापवून घेण्यांत आली. व ती प्रथम पुणें येथें भरलेल्या **सर्वपक्षीय परिषदेंत** वांटण्यांत आली. या दोन महिन्यांत ज्या मंडळींच्या गांठी घेतल्या; त्यांच्यांतील कांहीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत:—ना. शास्त्री, पं. कुंझरू, श्री. देवधर, तपस्वी परांजपे, महात्मा गांधी, जयराम दौलतराम, सौ. सरोजिनी नायडू, पं. मदनमोहन मालवीय, राजाबहादूर गोविंदलाल मोतीलालजी, श्री. सी. राजगोपालाचारी वगैरे.

याच सुमारास ( जुलै अखेरीस ) लो. टिळक पर्स फंडाचें नागपूर, पुणें व कर्नाटक येथील ट्रस्टींना समक्ष भेटून प्राथमिक कार्याला द्रव्यसहाय्य करण्याची विनंति करण्यांत आली. पुणें ट्रस्टनें ५०० रुपये मंजूर केले.

याच्या आधी पुणें ट्रस्टकडे अर्ज करतांना सर्व कल्पना श्री. केळकर यांना सांगितलीच होती. तिला अनुसरून त्यांनीं 'केसरी'चा जो लोकमान्य अंक ता. १ ऑगस्टला काढला त्यांत **'लष्करी-शिक्षणसंस्था'** या मथळ्याखालीं एक प्रास्ताविक लेख लिहिला. यानंतर व याच्या थोडेसें आधीं संस्था काढण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या पक्षांतील पुढाऱ्यांशीं विचारविनिमय चालूच होता व त्यांची एक प्रास्ताविक सभा बोलावणें इष्ट होतें. यासाठीं **ता. २१ ऑगस्ट १९४२** रोजीं एक सभा सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटींत कै. बाबासाहेब देवधर यांच्या खोलींत झाली. या सभेस कै. बाबासाहेब देवधर, श्री. न. चिं. केळकर, श्री. सरदार ऑ. जगन्नाथ महाराज पंडित, रा. ब. रा. रा. काळे, एम्. एल. सी., रा. ब. जी. के. चितळे, एम. एल. सी., श्री. पी. कोदंडराव, सेक्रेटरी सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, श्री. द. वि, आपटे, प्रो. द. वा. पोतदार, कॅप्टन मोडक, तपस्वी बाबासाहेब परांजपे अशी मंडळी हजर होती.

या सभेंत मुख्यतः पुढील गोष्टी ठरविण्यांत आल्या.

( १ ) संस्थेचें काम मुख्यतः माहिती देण्याचें राहील व संस्थेच्या पुढील प्रारंभींचें कार्य सैन्यासंबंधीं माहिती देण्याचें व संरक्षणाचें प्रश्नाचा मामुली पद्धतीनें–सदीप व्याख्यानें, लेख वगैरे–प्रचार करण्याचें राहील. ही संस्था रजिस्टरहि करण्यास हरकत नाहीं.

( २ ) या संस्थेचा दुसरा उद्देश कांहीं विवक्षित प्रकारची शिस्त व कुवत अंगीं आणण्याची खटपट करण्याचा असावा.

( ३ ) संस्थेस प्रथमतः मुंबई इलाख्यांतील निरनिराळ्या मतांच्या लोकांचें एक प्रास्ताविक मंडळ करावें व नंतर अखिल भारतीय संस्थेंत त्याचें रूपांतर करावें.

( ४ ) पुढील सभासदांचें 'प्रवर्तक मंडळ' (Organising Committee) असावें. श्री. न. चिं. केळकर, कै. गो. कृ. देवधर, श्री. पी. कोदंडराव, सेक्रेटरी, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी; रा. बा. रा. रा. काळे, अॅड्व्होकेट, एम्. एल. सी., ऑ. सरदार श्री. जगन्नाथ महाराज; प्रो. द. वा. पोतदार, कॅ. ग. वा. मोडक; श्री. न. गं. आपटे ( निमंत्रक ).

वरील प्रवर्तक मंडळानें लीगच्या कार्याचा पुढील आराखडा मान्य केला.

## आवश्यकता

**( १ ) संरक्षणाची जबाबदारीः–**" हिंदुस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी हळूहळू हिंदी लोकांनींच जास्त जास्त प्रमाणांत स्वीकारली पाहिजे." असा गोलमेज परिषदेनें अभिप्राय दिल्यामुळें या दिशेनें प्रयत्न करणें आवश्यक आहे.

**( २ ) कर देणारावरील कराचा बोजा हलका होण्याचा संभवः–** हल्लीं असें सांगितलें जातें कीं, आमचे लायकीचे दृष्टीनें ब्रिटिश ऑफिसर काढून टाकणें अशक्य आहे. वादाकरतां हा मुद्दा गृहीत धरला तरी त्यावरून लष्करांतील इतर ब्रिटिश नोकरांची किंवा ब्रिटिश शिपायांची आवश्यकता सिद्ध होत नाहीं. ब्रिटिश शिपायांना येथील हवापाणी मानवत नाहीं; व त्यामुळें ते येथें राहण्यास अपात्र आहेत; ब्रिटिश शिपाई युरोपमध्यें तेथील हवापाण्याचे परिस्थितींत काम करावयास पूर्ण समर्थ व लायक

असेल व तेथें खर्चहि कमी येत असेल परंतु, ऊष्ण कटिबंधांत असणाऱ्या आपल्या देशांत त्याच्यासारख्या थंड प्रदेशांत जन्मलेल्या शिपायाला नोकरीवर ठेवणें कधींहि स्वस्त पडणार नाहीं. व हवापाण्याच्या फरकामुळें तो येथें लायक व कार्यक्षमहि ठरणार नाहीं, त्याची प्रकृति उत्तम राहील अशी व्यवस्था करण्यासाठीं साहजिकपणें त्याच्यावर येथील उष्णतेंचे परिणाम होऊं नयेत म्हणून त्याविरुद्ध उपाययोजना करण्यासाठीं खूप खर्च करावा लागतो. वायव्य सरहद्द प्रांतासारख्या डोंगराळ प्रदेशामधून वावरण्याची ब्रिटिश शिपयांना संवय नसल्यामुळें त्या खात्यावर खूपच खर्च करावा लागतो व त्या मानानें कार्य मात्र निकृष्ट दर्जाचें होतें. विरुद्ध असणाऱ्या देशप्रकृतिमानाशीं झगडण्याकरितां व त्यामुळें त्रास होऊन ब्रिटिश शिपायाची शक्ति कमी होऊं नये म्हणून जवळ जवळ तीस कोट रुपये खर्च करण्यांत येतात. ब्रिटिश शिपाई बदलतां आला तर कर देणाराचें हे तीस कोट रुपये वांचवितां येतील.

लायक व कर्तृत्वज्ञान संरक्षक शक्ति उत्पन्न होईल अशा दृष्टीनें राष्ट्रास जे गुण आवश्यक आहेत ते वाढविण्याकरितां कार्यक्रम आंखला गेला पाहिजे. लीगतर्फे आम्ही पुढील कार्यक्रम राष्ट्रापुढें ठेवीत आहो.

### ( ३ ) शिक्षण

**हिंदी जनतेचा** लष्कराचें कारभाराशीं कधींच संबंध येत नसल्यामुळें स्वाभाविकपणें तिच्यांत लष्कराविषयीं अनास्था उत्पन्न झाली आहे. या अनास्थेमुळें लष्कराबाबतचें अज्ञान निर्माण झालें असून जनता त्याविषयीं विचारहि करीनाशी झाली आहे. लष्कराबाबतच्या बिकट प्रश्नाविषयींहि अशीच स्थिति आहे. भरपूर समजूतदार नागरीक लष्करांत दाखल व्हावेत अशी इच्छा असेल तर लष्कराविषयींच्या संपूर्ण माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. ही माहिती असणारा नागरीक उत्तम राष्ट्रीय संरक्षक शिपाई होऊं शकेल. म्हणून नागरिकांना अशा प्रकारचें शिक्षण देणें व लष्कराविषयींची माहिती त्यांना पुरविणें आवश्यक आहे.

हल्लीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें लष्करी खर्चाच्या अंदाजपत्रकाबाबत मत देण्याचा हक्क नसतांहि ( Non-Votable ) बरेचसे

सभासद बारकाईनें लक्ष घालून वादविवाद करतांना आढळून येतात. त्यांनीं त्यांत अधिकाधिक लक्ष घालावें, म्हणून त्यांना अंदाजपत्रकांतील आंकडे व तत्संबंधींची शास्त्रीय माहिती पुरविणें अगत्याचें आहे. त्याचें सहाय्यानें ते सरकारकडून जास्त तपशील विचारून घेऊं शकतील, जास्त सवलती मिळवूं शकतील व सरकारवर वजन पाडून लष्करी खर्चांत छाटाछाट करावयास भाग पाडूं शकतील. या माहितीच्या योगानें ते लष्करावरील ताबाहि जास्त जास्त मिळवूं शकतील व लष्करी खर्चाच्या महत्त्वाच्या बाबीवर मत देण्याचा हक्कहि प्राप्त करून घेऊं शकतील.

**रायफल क्लब**विषयींची जनतेमधील आवड व **लष्करच्या हिंदीकरणाच्या प्रश्नाविषयीं** जनतेकडून दाखविला जाणारा उत्साह यांवरून कालानुरूप उत्पन्न झालेल्या जबाबदारीची जाणीव जनतेंत उत्पन्न झाली आहे असें मानावयास कांहींच हरकत नाहीं. **सेवासमिति, बॉय-स्काऊट, हिंदुस्थानी सेवादल** या व इतर अशाच धर्तीच्या इतर निरनिराळ्या संस्था जनतेची या कार्यांत लक्ष घालावयाची वृत्तीच दर्शवितात. जनतेला फक्त शास्त्रीय माहिती व मार्गदर्शकत्वाची आवश्यकता आहे व '**लीग**' तें काम करूं इच्छित आहे.

'**लष्करी इतिहास व युद्धशास्त्र** (Military History and Military Science) हे विषय इंग्लंडप्रमाणें आपल्या देशांतील कांहीं विश्वविद्यालयांनींहि परीक्षेकरितां अभ्यासक्रमांत दाखल केले असल्यामुळें बाकीच्या विश्वविद्यालयांनींहि तसेंच करावें व विद्यार्थ्यांमधून त्या विषयाची आवड उत्पन्न व्हावी अशी खटपट करणें अवश्य आहे.

इंग्लंडमधील अठरा युनिव्हर्सिट्यांमधून 'लष्करी इतिहास व युद्धशास्त्र' हे विषय शिकविले जातात; व त्यांतील प्रायोगिक भाग ऑफिसर्स ट्रेनिंग कोअरममध्यें शिकविला जातो. लष्करी खात्यांत निदान शंभर जागा तरी या शिक्षितांना दिल्या जातात आणि टेरिटोरिअल्स व रिझर्व्हमध्येंहि त्यांना जागा देतात. हिंदुस्थान सरकारनेंहि अशाच प्रकारचें धोरण ठेवावें म्हणून येथील सर्व शिक्षण संस्थांना त्या दृष्टीनें सल्ला देणें, मदत करणें, व त्यांनीं तशा व्यवहार्य दृष्टीनें आपला शिक्षणक्रम आंखावा अशी खटपट करणें आवश्यक आहे.

अल्प प्रमाणांत कां होईना हिंदुस्थानांतील सुशिक्षित नागरिकांना लष्करांतील कमिशन्ड ऑफिसर्स म्हणून घेण्यांत येऊं लागलें आहे. हिंदुस्थानांतील लष्करांत हिंदीकरणाचें दृष्टीनें, लायक अशा हिंदवासीयांना जास्त जागा मिळतील अशी खटपट करणें व त्याकरितां उपाय योजणें आवश्यक आहे.

खर्च कमी करावयाच्या दृष्टीनें, संरक्षणाची लायकी वाढविण्याचें दृष्टीनें **टेरिटोरिअल्सची** व **रिझर्व्हची** संख्या वाढविणें हितावह होणार आहे. यामध्यें बरेचसें अडथळे येतील; परंतु हे अडथळे जर दूर करतां आले तर तिजोरीवरील खर्चाचा बोजा हलका होऊन जनतेची संरक्षणशक्तीहि वाढेल.

पूर्वीच्या हिंदुस्थानच्या इतिहासाकडे लक्ष दिलें असतां व बाहेरच्या जगाकडे लक्षपूर्वक पाहिले तर असें दिसून येईल कीं, **देशाचें संरक्षण करावयाची लायकी** आपणांमध्यें निर्माण करावयाची असेल तर आपणांस पुष्कळच तयारी करून आपला दर्जा वाढवावयास पाहिजे आहे. तसें केलें तरच आपण आपल्या देशाचें संरक्षण करावयास लायक ठरूं. वरील गोष्टी साध्य करण्यासाठीं 'नॅशनल सर्व्हिस लीग ऑफ इंग्लंड'चें धर्तीवर **लीग** स्थापन करावयास पाहिजे. त्या लीगचा **कामचलाऊ कार्यक्रम** खालींलप्रमाणें ठेवावाः—

( १ ) आपल्या देशाच्या संरक्षणास आवश्यक असलेल्या साधनांची व पद्धतींची माहिती पुरविणें.

( २ ) खालील मार्गांनीं हल्लींच्या हिंदुस्थानांतील व परदेशांतील निरनिराळ्या संरक्षणाच्या पद्धतींची माहिती जनतेस करून देणें—लेख, व्याख्यानें मॅजिकलँटर्न, सिनेमा, मिरवणुकी वगैरे.

( ३ ) हिंदी लष्कर, आरमार व वैमानिक दलांत दाखल होऊं इच्छिणाऱ्या लायक नागरिकांना प्रवेश मिळवून देण्याच्या बाबतींत खटपट करणें.

( ४ ) जनतेंत लष्करी, आरमारी व वैमानिक शिक्षणाची आवड उत्पन्न व्हावी म्हणून त्या शिक्षणाची व्यवस्था करणें व शाळांतून, कॉलेजांतून किंवा इतर संस्थांमधून हल्लीं शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्यें लष्करांत दाखल होण्याची आवड उत्पन्न करावयाच्या दृष्टीनें त्यांच्यांत लष्करांत दाखल होण्यास आवश्यक असलेल्या गुणांचीं वाढ होईल अशी खटपट करणें.

(५) लष्कराबाबतच्या माहितीचें वाङ्मय लोकांना समजावें म्हणून देशी भाषांमधून तें प्रसिद्ध करणें.

(६) युनिव्हर्सिट्यांनीं आपल्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांत युद्धशास्त्र हा विषय दाखल करावा अशी खटपट करणें.

(७) लष्करी धर्तीवर शिक्षण घेण्याची इच्छा असणारांकरितां शास्त्रीय व शारीरिक शिक्षणाची व्यवस्था एक मध्यवर्ती शाळा स्थापून करणें.

(८) मिलिटरी सायन्सबाबतच्या पुस्तकांचें एक मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करणें.

(९) या विषयाची गोडी असणाऱ्या बुद्धिमान् नागरिकांकरितां लष्करी प्रश्नांचा अभ्यास करावयाचें दृष्टीनें व त्याची आवड इतरांत उत्पन्न व्हावी म्हणून लहान लहान (स्टडी सर्कल्स) अभ्यासमंडळें काढणें.

(१०) भागशः किंवा पूर्णपणें अशाच प्रकारचें कार्य करणाऱ्या संस्थाशीं सहकार्य करणें.

(११) लीगचें ध्येय साध्य होण्याच्या दृष्टीनें सरकारी खातीं, लष्कर, आरमार वैमानिक खातें, लष्करी तज्ज्ञ, जनतेचें पुढारी, खाजगी वर्तमानपत्रें, मासिकें, युनिव्हर्सिटी व इतर इष्ट वाटणाऱ्या संस्थांबरोबर सहकार्य करणें.

(१२) युद्धशास्त्राचे अभ्यासासाठीं एखाद्या मध्यवर्ति ठिकाणी सुट्टीचें वर्ग चालविणें ( Vacation Classes ).

(१३) लीगची माहिती देण्यासाठीं एक मासिक चालविणें.

(१४) सभा, संमेलनें, परिषदा, सफरी, वगैरे निरनिराळ्या प्रसंगांनीं मंडळीं एकत्र जमवून लष्कराबाबतच्या चालू परिस्थितीची माहिती जनतेस करून देणें व त्यांचें लक्ष या प्रश्नाकडे जाईल अशी खटपट करणें.

(१५) हिंदुस्थानांतील व परदेशांतील लष्कराच्या रचनेंची माहिती जनतेस करुन देणें.

(१६) रायफल क्लब व एअरगन क्लब स्थापन करणें व इतरांना ते स्थापन करण्यासाठीं प्रोत्साहन देणें.

(१७) जिल्हा, तालुकानिहाय संस्थेच्या शाखा स्थापून त्यांच्या स्थानिक प्रश्नांसंबंधीं माहिती त्यांना पुरविणें.

